८०

ई. सन १८८०.

# MUKTAMÁLÁ,

## A NOVEL

COMPOSED

BY

AXMAN MORESHWAR SHÁSTRÍ HALBE

SIXTH EITDION.

Bomba

PRINTED AND PUBLISHED BY
SAKHARAM PARASHURAM PANDIT
AT THE "INDU-PRAKASH" PRESS.

1890.

*Price Rs.* 1 *As.* 2.

# मुक्तामाला.

ही कादंबरी

लक्ष्मण मोरेश्वर शास्त्री हळबे

ह्यांनीं

रचून तयार केली.

आवृत्ति सहावी.

मुंबईत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत सखाराम परशुराम पंडित यांनीं छापून प्रसिद्ध केली.

सन १८९०.

किंमत एक रुपया दोन आणे.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

आमच्या देशांत इंग्रजी राज्य झाल्यापासून अनेक उपयुक्त विषयांवर ग्रंथ मराटींत होऊं लागले व लोकांत विद्येचा प्रसारही होत चालला. ह्या सत्कृत्याची सरकारानें आपला उदार हस्त वर केल्यामुळें उत्तरोत्तर वृद्धि होत चालली. पूर्वीं आमच्या लोकांस मराठी भाषा शिकणें हें थट्टेसारखें वाटत होतें; परंतु हल्लीं ती भाषा शिकून तींत ग्रंथ लिहिणें हें साधारण कृत्य आहे असें नाहीं, अशी बहुतेकांची खात्री झाली आहे. तरी आमच्या लोकांस स्वभाषेंतील पुस्तकें व वर्त्तमानपत्रें वाचण्याची जितकी गोडी लागावी तितकी अद्यापि लागली नाहीं असें मला वाटतें. तर लोकांस स्वभाषेंतील पुतस्कें वगैरे वाचण्याची गोडी लागावी ह्या हेतुनें यथामति हा ग्रंथ तयार केला आहे. ह्यांतील विषय नीतिपर व उपदेशपर अशा प्रकारचा असून तो वाचतानां चित्तास आनंद देण्यासारखा आहे. तर सकल विद्वज्जनांस अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं ह्या ग्रंथांत ज्या कांहीं चुका झाल्या असतील त्यांची माफी करून, आपला उदार आश्रय द्यावा.

# दुसऱ्या आवृत्तिची प्रस्तावना.

पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत आमच्या लोकांस स्वदेशीय भाषेंतील पुस्तकें वाचण्याची जितकी गोडी लागावी तितकी अद्यापि लागली नाहीं असें लिहिलें होतें; परंतु त्या काळांत व या काळांत बराच फेर पडला असें या लहानशा पुस्तकाची पहिली आवृत्ति थोडक्याच काळांत संपल्यावरून व दुसऱ्याही कितीएक कारणांवरून सिद्ध झालें, तेणेंकरून मनास उत्तेजन येऊन या दुसऱ्या आवृत्तींत कितीएक ठिकाणीं बराच फेरफार केला व एक सहावा भाग अगदींच नवीन घातला असें वाचणारांस दिसून येईल. तर या आवृत्तीसही विद्वज्जनांनीं मान दिला असतां सहजच असलीं दुसरीं पुस्तकें लिहिण्यास उमेद येईल.

लक्ष्मण मोरेश्वर शास्त्री.

ता० १० फेब्रुआरी सन १८७०.

शुद्धिपत्र.

| पान | अशुद्ध | शुद्ध |
| --- | --- | --- |
| १५१ | भाग ७ | भाग ८ |

# अनुक्रमणिका.

## भाग १

पृष्ठ १ पासून ९ पर्यंत.

ऋतुवर्णन. भद्रसेन राजाचा ज्येष्ठपुत्र भयानक ह्याचें वर्णन. तो गादीवर येतांच त्याच्या दुष्टमंत्र्यांची योजना. त्याची दुष्ट कारकीर्द. दुय्यम प्रधान धनशंकर ह्याचें वर्णन. भयानकाच्या मंत्र्यांचीं पैसा उभारण्याविषयीं निरनिराळीं मतें.

## भाग २

पृष्ठ १० पासून २१ पर्यंत.

ऋतुवर्णन. धनशंकराचा सासरा शांतवर्मा ह्याचें इरावतीनामक नगरींत मुक्तामालेच्या गर्भाधानसंस्काराचा समारंभ. शांतवर्मा, शुक्राक्ष व सोमदत्त ह्यांचा परस्पर संबंध. भयानकराजाची जुलमी कारकीर्द, व तिजमुळें माजी कारभारी व सरदार, ह्यांखेरीज जहागीरदार ह्यांचे गुप्त विचार. राजाचें शिकारीस गमन.

## भाग ३.

पृष्ठ २२ पासून ४४ पर्यंत.

माजी कारभारी वगैरे लोकांचा, राजा शिकारीहून परत येत असतां त्यास पकडण्याचा बेत. शुक्लाक्ष हजार स्वारांनिशीं राजास मदत गेल्यामुळें बंडवाल्यांचा मोड. बंडांतील बंदिवानांची चौकशी व त्यांस शिक्षा. आपणास चुलत्याची सर्व संपत्ति व जहागीर मिळावी ह्मणून त्याचा जावई धनशंकर व कन्या मुक्तामाला ह्यांस ठार मारण्याविषयीं शुक्लाक्षाचें कारस्थान धनशंकरास जन्मठेपेची शिक्षा.

---

## भाग ४.

पृष्ठ ४५ पासून ७० पर्यंत.

इरावती येथील वटसावित्रीचा समारंभ. शुक्लाक्षाचें शांतवर्मा ह्यास पत्र. मुक्तामालेचा पति बंदांत पडल्यामुळें शोक. धनशंकराचे बंदांतील हाल व शोक. राजाच्या जुलमी क्रमाची वृद्धि व बंडवाल्यांच्या कटाची वढती शुक्लाक्षाची, मुक्तामालेस मारण्याकरितां पंचाक्षरी बोवांची योजना. पतीस बंदांत जाऊन भेटण्याचा मंत्र सिद्ध करून घेण्याकरितां मुक्तामालेचें घरांतून बाहेर पडून गुहेंत गुंतून पडणें. शुक्लाक्षानें धनशंकरास बुडवून मारल्याचें वर्णन. मुक्तामालेचा थांग नसल्यामुळें शांतवर्मा व सोमदत्त ह्यांचा शोक सोमदत्ताचें तिच्या शोधाकरितां निघून जाणें.

## भाग ५.

पृष्ठ ७१ पासून ९९ पर्यंत.

पंचाक्षरी बावाचें कपट. मुक्तामालेस मारण्याकरितां शुक्लाक्षाचें गुहेकडे जाणें. मुक्तामालेस रात्रौ रानांत शुक्लाक्ष धरीत असतां त्यास लाथ मारून गुलालसिंगाचें सोडविणें. पठाणाचा पोषाक करून मुक्तामाला व गुलालसिंग हीं उभयतां स्वार होऊन उज्जनीकडे जातात. शुक्लाक्ष व शांतवर्मा ह्यांची भेट. शांतवर्मा ह्यांबरोबर आपणही झाल्या गोष्टीचा खेद दाखवून मुक्तामालेच्या शोधाच्या मिषानें त्याचें बाहेर पडणें.

---

## भाग ६.

पृष्ठ १०० पासून ११५ पर्यंत.

गुलालसिंग व मुक्तामाला यांस पकडून तुरुंगांत टाकण्याचा प्रकार. मुक्तामाला तुरुंगांत पडल्ये. मुक्तामाला व बादशाहाची कन्या यांचा परस्परांवर प्रेमा, शुक्लाक्ष व बादशाहा यांस फसवून मुक्तामालेचें तुरुंगांतून पळून जाणें. बादशाहानें मुक्तामालेस ( पठाणास ) पकडण्याविषयीं स्वार पाठविल्याचा प्रकार. मुक्तामाला न सापडल्यामुळें स्वारांचें परत येणें.

---

## भाग ७.

पृष्ठ ११६ पासून १५० पर्यंत.

मुक्तामालेस उज्जनींत पुत्र होणें. तेथील मामलेदार भद्राक्ष ह्याची मुक्तामालेवरील पापवासना. त्याचे त्रासानें ती बाहेर पडली असतां रस्त्यांत सोमदत्ताची व तिची भेट. ती पुनः भद्राक्षाचे हातीं सांपडून तिची दुःखकारक स्थिति. शांतवर्मा ह्याचें तीर्थयात्रेस जाणें. शुक्लाक्ष व भद्राक्ष ह्यांचा संगम, सोमदत्ताचा बंदिखान्यांत वास. मुक्तामालेच्या मुलाची व तिची ताडातोड. शुक्लाक्षाची घोर कल्पना. मुक्तामालेस पेटींत घालून पुरणें व तिच्या मुलास डोहांत बुडविणें. शुक्लाक्षाचें कृतकृत्य होऊन उज्जनींतून निघणें.

---

## भाग ८.

पृष्ठ १५१ पासून १७९ पर्यंत.

सोमदत्ताची बंदांतून सुटका. त्याचें जिवावरील संकट. शुक्लाक्षाचें इरावतीवरून राजधानींत येणें. मुक्तामालेच्या बालकाचें गुलालसिंगाचे बहिणीस सांपडणें मोठ्या चमत्कारिक प्रकारानें सोमदत्ताची व मुक्तामालेची भेट.

---

# भाग ९.

पृष्ठ १८०पासून २३१पर्यंत.

मुक्तामाला क्षिप्रा नदीचे बेटांत येऊन पडण्याचें कारण. सोमदत्ताचा दुःखदायक इतिहास. उभयतांची तेथून सुटका. फार दुःख भोगून त्याची व शांतवर्मा ह्यांची भेट. पतीच्या वर्तमानामुळें मुक्तमालेचा विलाप. मोठ्या विलक्षण प्रसंगीं ह्यांची व धनशंकराची भेट. धनशंकराचा इतिहास. मुक्तमालेचा व तिच्या मुलाचा संगम. भयानक पदच्युत होऊन विशालाक्षाचे गादीवर येणें. धनशंकराची प्रधानाचे द्वारें राजाची भेट. सर्व अपराध्यांच्या चौकशीकरितां भव्य तयारी. सर्व हकीकतीविषयींचें सोमदत्ताचें संभाषण. आणि अपराध्यांस शिक्षा.

# मुक्तामाला.

## भाग १.

॥ श्लोक. ॥

मंत्री तसेच नृप दुष्ट जगांत होती
नानापरी मग जनांप्रति पीडिताती ।
होती मदांध न सुचे सुविचार त्यांशी
नाना मिषें करुनि नागविती प्रजांशीं ॥

पर्जन्यकाळ समाप्त होऊन हिंवाळ्यास आरंभ झाला ह्मणजे पर्वतशिखरावरून प्रातःकाळीं पाहिलें असतां पृथ्वीवरील फारच मनोरंजक चमत्कार दिसतो. तो असा कीं, निरनिराळ्या धान्यांचीं शेतें, कांहीं फुललेलीं व कांहीं पिकास आलेलीं; आंबे, नारळी, पोफळी इत्यादिकांचीं बनें; बागा, रानें ह्यांखेरीज मार्गाच्या दोहीं बाजूंस वृक्षांच्या रांगा इत्यादिकेंकरून जो पृथ्वीचा भाग आपल्या नजरेस येतो, तो सर्व गजबजून गेला आहे असे दिसतें, व त्यामुळें पृथ्वीवर चित्रविचित्र रंगाचा एक गालिचाच पसरला आहे कीं काय, असा भास होतो. दोहीं थडींनीं भरून चाललेल्या नदीचा नागमोडीसारखा पट्टा ह्याचो तर फारच शोभा दिसते. कितीएक ठिकाणीं तलाव असतात. त्यांत अनेक प्रकारच्या रंगांचीं कमळें उमलेलीं असल्यामुळें ते दुसऱ्या सुशोभित पदार्थांपेक्षां पहाणाराचे चित्तास अतिशय

आनंद देतात. शहरें व खेडींपाडीं ह्यांचा एक निराळाच चमत्कार दिसतो. तो असा कीं, कांहीं धुकें, प्रातःकाळीं चुली पेटल्यामुळें उत्पन्न झालेला धूर व झाडें ह्यांत त्यांतील वाडे व घरें इत्यादि गुंडाळलेलीं आहेत कीं काय असें वाटते. हा पृथ्वीवरील आनंददायक चमत्कार पहाण्याकरितां देवळें व मनोरे ह्यांनीं वृक्षांतून वरचे बाजूस आपलीं डोकीं वर काढिलीं आहेत कीं काय असा भास होतो.

जों जों आपण बारीक दृष्टीनें देखून पाहावें, तों तों निरनिराळ्या प्रकारचे चमत्कार दृष्टीस पडूं लागत. लोक आपल्या उद्योगास लागले आहेत असें दिसून येतें. पांथस्थ लोक कितीएक पायीं, कितीएक घोड्यांवरून व कितीएक गाड्यांतून, निरनिराळ्या मार्गानें जात येत आहेत. शेतकरी व गुराखी आपापले बैल व गुरें घेऊन गांवचे चोंहीकडून बाहेर पडत आहेत. कितीएक धान्य, गवत, लांकडें, भाजीपाला वगैरे जिन्नस विकण्याकरितां निघाले आहेत. कितीएक नदीवर व कितीएक ओढ्यावर जात आहेत. कितीएक एकमेकांस आरोळ्या देत आहेत. त्यांत अनेक प्रकारच्या पक्ष्यांचे ध्वनि मिसळून एकच किलकिलाट होऊन गेला आहे, असें ऐकण्यांत येतें. जिकडे नजर फेकावी तिकडे अशाच प्रकारचा चमत्कार दिसूं लागतो. कांहीं जवळ व कांहीं लांब असे जे पर्वत दिसतात त्यांजकडे लक्ष देऊन पाहिलें असतां एक निराळाच चमत्कार दिसतो; तो असा कीं, कांहीं ठिकाणीं दरी असतात, कांहीं ठिकाणीं

लहान मोठे कडे तुटलेलेअसतात, कांहीं ठिकाणीं दाट व भयंकर झाडी असते, कोठें विरळ वृक्ष, कोठें नुस्तें गवत व कोठें पाषाणच इत्यादि प्रकारचा भव्य चमत्कार दिसण्यांत येतो. सारांश अशा प्रकारचा अद्भुत चमत्कार वारंवार पहात जावा, कारण तेणेंकरून चित्तास अतिशय आनंद होऊन, ज्या जगन्नियंत्या परमेश्वरानें ही सृष्टि निर्माण करून अशा दशेस आणिली, त्याकडे लक्ष लागतें. मग अर्थातच आपणास इहलोकीं व व परलोकींही सुख होतें.

ईश्वरी नियमास अनुसरून जे लोक नीतीनें वागतात, त्यांस कितीही संकटें प्राप्त झालीं तरी, तीं सर्व दूर होऊन त्यांस शेवटीं सुखच होतें. ही गोष्ट स्पष्टपणें ध्यानांत येण्याकरितां एक इतिहास लिहितों. त्यावरून लोकांची वरील सिद्धांताविषयीं खात्री होऊन ते आपली वाईट वर्तणूक असल्यास, ती नीट करण्याविषयीं झटूं लागतील असें वाटतें.

प्राचीन कालीं **जयपूर** नामक नगरींत **भद्रसेन** राजा राज्य करीत होता. त्यास दोन पुत्र होते वडिलाचें नांव **भयानक** व कनिष्ठाचें **विशालाक्ष.** भयानकांचें वय पंचवीस वर्षांचें व विशालाक्षांचें वीस वर्षांचें होतें. भद्रसेनानें व त्याचे पूर्वजांनीं आपल्या शहाणपणाच्या व शौर्याच्या बलानें आपलें राज्य उत्तम दशेस आणून वाढविलेंही होतें. प्रधान व इतर कारभारी लोक शहाणे, नीतिमान् व विचारी अशा प्रकारचे योजून त्यांचा तो आदरसत्कार वगैरे योग्य रीतीनें ठेवीत असे.

v Imp.

तेणेंकरून सर्व प्रजा सुखी असून राजाचें कल्याण चिंतीत असे. आसपासच्या राजेरजवाड्यांत जयपूर येथील राजाचा मोठा दरारा असे. कारण येथील राजा नीतिमान् असून शूर, प्रधानादि कारभारी आपआपल्या कामांत दक्ष, फौजेवरील सरदारांची अशाच प्रकारची योजना, अशा कारणानें इतर राजांच्या मनांत हेवा उत्पन्न होई, परंतु त्यांचें कांहीं चालत नसे.

Char ✓ **भयानक** हा क्रूर, अविचारी, दुर्व्यसनी व अक्षरशून्य अशा प्रकारचा होता. त्याचे पित्यानें त्यास राजनीति, विद्या वगैरे सद्गुण शिकाविण्याविषयीं फार मेहनत घेतली; परंतु लाडामुळें त्यास आईची फारच फूस सांपडे व हाही कांहींसें दुर्लक्ष करी. सुमारें सोळा वर्षांचा झाला तेंव्हांपासून तो मनास वाटेल त्याप्रमाणें आचरण करूं लागला. दुर्गुणी, व्यसनी व व्याभिचारी अशा तरुण पुरुषांची त्यानें संगति धरिली.

आपला पुत्र अशा प्रकारचा निघाला म्हणून भद्रसेनास अतिशय दुःख होई. व पुढें राज्याचा कोणत्या प्रकारचा परिणाम होईल, हें ही त्यास पक्केपणीं समजून आलें; परंतु नाइलाज, आतां त्यास उपाय राहिला नाहीं; होईल तें होओ, अशी मनाची समजूत करून शेवटीं ह्या पुत्राच्या काळजीनें झुरून तो मरण पावला. अंतकाळीं त्यानें पुत्रास जवळ बोलावून,ही वाईट वर्तणूक तू सोडून मी जे सुज्ञ कारभारी नेमिले आहेत त्यांच्या अनुमतें चाल वगैरे त्यास अनेक प्रकारचा सदुपदेश केला.

भयानक महाराज ह्यांची स्वारी गादीवर येऊन

शिक्के कट्यार वगैरे राज्याची अनीन त्यांचे स्वाधी-होतांच सहा महिन्यांचे आंत त्यानें आपल्या बापाच्या वेळचे सुज्ञ व चतुर कारभारी दूर केले, आणि आपले दुष्ट व अविचारी सोबती ह्यांस त्या मोटमोठ्या अधिकारांच्या बहुतेक जागा दिल्या. सेनेंतही ह्याचप्रमाणें एकदम फेरफार करून टाकिला. हें ऐकून जहागीरदार, संभावीत लोक, व्यापारी, सावकार वगैरे सर्व प्रजस मोठी काळजी उत्पन्न झाली. मोटमोठ्या अब्रुदार लोकांस असें वाटूं लागलें कीं, आज आपण बरे आहों, उद्यां काय होईल ह्याचा भरंवसा नाहीं. आपण मुख्य अधिकारावर आलों व आपल्या इच्छेस कोणीही प्रतिबंध करणार नाहीं असें पाहून जे भयानक ह्यांच्याशीं पूर्वीं बांकून होते त्यांचा त्यानें सूड उगविला, कितीएकांस बंदींत टाकिलें, कितीएकांस हद्दपार केलें, व कितीएकांचीं घरेंदारें लुटून त्यांस ठार मारिलें. भयानकाचे जे अत्यंत प्रियमित्र त्यांपैकीं **गदाधर** ह्यास त्यानें मुख्य प्रधानाची जागा दिली. **मदांधास** सेनापति केलें. **पिंगाक्षास** न्यायाधिशाची जागा दिली. **लोहाक्षास** दप्तरदार योजिलें, आणि **चक्राक्षास** खजीनदारीच्या हुद्यावर नेमिलें. ह्याखेरीज इतर जाग्यांचीही अशाच प्रकारें व्यवस्था केली. राजामध्यें जे गुण त्याच गुणांनीं प्रधानादि परिपूर्ण होते. राजा व प्रधानादि पंचक मिळून ही एक टोळीच बनली. त्या सर्वांचीं वयें व गुण फार जवळजवळ मिळत असत. विद्येंत पाहिलें असतां कोणास सही करतां यावी, कोणास

न यावी इतक्या प्रतीचे परिपूर्ण होते. अफू व गांज्या ह्यांखेरीज तर कोणासहा अम्मल करण्याची संवय नसे. हे अम्मल इतके वाढत गेले कीं, तें सर्व राजमंडळ डोळे लाल करून रात्रंदिवस धुंदींतच असे.

भयानक व त्याचें मंडळ ह्यांची कीर्ति सर्व देशांत गेली आणि तिनें दुर्व्यसनी व दुर्गुणी लोकांस जयपुरास येण्याविषयीं पाचारण केलें. नाच, तमाशे व बैठकी ह्यांचे सप्ताह होऊं लागले. "यथा राजा तथा प्रजा" ह्या ह्मणीप्रमाणें लोकांतही दुराचरणाची वृद्धि होऊं लागली. व्यभिचार, चोऱ्या, जुगार ह्यांचा अधिकाधिक प्रसार होत चालला; अशा प्रकारचे जेथे राजे, प्रधान व इतर मुख्य कारभारी आहेत, तेथें न्यायमनसुबा कोणत्या रीतीनें चालतअसेल हें लिहून कळविण्याची गरज नाहीं; परंतु एथें "भांगेंत तुळस" ह्या ह्मणीप्रमाणें दुय्यम प्रधान **धनशंकर** होता, त्यास ह्या राजमंडळाचा वर्तनक्रम अगदीं आवडत नसे व तो त्यांत मिसळतही नसे. अशा प्रकारचा मनुष्य एवढ्या मोठ्या हुद्यावर टिकला कसा, ही वाचणारांचे अंतःकरणांत सहज शंका येईल; परंतु त्याचें कारण असें कीं, भयानकानें जे आपले प्रियमित्र मोठमोठ्या हुद्यांवर नेमिले ते विद्वंत वगैरें किती हुशार होते हें मागें दर्शविलेंच आहे. तर ज्या वेळेस गदाधरास प्रधानकीचीं वस्त्रें मिळालीं त्यावेळेस त्यांनें, आपणास कांहीं माहिती नाहीं व कांहीं येत नाहीं असें समजून, महाराजांपाशीं रदबदली केली. आणि धनशंकराची जागा कायम राखली. ह्याचें वय

सुमारें वीस वर्षांचें होतें. तरी तो मोठा बुद्धिमान् व घरची शिक्षा चांगली ह्या कारणामुळें राजकीय कामांत हुषार, नीतिमान् दक्ष व सदसद्विचारी अशा प्रकारचा होता. हा १८ वर्षांचा असतांच ह्याचा बाप मरण पावला; परंतु ह्याचे सद्गुण व हुषारी पाहून भद्रसेनानेंच दुय्यम प्रधानाची जागा ह्यास मोठ्या आनंदानें दिली होती.

धनशंकराचे पूर्वजांनीं अनेक वर्षें मोठ्या विश्वासानें व नीतीनें सरकारी चाकरी करून मोठी अब्रु व संपत्तीही मिळविली होती. ह्यानेंही आपल्या पूर्वजां-प्रमाणेंच वागून अल्प वयांत त्याच प्रकारची कीर्ति मिळविली; परंतु आपल्या पूर्वजांप्रमाणें आपला शेवट कसा लागेल. ह्याविषयींचे विचार त्याचे ममांत वारं-वार येऊं लागले; कारण हल्लीं तर सर्व मनुच फिरून गेला आहे, ह्यांत आपला निभाव लागणें कठीण. केव्हां कोणत्या प्रकारचें किटाळ आपल्यावर येईल हें समजत नाहीं. तर समजून उमजून पूर्वींच राजी-नामा देऊन स्वस्थपणें बसावें, ह्यांतच आपली अब्रु राहील असें त्यास वाटूं लागलें. सासऱ्याचे पत्रावरून त्यानें **शुक्राक्षास** बंदिखान्याचे कामावर नेमिलें होतें. तें काम मिळून सहा महिने झाले नाहींत तोंच, तो ह्या राजमंडळांत मिसळून त्यांचे गुणांत चांगलाच प्रवीण झाला, असेंही त्याचे दिसण्यांत आलें. प्रजेवर जुलूम व कोठेंही अन्याय न व्हावा ह्या गोष्टीविषयीं हा फार झटत असे; परंतु भयानकाचें उग्र स्वरूप व गदाधराची गदा

जेथें प्रगट होई तेथें मात्र ह्याचा उपाय चालत नसे. तरी हा कामावर असल्यामुळें, फारशी अव्यवस्था व अन्याय होत नसे. कारण राजा आपल्या प्रधानादि मंडळीसह विलासांत व व्यसनांत रात्रदिवस गुंतून गेल्यामुळें, त्यांस राज्यकारभारांत मन घालण्यास बनत नसे. परंतु उत्तरोत्तर धनशंकराचे मनांत, मागें सांगितलेल्या कारणामुळें व राजमंडळाच्या अयोग्य वर्तणुकीमुळें अधिकाधिक त्रास येऊं लागला; तथापि शहरांतील व बाहेरील संभावित व सुज्ञ लोकांच्या आग्रहामुळें त्यास चाकरी सोडतां येईना. त्याचे मनांतील अभिप्राय कीं, ह्याचे जाग्यावर ह्या मंडळींतीलच कोणी दीड शहाणे यतील; मग सर्व एकमय झाल्यामुळें अनर्थ होईल. ह्याखेरीज धनशंकराचेंही मनांत असें येई कीं कारणावांचून आपण चाकरी सोडूं लागल्यास, आपल गांव व संपत्ति सुरळीतपणें हातीं लागून सर्व तडीस लागेल किंवा काय होईल ह्याचा भरंवसा नाहीं. असो; त्यानें ईश्वरावर भरंवसा ठेवून आपला सत्क्रम चालविला. राजाच्या वर्तनक्रमाची उत्तरोत्तर सर्व देशांत कीर्ति पसरून, वेश्या, तमासगीर, पैलवान् दुर्व्यसनी, लुच्चे, ढोंगी वगैरे लोकांची शहरांत गर्दी होऊन गेली. भयानकाची स्वारी गादीवर आली त्यावेळेस खजिन्यांत पांच कोटि रुपये शिलक होते, ते सुमारें तीन वर्षांत फस्त केले. मग आपल्या विलासांत व चैनींत पैशाच्या तोटयामुळें अडचण येऊं लागली असें पाहून, राजानें गदाधर, शुकाक्ष वगैरे मंडळीस, ह्यास काय तजवीज करावी,

ह्मणून प्रश्न केला. तेव्हां गदाधरानें फौज कमी करावी असें सांगितलें; मदांधानें धर्मखातें कमी करण्यास सांगितलें; शुक्राक्षानें प्रजेवर कर बसविण्यास सांगितलें; लोहाक्षानें मांडलिक राजांकडून करभार येतो तो दुप्पट करण्यास सांगितलें, आणि चक्राक्षानें सर्व कामदारांचा पगार कमी करण्याविषयीं व कांहीं अगदींच काढून टाकण्याविषयीं सुचविलें. असे अनेकांचे अनेक विचार ऐकून राजास मोठा आनंद झाला, आणि त्यांपैकीं बहुतेक विचार अंमलांत आणण्याचा त्यानें निश्चय केला.

# भाग २.

॥ श्लोक ॥

आनंदयुक्त असतां जन नीतिमार्गें
राजे दुराचरणि त्यां छळिती कुमार्गें ।
त्रासूनियां मिळुनि ते करिती विचार ॥
होतो पदच्युत कसा नृप दुष्ट फार ॥

वसंतकालास आरंभ होऊन बरेच दिवस झाल्यामुळें, बागा, रानें व डोंगर ह्यांतील वृक्षांस नवीन पालवी फुटली. तेणेंकरून त्यांची फारच रमणीय शोभा दिसूं लागली. आंबे, फणस, अंजीर, द्राक्षें इत्यादि वृक्ष चोंहींकडे फळांनीं थवथवल्यामुळें त्यांचीही एक मोटी मनोरंजक रचना दिसूं लागली. बागांतून व कितीएकांच्या गृहांतून, गुलाब, मोतिया, शेंवती, चमेली, जाई, वगैरे फुलझाडांस बार आल्यामुळें चोंहोंकडे मधुर सुगंध सुटूं लागला. कोकिला, मयूर, कीर इत्यादि पक्ष्यांच्या मंजुळ स्वरानीं आकाश भरून गेलें. मृगजल हें पाणीच आहे असें मानून आपली तृषा शांत करण्याकरितां हरिणांचे कळप रानांतून हिकडून तिकडे फिरूं लागले. कितीएक, पांथस्थ लोक उष्णतेमुळें त्रास पावून वृक्षच्छायेखालीं मंद शीतळ वारा घेत बसले. ह्याचप्रमाणें गुरांचे कितीएक कळप छायेखालीं बसले आहेत व कितीएक येत आहेत. ह्या ऋतूंत थंड वारा व थंड पाणी फारच प्रियकर वाटतें, व अंवशीं पाहांटे प्रवास

करणें फारच सुखकर होतें. सारांश, सीतोपचाराची ह्या ऋतूंत जशी उत्कट इच्छा होते, तशी इतर ऋतूंत होत नाहीं.

अशा रमणीय ऋतूंत, सभोंवती अनेक सुंदर बागा असल्यामुळें **इरावती** नगरीची अति अल्हादकारक शोभा दिसत आहे. प्रातःकाळ झाल्यामुळें पक्ष्यांचा एकच किलकिलाट होऊन गेला. लोक आपआपल्या उद्योगास लागले आहेत. नगरनारी मस्तकावर कलश घेऊन ईश्वराचे गुणानुवाद गात पाण्यास जात आहेत. कितीएक सडासंमार्जन करून रांगोळ्या घालीत आहेत. कितीएक स्नानसंध्या करून ईश्वरपूजा करीत आहेत. कितीएक सामान आणण्याकरितां बाजारांत जात आहेत. कितीएक व्यापारी फळफळावळ, भाज्यापाले वगैरे जिन्नस घेऊन नगरांत प्रवेश करीत आहेत. मध्यभागीं शांतवर्मा ह्याचे वाड्यांत मोटी गडबड चालली आहे. एके बाजूस चौघडा झडत आहे व दुहरे बाजूस वाजंत्री व घडशी निरनिराळ्या रागांत सुस्वर काढीत आहेत. दासी हळदकुंकवाचे सडे घालीत आहेत. माळी लोक बागांतील फळफळावळ, भाज्या, फुलें वगैरे जिनसांचे हारे घेऊन वाड्यांत शिरत आहेत. मोठ्या दिवाणखान्यांतील आरसे, हंड्या, झाडें वगैरे सामान पुसून बिच्छाइत घालण्यांत चाकर लोक गुंतले आहेत. आचाऱ्यांस सामान देण्यांत कोठीवाल्याची एकच धांदल उडून गेली आहे. कारकून लोक कापडाचे बस्ते काढून त्यांच्या निरनिराळ्या प्रति लावण्यांत निमग्न

झाले आहेत, **शांतवर्मा** देवगृहांत पूजा करीत असतां गवयाचें गाणें चाललें आहे. **मुक्तामाला** आपलें प्रभातकर्म संपून विद्युल्लतेसारखी इकडून तिकडे चमकत आहे. **सोमदत्त** हा सर्व प्रकारची तयारी झाली अगर न झाली हें पाहण्यास चोंहींकडे देखरेख करीत आहे. उपाध्याय वगैरे भिक्षुक मंडळी संस्काराची सामग्री जमवून तयारी करण्यास लागले आहेत. नगरींतील स्त्रिया, विद्वान् व संभावित लोक वगैरे उत्तम पोषाग करून वाड्याकडे जाण्याकरिता निघाले आहेत. अशा प्रकारें सर्व लोक आनंदांत असल्यामुळ, त्या इरावती नगरीस फारच शोभा आली आहे.

नगरीबाहेर पांचपन्नास तंबू देऊन स्वारी उतरली होती. तेथेंहो खिसमतदार, शिपाई स्वार, भोई वगैर चाकर लोक यांची स्वारीची तयारी करण्याकरितां एकच गडबड चालली आहे. सर्व आपआपले पोषाग करून सकाळचे सात वाजतां, मध्यें जो किनखापी तंबू होता त्याचे पुढें येऊन व्यवस्थेनें उभे राहिले. भोयांनीं पालखी सजवून आणून डेऱ्यापुढें ठेविली. अबदागीरवाले व शिंगाडे येऊन उभे राहिले. इतक्यांत आश्रित व कारकून यांसह वर्त्तमान वस्त्राभरणांनीं सुशोभित व मदनासारखा सुरूप अशा **धनशंकराची** स्वारी बाहेर आली. मग भालदार ललकारतांच सर्वांनीं मुजरे केले; ते मोठ्या हास्यवदनानें घेऊन तो पालखींत बसला. आश्रित वगैरे घोड्यांवर बसून स्वारी निघतांच शिंगाड्यांनीं शिंगें फुंकलीं. तीं ऐकतांच,

हा ज्या रस्त्यानें येणार त्या रस्त्यावर जे आले नव्हते त्यांची एकच धांदल झाली. कितीएक गरीबगुरीबांच्या बायका कडेवर मुलें घेऊन धांवधांवत येऊन तेथें पोंचल्या. आपला कृपाळु धनी **शांतवर्मा** ह्याचा जांवई येणार ह्मणून त्यास पाहण्याकरितां नगरींतील सर्व नरनारी त्या रस्त्यावर जमल्या होत्या. धनशंकराबरोबर शिपाई, स्वार वगैरे मिळून जरी दीडशेंच मनुष्य होतें तरी तें उत्तम वस्त्रालंकारेंकरून भूषित असल्यामुळें त्याची स्वारी टुमदार दिसूं लागली. जेव्हां तो गांवांत शिरला, तेव्हां त्याचें सौंदर्य व चातुर्यमुद्रा हीं पाहून लोकांस मोठें कौतुक वाटलें. बहुतेक बायका, हात ओंवाळून कानांशीं बोटें मोडून आशीर्वादपर शब्द बोलूं लागल्या; हें धनशंकराचे नजरेस येतांच त्यास मोठें समाधान वाटलें; असो. हा वाड्याजवळ येत आहे इतक्यांत शांतवर्मा, सोमदत्त वगैरे मंडळीसुद्धां, सामोरा आला, आणि मोठ्या आदरसत्कारानें जांवयास दिवाणखान्यांत नेऊन लोडाशीं बसविलें, व इतर सर्व मंडळीचाही त्यानें यथायोग्य सत्कार केला. धनशंकर जाऊन बसतो तों नाचास आरंभ झाला. तेथील बेतबात व आदरसत्काराची रीती वगैरे पाहून सर्व जांवईमंडळास समाधान झालें. आदरसत्कार वगैरे तजवीज ठेवण्यांत शुक्लाक्षही होते. भयानकाच्या जयपूर नामक नगरींत ह्याची बंदोबस्तान्यावर नेमणूक धनशंकरानें शांतवर्म्याचे पत्रावरून केली होती व ते राजमंडळांत मिसळले होते, हें मागेंच सांगितलें आहे.

शांतवर्म्याचा कांहीं इतिहास, व शुक्लाक्ष आणि सोमदत्त ह्यांचा त्याच्याशीं संबंध, ह्या गोष्टी सांगणें अवश्य ह्मणून येथें पूर्वी सांगतों:—

शांतवर्मा ह्याचे पूर्वजांनीं, भयानकाचे पूर्वजांच्या पदरीं विश्वासानें मोठ्या योग्यतेची चाकरी करून, इरावती व तिचे आसपासचीं खेडीं मिळून पंधरा हजारांची जहागीर व पुष्कळ संपत्ति मिळविली होती. शांतवर्म्यानेंही सुमारें वीस वर्षे राजसेवा एक निष्टेनं करून मोठी अब्रु मिळविली; परंतु पोटीं संतान नाहीं व वयही बरेंच झालें अशा विचारानें चाकरी सोडून स्वस्थपणें तो आपल्या नगरींत येऊन राहिला. त्याजपाशीं सुमारें एक कोटीची माया होती. हल्लीं त्याचें वय सुमारें सत्तर वर्षांचें होतें. तो स्वभावानें मोठा शांत, दयाळु, उदार, धर्मशील व सदाचरणी असा असे. आपल्या हद्दींतील प्रजेचें कल्याण होण्याविषयीं तो फारच लक्ष देई. तेणेंकरून सर्व लोक सुखानें नांदत असून ते आपल्या धन्याचें निरंतर कल्याण इच्छीत. ह्याचें वय सुमारें पन्नास वर्षांचें असतां तो आपल्या नगरींत रहावयास आला. तेव्हांच शुक्लाक्षाचा पिता दारिद्रानें अत्यंत पिडल्यामुळें इरावतीस आला. हा दूरचा कांहींसा संबंधीं व गरीब हें पाहून शांतवर्म्यानें त्यास कांहीं काळजी न करितां स्वस्थपणें रहावें ह्मणून सांगितलें. त्यावेळीं शुक्लाक्षाचें वय दोन वर्षांचें होतें. पुढें सुमारें एक वर्ष लोटलें नाहीं तों त्याचा पिता मरण पावला. त्या वेळापासून मोठ्या मम-

तें ह्यांचें पालन करून शांतवर्मा ह्यानें त्यास विद्याही शिकविली. आपल्या पोटीं संतान नाहीं ह्यामुळें त्यास वारंवार खेद होईल; परंतु कर्मधर्मसंयोगानें पंचावन्नाव्या वर्षी त्यास एक कन्यारत्न झालें. तिचें नांव **मुक्तामाला** असें ठेविलें. सोमदत्त हा एका आश्रिताचा मुलगा, त्याचा व मुक्तामालिचा जन्म एकेच दिवशीं झाला. पुढें थोडके दिवसांत त्याचे आईबाप मरण पावल्यामुळें शांतवर्म्यानें त्यासही बाळगिलें.

मुक्तामाला व सोमदत्त ह्यांस जेव्हांपासून समजूं लागलें तेव्हांपासूनच तीं परस्परांशीं न भांडतां एकमेकांवर अत्यंत प्रीति करूं लागलीं.' हें पाहून शांतवर्मा व त्याची पत्नी भाग्यशीला ह्या उभयतांस वृद्धपणीं मोठें कौतुक वाटावें. पूर्वी मूलबाळ नसून वृद्धपणीं ही कन्या झाली म्हणून पूर्वी मात्र थोडेंसें वाईट वाटलें; परंतु जसजशी ती वाढत चालली तसतसे तिचे सद्गुण व रूप पाहून त्यांस पुत्र असतां जें सुख व्हावयाचें त्यापेक्षांही तें अधिक होऊं लागलें. जेव्हां ही पांच वर्षांची झाली तेव्हां त्यानें तिला व सोमदत्ताला बरोबर विद्या शिकविण्यास आरंभ केला, व आपणही बनल्या वेळीं त्यांस जवळ घेऊन सदुपदेश करीत असे. दोघांचीही बुद्धि चांगली व मुख्यत्वेंकरून शांतवर्म्याची शिक्षा फारच उत्तम, तेणेंकरून तीं उभयतां मुलें आपल्या सुगुणांनीं सर्वांस अत्यंत प्रियकर झालीं. शुकाक्षाचें वय ह्यांपेक्षां सुमारें पांच वर्षांनीं अधिक व त्याचा अभ्यासही निराळा ह्मणून ह्यांची व त्याची फारशी मैत्री

नसे. शुक्लाक्षावरही शांतवर्म्याची अत्यंत प्रीति असे. जेव्हां तो पंधरा वर्षांचा झाला तेव्हां मोठ्या सोहाळ्यानें त्याचें लग्न केलें. विद्या वगैरे सद्गुणांत जितका आनंद व्हावा तितका मात्र शुक्लाक्षापासून झाला नाहीं, ह्या गोष्टीवरून त्यावरील त्याची प्रीति कमी झाली असें नाहीं. शुक्लाक्ष हा आपला संबंधी असून आपणास पुत्र नाहीं ह्यामुळें त्यास दत्तक घ्यावा असा शांतवर्मा ह्याचा विचार होता. हें शुक्लाक्षास माहीत असल्यामुळें ती सर्व संपत्ति व जहागीर आपलींच आहेत, असें त्यास वाटत होतें; परंतु पुढें ते विचार फिरून आपल्या मुलीस अथवा तिच्या पुत्रास ही सर्व संपत्ति अर्पण करावी असा शांतवर्मा ह्यानें निश्चय केला. तरी शुक्लाक्ष व सोमदत्त ह्यांचे कल्याणाची त्याचे मनांत कमी काळजी होती असें नाहीं. शुक्लाक्षाचे लग्नांतच त्याचे बायकोचे आंगावर सुमारें दहा हजारांचे दागिने घातले होते, व आणखी त्याचें कल्याण व्हावें ह्या हेतूनेंच त्यानें त्यास पत्र देऊन जांवयाकडे पाठविलें. त्याप्रमाणें त्यास मोठ्या हुद्याचा रोजगारही मिळाला. सोमदत्ताच्या सद्गुणांमुळें शांतवर्मा ह्याचें त्यावर फारच प्रेम होतें, व आपण फार वृद्ध झालों, तर हा सर्व खटला चालविण्यास त्याची योजना करावी असें त्याचे मनांत होतें. उत्तरोत्तर सोमदत्त ह्याची हुषारी व विश्वासूपणा चांगल्या रीतीचा नजरेस आल्यामुळें त्याचा तो निश्चय दृढ होत चालला.

जेव्हां मुक्तामाला दहा वर्षांची झाली, तेव्हां हिला

योग्य वर कोण मिळेल ह्याविषयीं शांतवर्मा ह्याचे मनांत काळजी उत्पन्न झाली; परंतु थोडक्यात्र शोधानें त्याचे इच्छेपेक्षांही त्यास अधिक योग्यतेचा जांवई मिळाला. आपल्यास मुलगे मुली मिळून काय तें एवढेंच कन्यारत्न अशा हेतूनें हुंडा, धर्म वगैरे मिळून त्यानें लग्नांत सुमारें दोन लाख रुपयांचा खर्च केला. हल्लीं तिला ऋतुप्राप्त झाल्यामुळें सर्व सोहळा आपल्या घरीं व्हावा ह्या हेतूनें धनशंकर ह्यास रजा घेऊन येण्याविषयीं पत्र पाठविलें. **धनशंकर** हा मोठा सुज्ञ असल्यामुळें त्यानें असें मनांत आणिलें कीं, आपल्या सासऱ्यास वृद्धपणीं ही एक कन्या झाली व तिजवर त्याचा सर्व जीव आहे, तर आपणास त्याच्या वचनास मान देणें योग्य आहे. असें समजून तो आला आणि दिवाणखान्यांत नाच होत असून तेथें बसला आहे हें मागेंच सांगितलें. नंतर कांहीं वेळानें नाच आटोपून मोठ्या समारंभानें उभयतांचें नाहाणें झालें. उपाध्यायांनीं सर्व तयारी केलीच होती, तेथें धनशंकर येऊन पाटावर बसला. इतक्यांतच सर्व अलंकार घालून व भरगच्चीं दुगोली शालू नेसून लाजत लाजत मुक्तामाला शेजारीं येऊन बसली. दोघेंही रूपानें फार सुंदर, त्यांतही मुक्तामालेचें सौंदर्य कांहींसें अधिक असून यौवनामुळें व जडावाच्या अलंकारामुळें तें फारच रमणीय दिसूं लागलें; दोघांचाही बांधा टेंगणा ठुसका व कांति लिंबासारखी असून तेजस्वी होती. ह्याचे गळ्यांत पाच व मोतीं ह्यांची कंठी, कानांत मोठी भिकबाळी, डाव्या हातांत पाच व हिऱ्यांनीं जडलेलें सिंहमुखाचें

कडें, तशाच प्रकारची डजव्या हातांत पोंची, व हिरे माणकांच्या हातांत अंगठ्या; अशा प्रकारच्या अलंकारांनीं मंडित अशा त्या जोडप्यास पाहून लोकांस वाटलें कीं, एक मदन व दुसरी रतिच बसली आहे कीं काय! हा जोडा पाहून शांतवर्मा व त्याची पत्नी ह्या उभयतांस जो आनंद झाला तो वर्णन करितां येत नाहीं. असो. पुढें मोठ्या आनंदानें सर्व सोहळा होऊन धनशंकर मुक्तामालेसह जयपुरास जावयास निघाला. कन्येचा आपला वियोग होणार ह्मणून उभयतां मातापितरांस फार दुःख झालें; परंतु विचारानें त्यांनीं आपलें सांत्वन केलें. ह्या सर्व समारंभांत शुक्राक्ष ह्याचे चित्तास आनंद न होतां दुःखच होत असे; परंतु बाहेर दाखवितां येत नाहीं म्हणून सर्वांबरोबर आपणांस आनंद झाला असें बाहेरील चिन्हांनीं त्यानें दर्शविलें. तरी जो, अंतःकरणापासून आनंद नसतां बाहेर दर्शविण्यास जातो, त्याची ती सर्व कृति वेड्यावेड्यासारखी दिसते, हें सोमदत्ताचे मात्र लक्षांत आलें होतें, असो. हा शुक्राक्षही धनशंकराबरोबर निघाला; तेव्हां शांतवर्मा ह्यानें चांगले रीतीनें वागत जा, वगैरे त्यास सदुपदेश केला, आणि मुक्तामालेचा वरचेवर जाऊन समाचार घेत जा ह्मणून सांगितलें. जांवयास व कन्येस एक कोशपर्यंत पोंचवून हा परत आपल्या नगरीस आला व ते पुढें चालते झाले.

धनशंकर आपल्या प्रियपत्नीसुद्धां जयपुरास येऊन सुखरूप पोंचला. तीं दोघेंही गुणांनीं व स्वभावांनीं चांग-

लीं ह्यामुळें त्यांची एकमेकांवर उत्तरोत्तर प्रीति वाढत चालली. मुक्तामालेच्या रूपाची जिकडे तिकडे वाखाणणी होऊं लागली, असो. इकडे भयानकाचा पूर्वीप्रमाणें क्रम चाललाच होता. खजिन्यांतील पैसा संपल्यामुळें वरचेवर अडचण पडूं लागली, तेव्हां पूर्वभागांत सांगितल्याप्रमाणें पंधरा हजार फौज कमी केली आणि तिजवरील कामगारांस एकदम फांटा दिला. गांवांतील सावकारांपासून कर्ज काढण्याचा क्रम चालविला. प्रतिवर्षी धर्मादायखात्याकडे दहा लक्षांची नेमणूक होती ती पांच लक्षांची केली. हाताखालच्या मांडलिक राजांवरील कर दुप्पट केला. अशा प्रकारें पैसा जमा करण्याची तजवीज करून त्यानें आपल्या दुष्ट इच्छा तृप्त करण्याचा खर्च कमी न करितां उलटा वाढविलाच; कारभारी वगैरे जे दुष्ट लोक जवळ जमले होते, त्यांनीं लांच खाऊन, न्यायाचा अन्याय व अन्याचा न्याय व लोकांवर अनेक प्रकारचे जुलूम असें करण्याचा क्रम चालविला. तरुण व सुरूप स्त्रियांच्या अंतःकरणास वस्त्रालंकार, द्रव्य इत्यादिकेंकरून लालुच लावून त्यांचें पातिव्रत्य भंग करण्यास आरंभ केला. अशा प्रकारचा अनर्थ पाहून लोक अगदीं त्रासून गेले. निरपराधी ज्यांस चाकरीवरून काढिलें त्यांचीं अंतःकरणें फारच त्रासून गेलीं. जहागीरदार व मांडलिक राजेही ह्या गोष्टीचा विचार करूं लागले. त्यांस असें वाटलें कीं, हल्लीं आह्मांवर दुप्पट कर केला, पुढें कांहीं दिवसांनीं सर्वच घेतलें तर काय करावयाचें ! जेथें न्याय नीति सुटून

भलतींच कृत्यें चालू झालीं, तेथें कोणते वेळीं काय होईल ह्याचा भरंवसा नाहीं. नीतिमान् व धार्मिक असे राज्यांतील मोठमोठाले लोक, पूर्वींचे प्रधानादि कारभारी व सरदार लोक, जहागिरदार आणि मांडलिक राजे ह्यांचीं अंतःकरणें ह्या अनर्थास कांहीं तरी उपाय योजिला पाहिजे ह्या विचाराकडे लागलीं व कितीएक ठिकाणीं गुप्तरूपें ह्या लोकांच्या सभाही भरूं लागल्या.

इकडे आपल्या राज्यांत काय चाललें आहे व आपला वर्तनक्रम योग्य किंवा अयोग्य आहे, हें भयानकाचे ध्यानींमनींही नाहीं. जवळचे लोक तर त्यास त्या दुष्ट वर्तणुकीविषयीं अधिकाधिक उत्तेजन देत. चाललेल्या क्रमांत फेरफार होऊन निरनिराळ्या प्रकारची करमणूक व्हावी ह्मणून एके दिवशीं शुक्राक्षानें शिकारीस जाण्याविषयीं राजास सुचविलें. त्याचे व गदाधरादिकांचेही मनास ती गोष्ट येऊन शिकारीस जाण्याच्या तयारीचा हुकूम झाला. त्याच दिवशीं सायंकाळीं दरबार भरून बरोबर सामान व कोणते लोक घ्यावयाचे हें ठरविलें, तें येणेंप्रमाणें:—

तमासगिरांचे ताफे दोन, वारांगना गाणाऱ्या व नाचणाऱ्या मिळून पंधरा, पन्नास पैलवान, बहुतेक थट्टेबाज लोक, गदाधरादि सर्व राजमंडळ, स्वार व शिपाई मिळून दोडशें असामी. ह्या सर्वांचें बजारबुणगें मिळून सुमारें सात आठशें लोक झाले. सामान नेण्याकरितां उंट व घोडीं मिळून शंभर घेण्याचा हुकूम झाला. वारांगनादिकांस वीस मेणे व खाशा मंडळीकरितां पन्नास घोडीं;

ह्याप्रमाणें तयारी होऊन दुसरे दिवशीं स्वारी शिकारी-करितां निघून गेली. ज्या गांवानजीक रान असेल तेथें तंबूडेरे देऊन यथेच्छ क्रीडा चालवावी आणि सायं-काळीं सुमारें दोन तास शिकार करण्याकरितां जंग-लांत जावें. जेथें उतरावें तेथील गांवांत व बागेत जाऊन पदरच्या लोकांनीं मनाप्रमाणें व्यापार करून लोकांस त्रास द्यावा व जिनसांचाही खराबा करावा. अशा प्रकारें ह्या गांवाहून त्या गांवीं. नाचतमासे वगैरे विलास करीत राजेसाहेबांची स्वारी फिरत चालली.

# भाग ३.

॥ श्लोक ॥

कृत्यें करीत असतां बरवीं झटूनी
विघ्नें अनंत सहसा घडती मधूनी ।
तैसेच सज्जन पहा अतिदुष्टसंगें
कष्टूनि भोगिति सदा बहु दुःख अंगें ॥

**जयपुरापासून** सुमारें बारा कोशांवर डोंगराचे पायथ्याशीं निबिड रान होतें. तेथें मध्यरात्रीचे सुमारास घोडा झाडास बांधून एक पुरुष हिकडून तिकडे फिरत आहे. साधारणरीत्या पाहिलें असतां काळोख्या रात्रीचें स्वरूपच भयंकर, त्यांत रानांत एकाकी असल्यानें मोठ्या धीट शूराचेंही अंतःकरण उदास व भयचकित होतें, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे असें नाहीं. त्या रानांत झाडांचा वाळलेला पाला गुडघा गुडघा पडलेला होता, व रात्र निवांत झाल्यामुळें त्या पाल्यांतून लहानसें जनावर गेलें तरी मोठा शब्द होई. तेव्हां तो पुरुष चपापून जिकडून शब्द येई तिकडे हत्यार सरसावून पाहूं लागे. ह्याखेरीस कोल्हीं वगैरे रानटी जनावरें ह्यांचे शब्द त्याचे कानीं पडत. रात्रीं ओरडणाऱ्या कीटकांचा भयंकर शब्द चाललाच आहे. आसपासचे गांवांतील कुत्र्यांचेही मंद ध्वनि ऐकू येत आहेत. अशा भयंकर रात्रीं तो हिकडे तिकडे कावऱ्याबावऱ्या पाहात आहे तों त्याला घोड्यांचीं पावलें ऐकूं आलीं. तेव्हां

त्याचें चित्त शांत झालें; तों दुसरा गृहस्थ येऊन दोघे बोलताहेत तों तिसरा, चवथा असे सुमारें वीस असामी तेथें जमले. मग ते त्या पाल्यावर, घोड्यांचे गाशे टाकून विचार करण्यास बसले. ह्यांतील दहा भयानकाचे राज्यांतील जहागीरदार व दहा त्यानें कामावरून काढलेले शूर सरदार व मोठमोठाले कामदार असे होते. त्यांत जो पूर्वी प्रधान होता तो ह्मणाला कीं, मी भयानकाचा कनिष्ठ बंधु **विशालाक्ष** ह्याची एकांतीं भेट घेतली, आणि त्यास आपले व इतर लोकांचे विचार सांगितले, तेव्हां त्यानें असें उत्तर केलें कीं, तुमचे विचार चांगले आहेत खरे; परंतु जेव्हां तुह्मीं भयानक व त्याची मंडळी ह्यांस पकडून किल्यावर टाकाल तेव्हां मी तुमच्या पक्षास मिळून जसें सांगाल तसें ऐकेन. त्यापूर्वी तुह्मांस माझ्यानें कोणतेंच निश्चयात्मक वचन देववत नाहीं. कारण मी ह्या कृत्यांत आहें असें त्यास समजलें तर, तो भाऊ ह्मणून माझा प्राण रक्षील असें नाहीं; तरी तुमचे विचार मजकडून उघडकीस येतील अथवा तुमच्या विरुद्ध मी वर्तणूक करीन असें मात्र घडणार नाहीं. हें ऐकून सर्व ह्मणाले कीं, असो; ही एक गोष्ट मोठीच आहे. मग आपली एकंदर फौज किती जमेल ह्याचा विचार केला. तों सुमारें आठ हजार जमेल असें अनुमान झालें, व ह्याचप्रमाणें आपल्या पक्षाच्या निरनिराळ्या ठिकाणच्या दहापांच टोळ्या मिळून पंचवीस हजारांचा सुमार होईल असें त्यांस वाटलें. निरनिराळ्या ठिकाणच्या अशाच प्रकारचे लोकांच्या सुमारें दहा

सभा गुप्तरूपें भरत व त्यांचा एकमेकांशीं पत्रद्वारें व्यवहारही चालू होऊन एकदम चोहींकडे हल्ला करण्याचा बेत ठरला होता. असा विचार चालला आहे तों एकानें असें सांगितलें कीं, हल्लीं राजा शिकारीस गेला आहे, त्यास सुमारें पंधरा दिवस झाले. तो उद्यां पहांटेस ह्या रानाचे बाजूनें जो मार्ग जातो त्यानेंच जयपुरास तो परत जाणार असें मी ऐकिलें. त्याचे बरोबर जमेस धरण्यासारखे काय ते दीडशेंच लोक आहेत. ह्याकरितां उद्यांचे रात्रीं आपण पांचशें स्वारांनिशीं येथें यावें. मग तो जर ह्याच वाटेनें गेला तर एकदम हल्ला करून त्यास पकडण्यास उशीर लागणार नाहीं. अशा प्रकारची संधि पुनः येईल असें मला वाटत नाहीं; कारण तो शहरांत असला तर तेथें जाऊन जय पावणें फार कठीण आहे. शहराबाहेरील छावणींत दहा हजार फौज व शहरांतील दोन हजार मिळून बारा हजार आहे. व त्याखेरीज किल्लाही मजबूत आहे. आतां राजा हिकडूनच जाणार अगर दुसऱ्या वाटेनें जाणार ह्याचा शोध काढण्याकरितां मी आपला चाकर पाठविला आहे, तो इतक्यांतच येथें येईल. असें बोलतो तों तो चाकरही आला आणि धन्यास मुजरा करून, खास ह्याच वाटेनें स्वारी जाणार असें त्यानें सांगितलें. हें ऐकून सर्वांसही ती गोष्ट मान्य झाली. मग, त्यांनीं आपआपल्यांत वाटणी करून उदईक रात्रीं मोठ्या गुप्तरूपें पांचशें स्वारांसह येण्याचा बेत ठरविला, आणि निरनिराळ्या वाटेनें एकेक आपआपल्या ठिकाणास निघून गेले.

दुसरे दिवशीं रात्रौ सुमारें दहा वाजतां संकेताप्रमाणें ते लोक तेथें जमले; आणि अकरा वाजण्याचे सुमारास एक दोन अशा फुटकळ रीतीनें हत्यारबंद पांचशें स्वारही त्या रानांत आले. मग आपआपल्या अनुयायी स्वारांसहवर्तमान त्या सरदार लोकांनीं इतका हुषारीचा बंदोबस्त ठेविला कीं, जवळचे रस्त्यानें कोणी गेला तरी, त्यास ह्या रानांत कोणी आहे असा संशयही येऊं नये. इतक्यांत तेथें एक बातमिदार येऊन पोंचला. तेव्हां त्याचे सभोंवती ते सरदार व कारभारी जमले असतां त्यानें सांगितलें कीं, महाराजांची स्वारी खास ह्याच वाटेनें जाणार. कुच करण्याचा हुकूम होऊन सर्व लोक आटपाआटप करण्यास लागले. हें ऐकून सर्वांस अतिशय आनंद झाला, आणि त्यांनीं आपणांस जय येण्याविषयीं ईश्वराची प्रार्थना केली, तों एक वाजला. मग हळुहळू जाऊन त्या रानाचे कडेस जेथें बरींच दाट झाडें होतीं, तेथें त्यांचे आड उभे राहिले. तेथून रानाचे बाजूनें अडचणींतून रस्ता येऊन तो पुढें मोकळे मैदानांत मिळत होता.

सुमारें बारांवर तीन वाजतां अर्धकोशावर, जिकडून स्वारी येणार तिकडे मशालींचा उजेड दिसूं लागला. पुढें जसजसा तो जवळ जवळ येऊं लागला, तसतसा एक, दोन, तीन अशा अनेक मशाली व मनुष्यें, कांहीं घोड्यांवर, कांहीं मेण्यांत व कांहीं पायीं येत आहेत, असें स्पष्टपणें दिसूं लागलें. हें पाहून ह्या लोकांनीं आपआपलीं हत्यारें सरसाविलीं, आणि हुकुमाबरोबर बाहेर

पडण्याविषयीं तयार होऊन उभे राहिले. इतक्यांत घोडयांच्या टापा व मनुष्यांचा गलबला त्यांचे कानांवर आला, तेव्हां सर्वांचे डोळे स्वारीकडे लागून राहिले. तों हे जेथें उभे होते, तेथून समोरून कांहीं लोक जाऊं लागले. रस्ता लहान होता म्हणून, दोनचार अशा मनुष्यांची व स्वारांची रांग लागली. ते शिकारीच्या व विनोदाच्या परस्परांशीं गोष्टी बोलत आपआपल्या नादांत स्वस्थपणें चालले आहेत, कांहीं शिपाई व स्वार पुढें व कांहीं मागें व मध्यें राजेप्रधानादि सर्व मंडळी अशा व्यवस्थेनें स्वारी चालली आहे. सुमारें अर्धे लोक तो अडचणीचा रस्ता संपून मैदानांत गेले न गेले, इतक्यांत "हरहर महादेव" अशी एकच मोठ्यानें आरोळी झाली, आणि पांचशें स्वारांसहवर्तमान ते सरदार व कारभारी लोक राजाच्या स्वारींत जाऊन मिसळले. मग काय विचारावयाचें आहे ! पूर्वी एकदम भयंकर शब्द झाल्यानें स्वारींतील सर्व लोक भयभीत होऊन घाबरून गेलेच होते. त्यांत हत्यारबंद पांचशें स्वार जाऊन जेव्हां तोंडातोंड करूं लागले, तेव्हां त्यांची एकच दाणादाण होऊन गेली. भुई लोकांनीं मेणे टाकून पळण्यास आरंभ केला. साधारण लोक व बाजारबुणगें ह्यांनीं आपआपलीं घोडीं व सामान टाकून प्राणरक्षणाकरितां रानोमाळ पळण्यास आरंभ केला. कोणी रानांत शिरले, कोणी मोठमोठ्या दगडांचे व झाडांचे आड लपले, व कितीएक ओढ्यांत शिरून दडूं लागले. ज्यांस जखमा लागल्या, ते त्या वेदनांमुळें ईश्वराची करु-

णा भाकूं लागले; असा एकच हाहाकार होऊन गेला. हें काय आहे, हे लोक कोठून आले व असें करण्याचें कारण काय, वगैरे कोणासही कांहींच कळेना, असा घोंटाळा पाहून, मागचे व पुढचे स्वार व शिपाई राजाचे जवळ जमले. मग हे कोण आहेत ! ह्यांस ठार मारा; असा राजाचा हुकूम होतांच त्या परस्परांचे युद्धास आरंभ झाला; परंतु ते लोक फार थोडे, ह्यामुळें त्या स्वारांपुढें त्याचें कांहीं चालेनासें होऊन, बहुतेक प्राणास मुकले, व राहिल्यांचा पळ सुटला. त्यांबरोबर राजे, प्रधान इत्यादि सर्व वाट फुटेल तिकडे पळूं लागले, मग स्वार पाठीमागें लागून जवळजवळ आले असें पाहून राजादिकांचा धीर खचून हातपाय गळाले.

अशा प्रकारच्या विवंचनेंत असतां, भयानकानें कांहींशा अंतरावर पलीकडे भरधांव घोडे धांवताहेत असा त्यांच्या टापांचा शब्द ऐकिला. तेणेंकरून तो फारच घाबरला. त्यास असें वाटलें कीं, ह्या दुष्टांनीं दोन्ही बाजूंनीं गांठलें. आतां पळण्यासही वाट राहिली नाहीं. अशा काळजींत तो बुडून गेला आहे, इतक्यांत त्या स्वारांची एक लांब भिंतच जवळ आली, असें त्यास दिसलें. तों भिऊं नका, आलों; असा शब्द त्याचे कानीं पडला. तो शुक्राक्षाचा शब्द ओळखून भयानकास जो आनंद झाला, तो वर्णन करितां येत नाहीं. पुढें शुक्राक्ष व मागून हजार स्वारांच्या रांगा भरधांव घोडे टाकीत राजाजवळ येऊन पोंचल्या. ह्या वेळेस सुमारें पांच वाजून नुकताच चंद्र वर आला होता, व त्याचा मंद

प्रकाश चोंहींकडे पसरला होता. हे स्वार आलेले पाहून शत्रूंचे स्वार किती आहेत वगैरे पाहण्याकरितां अंमळ दबकून राहिले. तों राजानें आपला घोडा परतवून मोठ्या रागानें आरोळी देऊन शुकाक्षास सांगितलें कीं, ह्या दुष्टांनीं भारी नाश करून सर्वांस दुःख दिलें; तर ह्यांचा चांगला सूड घे, आणि सांपडतील तर मुख्यमुख्यांस जिवंत पकडून आण. हें ऐकून मदांध, पिंगाक्ष, लोहाक्ष आणि चक्राक्ष हेही आपआपले घोडे परतवून राजापाशीं आले. मग शुकाक्ष, राजानें सांगितल्याप्रमाणें स्वारांस हुकूम करून आपणही पुढें सरसावला. शत्रूंस हे लोक किती आहेत, ह्याचें बराबर अनुमान झालें नाहीं, व त्यांतील सुमारें शंभर असामी मेले व घायाळ झाले होते, तथापि त्यांनींही पुढेंच चाल केली. मग परस्परांची मोठी निकराची लढाई होऊन राजास जय मिळाला. दोहोंकडे मिळून चारपांचशें स्वार पडले. शत्रूंच्या स्वारांची फार नासाडी झाल्यामुळें, ते चोहींकडे पळूं लागले. मुख्य सरदार व कारभारी ह्यांनीं आपला मोड पाहून मागच्या मागेंच पाय काढिला. शुकाक्षानें सुमारें पन्नाससाठ असामी बंदिवान केले. शेवटीं पाठलाग करितां करितां मुख्य पांच असामीही सांपले. बाकीचे रानांतून इतर मार्गानें हातीं न लागतां पार झाले. मग रानोमाळ झालेले सर्व लोक जमा करून शुकाक्ष यशस्वी होत्साता त्या बंदिवानांसह राजाजवळ आला, आणि त्यास झालेली सर्व हकीकत सांगितली. त्यावेळीं राजानें व प्रधाना-

दिकांनीं त्याच्या हुषारीची व शौर्याची मोठी वाखाणणी करून उपकार मानिले. आणि तुला ही बातमी कशी लागली व वेळेस कसा येऊन पोंचलास ह्याविषयीं विचारिलें; तेव्हां त्यानें सांगितलें कीं, आतां पूर्वी शहरांत जाऊन ह्या बंदिवानांची वगैरे तजवीज करूं, मग स्वस्थपणें सर्व निवेदन करीन. नंतर त्या सर्व समाजासह मोठ्या जयघोषानें सकाळचे सात वाजतांना राजाची स्वारी शहरांत येऊन दाखल झाली. मग अगोदर त्या बंदिवानांच्या हातापायांत बिड्या घालून त्यांस बंदिखान्यांत टाकिलें आणि दुपारीं दरबार भरवून सर्व चौकशी करण्याचा ठराव झाला.

सुमारें बारांवर दोन वाजतां भयानक आपल्या प्रधानांसहवर्तमान दरबारांत आला. आपली बंडवाल्यांनीं नासाडी करून मोठी अप्रतिष्ठा केली म्हणून अतिशयच वाईट वाटून, त्यास फार राग आला होता. शहरांत ही बातमी पसरून अनेकांस वाईट वाटलें व बंदिवानांची चौकशी होणार म्हणून बहुतेक संभावित लोक दरबारांत जमले. आंत जागा नाहींशी झाल्यामुळें सभोंवती लोकांचा गराडा होऊन एकच गर्दी होऊन गेली. इतक्यांत मागेंपुढें शिपायांसह मुख्य पांच बंदिवान आणून शुक्राक्षानें राजापुढें उभे केले. त्यांचेकडे पाहून लोकांस फार वाईट वाटलें व त्यांचे पोटांत त्यांविषयीं दया उत्पन्न झाली. कारण त्यांपैकीं कोणी पूर्वीचे कारभारी, कोणी सरदार, कोणी जहागीरदार अशा प्रकारचे असून सर्वही कुलीन, नीतिमान्, विचारी व

लोकांचे कल्याणाविषयीं झटणारे असे होते व हल्लींचाही त्यांचा हेतु मोठा स्तुत्य होता; परंतु असा समय प्राप्त झाला कीं, सर्व विपरीत होऊन गेलें, असो; जरी त्यांस अशी दशा प्राप्त झाली तरी त्यांनीं आपलें गांभीर्य सोडिलें नाहीं, व एकाचीही मुखश्री म्लान झाली नाहीं. मग राजानें त्यांस प्रश्न केला कीं, तुह्मी मला व माझ्या शक्तीला न ओळखितां जी निंद्य व दुष्ट वर्तणूक केली ह्याचें कारण काय ? हें ऐकून त्यांतील एकजण म्हणाला कीं, तूं आह्मांस आतां कोणती शिक्षा करशील हें आह्मीं पक्केपणीं समजून आहों. तर असें करण्याचा आमचा काय हेतु तो ऐक.—तूं ह्या राजवंशांत उत्पन्न होऊस सर्व कुलास कलंक लाविलास. तुझ्या पूर्वजांचे ठायीं नीति, धर्म, शौर्य, दया, शांति व प्रजेच्या कल्याणाविषयीं इच्छा इत्यादि जे सद्गुण होते, तींहिंकरून त्यांनीं मोठी कीर्ति व राज्य संपादन केलें, त्यांविपरीत गुण तुझेठायीं भरलेले असून तूं राज्य बुडविण्याचा क्रम चालविला आहेस. जो राजा, अविद्वान् , दुराचारी, निर्दय, दुर्व्यसनी, विषयांध व प्रजेचे कल्याणाकडे दुर्लक्ष करणारा, विद्या व कलाकौशल्य इत्यादिकांस उत्तेजन न देणारा, दुष्ट व अविचारी असे मंत्री बाळगणारा, आपले राज्यांत काय होत आहे, दुसऱ्याचे राज्यांत कसा काय प्रकार चालला आहे, आपली फौज किती व ती कोणत्या प्रकारची आहे, इत्यादि गोष्टींचा विचार न करणारा; असा असेल तो राज्यावर उपयोगी नाहीं; जर असेल तर सर्व प्रजेनें एकमत होऊन त्यास पदच्युत करावें; ह्या हेतूनें

आह्मी हें कृत्य केलें. आतां जरी ते सिद्धीस गेलें नाहीं, तरी तूं मनांत पक्की गांठ घालून ठेव कीं, जर तूं आपला क्रम पुढें असाच चालविशील तर तसेंच फळ पावशील. हें ऐकून भयानकास अतिशय राग आला आणि शिपायांस सांगितलें कीं, हा फार बरळूं लागला, ह्याचें तोंड बांधा. हें ऐकून तो ह्मणाला कीं, विचारिलें म्हणून सांगितलें, नाहीं पेक्षां मला एक अक्षरही बोलण्याचें कारण नव्हतें. मग राजानें विचारिलें कीं, तुमचे जे दुसरे सोबती पळून गेले त्यांचीं व आणखी कोण सामील असतील त्यांचीं नावें सांगाल, तर तुह्मांस देहांत शिक्षा व्हावयाची नाहीं. हें ऐकून त्यांनीं साफच सांगितलें कीं, त्यांचीं नांवें आह्मांस ठाऊक आहेत खरीं; परंतु प्राण गेला तरीही सांगणार नाहीं. 'बरें ! अशानें तुह्मी सांगतां काय '!! असें बोलून राजानें कचेरी बरखास्त केली; आणि शुक्राक्षास सांगितलें कीं, आज रात्रीं ह्यांपासून अगर इतरांपासून जे कोणी दुसरे ह्या कटांत असतील, त्यांचीं नांवें समजण्याकरितां सुचेल तो यत्न करावा. मग राजा, प्रधान वगैरे जातांच सर्व लोक आपापल्या घरीं गेले.

त्या दिवशीं रात्रीं शुक्राक्षानें बंदिखान्यांत जाऊन, मारहाण वगैरे अनेक प्रकारच्या यातना त्या लोकांस कबूल होण्याविषयीं केल्या; परंतु त्या सर्व व्यर्थ झाल्या. हें मोठें आश्चर्य कीं, एकही कबूल झाला नाहीं. मग त्यानें एका दोघां भोळ्या मनुष्यास पैशाची व मुक्त करण्याची आशा दाखवून असें सांगितलें कीं, धनशंकर ह्यांस सामील आहे, असें तुह्मीं राजापाशीं बोला.

असें करण्याचें कारण उघडच आहे कीं, असें कांहीं केल्याखेरीज आपणास मोटी जागा मिळत नाहीं, व दुसरा मुख्य उद्देश हा कीं, धनशंकर व त्याची स्त्री मुक्तामाला ह्या उभयतांचा नाश केल्याखेरीज आपणास शांतवर्मा ह्याची जहागीर व सर्व संपत्ति मिळणार नाहीं. कारण पूर्वी त्याचे मनांत शुक्लाक्षास दत्तक घ्यावें असें होतें; परंतु आलीकडे ते विचार फिरून, मुक्तामाला अगर तिच्या मुलास सर्व संपत्ति देण्याचा त्यानें निश्चय केला होता. तरी हा शुक्लाक्षाचा कृतघ्नपणा शिखरास जाऊन पोंचला ह्यांत संशय नाहीं. कारण शांतवर्मा ह्यानें त्याचें लहानपणापासून पुत्राप्रमाणें लालनपालन करून, विद्या शिकविली व पुढें लग्न करून देऊन जांवयाकडून मोटा हुद्याचा रोजगारही लावून देवविला. ह्याखेरीज सुमारें पंधरा हजार रुपये शांतवर्म्यानें ह्याचे लग्नास खर्च केले, व पुढें त्याचें त्यावर प्रेम असून आणखी कांहीं देण्याचें त्याचे मनांत होतेंच. तर ज्यानें आपणावर अशा प्रकारचे उपकार केले, त्याची एकुलती एक मुलगी तीही वृद्धपणीं झालेली आणि रूपानें व सद्गुणांनी संपन्न तिचा व तिचे तशाच प्रकारचे पतीचा सर्वस्वी घात करण्यास प्रवृत्त होणें, ह्या कृत्यास कृतघ्न ह्मणणेंही फार हलकें. तर दुसरी एकादी नवीन पदवी शोधून काढून ह्या शुक्लाक्षास वाचणारांनींच द्यावी असें वाटतें. असो, सर्पास दूध पाजून कितीही ममतेनें त्याचें पालन केलें तरी, तो आपला गुण सोडील नाहीं. त्याचप्रमाणें जे स्वभावतः दुष्ट असतात,

त्यांवर सत्पुरुषांनीं कितीही उपकार केले तरी, ते आप-
ल्या यत्किंचित् लाभाकरितां व सुखाकरितां त्यांचा
सर्वस्वी नाश करण्यास मागें पुढें पहात नाहींत. अशा
प्रकारचीं अनेक उदाहरणें लोकांचे पाहण्यांत आलीं
असतील, त्यांतील हें मुख्य ह्मटलें तरी चालेल. आतां
शुक्लाक्ष हजार स्वारांनिशीं एकाएकीं राजाचे मदतीस
गेला आणि मोठें शौर्याचें कृत्य करून, त्यानें सर्वांचें
प्राण वांचविले व तेणेंकरून राजाची आपणावर बहाल
मर्जी करून घेतली; हें कसें घडलें, तें सांगणें येथें
अवश्य आहे ह्मणून सांगतों.

धनशंकरानें आपल्या पदरीं, राज्यांत कोठें काय
चाललें आहे, हें समजण्याकरितां अनेक हेर ठेविले होते.
त्यांपैकीं एकानें सुमारें रात्रीचे आठ वाजतां येऊन
राजास पकडण्याच्या बेताची बातमी सांगितली. तेव्हां
त्या लोकांचें हें स्तुत्य कृत्य आहे, असें जरी त्यास वाटलें,
तरी, त्याकडे त्याच्यानें अगदीं दुर्लक्ष करवेना. ह्यास
कारणें दोन; तीं अशीं कीं, आपणास ही बातमी समज-
ली होती, असें कदाचित् राजास समजल्यास तें फारच
वाईट हें एक, व दुसरें ज्याच्या पदरीं आपल्या पूर्वजांनीं
अन्न खाल्लें व आपणही खातों त्याच्याशीं विपरीत वागणें
हेंही वाईट. तर आपण प्रत्यक्ष न जावें इतकेंच करणें यो-
ग्य. असा विचार करून त्यानें शुक्लाक्ष शहरांत कांहीं कां-
माकरितां त्याच दिवशीं आला होता, त्यास बोलावून हें
वर्तमान सांगितलें, आणि विलंब न करितां हजार स्वार
बरोबर घेऊन सुमारें चार वाजण्याचे पूर्वीं तेथें जाऊन

पोंचावें असा त्यास हुकूम केला, त्याप्रमाणें तो गेला. नंतर घडलेला मजकूर मागें सांगितलाच आहे.

मागें सांगितल्याप्रमाणें शुक्लाक्षानें, धनशंकराचा घात करण्याची ही संधि चांगली आहे असें मनांत आणून, त्या बंडाचे पक्षास हा सामील आहे, असें सांगण्याविषयीं दोघां बंदिवानांस कबूल करून ठेविलेंच होतें. मग दुसरे दिवशीं प्रातःकाळीं हा राजवाड्यांत गेला. तेथें गदाधरादि कारभारीपंचक जमलेंच होतें. मग राजानें ह्यास विचारिलें कीं, तूं एकाएकीं स्वार घेऊन कसा आलास हें सांग! तेव्हां त्यानें सांगितलें कीं, महाराज, मी आपल्या पदरीं राहिल्यापासून राज्याची वढती असावी ह्या हेतूनें रात्रंदिवस झटत असतों; परंतु हा प्रसंग आला ह्मणून माझी गरीबाची चाकरी सरकारचे नजरेस आली. मी आपल्याजवळ गुप्त बातमीदार ठे-विले आहेत, त्यांचें काम इतकेंच कीं, सरकारचे विरुद्ध व सरकारचें गैरहित करण्याविषयीं जे उद्योग करीत असतील, त्यांची चौकशी ठेवून बातमी सांगावी. त्या प्रमाणें त्यांचा येण्याचा संकेत होता, ह्मणूनच मी स्वारींतून शहरांत आलों होतों. तेव्हां सुमारें आठ वाजतां माझ्या विश्वासु फत्तेसिंगानें (असें म्हणून त्यास बरोबर नेलेंच होतें त्याकडे बोट दाखविलें) ही भयंकर बातमी आणिली. मग मला कांहीं सुचेनासें झालें; आपल्या धन्यास केव्हां सुरक्षित पाहीन असें होऊन गेलें. नंतर जेवणखाणही न करितां लष्करांत गेलों आणि हजार स्वार बरोबर घेऊन, भरधांव घोडे टाकीतच मोठ्या

निकराचे वेळेस घेऊन पोंचलों. पुढील वृत्तांत सरकारास विदितच आहे. हें ऐकून तेथील सर्वांस ह्याच्या चातुर्याविषयीं व हुषारीविषयीं मोठें आश्चर्य वाटलें. व भयानकाचेही मनास अतिशय संतोष होऊन, त्यास त्यानें दहा हजारांचे बक्षीस दिलें व फत्तेसिंगास सोन्याचें कडें वगैरे पोषाग मिळून एक हजारांचा विषय दिला; हें पाहून शुक्लाक्षास मोठा आनंद झाला. नंतर त्यानें राजास सांगितलें कीं, सरकारचे हुकुमाप्रमाणें ह्या बंडवाल्यांत आणखी कोण कोण सामील आहेत, हें कबूल करण्याविषयीं त्या बंदिवानांस अनेक प्रकारच्या यातना दिल्या; परंतु कबूल होत नाहींत. एकाविषयीं थोडा सुगावा लागेल असें धोरण दिसतें, तर त्याविषयीं पक्की चौकशी करून सायंकाळीं सरकारचे कानावर घालीन. नंतर 'फार बरें' असें म्हणून स्वारी भोजनास उठून गेली.

दोनप्रहरीं कचेरी भरून त्या सर्व बंदिवानांस निरनिराळ्या ठिकाणीं फाशीं देण्याचा हुकूम झाला व त्या मुख्य सरदारांचीं घरें, जहागिरी वगैरे जप्त करून सरकारी खात्यास जमा करण्याविषयीं सांगितलें. त्या पांचांस व दुसऱ्या दहा स्वारांस आज पांच वाजतां मैदानांत फांशीं द्यावें, म्हणून राजानें हुकूम केला. ही बातमी फुटतांच शहरांतील हजारो लोक तो चमत्कार पाहण्याकरितां जमा झाले. पांचवाजण्याचे कांहीं पूर्वीं, दोनशें शिबंदीसहवर्तमान शुक्लास त्या पंधरा बंदिवानांस तेथें घेऊन आला. पूर्वीं तेथें स्वार व शिपाई मिळून हजार लोक सभोंवतीं उभे केले होते. त्यांचे पलीकडे हजारो

लोकांची एकच गर्दी होऊन गेली होती. मध्यभागीं फाशीं देण्याचे खांब पुरले होते. त्या खांबाजवळ शुक्राक्षानें त्या बंदिवानांस आणून क्रमानें उभें केलें. इतक्यांत प्रधानादिकांसह महाराजांची स्वारी भालदार ललकारत तेथें येऊन पोंचली. नंतर त्यांस फाशीं देण्याचें कारण सर्वांस ऐकूं येई अशा स्वरानें शुक्राक्षानें सांगितलें. मग लागलींच त्यांस फाशीं चढविलें आणि दोनशें लोक रखवालीस ठेवून, महाराजांची स्वारी चालती झाली. त्यांतील मुख्य पांचाकरितां सर्व लोकांचे अंतःकरणास गहिंवर आला. कितीएकांचे डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या; परंतु बिचारे करतात काय? दुःख करीतच आपले घरीं निघून गेले.

हें कृत्य घडलें त्याच दिवशीं दोन प्रहरीं धनशंकरास कळलें कीं, बंडवाले लोकांच्या संकेताची बातमी आपण आणिली अशी राजापाशीं बढाई करून शुक्राक्षानें मोठें बक्षीस मिळविलें व राजाची मेहेरबानी संपादन केली. ह्या गोष्टींत त्यानें माझें नांवही काढिलें नाहीं, ही मोठी अचंबा करण्यासारखी गोष्ट आहे. ह्यावरून त्यास असें वाटलें कीं, आतां हा काय करील ह्याचा भरंवसा नाहीं. वास्तविक पाहिलें असतां माझ्या गुलालसिंगानें ही बातमी आणिली आणि त्याबद्दल फत्तेसिंगास बक्षीस मिळालें! आतां फत्तेसिंग हा त्याचा मुलगा खरा, परंतु व्हावें तसें झालें नाहीं. मग त्यानें गुलालसिंगास हाक मारून विचारिलें कीं, तुझ्या मुलास ही बातमी आणल्याबद्दल हजार रुपयांचें बक्षीस मिळालें हें तुला

ठाऊक आहे काय? हें ऐकून त्यासही मोठें आश्चर्य वाटलें. तो ह्मणाला महाराज, असें होईल कसें? बातमी मी आणिली आणि त्याला बक्षीस कसें मिळेल? बाकी, तो आज अकरा वाजतां येथें आला होता खरा; परंतु मजपाशीं कांहींच बोलला नाहीं. मग धनशंकर ह्मणाला, असा चमत्कार झाला आहे खरा. त्यास हजार मिळाले, इतकेंच नाहीं, परंतु त्याचे धन्यासही दहा हजार मिळाले; असें ऐकून गुलालसिंगास फार वाईट वाटलें, व शुक्लाक्षाचे विपरीत वर्तणुकीमुळें धनशंकराचें मनही अगदीं खिन्न होऊन गेलें.

सुमारें रात्रीचे नऊ वाजतां शुक्लाक्ष राजवाड्यांत गेला, आणि राजा, प्रधान वगैरे अंतरंग मंडळींत बसला असतां, त्यास सांगूं लागला कीं, महाराज, त्या बंदिवानांस कबूल करण्याकारितां फारच मेहनत घेतली. तेव्हां दोघांनीं सांगितलें कीं, धनशंकराची मात्र आह्मांस मदत होती, आणखी कोणी आम्हांस ठाऊक नाहीं. पुढें बारकाईनें चौकशी कारितां असें कळतें कीं, त्याचे घरीं ह्या विषयींच्या मजकुराच्या एक दोन चिठ्याही सांपडतील; परंतु एकदम जप्ती नेऊन झाडा घेतला पाहिजे. हें ऐकून सर्वांस मोठा चमत्कार वाटला. मग राजा म्हणाला ही गोष्ट खरी असावी; कारण आमची वर्तणूक त्यास आवडत नाहीं, म्हणून तो कधींही मंडळींत येत नाहीं. त्यास ठेवण्याचें माझ्या मनांत नव्हतें; परंतु गदाधराचे आग्रहामुळें मी कबूल केलें. मग शुक्लाक्ष म्हणाला कीं, तो माझा संबंधी व त्याचे सासऱ्यानें माझें लहानप-

णापासून रक्षण करून कल्याण केलें; परंतु आपली विश्वासानें चाकरी करावयाची ह्यांत संबंध वगैरे मी कांहींच पहात नाहीं. महाराज, फार काय सांगूं! त्याणें मला आपल्या पदरीं लाविलें व मी त्याचे अनुमतानें वागतों असें समजून, आपली प्रतिष्ठा व्हावी ह्या हेतूनें मला सांगितलें कीं, ह्या बंडाच्या संकेताची बातमी मीं आणिली असें तूं राजास सांग. मी भिडेस्तव उत्तरच दिलें नाहीं. हें ऐकून तर राजास फार राग आला; आणि दांत ओंठ खाऊन त्यानें कोतवालस बोलाविण्याविषयीं हुकूम केला. त्यावेळीं सुमारें अकरा वाजण्याचा समय झाला होता. इतक्यांत कोतवाल येऊन त्यानें राजास मुजरा केला. तेव्हां राजानें त्यास सांगितलें कीं, बरोबर पंचवीस शिपाई व दोनचार कारकून घेऊन, आतांच धनशंकराचे वाड्याची जप्ती कर आणि कोणासही हिकडे तिकडे हालूं न देतां, मुख्यत्वेंकरून त्याचे बसण्याउठण्याचे खोलींतील रुमाल व आंगरख्यांत बंडाच्या मजकुराचे कागद सांपडले तर पहा. जर सांपडतील तर तेथेंच त्याच्या मुसक्या बांधून घेऊन ये, व न सांपडल्यास तसाच घेऊन ये. इतकें राजा सांगतो तों शुक्राक्ष ह्मणाला कीं, त्याचा गुलालसिंग चाकर हा गुप्त पत्रें वगैरे नेण्याचे कामांत आहे, तर त्यासही पकडून आणिलं पाहिजे. मग राजानें कोतवालास त्यासही आणण्यास सांगितलें. हुकुमाप्रमाणें करितों, असें म्हणून कोतवाल मुजरा करून चालता झाला. गुलालसिंगास पकडण्याविषयीं सांगण्याचा शुक्राक्षाचा हेतु इतकाच

कीं, ह्या गोष्टींतील खरा मजकूर त्यास माहीत आहे, तर तो लोकांस व शांतवर्म्यासही माझे गैरवर्तणुकीविषयीं सांगेल व तेणेंकरून आपले कार्यास एकादा धोका येईल; त्याचप्रमाणें कदाचित् धनशंकर, मी ही बातमी शुक्राक्षास सांगून फौज देऊन पाठविलें असें ह्मणेल; याकरितां त्यानें पूर्वींच राजाचे मनांत विपरीत भरून दिलें.

इकडे धनशंकर आपले बिछान्यावर स्वस्थ पडला आहे. येथील राजादिकांच्या दुष्ट वर्तणुकीमुळें त्यानें आपल्या प्रिय पत्नीस माहेरीं पाठवून दिल्यास सुमारें आठ दिवस झाले होते. तिचे रूपाची प्रशंसा चोंहीकडे पसरत चालली होती, व राजमंडळांतही तिच्या रूपाचीं तारीफ होऊं लागली. ह्याच कारणानें त्यानें असा निश्चय केला होता कीं, तिला येथें अतःपर कधीं च आणावयाची नाहीं. महिना दोन महिन्यांनीं आपणच तेथें आठचार दिवस राहून येत जावें. अशा शहाणपणानें त्यानें तिला पाठविली खरी; परंतु ती गेल्यापासून ह्यास एक दिवसही चैन पडेनासें झालें. दोघेंही सद्गुणी व शहाणीं ह्यामुळें त्यांची अत्यंत प्रीति जडून गेली होती. रात्रीं हा बिछान्यावर पडला म्हणजे तिची मूर्ति ह्याचे डोळ्यांपुढें उभी रहावी, व कधीं कधीं असें व्हावें कीं, उभयतांत झालेले संवाद व तिचे गुण आठवून ह्यास झोंप न येतां रात्र निघून जावी. ह्याचे मनांत वारंवार असें येई कीं, आजपर्यंत अब्रूनें दिवस काढिले तेवढे पुरत, आतां ही चाकरी सोडून द्यावी आणि आपल्या प्रियेसह राहून आनंदांत

दिवस काढावे हेंच योग्य आहे. ह्याच मजकुराचें शांतवर्मा ह्यानें त्यास नुकतेंच पत्र पाठविलें होतें. त्याच विचारांत तो निमग्न होऊन गेला आहे. इतक्यांत पुढल्या दरवाजावर मोठ्यानें कोणी धक्के देत आहे, असें ह्याचे कानीं पडलें. हें विपरीत पाहून दचकून उठला आणि त्यानें खिडकी उघडून गुलालसिंगास हाक मारली. तों तो कोण आहे म्हणून दार उघडण्यास निघालाच होता; दार उघडतो तों पुढें मशाली, मागें कोतवाल व कांहीं कारकून व शिपाई आंत शिरतांना ह्यानें पाहिले. हा भयंकर चमत्कार पाहून त्या गरीब बिचाऱ्या धनशंराचे पोटांत धडकीच भरली; परंतु तो विचारी व गंभीर मनाचा होता म्हणून चित्तास धीर देऊन, त्यानें काय आहे म्हणून कोतवालास विचारलें. कोतवाल हा ह्याचे हाताखालचा व निरंतर ह्याच्याशीं मोठ्या नम्रतेनें वागत असे, परंतु त्या दिवशीं मोठ्यानें दरवडावून, "खालीं या म्हणजे काय आहे तें सांगतों," असें त्यानें धनशंकरास उत्तर दिलें. तेणेंकरून आपणावर अरिष्ट आलें, असें त्यानें अनुमान केलें; परंतु करितो काय? मुकाट्यानें खालीं आला. तों कोतवाल पुढें सरसावून ह्मणाला कीं, "तूं कैदी आहेस" असें म्हणून त्यानें शिपायांस सांगितलें कीं, गुलालसिंग यास येथेंच धरून ठेवा; कोठें जाऊं देऊं नका. मग तो त्याचा हात धरून कारकून व एक दोन शिपाई यांसह माडीवर गेला आणि खोलींत झाडा घेऊन पहातो तों बिन नांवाच्या दोन चिठ्या सांपडल्या. त्यांतील तात्पर्य हेंच कीं, "तुमची

चिटी पावली, आपण सुचविल्याप्रमाणें आह्मी तयारी केली आहे. तुह्मी मात्र लिहिल्याप्रम णें मागाहून तजवीज ठेवावी. आज रात्रीं आमचा बेत आहे." ह्या चिटया धनशंकराचे देखतच कोतवालानें त्याचे रुमालांतून एक व खिशांतून एक अशा काढल्या, आणि त्यास वांचून दाखविल्या. मग हें काय आहे असें त्यास विचारिलें; तेव्हां पाण्यांत ढेकूळ टाकिलें असतां जसें विरघळतें तशी त्या निरपराधी धनशंकराची मुखश्री म्लान होऊन गेली, व जरी तो मोठा शहाणा व गंभीर मनाचा होता तरी, अक्कल गुंग होऊन कांहीं सुचेनासें झालें. मग कांहीं वेळ स्तब्ध होऊन त्यानें कोतवालास असें सांगितलें कीं, ह्यांतील काय खरें आहे तें ईश्वरास माहीत, मला कांहीं ठाऊक नाहीं. "कांहीं ठऊक नाहीं! आतां लवकरच ठाऊक होईल." असें म्हणून कोतवालानें त्याच्या मुसक्या बांधल्या आणि खालीं आणून गुलालसिंगाच्याही मुसक्या बांधिण्यास शिपायांस हुकूम केला. इतक्यांत धनशंकराची आई वगैरे घरांतील मनुष्यें घाबरीं होऊन माजघराचे दरवाजाचे आंतल्या बाजूस उभीं होतीं त्यांनीं, ह्याच्या मुसक्या बांधिल्या असें पाहून एकच टाहो फोडला. आई तर, "हें काय आहे, काय करितां, माझ्या बाबानें असा काय अपराध केला,' असें ह्मणत हंबरडा फोडीतच बाहेर आली. तेव्हां कोतवालानें धमकावून सांगितलें कीं, "गडबड करूं नकां," असें ह्मणून वाड्याच्या बंदोबस्ताकरितां कांहीं शिपाई तेथें ठेवून तिच्या ओरडण्याकडे लक्ष न देतां

त्या दोघांस घेऊन चालता झाला. धनशंकराचे आंगा-वर नेसलेल्या वस्त्राखेरीज दुसरें वस्त्रही नव्हतें. तसाच उघडाबोडका तो निर्दय कोतवाल त्यास घेऊन गेला. ह्या चिठ्या त्याच्या रुमालांत व खिशांत कशा आल्या त्याचें अनुमान लोकांस होईल, तथापि स्पष्टतेकरितां सांगतों. शुक्लाक्षानें त्या एका विश्वासु मनुष्याकडून लिहवून फत्तेसिंगाच्या स्वाधीन केल्या. त्याचा बाप गुलालसिंग हा धनशंकराचा विश्वासु चाकर हें वर सांगितलेंच आहे; तर फत्तेसिंगानें बापाकडे रोजच्या प्रमाणें येऊन हें कृत्य केलें.

आतां इकडे राजा वगैरे सर्व मंडळी कोतवालाची वाट पहात बसली होती, इतक्यांत कोतवालानें जाऊन मुजरा केला आणि दोघां कैदींस आणून पुढें उभें केलें. नंतर त्या चिठ्या त्यानें राजापुढें टाकिल्या. प्रधानानें त्या वाचतांच, राजानें लाल डोळे करून धनशंकराकडे पाहिलें, आणि मोठ्यानें ओरडून ह्मणाला कीं, तूं माझा घात करणाऱ्या मंडळींत शिरलास काय? तुला विश्वासु व हुषार म्हणून मोठ्या हुद्याची जागा दिली, त्याचें चांगलें सार्थक केलेंस. असें ऐकून धनशंकर हात जोडून मोठ्या नम्रतेनें ह्मणाला कीं, महाराज ज्याप्रमाणें सरकारांनीं मजवर विश्वास ठेविला त्याचप्रमाणें इश्वरास स्मरून मी आजपावेतों नीतीनें वागत असतां, हा कोणी दुसमानानें मजवर आरोप आणिला आहे. मी खचीत ईश्वरास स्मरून व आपले पाय स्मरून सांगतों कीं, ह्या चिठ्या मी आपल्या डोळ्यांनींही पाहिल्या नाहींत.

व त्यांतील मजकुराविषयीं संभूत वार्ताही मला ठाऊक नाहीं. ह्याची महाराजांनीं बारकाईनें चौकशी करावी. मग जें करणें असेल तें करावें. बंडवाल्यांच्या संकेताची बातमी ( गुलालसिंगाकडे बोट दाखवून ) ह्या माझ्या विश्वासु हेरानें आणिली आणि मी हजार स्वार घेऊन ताबडतोब जाण्याविषयीं शुक्लाक्षास सांगितलें. हें खरें किंवा खोटें हे त्यासच विचारावें. हें ऐकून शुक्लाक्षानें मोघमांत सांगितलें कीं, तें सर्व सरकारास सांगितलेंच आहे. मग राजा दांत ओंठ खाऊन म्हणाला. कीं, तुझें सर्व कपट मला ठाऊक झालें आहे. तुला व तुझ्या मदत करणाऱ्या चाकराला फाशींच द्यावें; परंतु तुजकडे पाहून थोडी माझे पोटांत दया उत्पन्न झाली कां हें सांगवत नाहीं. म्हणून जन्मठेपीची शिक्षा दिली आहे. असें बोलून राजानें त्यांस बंदिखान्यांस नेऊन टाकण्याविषयीं हुकूम केला. हें शुक्लाक्षाचे मनाप्रमाणें झालें नाहीं तरी, त्यानें मनांत असें आणिलें कीं, अर्धे अधिक कार्य झालें. बाकीचें पुढें पाहतां येईल. असा तो मनांत विचार करीत आहे, तों राजानें शुक्लाक्षाकडे पाहिलें. तेव्हां त्यानें हात जोडून काय हुकूम आहे म्हणून विचारिलें. मग राजानें हंसतहंसतच, तूं दुय्यम प्रधानाचें काम उद्यांपासून चालवीत जा असें सांगितलें. तें ऐकून मोठा हुद्दा मिळाला ह्यामुळें त्यास फार आनंद झाला. नंतर त्यानें रदबली करून फत्तेसिंगास आपली जागा देवविली. असें करण्यांत त्याचे एक दोन हेतु होते. ह्याचें सर्व गुह्य फत्तेसिंगास

माहीत होतें. तर त्याचे बापास जन्मठेप झाल्यानें त्यास वाईट, वाटेल. तर ह्या आनंदानें तें दुःख त्यानें विसरावें व आपण सांगितल्याप्रमाणें वर्तणूक करावी. बंदिखान्यावर दुसरा कोणी आला असता तर ह्याचे पुढील दुष्ट हेतु साधण्यास कांहीं अडचण पडती ती न पडावी. आतां धनशंकराशीं आपण विपरीत वागून बक्षीस व कीर्ति मिळविली, ही गोष्ट कदाचित् तो शांत- वर्मा ह्यास कळवील, ह्मणून अवकाश न करितां त्याच दिवशीं त्यानें हें सर्व भारूड रचून त्यास व त्याचे मा- हितगार चाकरासही बंदींत टाकिलें. इतकें निर्विघ्नपणें तडीस गेलें तेव्हां त्यास वाटलें कीं, आतां कोणताही खरा मजकूर शांतवर्म्यास कळून मी विपरीत वागलों असें त्याचे मनांत येण्याचा अगदीं संभव नाहीं.

# भाग ४.

॥ श्लोक ॥

केले खलांवर बहू उपकार व्हाया
संतुष्ट, जाति परि ते समुळींहि वांया ।
त्यांचे मनीं वसत नाहिं दया कधींही
आप्तांसही छळुनि पाडिति दुःखडोहीं ॥

इरावती नगरीचे ठायीं सुप्रभातीं सूर्योदय झाला असतां मोठा चमत्कारिक समारंभ चालला आहे. त्या दिवशीं वटसावित्री होती, ह्मणून नगरींतील कितीएक स्त्रिया पूजासामग्री व वायनें घेऊन व उत्तम वस्त्रालंकार लेवून नदीचे तीरीं जात आहेत. कितीएक घांटावरील वडाचे पारावर बसून पूजा करीत आहेत. कितीएक स्नान करिताहेत. कितीएक एकमेकीस हळदकुंकू देत आहेत. ब्राह्मणाचीही पूजा सांगण्याची वगैरे एकच लगबग होऊन गेली आहे. कितीएक ब्राह्मण स्नानें करिताहेत . कितीएक संध्याजपादि करण्यास आसनें घालून बसले आहेत. कितीएक देवपूजा करीत आहेत. अशा प्रकारें एकच गर्दी होऊन थाट बनून राहिला आहे. इतक्यांत दहापांच चाकर बरोबर असून **मुक्तामाला** आपल्या समवयस्क कांहीं सख्यांसहवर्तमान तेथें आली. जसा नक्षत्रांत चंद्रमा अशा प्रकारची ती त्या स्त्रीसमाजांत येतांच शोभा दिसूं लागली, तिनें त्या दिवशीं सर्व जडावाचे दागिने घातले होते, तेणेंकरून व कांहीं

महिनेही गेल्यामुळें तिचे शरीराची कांति फारच तेजस्वी दिसूं लागली. ह्या कारणामुळें ती ह्या दिवशीं जितकी रमणीय दिसली तितकी, पूर्वी कधींच दिसली नव्हती. पुरुष काय, परंतु सर्व स्त्रिया देखील तिच्याकडे पाहतच स्तब्ध राहिल्या. असो, तिनें पूजा करून सौभाग्यवायनें दिलीं. मग देवदर्शन करून वाड्यांत जाऊन पोचली. ही जों आंत जाते तों मागाहून एक घोडेस्वार आंत शिरला. त्यास चाकर लोकांनीं कोठून आलास असें विचारतांच मी जयपुराहून आलों असें त्यानें सांगितलें. तें मधुर नांव ऐकतांच मुक्तामालेस मोठा आनंद झाला. मग किंचित् हास्यवदन करून ती आंतील चौकांत गेली. तों तिचा वृद्ध पिता पूजा वगैरे आटोपून नुकताच बाहेर आला होता. त्यास ही आपली कन्या फारच रमणीय दिसते असें वाटून अतिशय आनंद झाला. मग हंसत हंसत कां पूजाविज्ञा आटपली काय ? असें त्यानें तिला विचारिलें. नंतर तिनें हास्यवदन करून झाली ह्मणून सांगितलें, आणि जयपुराहून स्वार आला आहे असें सांगत आहे तों तोही आंत आला, आणि शांतवर्मा ह्यास सलाम करून त्यानें कागद पुढें टाकिला. मग आपली कन्या कागदांतील मजकूर ऐकण्याकरितां उभी राहिली आहे असें समजून त्यानें मोठ्यानें वाचण्यास आरंभ केला, तो येणेंप्रमाणें:—

"तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री तात्या मुक्काम इरावती, वडिलांचे सेवेशीं, बालक शुकाक्षाचे अनेक शिर-

साष्टांग नमस्कार विज्ञापना, विशेष—दोन दिवसांपूर्वीं एथून दहा कोशांवर सुमारें पांचशें बंडवाले जमून, त्यांनीं राजाची स्वारी शिकारीहून परत येत असतां, एकाएकीं हल्ला केला, आणि कितीएक लोकांस ठार मारून बहुत नासाडी केली. ह्या बंडवाल्यांच्या संकेताची बातमी सुमारें रात्रीचे आठ वाजतां मला लागली, मग बरोबर हजार स्वार घेऊन मी ताबडतोब तेथें गेलों.आणि त्यांचा मोड करून पन्नाससाठ असामी कैदही केले. मी गेलों नसतों तर त्यांनीं राजासुद्धां सर्वांस ठार मारिलें असतें. ह्यांत दुःखाची गोष्ट हीच कीं. ह्या बंडवाल्यांस आंतून आपले धनशंकरराव सामील होते, हें त्या कैदी लोकांस हाणमार करितां त्यांनीं कबूल केल्यावरून समजलें, व राजानें वाड्याची जप्ती करून झाडा घेतां दोन पत्रेंही सांपडलीं. अशा अविचाराची गोष्ट त्यांनीं कशी केली हें मोठें आश्चर्य वाटतें. इतकेंही असून त्यांनीं जर मला पूर्वीं ही गोष्ट सांगितली असती, तर हरएक प्रयत्नानें त्यांस ह्या संकटांतून पार पाडून नेलें असतें. फांशीचीच शिक्षा व्हावयाची, परंतु मेहेरबानीनें राजानें जन्मठेपेची शिक्षा दिली. ( हें वाचतांच त्याचे व मुक्तामालेचे डोळ्यांतून अश्रुपात चालले) हें कळविण्यास मला फार दुःख वाटतें. येथें मला रात्रंदिवस चैन पडेनासें होऊन गेलें आहे. आपणास एकुलती एक कन्या आणि तिचें असें झालें, तेणेंकरून अतिशयित दुःख होईल. माझी मुक्तामाला हा मजकूर ऐकून काय करील! आतां हा सर्व जन्म तिनें कोणाकडे

पाहून काढावा?" हा मजकूर वाचतांच त्याचा कंठ दाटून आला, डोळ्यापुढें कांहीं दिसेनासें झालें, हातचें पत्र गळालें, मग दोघेंही आरोळी फोडून धाडदिशीं जमिनीवर पडलीं. कांहीं कारकून व आश्रित पत्र वाचीत असतां जवळ होतेच, ते त्यांस सांवरूं लागले. हा गोंधळ ऐकून सोमदत्त माडीवर होता, तो धांवतच खालीं आला, मुक्तामालेची माता देवघरांतून घाबरी घाबरी बाहेर आली, व वाड्यांतील सर्व लोक तेथें जमा झाले. चौकशीअंतीं काय आहे हें समजतांच **भाग्यशीला** व सोमदत्त ह्यांनीं मोठ्यानें हंबरडा फोडून रडण्यास आरंभ केला. आश्रित व वाड्यांतील दुसऱ्या बायका ह्यांचा रडण्याचा मिळून एकच कल्होळ होऊन गेला. इतक्यांत मुक्तामाला मूर्छित पडली होती, ती सावध झाली, मग तिनें फारच आकांत मांडिला व ती आंगावरील दागिने काढून फेंकून देऊं लागली. ही बातमी लागलीच गावांत सर्वत्र पसरली व सर्व आपआपलीं कामें सोडून वाड्यांत आले. तेणेंकरून तेथें एकच गर्दी होऊन गेली. सर्वांचे डोळ्यांतून अश्रुपात चालले. धनशंकर नुकताच येऊन गेला होता, त्यामुळें तो सर्व लोकांचे डोळ्यापुढें दिसत होता. अशा अनेक कारणांनीं जें सर्वांस दुःख झालें, तें लिहून कळवितां येत नाहीं. शांतवर्मा मोठा विचारी, तरी त्याचा शोक आवरेना. मग गांवांतील वृद्ध व संभावित लोक पुढें होऊन ह्मणाले कीं, जर आपणच असा शोक करीत बसाल, तर त्या मुक्तामालेचें सांत्वन कोणी बरें करावें? झाल्या गोष्टीस

इलाज नाहीं, तर हिचें सांत्वन करून पुढें त्याची मुक्तता कोणते प्रकारें होईल हा विचार करणें आपणांस योग्य आहे. हें ऐकून त्यानें सर्व दुःख गिळिलें, आणि कन्येस म्हणाला. बये, आतां शोक पुरे कर, तुझ्यावर माझा सर्व जीव आहे, तर जर तूं अशाच प्रकारें शोक करशील तर माझे प्राण फार दिवस वांचणार ? ांत. तुजकडे पाहून माझें काळीज तिळतिळ तुटत आहे, तर मजकडे व माझे वयाकडे पहा. असें ह्मणून तो तिजपाशीं गेला आणि तिचे तोंडावरून हात फिरवूं लागला; तों तिनें उठून त्याचे गळ्यास मिठी मारिली आणि "आतां मी कधीं पाहीन" असें ह्मणून मोठ्यानेंच रडण्यास आरंभ केला. तें ऐकून शांतवर्माही रडूं लागला. मग काय विचारावें! पुनः एकच कल्होळ होऊन गेला. जेवढे लोक तेथें जमले होते तेवढेही मोठ्यानें रडूं लागले. कोणासही तो हुंदका सांवरेना. असें पाहून शांतवर्मा, मुक्तामालेस फरपटत फरपटत आंत घेऊन गेला, मग त्यानें अनेक विचाराच्या गोष्टी सांगून तिचें कांहींसें सांत्वन केलें. गांवांतील लोक हळूहळू दुःख करीतच आपआपल्या घरीं गेले व वाड्यांतील सर्व मंडळी आपआपल्याशींच दुःख करीत निरनिराळ्या ठिकाणीं बसली.

इकडे जयपुरांत दुसरे दिवशीं प्रातःकाळीं धनशंकराची अशी अवस्था झाली ही बातमी पसरली. ती ऐकून सर्व सज्जन लोकांस अतिशयित खेद झाला. भयानकानें असा हुकूम केला कीं, धनशंकराच्या घरां-

तील सर्व मनुष्यांस एकवस्त्रानिशीं बाहेर काढून सर्व मालमत्ता सरकारांत जमा करावी. त्याची व दुसऱ्या बंडवाल्यांची मिळून सुमारें पन्नास लक्षांची सरकारी खात्यास जमा झाली. हें पाहून राजास वाटलें कीं, आपणास खर्चाची अडचण होती ती सध्या दूर झाली; हा एक मोठा फायदाच झाला. जेव्हां धनशंकराची माता व इतर मनुष्यें ह्यांस बाहेर काढिलें तेव्हां, त्या बिचाऱ्या दुःखी मनुष्यांस कोठेंच आधार नाहींसा झाला. शुक्लाक्षानें असें मनांत आणिलें कीं, हीं आतां इरावतीस जातील, तर आपणांस त्यांची तजवीज केली पाहिजे. मग त्यानें त्यांस मोठ्या आदरसत्कारानें आपल्या घरीं आणिलें, आणि झाल्या गोष्टीचा मोठा खेद करून व खर्चाची वगैरे सर्व तजवीज करून त्यांची इरावतीस रवानगी करून दिली. नंतर तो आपला दुष्ट हेतु सिद्धीस नेण्याच्या विचारास लागला. आतां जेव्हां फत्तेसिंगानें आपल्याबापास जन्मठेप झाली असें पाहिलें तेव्हां त्यानें शुक्लाक्षास असें कसें केलें ह्मणून विचारिलें. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, त्यास मोकळें सोडून आपला मतलब कसा साधला असता? बंदिखान्यावर तूंच आहेस तेव्हां त्यास कोणतें दुःख आहे असें नाहीं. हें ऐकून ह्यानें आपलें सर्वस्वी कल्याण केलें ह्मणून त्यास कांहीं पुढें बोलवेना, व द्रव्य आणि मोठा अधिकार मिळत असल्यास तो सोडून मातापितरादि आप्तमित्रांचा स्वीकार करतील असे फारच थोडे आढळतील. फार काय सांगावें कीं, त्यांचा घात करण्यासही कितीएक प्रवृत्त

होतील. पाहूं गेलें असतां अशा प्रकारचीं उदाहरणें थोडीं आढळण्यांत येतील असें नाहीं. असो, हें विषयांतर झालें, तर आपल्या प्रस्तुत विषयाकडे वळूं.

धनशंकराचे पायांत बिड्या घालून त्यास एका अंधार कोठडींत घालून ठेविलें. हांतरावयास एक घोंगडी व पाणी पिण्यास एक लांकडांचा कटोरा, ह्याखेरीज दुसरें कांहीं नाहीं. खाण्यापिण्याच्या हालांस तर विचारावयास नको ! भाकरी व भाजी, तीही एकवेळ, ह्याखेरीज दुसरें कांहीं नाहीं. येथील बंदिवानांची बऱ्याच रीतीची तजवीज असे; परंतु ह्यास हाल हाल करून मारावें असें शुक्लाक्षाचे मनांत, ह्मणून त्यानें ह्याची अशी व्यवस्था ठेविली होती. त्यास गुडघाभर बिछान्यावर निजण्याची जन्मापासून संवय, त्याच प्रमाणें उत्तम अन्न खाण्याची संवय, ह्यामुळें ती कोरडी भाकरी गिळूं नयेव रात्रीं नुसत्या घोंगडीवर झोंप येऊं नये. पांघरावयास कांहीं नसल्यामुळें थंडी वाजावी व ढेंकूण पिसा व चिलटें ह्यांनीं रात्रंदिवस तोडतोडून घ्यावें. अशा प्रकारचें संकट एकदम त्यावर येऊन पडलें. ह्याची आपण सांगितल्याप्रमाणें तजवीज ठेविली आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां कधींकधीं शुक्लाक्ष तेथें जात असे; परंतु त्या निर्दयास कधींही त्याची करुणा आली नाहीं. तो त्याच्याशीं एक शब्द देखील कधीं बोलला नाहीं. एके दिवशीं शुक्लाक्ष तेथें आला असें पाहून अत्यंत त्रासल्यामुळें धनशंकरानें दीनपणें त्याची प्रार्थना केली कीं, ढेंकूण, पिसा, व थंडी ह्यांनीं मला फार पीडा होते; तर

मेहेरबानी करून पांघरण्यास एक धोतर देशील तर मजवर मोठे उपकार होतील. हें ऐकून डोळे वटारून त्यानें उत्तर केलें कीं, तुह्मांस कधींच थंडी वाजूं नये व ढेंकूण पिसा चावूं नयेत अशी लवकरच तजवीज होईल, असें ह्मणून तो चालता झाला. अशा प्रकारचे त्याचे कठोर शब्द ऐकून, दीनवाण्या तोंडानें बोललों नसतों तर बरें झालें असतें असें त्यास वाटलें. दशा त्या दुःखकारक अवस्थेंत पडल्यामुळें त्याचें शरीर थोडक्याच दिवसांत निस्तेज होऊन गेलें; शक्ति क्षीण होत चालली; आईची व इतर माणसांची काय दशा झाली असेल ह्याविषयींच्या काळजीनें त्याची कंबर खचून गेली, आपल्या प्रिय पत्नीस हें वर्तमान समजलें म्हणजे तिची काय दशा होईल, तिचा शोक कधींही कमी व्हावयाचा नाहीं, तिला आतां सुख कोठून होणार, मजवाचून तिला चैन पडावयाचें नाहीं ! जरी तिला सर्व यथास्थित आहे तरी माझ्या वियोगामुळें ती मजसारखीच क्षीण होत जाईल. आतां ती मला भेटेल काय! ती हंसत हंसत लडिवाळपणानें माझ्याशीं बोलेल काय ! ती आपल्या गोंडस व नाजुक हातांनीं कधीं तरी माझे गळ्यास मिठी घालील काय ! असा शोक करीत असतां त्याचा कंठ दाटून आला, डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. मग मोठ्यानें दुःखाचा सुसकारा टाकून ह्मणतो. “हरहर ! हे ईश्वरा, हा अन्याय तुला कसा आवडला ? मी नीतीनें तुला भिऊन वागत असतां मजवर असा कां कोप केलास ? तूं सर्व-

व्यापक म्हणून कोणी कसेंही एकांतीं पातक अथवा अन्याय केला तरी तुला समजतो; मग हे दीनदयाळा, मजविषयीं कां डोळेझांक केलीस? तुझ्या सेवेविषयीं मी चुकलों असें मला वाटत नाहीं. आजपर्यंत जें करणें तें तुला भिऊनच केलें. असें असतां माझा सर्वस्वी नाश होऊन ह्या दुःखसमुद्रांत पडलों हें तुला समजलें नाहीं काय? खचीत समजलें आहे ह्यांत संदेह नाहीं. तुझे राज्यांत अन्याय घडला असें ह्मटलें ही चूक आहे. सर्वव्यापक, दयाळु, नीतिमान व भक्तवत्सल असा जो तूं त्या तुझ्या राज्यांत अशी अनीति कधीं व्हावयाची नाहीं. अज्ञानी, अविचारी, लोभी व विषयासक्त असे जे आह्मी त्या आह्मांकडून अपराध झाल्याखेरीज तूं कधींही पाठमोरा व्हावयाचा नाहींस. तर हे प्रभो, तुला मनोभावें शरण आलों, आतां उपेक्षा करूं नको. लवकर धांव आणि मला ह्या दुःखांतून सोडीव. तुज-वांचून आतां कोणाचाही ह्या अनाथास आधार नाहीं." अशा प्रकारें धनशंकर त्या कोठडींत घोंगडीवर पडून ईश्वराचा धांवा करीत आहे.

इकडे भयानकानें त्या सर्व बंदिवानांस फांशीं देऊन व आपणास ह्या कृत्यांत बराच नफा झाला असें समजून पूर्वक्रमास आरंभ केला. ज्या दोघां बंदिवानांस शुक्लाक्षानें मुक्त करण्याचें वचन देऊन धनशंकराविरुद्ध साक्षी देण्याचें कबूल करविलें होतें त्यांसही फांशीं दिलें. कारण हे जिवंत राहिल्यास पुढेंमागें अडचण पडेल, असें शुक्लाक्षास वाटून त्यानेंच हें कृत्य केलें. असा

ह्या भयंकर अनर्थ पाहून राज्यांतील लोक घाबरून गेले. जे एकत्र जमून राजाचे विरुद्ध बेत करीत होते, त्यांस फारच दहशत पडली. त्यांस एक मोटी गोष्ट अनुकूल झाली ती अशी कीं, सांपडलेल्या बंदिवानांपैकीं, ह्यांत आणखी कोण आहेत, हें एकानेंही कबूल केलें नाहीं, तरी कधीं कोणावर कसा प्रसंग येईल ह्याचा अगदीं भरंवसा नाहीं असें त्यांस होऊन गेलें. तथापि ह्या अनर्थानें त्या लोकांचें धैर्य न खचतां त्यांची अधिकाधिकच वृद्धि होत चालली. ह्या उदाहरणानें राजाचे डोळे उघडावे, परंतु तसें न होतां लोकांस फार त्रास येईल अशा क्रमास त्यानें आरंभ केला. त्याच्या मंत्र्यांनीं त्यास असें सांगितलें कीं, ही एक गोष्ट चांगलीच झाली कीं, ह्या दहशतीनें लोक पुनः असें करण्यास प्रवृत्त होणार नाहींत. असा त्यांचा निश्चय होऊन मग देशांतील उत्तम उत्तम स्त्रियांवर जुलूम करण्याचा त्यांनीं क्रम चालविला. ही संधि फार चांगली आहे असें मनांत आणून शुक्राक्षानें एकांतीं राजास सांगितलें कीं, धनशंकराची स्त्री मुक्तामाला स्वरूपानें इतकी सुंदर आहे कीं, तिजपुढें रंभाही तुच्छ आहे. तर अशा प्रकारचें रत्न सरकारास योग्य आहे असें मला वाटतें. मग राजा ह्मणाला कीं, मीही तिचे लावण्याविषयीं असेंच ऐकतों; परंतु उघडपणें जुलूम करितां येत नाहीं. कारण कदाचित् त्यापासून मोटा अनर्थही होईल. तर कितीही खर्च झाला तरी चिंता नाहीं; परंतु ती युक्तीनें साध्य होईल तर फार चांगलें. मी यत्न करितों, सफळ

झाला म्हणजे सरकारास कळवीन. असें शुकाक्षानें राजास सांगतांच त्यांस मोठा आनंद झाला, आणि म्हणाला कीं, तूं हें काम करशील अशी माझी खात्री आहे. मग शुकाक्ष लागेल तसा पैसा खजिन्यांतून घेण्याचा हुकूम घेऊन घरीं आला.

शुकाक्षानें पैसा मिळविण्याकरितां वर सांगितलेली तजवीज केली. मुक्तामालेस आणून राजास देण्याचें त्याचे ध्यानींमनींही नाहीं. तिला ठार मारून शांतवर्म्याची सर्व संपत्ति आपणास मिळावी हा त्याचा मुख्य हेतु. आतां राजास असें सांगितल्यानें पैसाही मिळून प्रसंगीं पाहिजे तसा अधिकारही चालवितां येईल हें त्यानें मनांत आणिलें, असो. घरीं येऊन काय तजवीज करावी ह्याविषयीं तो योजना करूं लागला. मग त्यानें तेथें एक हुषार पंचाक्षरी होता त्यास बोलावून आणिलें आणि एकांतीं नेऊन सांगितलें कीं, माझी एक कामगिरी आहे ती तूं चांगले रीतीनें बजाविशील असें मला वाटतें; परंतु कोणापाशीं बोलणार नाहीं, अशी शपथ वाहा. इतकेंही करून बोललास तर माझ्याशीं गांठ आहे. तुझीं सर्व पाळें मुळेंही खणून काढीन, अशी त्यानें त्यास धमकीही दिली. तो बिचारा घाबरला, आणि हात जोडून ह्मणाला. महाराज, मी आपला सेवक आहें; हुकूमाप्रमाणें वागेन. आपल्या सारख्यांशीं भलती वर्त्तणूक करून कधीं निभाव लागावयाचा नाहीं व त्यांत फायदाही नाहीं, हें मी पक्कें समजतों. तर चाकरास काय तो हुकूम करावा.

मग तो ह्मणाला, तुला इरावती माहीत आहे कीं, नाहीं? तो ह्मणाला, आहे. तर तेथें धनशंकराची स्त्री मुक्ता-माला आपले बापाचे घरीं आहे; त्या ठिकाणीं जाऊन तिला कोणत्या तरी उपायांनीं ठार मारून तिचें डोकें मला दाखविण्याकरितां घेऊन यावें. ही कामगिरी जर तूं चांगल्या रीतीनें बजावशील तर पांच हजार रुपये बक्षीस देईन. ह्याखेरीज पूर्वीं खर्चाकरितां पाहिजे असल्यास हजार पांचशें रुपये आतांच देतों. हें ऐकून तो ह्मणाला. काम तर अवघड व जिवावरील आहे खरें; परंतु पार पाडीन असें वाटतें. मग शुक्राक्षानें हजार रुपये लागलेच देऊन उद्यांच निघून जा असें त्यास सांगितलें. मग तो सलाम करून लागलाच चालता झाला.

त्या पंचाक्षऱ्यास एकदम हजार रुपये मिळाल्यामुळें अतिशयित आनंद झाला व पांच हजार रुपये मिळाले ह्मणजे मी मोठा श्रीमान् होईन, मग अनेक प्रकारचे विषयोपभोग भोगीन, असे अनेक प्रकारचे तरंग त्याचे अंतःकरणांत उठूं लागले. हल्लीं राज्यांत शुक्राक्षाचा इतका अधिकार आहे कीं, तो जी करील ती पूर्वदिशा. मग त्याची आपणावर बहाल मर्जी होईल. मग मला काय कमी आहे, जें पाहिजे तें करीन. अशा मोठमोठ्या विचारांत त्याचें अंतःकरण अगदीं बुडून गेलें. वाटेनें जातांना जे लोक आजूबाजूनें जात, ते सर्व आपणापेक्षां फार हलके असें त्यास दिसूं लागलें, परंतु आपण करणार काय? व तें योग्य किंवा

अयोग्य ह्या विचाराकडे त्याचे अंतःकरणाचा थोडा देखील कल झाला नाहीं. असो, असे विचार करीत तो आपणाबरोबर एक दोन सागे घेऊन इरावतीस जाऊन पोंचला. त्या साग्यांस त्यानें आपला मुख्य उद्देश कळविला नाहीं. मग त्या नगरींत जेथें मुक्तामालेची दासी रहात होती तेथें जागा घेऊन त्यानें आपलें स्तोम माजविण्यास आरंभ केला. त्या साग्यांनीं आपलें बिऱ्हाड दुसरे ठिकाणीं ठेविलें होतें. कारण ह्या मंत्र्याचे आपण मदतगार आहों असा लोकांस संशय येऊं नये. त्यांनीं लोकांस असें सांगावें कीं, ह्या बोवाची कीर्ति ऐकून आह्मीं त्यांस आपले गांवीं नेण्याकरितां आलों आहों. ते पिशाचबाधा सहज दूर करितात. कोणास कसाही रोग असो, त्याचा मंत्रसामर्थ्यानें समूळ नाश करून टाकितात. त्यांस पुढें काय होणार हें देखील समजतें. फार काय सांगावें ! जर त्यांनीं मनावर घेतलें तर हिकडचा गांव तिकडे व तिकडचा हिकडे, असें करण्याचें त्यांचें आंगीं सामर्थ्य आहे. मग गारुड्याप्रमाणें नानाप्रकारचे जिन्नस आणणें हें कृत्य तर त्यांचे हातचा मळ आहे.

ह्या वर सांगितलेले कारणांमुळें त्याची मोठी प्रतिष्टा झाली आणि अनेक भोळे लोक तेथें जमूं लागले. मुख्यत्वेंकरून बायकांची फारच गर्दी होऊं लागली. तेथें लोक बसले असतां एकाएकीं, मिठाई, नारळ, खारका, बदाम पानसुपारी व अनेक प्रकारची फळफळावळ वरून त्या ठिकाणीं मध्येंच पडावी. तें पाहून लोकांस

मोठा अचंबा वाटावा, परंतु हें सर्व त्या सांग्यांचें काम. मग बोवांनीं जवळ असतील त्यांकडून ते जिन्नस सर्वांस वांटवावे. कितीएकांस आंगारे द्यावे. कधींकधीं आंगास आणून भुतें काढण्याचा त्यानें आव घालावा. तेथील लोक फार भोळे, ह्यामुळें त्याचें मोठें वजन पडलें. ज्याच्याशीं बोवा बोलतील तो दैववान् असें झालें. कारण फारच लोक जमूं लागल्यामुळें साधारण लोकांचीं दाद लागेनाशी झाली. गांवांतील सर्व लोकांचें तोंडीं ह्याच गोष्टी होऊन गेल्या. ह्या बोवा विषयींच्या नाना तऱ्हेच्या गोष्टी ऐकून एकोदिवशीं मुक्तामालेच्या मनांत आलें कीं, एकवार आपणही जाऊन त्या बोवाची भेट घ्यावी. असें मनांत येण्याचें कारण इतकेंच कीं, आपल्या प्रियपतीस एकदां भेटण्याविषयीं तिचे अंतःकरणांत मोठी उत्कंठा प्राप्त झाली होती. ह्यामुळें तिचे मनांत तेच विचार रात्रंदिवस घोळत असल्यामुळें तिला तें वेडच लागलें होतें. तिनें त्या दुःखांतच झुरत असावें, परंतु तिच्या दयाळू पित्यानें तिची दुःखी मुद्रा पाहिली म्हणजे त्यास अत्यंत दुःख होई. ह्मणून मात्र ती त्याचे संनिध असली म्हणजे सर्व दुःख विसरल्यासारखें दाखवी. खऱ्या बहीणभावंडांत इतकी परस्परांवर प्रीति असत नाहीं अशा प्रकारची सोमदत्ताची व तिची प्रीति असे, ह्मणून त्याच्या सहवासानें मात्र तिच्या मनास कांहींशी विश्रांति होई. तो अनेक प्रकारच्या उपदेशपर व मनोरंजक गोष्टी सांगून तिच्या अंतःकरणांतील तें दुःख कमी करण्याविषयीं मना-

पासून झटत असे. परंतु होकायंत्रांतील लोहचुंबकाची सळई दुसरे दिशेस केली असतां क्षणिक त्या दिशेकडे राहून ज्याप्रमाणें लागलींच उत्तरेकडे वळते त्याप्रमाणें त्या दोघांचा वियोग झाला म्हणजे तिचें मान त्या प्रियकर मूर्तीकडे वळे. अशा प्रकारची तिची दशा होऊन गेली होती.

आतां जेव्हां तिच्या मनांत त्या दांभिक बोवांस भेटावें असें आलें, तेव्हां तिला कळलें होतें कीं, आपल्या रुपीच्या घरींच तो राहिला आहे. मग तिनें रुपीस विचारिलें कीं, रुप्ये, तुला कसेंगे वाटतें ? जो तुझ्या घरीं बोवा आला आहे, तो आपल्या मंत्रसामर्थ्येंकरून माझ्या पतीस सोडून गुप्तरूपें येथें घेऊन येईल काय ? हें ऐकून रुपी ह्मणाली बाई साहेब, तो भुतें काढतो, मोठमोठे समंध काढतो व रोगराई बरी करतो, माझी हिरी सांगत होती कीं, तो वाडेच्यावाडे हिकडचे तिकडे उचलून नेतो. तर तुमचें काम तो सहज करील. बरें तुह्माला सुचलें ! कीं त्याला विचारावें. मग मुक्तामालेनें सांगितलें कीं, तो एकटा असेल तेव्हां तूं त्याला विचार आणि काय ह्मणतो तें मला येऊन सांग. मग रुपी दोनप्रहरीं घरीं गेली, तों एक दोघे जवळपास कांहीं काम करीत असून बोवासाहेब एकटेच आसनावर बसले आहेत. ही संधि बरी आहे असें पाहून, ही कांहींशी पुढें गेली, आणि हात जोडून ह्मणाली कीं बोवासाहेब, आपली अंमळ एकीकडे गांठ पडेल तर मला कांहीं विचारावयाचें आहे. बोवाचे मनांत तें कर्तव्यच.

त्यांनीं त्या जवळच्या लोकांस बाहेर जाण्याविषयीं सांगितलें. मग रुपी पुढें होऊन हळूच बोलली कीं, माझ्या यजमाननीचा नवरा राजानें बंदींत टाकिला आहे, तर त्याला कृपा करून आपल्या मंत्रांनीं आणून द्याल तर ती तुह्मांस जें मागाल तें देईल. असें तिनेंच मला विचारण्यास सांगितलें आहे. त्यानें उत्तर केलें कीं, हीं गोष्ट मोठी अवघड आहे असें नाहीं; तूं तिला आणून मला भेटीव म्हणजे काय तें सांगेन. हा मजकूर दासीनें येऊन सांगतांच मुक्तामालेच्या आनंदास पारावार नाहींसा झाला. मग हा मजकूर कोणासही सांगूं नको असें तिनें दासीस सांगून ठेविलें, आणि एकांतीं त्याची भेट घेण्याचा तिनें निश्चय केला.

नंतर एके दिवशीं त्या बोवाचे मठींत कोणी नसावें अशा प्रकारची तजवीज आपल्या दासीकडून ठेवून मुक्तामाला सुमारें रात्रीचे अकरा वाजतां चोरून तेथें गेली. तिचे बरोबर ती विश्वासु दासी मात्र होती, तेथें जातांच तिनें बोवास भक्तिपूर्वक नमस्कार करून विनंती केली कीं महाराज, मी असें समजत्यें कीं, मला ह्या दुःखसागरांतून पार पाडण्यास आपणास ईश्वरानेंच येथें धाडिलें; नाहींपेक्षां हे चरण माझे दृष्टीस कोठून पडणार? तर मला आपली कन्या समजून संसारांत घालाल तर तुमचे उपकार जन्मोजन्मींही विसरावयाची नाहीं. मग तुह्मीं जें मागाल तें देण्यास माझा पिता कधीं मागेंपुढें पहावयाचा नाहीं. हें ऐकून त्यांनीं वर आकाशाकडे पाहिलें व तीस ध्यान केल्यासारखी मुद्रा दाख-

खिली. आणि ह्मणाले कीं, माझ्या जगदंबेनें मला कोणतें कमी केलें आहे असें नाहीं. मी रानांत जाऊन बसलों तरी, मनांत येतांच सर्व सिद्धता आपोआप होत असते. लोकांच्या एका कवडीचीही मला इच्छा नाहीं. मनांत आलें तर लाखो रुपये दुसऱ्यास देण्याचें माझे अंगीं सामर्थ्य आहे. आतां गांवोगांव हिंडण्याचें कारण इतकेंच कीं, जे लोक अनेक प्रकारच्या व्याधींनीं व दुःखांनीं पीडित असतात, त्यांवर उपकार करावे; दुसरा कांहीं हेतु नाहीं, आणि ज्या अर्थीं तूं मला बापाप्रमाणें मानिलेंस, त्याअर्थीं तुला कन्या समजूनच तुझें काम हट-कून करीन; परंतु तुझ्या ह्मणण्याप्रमाणें होण्यास एक अडचण आहे. ती ही कीं, माझ्या मंत्राचा अम्मल राज-सत्तेवर चालत नाहीं. ह्यामुळें तुझा पति मंत्रानें हिकडे येईल, असें मात्र घडावयाचें कठीण. तुला मंत्र सिद्ध करून दिला ह्मणजे तूं मात्र तेथें जाशील आणि त्याची तुझी गांठ पडेल. मग तोच मंत्र तूं त्यास सिद्ध करून दिलास, म्हणजे तुह्मां दोघांस तेथून पाहिजे तिकडे जातां येईल. आतां तुला मंत्र सिद्ध करून देण्यास येथून आठ दिव-सांचे वाटेवर डोंगरांत माझी लीलांबरी ह्मणून देवी आहे, तेथें गेलें पाहिजे. गेल्यानंतर एका रात्रीचें काम! सर्व सामग्री तयार करून त्या देवीपुढें बसून मी सांगेन त्याप्रमाणें मंत्र जपला, म्हणजे कार्य झालें; परंतु तुला एकटीला आलें पाहिजे, दुसरें बरोबर कोणी उपयोगी नाहीं. असें सांगून त्यानें, "जय जगदंबे" असें ह्मणून वर हात केला, तो एक हळदीचा व दुसरा

कुंकवाचा असे दोन पुडे त्याचे हातावर पडले, आणि मागाहून एक नारळ, कांहीं खारका व बदाम एकाएकीं त्या दोघांच्या मध्यें येऊन पडले. हा तुला प्रसाद घेऊन जा, असें म्हणून त्यानें तें सर्व मुक्तामालेस अर्पण केलें, आणि सांगितलें कीं, आतां तूं जा आणि पुरता विचार करून मला काय तें कळींव; मी पाहिजे तेव्हां तुजकरितां श्रम घेण्यास तयार आहें. मग ती नमस्कार करून चालती झाली. मुक्तामाला ज्याप्रमाणें कोणास न कळतां चोरून गेली होती, त्याच प्रमाणें येऊन आपल्या बिछान्यावर पडली. बोवानें मंत्रसामर्थ्येंकरून जिन्नस आणलेले पाहून ती अगदीं विस्मित होऊन गेली होती, व तिचे मनाची अशी खात्री होऊन गेली कीं, हा कोणी अलौकिक पुरुष आहे. हा सांगितल्याप्रमाणेंच करील ह्यांत संशय नाहीं. आपल्या प्रियकर पतीची भेट होण्याची संधि आली आहे, अशा प्रकारच्या विचारांत ती निमग्न होऊन गेली. अशा प्रसंगीं झोंप कोठून येणार? ही गोष्ट आपल्या पित्यास व सोमदत्तास कळवावी किंवा नाहीं, ह्याविषयीं ती विचार करूं लागली. एकदां तिला असें वाटलें कीं, ह्या गोष्टीस ते मोठ्या आनंदानें संमति देतील. पुनः असें मनांत आलें कीं, इतकें लांब ह्या बोवाबरोबर एकटीस पाठविण्यास ते अनेक शंका घेतील, आणि स्वतः तिलाही वाटलें त्यांस शंका येईल हें खरेंच; परंतु इतकें लांब त्याजबरोबर एकटें जावयाचें, ह्याचा मलाही पुरतेपणीं विचार केला पाहिजे. नाहींपेक्षां

आगींतून निघून फोपाटयांत पडल्यें असें होईल. छे: असें नाहीं, तो मनुष्य फार सज्जन दिसतो. त्यानें मला आपली कन्या असें ह्मटलें आहे. माझें मन वेडें, अशा भलभलत्या शंका घेऊन ही संधि तें घालवील. शेवटीं तिनें असा निश्चय केला कीं, कोणासही न विचारितां रुपीस मात्र बरोबर घेऊन जावें. मग दुसरे दिवशीं त्या दासीबरोबर आपला विचार तिनें त्या बोवास कळविला आणि रात्रौ आपण तेथें जाऊन दोघांच्या मतें असें टरविलें कीं, एके दिवशीं दोघांनीं जावें, हें बरोबर नाहीं. तर बोवांनीं उद्यां निघून जावें आणि पुढें तिसरे दिवशीं गांवाबाहेर अमुक ठिकाणीं ह्या दोघांनीं यावें; तेथें बोवांनीं दोन मोठमोठया घोडयांनिशीं तयार असावें. असें टरवून तिनें एक हजार रुपयांचा दागिना घोडे विकत घेण्याकरितां बोवांजवळ दिला. मग संकेताप्रमाणें खास मी येतें, असें सांगून बोवांस नमस्कार करून ती निघून आपल्या वाडयांत आली.

आपल्या श्रमांचें सार्थक झालें, असें पाहून बोवास मोठें समाधान वाटलें. मग त्यानें आपल्या साग्यांस सांगितलें कीं, तुह्मी आतां जयपुरास जावें आणि शुक्लाक्ष महाराजांस असें सांगावें कीं, आजपासून बाराव्या दिवशीं सांगितल्याप्रमाणें काम फत्ते करून संकेताप्रमाणें येऊन भेटन. बरें आहे, म्हणून ते चालते झाले. मग लागलेच बोवाही तेथून निघाले आणि पांचपांचशें रुपयांचे दोन घोडयांसुद्धां सर्व तयारी करून तिसरे दिवशीं रात्रीं त्या संकेत केलेल्या ठिकाणीं येऊन उभे राहिले.

इकडे मुक्तामाला, रात्रीचे सुमारें आठ वाजतां सर्व आटोपून आपले मंदिरांत गेली, आणि तिनें जें कांहीं आपल्या बरोबर ध्यावयाचें, त्याचें एक लहानसें गाटोडें करून ठेविलें. मग " मी कांहीं कामास बाहेर गेल्यें आहें. सुमारें बारा दिवसांनीं परत येईन. माझी अगदीं काळजी करूं नये " अशी चिठी लिहून, तिनें बिछान्यावर ठेविली; आणि नऊ वाजतांच तें गाटोडें खाकेस मारून व टोपी डोकीवरून घेऊन, मागचे दारानें चालती झाली. त्या दिवशीं, कृष्णपक्ष असून अभ्र असल्यामुळें फारच काळोख पडला होता. ती गोष्ट, कोणी न पाहतां गांवांतून निघून जाण्यास, तिला मोठी अनुकूल झाली. वाड्याबाहेर पडली तों दासी वाट पहातच होती. मग एकीमेकींचा हात धरून मोठ्या सपाट्यानें गांवाचे बाहेर पडल्या, आणि त्या संकेताचे ठिकाणीं आल्या. तों बोवाही येऊन वाट पहातच होते. मग बोवांस वंदन करून फार न बोलतां दोघी एका घोड्यावर बसल्या व दुसऱ्यावर बोवाही बसले. नंतर बोवांचा घोडा पुढें व ह्यांचा मागें अशा रीतीनें झपाट्यानें घोडे हाकून त्यांनीं सूर्योदयाचे सुमारास पंधरा कोश मजल काढली. तेंव्हां, घोडे थकले व ह्या जवळच्या रानांत दिवसास चालणें बरोबर नाहीं, असें बोवांनीं मनांत आणिलें, आणि आडमार्गानें जाऊन एका रानांत मुक्काम केला. सर्व साहित्य बरोबर घेतलेंच होतें. मग भोजन करून रात्रीं जागरण झालें होतें ह्मणून त्रिवर्गही स्वस्थपणें निजलीं. सुमारें चार वाजतां उठून आणखी

थोडाबहुत उपहार केला, आणि पुनः दिवे लागण्याचे वेळेस मार्गास लागलीं. वाटेनें बोवांनीं आपल्या महत्वाच्या अनेक प्रकारच्या गोष्टी रचून त्यांस सांगितल्या. व तेणेंकरून आपला विश्वासुपणा व परोकारबुद्धि हीं त्यांचे भोळ्या अंतःकरणांत पूर्णपणें भरवून दिलीं. अशा प्रकारें सात दिवस मार्ग क्रमून ते बोवा त्यांसुद्धां एका खेडे गांवांत येऊन उतरले, आणि तेथून सुमारें पांच कोशांवर एक डोंगर दिसत होता, त्याकडे बोट दाखवून ह्मणाले कीं, हा आमच्या लीलांबरीचा डोंगर, यास नमस्कार करा. त्यांनीं मोठ्या मनोभावानें नमस्कार केला. मग बोवांनीं मुक्तामालेला सांगितलें कीं, आज तुझी व तुझ्या पतीची भेट करून देतों. मीं आतां सर्व सामग्री तयार करण्यास लागतों. आणि रात्रौ सामान संभाळण्यास दासीस ठेवून आपणासच दोघांस घोड्यावर बसून तेथें गेलें पाहिजे. मुक्तामालेनें किंचित् हास्य करून फार बरें आहे म्हणून सांगितलें. नंतर भोजन झाल्यावर धूप, कापूर, फुलें, उडीद वगैरे अनेक जिनसा बोवांनीं आणिल्या. मग रात्रीचे आठ वाजल्यावर मुक्तामालेस बरोबर घेऊन ते डोंगराकडे चालते झाले.

इकडे जयपुरास त्या बोवाच्या साग्यांनीं शुक्राक्षास बाराव्या दिवशीं संकेताप्रमाणें बोवा येणार म्हणून सांगतांच आपली कार्यसिद्धि झाली, असें त्यास वाटून मोठा आनंद झाला. धनशंकरास त्रास देण्याचा त्यानें क्रम चालविलाच होता; तेणेंकरून तो बिचारा अगदीं क्षीण होऊन गेला. उठण्यास व बसण्यासही सामर्थ्य

नाहींसें झालें. मग एके दिवशीं त्या बंदिखान्यांत एक बंदिवान मरण पावला, तेव्हां ही संधि बरी आहे असें पाहून शुक्लाक्षानें फत्तेसिंगाकडून धनशंकर मरण पावला अशी राजास खबर देवविली. मग सर्व लोकांस जाहीर होण्याकरितां, आपण त्याचे संबंधी ह्मणून स्मशानयात्रादि कर्म शुक्लाक्षानें स्वतः केलें, आणि फत्तेसिंगास सांगून पाठविलें कीं, धनशंकराचे खाण्याचे पदार्थांत चांगला अम्मल घालावा. अशा प्रकारें त्या सज्जन पुरुषाचा अल्पवयांत अशा प्रकारचा वाईट परिणाम झाल्यामुळें सर्व लोकांस वाईट वाटलें. असो; त्याच दिवशीं रात्रीं सुमारें बारा वाजतां शुक्लाक्ष बंदिखान्यांत गेला, तों तो बिचारा त्या घोंगडीवर अमलानें गुंग होऊन पडला होता. मग त्याची एका वस्त्रांत मोट बांधून त्यानें फत्तेसिंगास सांगितलें कीं, मागच्या दारानें जा आणि नदीच्या किनाऱ्यानेंच जाऊन खालीं अर्ध कोशावर डोह आहे त्यांत ह्यास टाकून परत ये. त्याप्रमाणें फत्तेसिंगानें केलें, आणि तो परत आल्यावर ते दोघेही परस्पर आपआपल्या ठिकाणास गेले.

पुढें कांहीं दिवस गेल्यावर एके दिवशीं प्रातःकाळीं अरुणोदयाचे सुमारास शुक्लाक्ष उठून बाहेर येतो, तों त्याचे चाकरानें सांगितलें कीं, महाराज, मी आतांच एक मोठा चमत्कार पाहिला. मी वाटेनें येत असतां एका घोडेस्वारास कोतवालानें वहिमावरून पकडलें. त्याचा झाडा घेऊन पाहतां, त्याजपाशीं कोण्या बायकोचे तोडलेले हातपाय सांपडले. तेव्हां हा खुनी मनुष्य आहे, असें

समजून कोतवालानें त्यास चावडीकडे नेलें आणि मी हिकडे आलों. हें ऐकतांच शुक्लाक्ष मनांत चरकला आणि कांहीं कामाच्या मिषानें दोन शिपाई बरोबर घेऊन चावडीवर गेला. त्यास पाहतांच कोतवाल पुढें आला आणि सलाम करून झालेलें वर्तमान सांगू लागला. तें ऐकून घेऊन त्यास बंदिखान्यांत पाठवावें, असें शुक्लाक्षानें सांगितलें आणि आपला एक शिपाई बरोबर देऊन त्या तोडलेल्या हातापायांसुद्धां पंचाक्षरीबोवास फत्तेसिंगाकडे पाठवून दिलें. ह्या बोवांनीं जेव्हां शुक्लाक्षास चावडीकडे येतांना पाहिलें, तेव्हां त्याचे जिवांत जीव आला. नाहींपेक्षां त्यास वाटलें होतें कीं, आतां आपली मुदत भरली; संपत्ति मिळवून जीं अनेक प्रकारचीं विषयादि सुखें भोगूं अशा कल्पना करीत होतों, त्यांची समाप्ति झाली. परंतु शेवटीं ते बंदिखान्यांतील एका कोठडींत सुखरूपपणें वास करूं लागले. ह्या बोवांस बंदिखान्यांत पाठवून शुक्लाक्ष आपले वाड्यांत परत आला, आणि रंगमहालांत स्वस्थपणें तक्याशीं टेकून मनांत ह्मणतो: आज कृतकृत्य झालों. आरंभिलेलें कार्य, मध्यें विघ्न न येतां, ईश्वरानें तडीस नेलें. आतां शांतवर्मा ह्याची सर्व संपत्ति आपले हातीं येईल. ह्या नाशास मी यत्किंचित् तरी कारण आहें, असा त्यास अंदेशा येईल असें वाटत नाहीं. मुक्तामालेनें जीव दिला, वगैरे कांहीं तरी कारण राजास सांगतां येईल. त्यापासूनही दहा हजार रुपये काढण्यास सांपडले. आतां माझ्यासारखा श्रीमान् कोण आहे? परंतु अद्यापि

सर्व संपलें नाहीं. इरावतीस जाऊन शांतवर्मा ह्याचें अनेक प्रकारें सांत्वन केलें पाहिजे. मुक्तामालेचा शोध लावण्याकरितां जाऊन कोठें तरी महिना पंधरा दिवस काढून तिचा कोठें थांग नाहीं, तर तिनें ह्या दु:खामुळें बहुधा जीव दिला असावा, अशी त्याची खात्री करून दिली पाहिजे. तेव्हां आपला जीव स्वस्थ होईल. अशा विचारांत तो निमग्न होऊन गेला.

इकडे इरावतींत, ज्या रात्रीं मुक्तामाला निघून गेली, त्याचे दुसरे दिवशीं प्रात:काळीं वाड्यांतील सर्व लोक उठून आपापल्या कामास लागले. सुमारें सात वाजले, तरी मुक्तामाला उठली नाहीं, असें लोक परस्पराशीं बोलूं लागले. हें शांतवर्म्याचे कानीं येतांच, त्यानें सोमदत्तास हाक मारिली, आणि मुक्तामाला अजून कां उठली नाहीं? तिची प्रकृति नीट नाहीं कीं काय? ह्याची चौकशी कर असें सांगितलें. त्यासही आश्चर्य वाटून तो धांवतच तिचे मंदिरांत गेला. पहातो तों बिछाना मोकळा पडला असून तेथें ती नाहीं, तेव्हां ती आतांच उठून खालीं गेली असेल असें त्यास वाटलें. मग खालीं येऊन चौकशी करितो, तों तिचा कोठें थांग नाहीं. हिकडे सोमदत्तास विलंब लागलेला पाहून म्हाताऱ्यास पूजा सुचेना, त्यानें दुसऱ्या मनुष्यास पाठविलें; इतक्यांत म्लानवदन करून सोमदत्त देवघराजवळ आला, आणि ती वाड्यांत कोठें आढळत नाहीं असें सांगूं लागला; तें ऐकून म्हातारा पूजा तशीच टाकून घाबऱ्याघाबऱ्या तिचे मंदिरांत त्यास बरोबर घेऊन गेला. तों तेथें कोणी

नाहीं असें त्यानें पाहिलें. सोमदत्त पुढें होऊन पहातो तों बिछान्यावर एक चिठी पडलेली आहे. मग ती उचलून त्यानें वाचली, आणि ती शांतवर्मा ह्याचे हातीं दिली. त्यानेंही ती वाचून कपाळास हात लाविला आणि म्हणाला, मी हतभाग्य ! अशा उत्तम गुणांचं कन्यारत्न मला कोठून लाभेल ! हे प्रभो, मला संतान नव्हतें तेणेंकरून मी फार सुखी होतों. जी तूं कन्या दिलीस ती आंधळी, थोटी, पांगळी, कुरूप, वेडी, खुळी अशा प्रकारची असती, आणि तिचें अशा प्रकारचें कांहीं बरेंवाईट झालें असतें, तर मला इतका शोक झाला नसता. तिचे गुण किती आठवूं ! मला वृद्धपणीं दुःख होऊं नये ह्मणून, आपलें दुःख एकीकडे ठेवून तिनें हास्यवदन करून मजशीं बोलावें; परंतु तिचे मनास अतिशयित दुःख होत आहे, असें बाहेरील चिन्हांवरून माझे नजरेस येत असे. तिला चार महिने गेले आहेत. जर कदाचित् तिला मुलगा झाला तर, तिचें व माझेंही दुःख कमी होईल, ह्या आशेनें मी कांहींसें जिवाचें समाधान करून घेत असें. बारा दिवसांनीं परत येत्यें ह्मणून लिहिलें हें व्यर्थ आहे. तिला तें दुःख सहन होईना म्हणून आपल्या जिवाचा नाश करावा ह्या हेतूनेंच ती गेली ह्यांत संशय नाहीं. अशा प्रकारें तो विलाप करूं लागला. सोमदत्तास पहिल्यापेक्षां आतां फारच दुःख झालें. त्याचे डोळ्यांतून सारख्या अश्रुधारा चालल्या, त्या कांहीं केल्यानें थांबेनात. मग तो आपले खोलींत जाऊन विलाप करीत बसला.

हे प्रियभगिनी मुक्तामाले, मला टाकून कोठें गेलीस ? मुक्तामालेची आई, सासू, वगैरे सर्व शोकांत निमग्न होऊन गेलीं. गांवांत बातमी फुटतांच सर्व नगरी शोक करूं लागली. मोठमोठे विद्वान् व वृद्ध लोकांनीं शांतवर्मा ह्याचें सांत्वन केलें, आणि शोध करण्याकरितां लोक पाठविण्याविषयीं त्यास सुचविलें. मग त्यानें चोंहीकडे स्वार व शिपाई रवाना केले. त्यांपैकीं कोणी दोन दिवसांनीं कोणी चार दिवसांनीं परत आले आणि कोठें थांग लागत नाहीं, असें सागूं लागले. हें ऐकून सोमदत्ताचें अंतःकरण अगदीं उदास होऊन गेलें. त्यास सर्व वाडा भणभणीत दिसूं लागला. कोठेंही चैन पडेना. मग त्यानें शांतवर्म्यास विचारिलें कीं, मला पाठविलें असतां, मी मुक्तामालेचा शोध करण्यास जातों. हें ऐकून त्यानें मोठा दुःखाचा सुस्कारा टाकिला. आणि ह्मणाला कीं, तुह्मां दोघांची बाळपणापासून एकमेकावर फार भक्ति, ह्यामुळें तिजवाचून तुला चैन पडावयाचें नाहीं, व अति दुःख होईल हें मी पक्कें समजतों. व तिजपेक्षां तुजवर माझा कमी लोभ आहे असें नाहीं. तर तिचें दुःखानें मी जळत आहेंच आणि तूं जाऊन तुझाही थांग नाहींसा झाला, म्हणजे मला दुप्पट दुःख होईल, असें मात्र करूं नको. असें बोलत असतां दोघांच्याही डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. मग सोमदत्तानें मोठ्या संकटानें आपला शोक आंवरून मी तसें करणार नाहीं, असें सांगितलें. आणि त्याची आज्ञा घेऊन, दुसरे दिवशीं तो तिचे शोधाकरितां निघून गेला.

# भाग ५.

॥ श्लोक ॥

जे भक्तिनें निशिदिनीं जगदीश गातीं
त्यां संकटीं सदय तो धरितोच हातीं ।
ऐशा नरां छळुनि गांजिति दुष्ट पाहीं
कां कीं मनांत सुविचार मुळींच नाहीं ॥

पंचाक्षरीबोवा इरावतीस असतां जेव्हां त्यांचेकडे मुक्तामाला गेली, तेव्हां तिचें अवर्णनीय स्वरूप पाहून त्याचें अंतःकरण मोहित होऊन गेलें होतें ! मग त्यानें आपला दोहींकडून मतलब साधून शुक्लाक्षासही टकवावें असा बेत केला, व ह्याच हेतूनें त्या बिचाऱ्या भोळे स्त्रीस त्यानें इतकें दूर नेलें आणि त्या खेडे गांवांत दासीस ठेवून मुक्तामालेस मंत्र सिद्ध करून देण्याकरितां, रात्रीं तिच्यासह डोंगराकडे निघून गेला, हें मागें सांगितलेंच आहे. त्या प्रदेशांतील त्यास चांगली माहिती होती, ह्मणून अडचणींतून आडमार्गानें जाण्यास त्यास अगदीं अडचण पडली नाहीं. जेथपर्यंत घोड्यास मार्ग होता, तेथपर्यंत जाऊन तेथें झाडास दोन्ही घोडे बांधून ठेविले आणि बोजा डोईवर घेऊन मुक्तामालेसह, तो त्या डोंगराचे मध्यभागीं एक गुहा होती, तेथें गेला आणि गुहेचें दार उघडून आंत शिरला. त्याचे मागून मुक्तामालाही आंत शिरली. तेव्हां ती गुहा मुक्तामालेस मोठी भयंकर दिसली. आंत मोठा एक शेंदूर लाविलेला दगड होता, त्यास "जय लीलांबरी" ह्मणून त्यानें साष्टांग

नमस्कार घातला. तें पाहून मुक्तामालेनेंही तसेंच केलें. त्या दगडापासून एक झरा वाहत होता व आंत एक दोन निरनिराळ्या कोटड्या होत्या, त्या सर्व त्यानें मुक्तामालेस दाखविल्या. मग सामान सोडून तयारी करण्याचा त्यानें आव घातला. सामान पाहतांना एकाएकीं चाचपल्यासारखें करून, दोन जिनसा आणावयाच्या राहिल्या असें ह्मणून, त्यानें मुक्तमालेस सांगितलें कीं, तूं ह्या जिनसा निरनिराळ्या काढून ठेव, तों मी जाऊन त्या राहिलेल्या जिनसा घेऊन येतों; तेव्हां ती ह्मणाली मला येथें भय वाटतें, मी एकटी कशी राहूं ? तर मीही बरोबर येतें. तो ह्मणाला अशानें उशीर होऊन कार्यांत मात्र अंतर पडेल. येथें भय कशाचें आहे? मी दाराचा चांगला बंदोबस्त करितों. कोणीही येथें यावयाचें नाहीं. असें मुक्तामालेस सांगून तो दाराबाहेर पडला. आणि तें दगडी दार मोठ्या मजबुतीनें बंद करून त्यास बाहेरून एक मोठा दगडही लावून ठेविला. तो असा कीं, दार उघडतां न यावें.

अशा प्रकारची तेथील बंदोबस्ती करून तो घोड्यांपाशीं आला, आणि एका घोड्यावर बसून दुसरा मागून चालविला. मग त्या खेडे गांवांत येतो तों दासीस झोंप लागली होती. नंतर तिला उठविलें आणि ह्मणाला एक दोन जिनसा न्यावयाच्या राहिल्या ह्मणून मी परत आलों. तर आतां येथें आंधारांत कांहीं दिसत नाहीं, सर्व सामानच तिकडे घेऊन जाऊं, व तूंही येत असलीस तर चल. तिचे मनांत होतेंच. मग

घोड्यावर सर्व सामान घालून तिला घेऊन बोवा तेथून निघाले. मग दुसराच मार्ग धरून एके रानांत गेले. पुढें घोड्यांस वाट नाहीं असें सांगून खालीं उतरले. बोवांनीं चांगली एक कट्यार जवळ बाळगिलीच होती; ती एका हातांत घेतली आणि एकाएकीं पुढें होऊन दुसऱ्या हातानें त्या अनाथाचा गळा धरिला. मग शब्द काढण्यासही अवकाश न देतां त्या निर्दयानें, कट्यार मारून तिचा कोथळाच बाहेर काढला. मग अर्थात् तिचा लागलाच प्राण गेला. नंतर त्या मानभाव्यानें तिचे हातपाय कापून निराळे ठेविले आणि बाकीचें सर्व धड जवळच एक मोठी वृक्षाची ढोल होती तींत टाकिलें. मग ते दोन्ही अवयव एका वस्त्रांत गुंडाळून घोड्यावर टाकिले, आणि जवळच्या ओढ्यांत हातपाय वगैरे स्वच्छ धुवून घोड्यावर बसून स्वारी चालती झाली.

वर सांगितलेलें क्रूर कर्म करण्याचें कारण उघडच आहे कीं, ते अवयव शुक्राक्षास दाखवून त्यापासून पांचहजार रुपये मिळवावयाचे होते; परंतु त्यानें डोकें आणण्यास सांगितलें असून हात नेऊन कसें चालेल, ही शंका येऊन त्यानें अशी हिकमत लढविण्याचें मनांत आणिलें कीं, डोकें घेतलें होतें तें रात्रीं वाटेंत निजलों असतां कुतऱ्यानें पडशी फाडून नेलें, त्याचा कोठें थांग न लागल्यामुळें पुनः परत जाऊन हात पाय आणिले, हेंही आपणास ओळखतीलच. खेरीज इरावतीस मनुष्य पाठवून ती तेथें आहे किंवा नाहीं याचा शोध आणवावा

ह्मणजे आपली खात्री होईल, असें शुक्लाक्षमहाराजांस सांगून प्रसंग मारून नेतां येईल, असा त्यानें निश्चय केला. आणि मग मोठ्या आनंदानें त्यानें जयपुरी-ची वाट धरिली. त्याचे मनांत असें होतें कीं, शुक्ला-क्षापासून आतां पांचहजार रुपये मिळतील व आपली सुमारें दीड हजाराची जिनगी आहे, हें सर्व घेऊन मुक्तामालेजवळ यावें. ती आपणास वश होईलच, एकटी रानांत करिते काय? ह्याखेरीज तिचे आंगावर-ही पांच हजारांचे दागिने आहेत. ती व आपण एक झालों ह्मणजे, प्रसंग पडला तर तेही आपल्या उपयो-गीं पडतील. असा विचार करीत तो जयपुरास गेल्या-वर त्याची काय अवस्था झाली हें चवथे भागांत सांगि-तलेंच आहे कीं, ते बंदिखान्यांत एका कोठडींत स्वस्थ हवा खात बसले.

ज्या दिवशीं ह्या बोवास शुक्लाक्षानें बंदिखान्यांत पाठ-विलें, त्या दिवशीं आपण कृतकृत्य झालों असें त्यास वाट-लें; परंतु मुक्तामालेचें डोकें आणण्यास सांगितलें असतां हातपाय कसे आणिले असें त्यास वाटल्यावरून तो रात्रीं बंदिखान्यांत गेला आणि आणिलेले अवयव घेऊन पाहि-ले तों ते तिचेच असावे असें त्यास प्रथम वाटलें. परंतु रेखून पाहतां तीही लबाडी त्याचे लक्षांत आली. मुक्तामाले-प्रमाणेंच तिचे दासीचा व त्याचा सहवास होता, तिचे उजवे हातास भाजल्यामुळें एक डाग पडलेला होता व कर्म-धर्मसंयोगेंकरून तोच हात आला होता. मग तो डाग पाहतांच त्याची खात्री झाली कीं, हे मुक्तमालेचे

अवयव नव्हेत. यानें मलाही फसविण्याचा बेत मांडिला आहे, असें मनांत येऊन शुक्राक्षास फार राग आला. मग त्यानें लागलेंच त्या बोवांस तेथें आणविलें आणि विचारलें कीं, तुला डोकें आणण्यास सांगितलें असून हातपाय कां आणिलेस ? त्यावर त्यानें पूर्वीं मनांत योजिलेलें उत्तर दिलें. त्यावर तो ह्मणाला बरें आहे; हे मुक्तामालेचेच अवयव आहेतना ? ह्यांत कांहीं लबाडी तर नाहीं ? हें ऐकून तो थोडासा चांचरला आणि ह्मणाला, महाराज, तिचेच हे अवयव; मी सरकाराशीं लबाडी करीन काय ? असें त्याचें उत्तर ऐकतांच शुक्राक्षानें लाल डोळे केले आणि ह्मणाला अरे मूर्खा, तूं मला ओळखिलें नाहींस! व माझ्याशीं लबाडी करून चालेल किंवा नाहीं हें मनांत आणिलें नाहींस !! हे तिच्या दासीचे हातपाय आहेत, मी पक्के ओळखिले. तर खरा मजकूर काय आहे तो सांग, नाहींपेक्षां आतांच मारितों. खरें सांगशील तर सर्व अपराधांची क्षमा करून तुला मुक्त करीन; असें ऐकतांच तो घाबरला, आणि जें काय खरें होतें, तें सर्व त्यानें शुक्राक्षास सांगितलें. तें ऐकून चांगली संधि आली असून ती ह्यानें घालविली, आणि आपले कामांत व्यत्यय आणिला, असें त्याचे मनांत येऊन मग त्यास त्यानें लाथाबुक्यांखालीं अर्धमेला केला, आणि ह्याची धनशंकराप्रमाणेंच तजवीज ठेवावी, असें फत्तेसिंगास सांगून आपण तेथून निघून गेला.

शुक्राक्ष आपल्या वाड्यांत येऊन बिछान्यावर पडला;

परंतु त्याचें अंतःकरण अगदीं उद्विग्न होऊन गेल्यामुळें, त्यास झोंप येईना. मुक्तामाला हातीं सांपडून तिचा त्या दुष्टानें नाश केला नाहीं, ह्मणून त्यास फार खेद झाला; परंतु ती त्या गुहेंत कोंडून राहिली आहे, हें तरी एक फार चांगलें झालें आहे असें त्यास वाटलें. आपण तेथें गेलों असतां ती आयतीच आपल्या हातीं लागेल, पण तेथें जाण्यास घाईनें गेलें तरी तीन दिवस पाहिजेत, व ह्या दुष्टानें कोंडून ठेविल्यास पांच दिवस झाले; मिळून आठ दिवसांत ती तेथून सुटून गेली तर मात्र इलाज नाहीं असें त्यास वाटूं लागलें. आतांच निघून गेलों असतों; परंतु अपरात्र झाली, राजाची भेट घेऊन त्यास विचारिलें पाहिजे. तर प्रातःकाळ झाल्यावांचून आपलें निघणें होत नाहीं; अशा विचारांत तो असतां प्रातःकाळ झाला. मग लागलाच उठून राजाकडे गेला, आणि मुक्तामालेस फसवून आणण्याकरितां दोन तीन मनुष्यें पाठविलीं होतीं; परंतु ती त्यांचे हातीं लागली असतां रात्रौ पळून गेलीं. तिचा त्यांस पुनः थांग लागला नाहीं. असें राजास सांगून, मला हुकूम द्यावा, व मी स्वतः गेल्यावेरीज तें काम होणार नाहीं असें त्यानें त्यास सांगितलें. मग ते वेडे पीर महाराज! फार बरें आहे, असें ह्मणाले. नंतर तो तेथून निघून वाड्यांत आला आणि एक चाकर बरोबर घेऊन, घोड्यावर बसून लागलाच निघाला. तो भरमजला करून तिसऱ्या दिवशीं सायंकाळचे सुमारास त्या डोंगराच्या पायथ्याशीं येऊन पोंचला. मग घोड्यावरून उतरून चाकरास तेथें

ठेऊन आपण एकटाच त्या गुहेकडे धांवत वर चढूं लागला.

इकडे मुक्तामालेस त्या गुहेंत कोंडून ठेऊन बोवा जिनस आणण्यास गेल्यावर तो आतां येईल ह्मणून ती वाट पाहत बसली. बाहेर कांहीं खसबसल्यामुळें तो आला असें तिला वाटावें. पुनः कांहीं नाहीं. असें होतां होतां सुमारें एक प्रहर लोटला, तरी बोवाचा कोठें ठिकाण नाहीं. मग तिचे मनांत नानाप्रकारच्या कल्पना येऊं लागल्या. रानांतील जनावरांचे भयंकर शब्द कानीं पडतच होते. तेणेंकरून तिला उत्तरोत्तर अधिकाधिक भीति वाटूं लागली. केव्हां केव्हां त्या गुहेंत, कांहीं खसबस होत आहे, असा तिला भास व्हावा. मग तिनें डचकून पहावें, अशा स्थितींत तिला कांहीं सुचेनासें झालें. वेड्यासारखी हिकडून तिकडे फिरूं लागली. काय करावें हें सुचेना. मी मूर्खपणा करून या काळाचे हातीं सांपडल्यें अशी तिचे मनाची खात्री झाली. ती गुहा तिला यमसदनच वाटूं लागलें. अशा संकटांत ती पडली आहे, तों बाहेर पक्षांचा किलकिलाट होऊं लागला. त्यावरून प्रातःकाळ झाला, असें तिनें अनुमान केलें. आतां तरी ह्या बंदींतून सोडविण्यास कोणी येईल काय, असें तिचे मनांत येऊं लागलें. पुनः ह्मणते कीं, ही आशा व्यर्थ आहे. मी आपले हातांनेच आपला घात करून घेतला. येथें कोणी आल्यास माझे हालच करण्यास येईल, सुख देण्यास कोणी येईल असा संभव

नाहीं. अशा विचारांत ती असतां पक्ष्यांचा किलकिलाट बंद झाला, व रात्रीचे कीटक व पशु ह्यांचे भयंकर शब्द कानीं पडूं लागल्यामुळें तिला अतिशयच भीति वाटूं लागली. सर्वांगास घाम सुटला. काळीज धडधडां उडूं लागलें. अशी अवस्था होऊन तिला कांहीं वेळ मूर्च्छाही आली. पुनः दचकून उठली तों दिव्याचा मंद प्रकाश व ती भयंकर गुहा तिचे पुढें दिसूं लागली. ह्या दुःखापुढें भुकेची व तान्हेची तिला शुद्धही नाहीं. ह्यापेक्षां प्राण गेला तरी बरा असें तिला होऊन गेलें. मग तें दार उघडण्याविषयीं तिनें यत्न चालविला. तिची शक्ति किती ! व दुःखानें व क्षुधेनें ती अगदीं अशक्त होऊन गेली होती. तें बाहेरून दगड लावून बंद केलेलें दार तिला कोठून उघडणार ! मग निराश होऊन, हात आपटून तिनें धाडदिशीं आपलें आंग जमिनिवर टाकिलें, आणि शोक करण्यास आरंभ केला, तो असाः—

॥ पद ॥

( 'अहा रे दैवा' ह्या चालीवर )

भक्तवत्सला धांव धांव आतां ।
संकटसमयीं नाहीं दूजा त्राता ॥ ध्रु० ॥
जन्मांत नाहीं कवणासी गांजीलें ।
सत्कर्म करुनी अतिथीच पूजीले ॥
निंद्य कर्म तें नाहीं आचरीलें ।
मनोभावानें तुजला आठवीलें ॥ भ० ॥ १ ॥
धांवा हो करितां द्रौपदी माऊली ।

संकट पाहुनी लज्जा त्वां रक्षीली ॥
कोणी बा सुटका गजेंद्राची केली ।
तारक तूंची दासांची माऊली ॥ भ० ॥ २ ॥
पतिच्चिया विरहें काळीज जळालें ।
भेटीच्या त्याचे आशेंसी गुंतलें ॥
फसवोनी मजला आणोनी कोंडीलें ।
कोणतें ह्यांत पातक मी केलें ॥ भ० ॥ ३ ॥
मातापितरांसी आलें मी सोडून ।
वृद्धपणीं त्यांसी दुःख हें दारूण ॥
विरहें तीं माझ्या सोडीतील प्राण ।
सोमदत्ता त्या शांतवील कवण ॥ भ० ॥ ४ ॥
दुष्ट तो राजा उलथोनीयां गेला ।
न्याय नीतीचा लोप त्यानें केला ॥
दुष्ट लोकांसी आश्रय दीधला ।
प्रियकर माझा बंदींत टाकीला ॥ भ० ॥ ५ ॥

अशा प्रकारें विलाप करण्यांत दुसरीही रात्र निघून गेली. पुनः प्रातःकाळ झाला, असें पक्षांच्या किलकिलाटानें तिला समजलें. भीति वाटून वाटून व दुःख करून करून तिचें अंतःकरण अगदीं निरढवून गेलें. ह्याखेरीज ती आपल्या जिवावर उदारही झाली. प्राणत्याग करावा असें अनेक वेळां तिचे मनांत आलें; परंतु गरोदर असल्यामुळें बालहत्या घडेल व त्यावरील ममतेमुळें तिच्यानें तें घोर कर्म करवेना. सुमारे दोन दिवस अन्न नसल्यामुळें तिच्या पोटाची दामटी वळून गेली. मग क्षुधेनें फारच पीडा केल्यामुळें कांहीं भक्षण करावें असें

तिनें मनांत आणिलें. नंतर तेथें झरा होताच, तेथें जाऊन मुखप्रक्षालन वगैरे करून स्नान केलें, आणि ईश्वराचें चिंतन केल्यानंतर मंत्र सिद्ध करण्याकरितां सामग्री आणिलेली होती, तींतील कांहीं भक्षिली. नंतर पाणी पिऊन तिचा जीव कांहिंसा थंड झाला. मग ईश्वरचिंतनावांचून कांहीं मनांत आणावयाचें नाहीं, असा तिनें निश्चय केला; परंतु तें सर्व व्यर्थ. दासीची काय अवस्था झाली असेल? आपलीं वृद्ध माता-पितरें व सोमदत्त ह्यांची काय दशा होईल? त्या बंदिखान्यांत पतीचे दिवस कसे जातील? वगैरे गोष्टी तिचे डोळ्यांपुढें वरचेवर येऊन उभ्या रहात. व आपली येथें खाण्यापिण्यावांचून काय दशा होईल, ह्या विचारांनीं तिचें मन अगदीं व्यापून गेलें. जी सामुग्री होती ती सुमारें तिनें पांच सहा दिवस पुरविली. पुढें पाण्यावांचून दुसरें कांहीं नाहींसें झालें. येथें पाणी आहे हें मोठ भाग्यच असें तिला वाटलें. आठवे दिवशीं अगदीं उपोषित असल्यानें तिला चैन पडेना. मग दिवा हातांत घेऊन सर्व गुहा शोधण्यास तिनें आरंभ केला.

शोध करितां करितां एके ठिकाणीं फडताळ आहे, असा तिला भास झाला. त्याचें दार उघडूं लागली तों तें उघडेना. मग तिनें खालचे बाजूनें लांकूड घालून मोटा जोर केला तों तें थोडेंसें उघडलें, नंतर तशाच युक्तीनें तिनें एक फळी उघडली. मग आंत दिवा करून पहाते तों लांबपर्यंत काळोखच दिसूं लागला. तेव्हां तिला वाटलें कीं, हा गुहेचाच दुसरा एक भाग आहे;

परंतु आंत जाऊन पाहण्यास तिला फार भीति वाटूं लागली. शेवटीं जिवाचा धडा करून त्या दिव्यासुद्धां ती आंत शिरली, आणि पहाते तों एकसारखा बोळ आहे असें तिला दिसलें. मग ह्यांत काय आहे, ह्याचा शोध करण्याचा निश्चय करून, ती पुढें पुढें जाऊं लागली, तों कोठें उंच, कोठें सखल, अशा प्रकारचा हा मार्ग आहे अशी तिची खात्री झाली; परंतु दिव्याचा प्रकाश मंद होत चालला, ह्यामुळें कोठें वांकावें, व कोठें आंग चोरून जावें, तें स्पष्टपणें न दिसल्यामुळें तिचे डोक्यास व पायांस दगड लागूं लागले. तेणेंकरून डोक्यास टेंगळें आलीं व ठेंचा लागून तिच्या त्या सुकुमार पायांचीं रक्तें निघालीं. तिला चालण्याची संवय नव्हती, ह्मणून पायांस दगड टोंचून व बरेंच चालल्यानें ते दुखूंही लागले; परंतु तो मार्ग संपेना. भीतीनें व ह्या सांगितलेल्या वेदनांनीं तिचा जीव फारच त्रासला. अशा संकटांत ती पडली आहे, इतक्यांत दिवाही गेला. मग काय विचारावयाचें आहे! ती फारच घाबरून गेली. पुढें पाऊल उचलेनासें झालें. कंबर खचून एकदम खालीं बसली. छाती धडधडां उडूं लागून डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. आतां मागें जावें किंवा पुढें जावें, ह्याचा तिला मोठा विचार पडला. मग तिनें मोठ्या गंभीर मनानें सर्व दुःख गिळून, जगन्नियंत्या परमेश्वराचें चिंतन केलें आणि पुढेंच जाण्याचा निश्चय करून, बसत उठत तो मार्ग क्रमण्यास पुनः आरंभ केला. मी कोठें आहें, व कोठें जात आहें व

ह्याहीपेक्षां दुसऱ्या एकाद्या निराळ्याच संकटांत पड- णार कीं काय ? असे विचार तिच्या मनांत येऊं लागले. शेवटीं ईश्वरावरच तिनें भरंवसा ठेविला.

ती बिचारी मुक्तामाला वर सांगितल्याप्रमाणें मोठ्या संकटानें अर्ध कोश त्या दुःखदायक मार्गानें चालत आली. आणि पुढें पहाते तों मार्ग समाप्त झाला. मग हातानें चांचपून पहाते तों पुढें सर्व पाषणमय भिंत तिचे हातास लागूं लागली. परंतु कोठेंही मार्ग सांप- डेना, तेव्हां ती फारच घाबरली. तिचे दुःखास पारावार नाहींसा झाला. मग ती ह्मणते: हे देवा, मला कोठें आणून टाकिलेंस ? आतां मी काय करूं ? माघारें जाण्यास शक्ति नाहीं व गेलें तरी तिकडून सुटका होते, असें नाहीं. असें ह्मणत ह्मणत हातानें चांचपत हिकडून तिकडे फिरत आहे, तों फटींतून थोडासा वारा आल्याचा तिला भास झाला, तेव्हां तिला वाटलें कीं, येथें दार असावें. मग जिवास धीर देऊन पाहूं लागली, तों तिचे हातास दार लागलें. नंतर त्याची एक फळी धरून पायांच्या नेटानें जोर करितांच ती उघडली आणि एकदम बाहेरील वारा तिचे आंगास लाग- ला, तेणेंकरून, फार वेळ आंत गुदमरून जो घाम आला होता, तो नाहींसा होऊन तिला थोडा आंनंद झाला. मग त्या दारांतून पलीकडे पाहूं लागली तों मध्यें काळोख असून कांहीं अंतरावर दुसरें एक उघडेंच दार आहे, असें तिचे दृष्टीस पडलें. नंतर ती दारां- तून काळोखांत आली, तेव्हां तिला असें वाटलें कीं,

ही बरीच विस्तीर्ण दुसरी गुहा आहे. अशा विचारांत ती आहे तों, तेथून कांहीं अंतरावर खसबस होऊन कांहीं जनावरें हिकडून तिकडे गेल्याचा तिला भास झाला. तेव्हां ती एकाएकीं डचकली आणि अत्यंत भीती-मुळें तिचे अंगास दरदराऊन पुनः घाम आला. हीं जना-वरें आपणास फाडून खातात कीं काय असें तिला वाटलें. मग कांहीं वेळ हिकडेतिकडे पहात ती तेथेंच उभी राहि ली; परंतु तिला धीर निघेना. शेवटीं तशीच भीतभीत त्या पुढच्या दाराबाहेर आली. तेव्हां, सारखें आठ दिवस अंधारांत कोंडून राहिल्यामुळें, आजच आपण ह्या जगांत आलों असें तिला वाटलें. उघड प्रदेशांतील वारा सर्व आंगभर लागतांच तिचा जीव थंड झाला, आणि ईश्वरानें आपणास ह्या संकटांतून सोडविलें ह्मणून तिनें त्याचें चिंतन केलें.

जेव्हां मुक्तामाला त्या गुहेंतून डोंगराचे दुसरे बाजूस आली, तेव्हां सुमारें रात्रीचे बारा वाजले होते. तिनें ईश्वरचिंतन करून चोंहीकडे पाहिलें तों सर्व जंगल पसरलें आहे असें त्या काळोखे रात्रीं तिचे दृष्टीस पडलें. आतां काय करावें व कोठें जावें, असा विचार करीत आहे तों रानांतील जनावरांचे भयंकर शब्द तिचे कानीं पडूं लागले. कितीएक जवळपास ओरडताहेत असें तिला भासलें. आतां आपण ह्या जनावरांच्या भक्ष्यस्था-नीं पडणार, अशा प्रकारची भीति पुनः तिचे अंतःकर-णांत उत्पन्न झाली. नक्षत्रांच्या मंद प्रकाशामुळें जाण्यास कोठेंही मार्ग दिसेना. सूर्योदय होई तोंपर्यंत येथेंच

बसावें तर भीतीमुळें धीर निघेना. मग खालीं बसली आणि पहाते तों कांहींशी मळलेली एक पाऊलवाट तिचे दृष्टीस पडली. नंतर हळुहळू त्या वाटेनें तो डोंगर उतरण्यास तिनें आरंभ केला. ज्या मार्गानें ही उतरूं लागली, त्या मार्गांत दाट रान नव्हतें व डोंगराचे पायथ्याशीं येण्यासही थोडेंच अंतर होतें; परंतु कांटे व दगड लागून तिच्या त्या नाजूक पायांचीं रक्तें निघालीं, पुढें चालवेनासें झालें. मग तिनें आपलें वस्त्र फाडून पायांस चिंध्या गुंडाळल्या, आणि तशाच त्या वेदना सोशीत ती डोंगराचे पायथ्याशीं आली. नंतर हिकडे तिकडे पाहतां पाहतां एक बराच रस्ता झाडांमधून जात आहे, असें तिनें पाहिलें. मग ती त्या रस्त्यानें हळुहळू पुढें चालली.

अशा अद्भूत संकटांतून सुटून रस्त्यास लागतांच तिचे मनास वाटलें कीं, आपणास जी ग्रहदशा आली होती ती समाप्त झाली. मग पुढें कांहींशी जाते तों, मागें कांहीं अंतरावर पावलें वाजल्याचा तिला भास झाला. मग डचकून मागें पाहूं लागली तों कांहीं अंतरावर एक मनुष्याची आकृति तिचे दृष्टीस पडली. तेव्हां तिला वाटलें कीं, कोणी वाटसरू असेल. परंतु पुनः तो दुष्ट आला असेल,असें तिच्या मनांत येऊन वाट सोडून, ती आडमार्गानें जाऊं लागली. कांहीं पावलें पुढें जाऊन मागें पाहते, तों तोही आडमार्गानें आपणाकडेच येत आहे असें तिला वाटलें. मग तो तिला यमासारखा दिसूं लागला. हा दागिन्याकरितां आपला घात करणार

अशी तिचे मनाची खात्री होऊन गेली. एक पाऊल पुढें टाकावें आणि मागें पहावें असें करीत करीत ती जात आहे, तों तो अगदीं जवळ आला असें तिला दिसलें; परंतु बिचारी करिते काय? घाबरून वेड्यासारखी हिकडून तिकडे होऊं लागली. जेव्हां तो अगदीं जवळ येऊन धरितो असें तिला वाटलें, तेव्हां कोणी धांवा आणि ह्या मेल्याचे हातून मला सोडवा, अशी मोठ्यानें ती ओरडूं लागली. इतक्यांत दुसरा एक मनुष्य त्याचे मागून आला, आणि त्या अनाथ स्त्रीस पीडा देणारास त्यानें जी एक जोरानें लाथ मारिली, त्याबरोबर तो जवळचे दगडावर हापटून उलथून खालीं पडला. हा चमत्कार पाहून आपणास हें ईश्वरानेंच साहाय पाठविलें कीं काय, असें तिला वाटलें. मग तो पुढें आला आणि तिला ह्मणाला; बाई, आतां तुह्मी माझे मागून या. माझ्या जीवांत जीव आहे तों तुह्मांस भीति नाहीं. हे त्याचे मधुर शब्द ऐकून तिला अतिशय समाधान झालें, आणि पाय उचलत नव्हता तरी, भीतीमुळें ती अर्धकोश मोठ्या सपाट्यानें त्याचे मागून गेली. मग तिच्या मनांत येऊं लागलें कीं, हा कोण आहे कोण जाणें? नाहींपेक्षां हाच मला दुसऱ्या एखाद्या संकटांत पाडील. माझ्यानें आतां कोणावरही भरंवसा ठेववत नाहीं. असें मनांत येऊन तिनें त्यास विचारिलें कीं, बाबा तूं त्या काळाचे हातून मला सोडविलेंस, तर तुझें ईश्वर कल्याण करील; परंतु तूं कोण आहेस, हें मला सांगशील, तर माझे जिवास फार समाधान होईल. अशी तिची दीन वाणी

ऐकून तो उभा राहिला, आणि खालीं वांकून रेखून पाहतांना त्यानें तिला ओळखिलें. मग पायां पडून ह्म-णाला: बाईसाहेब, तुह्मी ह्या चाकराला ओळखिलें नाहीं काय? आपली अशी दशा कोणी केली? इतकें दूर अशा अपरात्रीं ह्या रानांत आपण कोणीकडे आलां? असें बोलतानां त्यास फार गहिंवर आला, आणि त्याचे डो-ळ्यांतून अश्रुधारा चालल्या. त्याचे ते शब्द ऐकून, हा आपल्या पतीचा विश्वासु सेवक गुलालसिंग असें तिनेंही ओळखिलें. मग त्याचे प्रमाणेंच तिचीही अवस्था झाली.

त्या दोघांतून एकाचाही शोक आवरेना; परंतु आपण कोणत्या प्रसंगांत आहों, ह्याची दोघांसही एकदम स्मृति झाली. मग शोक आंवरून तीं मार्गास लागलीं; परंतु मुक्तामाला थकून गेली व कांटे व टेंचा लागल्यामुळें तिचा पाय उचलेनासा झाला, हें पाहून गुलालसिंगास तिची फारच करुणा आली. मग तो ह्मणाला: बाईसाहेब, मी तुमचा चाकर आहे, तर भीड न धरितां माझ्ये खांद्यावर बसा. मी तुह्मांस घेऊन जाईन. तिला कांहीं-सा संकोच झाला खरा; परंतु नाईलाज ह्मणून तिनें त्याचे वचनास रुकार दिला. मग तिला खांद्यावर बस-वून तो चालूं लागला. नंतर परस्परांनीं सर्व हकीकत एकमेकांस सांगितली. शुक्राक्षाचें सर्व कपट त्यानें तिला सांगितलें. आपल्या सर्वस्वी नाशास हाच कारण असें तिचे मनांत येऊन तिला फारच दुःख झालें. ज्यास आपल्या बापानें व पतीनें इतक्या भाग्यास आणिलें

त्यानें अशा प्रकारें उपकार फोडिले,ह्मणून तिचे अंतःक-रणाचा फारच संताप होऊन गेला. तेव्हां गुलालसिंग ह्मणाला बाईसाहेब, आतां जो रानांत आपला घात करण्यास आला होता, तो बहुधा तोच असावा. तिलाही तें खरें वाटलें. मग तिनें त्यास विचारिलें कीं, तुझ्या यजमानाची काय अवस्था आहे,व तूं तेथून कसा आलास ? हें ऐकून तो ह्मणालाः बाईसाहेब, मी एका कोठडींत, मला त्यांची बातमी नाहीं, व ती गोष्ट तुह्मी मनांत आणूं नका. त्यापासून दुःख मात्र होणार. दुसरा कांहीं फायदा नाहीं. माझा मुलगाच बंदिखान्यावर आहे ह्यामुळें मला फारसा त्रास नव्हता, तरी कोंडून राहण्यास फारच कंटाळलों. मग मी कोणापाशींही झाल्या गोष्टीविषयीं न बोलतां. व कोणाचेही दृष्टीस न पडतां रात्रीचा चालत जाऊन उज्जनीजवळ एका खेडयांत माझी बहीण आहे, तिचे घरीं राहीन असें कबूल केलें; तेव्हां त्यानें गुप्तरूपें माझी सुटका केली, व त्याप्रमाणें रात्रीं वाट चालत असल्यामुळें मोठ्या निकाराच्या प्रसंगीं आपल्या सेवेस येऊन हजर झालों, ह्यामुळें मला मोठें समाधान वाटलें. त्या दुष्टास ठार मारलें असतें, परंतु त्या वेळीं असा प्रसंग आहे असें माझे ध्यानींमनींही आलें नाहीं. अशीं तीं दोघें दुःखाच्या गोष्टी बोलत जात आहेत, तों अरुणोदय झाला.

मुक्तामालेस तशा त्या संकटसमयीं गुलालसिंगाचा सहवास किती सुखकारक झाला असावा, हें वाचणारांचे लक्षांत येईलच. तिला असें वाटलें कीं, हा एक मोठा अनर्थच

टळला. आतां मी अगदीं संकटांतून मुक्त झाल्यें. वास्तविक पाहिलें असतां, त्या वेळीं ज्या स्थितींत ती होती, त्या स्थितीशीं आणि ती आपल्या पित्याचे घरीं असतां ज्या स्थितींत होती, त्या स्थितीची तुलना केली तर, जमीनअस्मानाचें अंतर. परंतु मनुष्यास विलक्षण संकट प्राप्त होऊन अति दुःख झालें असतां, त्यावेळीं थोडें बहुत समाधान होण्यासारखी कांहीं गोष्ट झाली, ह्मणजे त्यांस पराकाष्टेचा आनंद होतो, त्याचप्रमाणें मुक्तामालेस होऊन गेलें. असो. अरुणोदय होतांच वाटेंत एक झरा लागला, तेथें गुलालसिंगानें मुक्तामालेस उतरिलें, आणि प्रकाश पडल्यामुळें तिचें निस्तेज वदन व कांटे वगैरे लागून जी दुर्दशा झाली ती पाहून, त्याचे पोटांतून भडभडून आलें, व डोळ्यांतून अश्रुधाराही चालल्या. हें पाहून तिलाही गहिंवर आला; परंतु बिचारी शोक करितांकरितां थकली होती, कोठवर शोक करील ? मग तिनें त्याचें अनेक प्रकारें सांत्वन केलें आणि ह्मणाली, बाबा, तूं शोक करूं नको. ज्यानें आपला विनाकारण सर्वस्वी घात केला त्यास, आपण समर्थ नाहीं तरी, ईश्वर तसेंच शासन करण्यास चुकेल असें व्हावयाचें नाहीं. मग त्यानें तिचे पायांतील कांटे काढले, आणि दोघांनींही मुखमार्जन वगैरे केलें. मग मुक्तामाला ह्मणाली कीं, आज दोन दिवस कांहीं खावयास मिळालें नाहीं, तेणेंकरून मला फारच क्षुधा लागली आहे. तर आधीं कांहीं तरी खाल्यावांचून मला कांहीं सुचत नाहीं. मग तो ह्मणाला, हा अर्ध कोशावर गांव आहे, तेथें जाऊन

सर्व तजवीज करितों. आतां मी बराच लांब आलों आहें, तर येथें कोणी ओळखीचें भेटेल असें वाटत नाहीं. ह्याखेरीज एकदोन दिवसांची गोष्ट, रोज असेंच वागावें लागेल असें नाहीं.

असें बोलतां बोलतां तीं त्या गांवीं जाऊन पोंचलीं. मग गुलालसिंगानें तिची उत्तम प्रकारची खाण्यापिण्याची तजवीज केली, व तिजकरितां एकदोन वस्त्रेंही विकत घेतलीं. हें पाहून तिनें सांगितलें कीं ह्यांतून एक दागिना मोड. मला वरचेवर खर्चाविचास लागेलच. तेव्हां तो ह्मणाला मजपाशीं रुपये आहेत, ते संपतील तेव्हां पुढें पाहतां येईल. तरी तिनें त्याचें न ऐकतां त्याकडून पांचशें रुपयांचा एक दागिना मोडविला, आणि जे जिन्नस पाहिजे होते ते सर्व विकत घेतले. नंतर आतां कोठें जावें ह्याविषयीं विचार करूं लागली. तेव्हां गुलालसिंग ह्मणाला कीं, बाईसाहेब, येथून इरावती फार लांब राहिली तर मी एकटा बरोबर असून तिकडे जाणें सुरक्षित नव्हे. कारण तो दुष्ट उलथून पडून बरेंच लागल्यामुळें त्याणें आपला पाटलाग केला नाहीं. तर पूर्वींच आपण उज्जनींत जाऊं आणि शांतवर्मा ह्यास पत्र पाठवूं, ह्मणजे तिकडून दहावीस मनुष्यें नेण्यास येतील. नंतर आपण त्यांचेबरोबर जावें, हें मला नीट दिसतें. हें ऐकतांच मुक्तामाला ह्मणाली: हो! हो! हो! आतां मला आठवण झाली. माझ्या आईच्या आतेबहिणीच्या चुलतभावाची मुलगी उज्जनींत राहत असते, आई मजपाशीं एक दोन वेळ

बोलली होती. तर तेथें जाऊं ह्मणजे आपला जीव थंड होईल. मग स्वस्थपणें पाहिजे तशी व्यवस्था तेथें करितां येईल. हा बेत गुलालसिंगासही बरा वाटला; परंतु त्याचें मन स्वस्थ होईना. कारण उज्जनीस जाणें म्हणजे तीन चार दिवसांचा रस्ता. तर मध्यें कोणत्या प्रकारचा कसा प्रसंग येईल, याचा भरंवसा नाहीं. याकरितां सुरक्षितपणें पोंचण्याची कांहीं तरी अन्य तजवीज केल्यास बरें पडेल. अशा विचारांत त्याचें मन गुंतलेलें ओळखून मुक्तामाला त्यास ह्मणाली कीं, गुलालसिंगा, तूं काय विचार करीत आहेस? तेव्हां त्यानें मनांत आलेली गोष्ट तिला सांगितली. मग विचार करितां करितां दोघांच्या मतें असें ठरलें कीं, एथून पाच सहा कोसांवर एक मोठा गांव आहे तेथं जावें; आणि दोन घोडीं विकत घेऊन, मुक्तामालेनें पठाणाचा पोषाख घ्यावा, मग दोघांनीं घोड्यावर स्वार होऊन उज्जनींत जावें.

वर लिहिल्याप्रमाणें निश्चय करून एक भाड्याचें घोडें केलें आणि त्या गांवीं जाऊन पोंचलीं. तेथें दुसऱ्या दिवशीं एक हजाराचा दागिना मोडला आणि ५०० रुपयांचा एक व २०० रुपयांचा एक अशीं दोन घोडीं घेतलीं. मुक्तामालेकरितां सुमारे ३०० रुपयांचा एक मंदिलासुद्धां उत्तम पोषाग घेतला. मग सर्व दागिने काढून तिनें गुलालसिंगापाशीं दिले आणि केंस उरफाडून गोपानें बांधून, तुमान, आंगरखा, मंदील वगैरे सुशोभित पोषाग केला. कमरेस रेशमी कांचा बांधून त्यास कट्यार व सुरी अशीं दोन हत्यारेंही लट-

काविलीं. तेव्हां आमच्या मुक्तामाला नामक पठाणाची पाहण्यासारखी रमणीय शोभा दिसूं लागली! मुक्तामाला जरी अतिदुःखानें व जन्मांत झाले नाहींत असे एकाएकीं हाल झाल्यानें बऱ्याच प्रकारें कोमेजली होती, तथापि हिरा कांहींसा मळला तरी त्याचें तेज झांकलें जात नाहीं. त्याप्रमाणें मुक्तामालेचें तेज, कोमलपणा व रूप हीं स्वभावसिद्ध असल्यानें तिच्या त्या वैभवांत तसा कमीपणा आला नव्हता. तो पठाणाचा वेष तिला इतका शोभा देऊं लागला कीं, हा बादशाहाचे कुळापैकींच कोणी असावा असें दिसूं लागलें ! गुलालसिंग तर तो थाट पाहून तोंडांत बोटच घालून राहिला, आणि ह्मणाला महाराज, आपल्या या रूपाकडे पाहून दुसऱ्याची काय? परंतु माझीही दृष्ट लागेल, असें मला वाटतें. पूर्वीपेक्षां हल्लींचा पेहेराव आपणांस किती चांगली शोभा देऊं लागला आहे, हें माझ्यानें सांगवत नाहीं ! परंतु काय? असें ह्मणतो तों त्याचें डोळ्यांतून पाणी आलें. हें पाहून मुक्तामाला सुस्कारा टाकून ह्मणाली, बाबा, करतोस काय ! दुःख ह्मणून किती व कोणच्या गोष्टींचे करावें? स्वप्नींही येणार नाहीं असा प्रसंग गुदरला खरा! होईल तें होवो; दगडासारखें हृदय करून त्यास रेंटीतच नेलें पाहिजे; दुसरा इलाज नाहीं ! मग दोघेंही घोड्यांवर स्वार होऊन उज्जनीकडे चालतीं झालीं.

उज्जनीस ज्या मार्गानें जावयाचें तो मार्ग मुसलमानी राज्यांत होता. पहिले दिवशीं सुमारें आठ कोश जाऊन एका गांवीं मुक्काम केला. तेथून दुसरे दिवशीं

प्रात:काळीं मार्गास लागून दोघे बोलत बोलत मार्ग क्रमीत आहेत. सुमारें चार घटका दिवस आला असून हीं जात आहेत तों मागें कांहीं गलबला ऐकूं आला. ह्मणून दोघांनीं एकदम मागें वळून पाहिलें, तों पांच चारशें स्वार भरधांव घोडे टाकीत येत आहेत, असें दृष्टीस पडलें. मग काय विचारितां! दोघांचीही मुखश्री म्लान झाली, आणि कांहीं संकट आलें, असें त्यांस खचित वाटलें. इतक्यांत ते अगदीं जवळ येऊन भिडले. त्यांचा एक मुख्य सरदार होता, त्यानें हुकूम केला कीं, यांस कैद करा आणि शहराकडे घेऊन चला. हें ऐकून पठाणानें विचारिलें कीं, आमच्याकडे गुन्हा काय व कैद कशाकरितां? तेव्हां तो सरदार ह्मणाला, फार बोलण्याचें काम नाहीं. गुन्हा वगैरे काय तें सर्व कळून येईल. असें बोलून ते त्या दोघांस कैद करून घेऊन चालते झाले.

इकडे शुक्लाक्ष त्या लीलांबरीच्या गुहेशीं जाऊन पाहतो तों, तें दार दगड लावून बंद केलेलें तसेंच आहे असें त्याचे दृष्टीस पडलें. तेव्हां त्यास समाधान वाटून मुक्तामाला येथून सुटून गेली नाहीं, अशी त्याचे मनाची खात्री झाली. मग जसा व्याघ्र गाईचे गोठ्यांत शिरतो, तसा तें दार उघडून तो आंत शिरला, आणि तिला हळूच हाका मारूं लागला; परंतु उत्तर देत नाहीं असें वाटून तो त्या काळोखांत हिकडे तिकडे चाचपून पाहूं लागला. आपण ह्या नाशास कारण आहों हें तिला माहीत नसावें, अशी त्याचे मनाची पक्की

खात्री होती, परंतु तो बोवा आपला नाश करण्यास आला असेल, असें तिला वाटून ती कदाचित् दडून बसली असेल, असें ह्याचे मनांत येऊन हा असें बोलूं लागला कीं, मी शुक्राक्ष आहे. त्या दुष्ट बोवानें तुला फसवून आणून आपली पापवासना तृप्त करण्याकरितां येथें कोंडून ठेविलें. ही बातमी मला लागतांच त्याचें पारिपत्य करून तुला सोडवून नेण्याकरितां मी आलों आहे. तर तूं कां ओ देत नाहींस? तुला केव्हां पाहीन असें मला होऊन गेलें आहे. अशा प्रकारें त्यानें अनेक उपाय केले; परंतु तिचा थांग नाहीं, असें पाहून दिव्यावांचून व्यर्थ, असें त्यानें मनांत आणिलें. मग बाहेर येऊन त्यानें तें दार पहिल्यासारखें बंद केलें, आणि धांवतच खालीं येऊन मोतद्दारापासून चकमक व मेणबत्ती घेऊन तो परत गेला. नंतर दार उघडून आंत शिरला, आणि मेणबत्ती लावून पाहतो तों कांहीं सामान अस्ताव्यस्त पडलें असून मुक्तामाला कोठें नाहीं, हें पाहून त्यास मोठें आश्चर्य वाटलें. नंतर सर्व गुहा शोधून पाहतांना तें दार त्याचे दृष्टीस पडलें. तेव्हां खास ह्यांत जाऊन बसली असावी, असें त्यास वाटलें. मग वांकून आंत शिरतांना तिचीं पावलें त्या मार्गावरील धुरळ्यावर उमटलेलीं ह्याचे दृष्टीस पडलीं, मग ज्या मार्गानें नुकतीच बिचारी मुक्तामाला गेली होती, त्या मार्गानें हा लांडग्यासारखा पलीकडचे बाजूस गेला. तेव्हां तिकडील दार उघडें पाहून ही सुटून गेली, असें यास वाटलें. मग आपले सर्व श्रम व्यर्थ झाले, असें

पाहून तो फार खिन्न झाला, आणि विसावा घेण्याकरितां त्या गुहेचे दारीं विचार करीत बसला.

विचार करितां करितां त्याचे मनांत असें आलें कीं, जर कारितां ती आतांच हिकडून बाहेर पडली असेल तर, जाते कोठें? खालीं आसपास कोणीकडे तरी जात असेल. असें मनांत येतांच, तो लागलाच खालीं उतरून रस्त्यावर आला, आणि कांहींसा पुढें जाऊन पाहतो तों, कोणी सावकाशपणें चालत आहे असें त्यानें पाहिलें. नंतर त्वरेनें पुढें जाऊन तो त्या अनाथास धरीत आहे, इतक्यांत गुलालसिंगानें त्यास लाथ मारून खालीं पाडिलें, हें मागें सांगितलेंच आहे. तेथें दगडावर हाप-टून उलथून पडल्यामुळें त्यास कांहींवेळ मूर्छा आली. मग सावध होऊन पाहतो, तों बराच पाय दुखवून नीट-पणें चालतां येईना, अशी त्याची अवस्था झाली. मुक्ता-माला व ज्यानें लाथ मारिली तोही कोठें दिसत नाहीं, असें पाहून त्यास फार दुःख झालें. अशा प्रकारें आपला अपमान झाला ह्मणून त्यास फारच राग आला. ज्यानें लाथ मारिली त्याचा प्राणच घ्यावा असें त्यास वाटलें; परंतु करतो काय! त्याचा पाठलाग करण्यास चालतां येईना, असो. जातात कोठें! कांहीं दिवसांनीं त्यांचा सूड घेईनच घेईन. असा मनांत निश्चय करून तो लंगडत लंगडत घोड्याकडे जाण्याकरितां तेथून निघाला.

सुमारें सूर्योदयाचे वेळेस शुक्लाक्षमहाराजांची स्वारी घोड्यापाशीं येऊन पोंचली. तों वाट पाहतां पाहतां

त्रासून मोतद्दार, घोडा झाडाशीं बांधून जमिनीवर स्वस्थ घोरत पडला होता. त्यास उठवून आपण घोड्यावर बसला, आणि मार्गास लागला. मग त्यानें असें मनांत आणिलें कीं, आतां जयपुरास न जातां पूर्वी शांतवर्मा ह्यास भेटावें, आणि त्याचें अनेकप्रकारें सांत्वन करून पाय चांगला बरा होईपर्यंत आठचार दिवस तेथेंच काढावे, ह्मणजे त्याची प्रीति चांगल्या प्रकारें आपणावर बसवून घेण्यास बरें पडेल. नंतर त्याचेंच संमत घेऊन मुक्तामालेच्या शोधाकरितां ह्मणून बाहेर पडावें. असें केल्यानें दोन्ही कार्यें साधल्यासारखें होईल. असा विचार करून तो सुमारें सातव्या दिवशीं इरावतीस येऊन पोंचला.

जेव्हां हा नगरींत शिरला तेव्हां, लोक त्यास पाहून मुक्तामालेविषयीं दुःख करून अनेक प्रकारच्या गोष्टी बोलूं लागले. त्या ऐकतच हा वाड्यांत येऊन पोंचला आणि खिन्न वदन करून शांतवर्मा बसला होता, तेथें जाऊन त्यानें त्यास नमस्कार केला. त्या ह्मातान्याचें अंतःकरण दुःख करून करून अगदीं जळून गेलें होतें, तरी ह्यास पाहतांच सर्व दुःखें पुढें उभीं राहून त्याचे डोळे पाण्यानें भरून आले, व कंठ दाटून आल्यामुळें तोंडांतून शब्द निघेना. कांहीं वेळ अशी त्याची अवस्था होऊन गेली, असें पाहून ह्या कृतघ्न पुरुषानेंही गहिंवर आल्यासारखें दाखवून डोळ्यांत पाणी आणिलें. आणि खालीं मान घालून बसला. इतक्यांत शांतवर्मा मोठा गळा काढून ह्मणाला कीं, बाबा माझी मुक्तामाला

कोठें पाहिलीस काय? आज सुमारें महिना होत आला, तिचा थांग नाहीं. बारा दिवसांचे आंत परत येत्यें असें सांगून ती मला सोडून गेली. आतां ती माझे कोठून दृष्टीस पडणार? जन्मापासून तिला बाहेरचें ऊन्ह ठाऊक नाहीं. तिचा वेळचे वेळीं खाण्यापिण्याचा बंदोबस्त कोण ठेवील? एकटी दासी बरोबर घेऊन गेली, असें तिचें कोणतें काम होतें? मला सांगितलें असतें तर मीही तिच्या बरोबर गेलों असतों ! तिला तीन महिने होत आले. डोहाळेजेवणाच्या गोष्टी चालल्या होत्या. आतां माझ्या बाईचें डोहाळेजेवण कोण करील? शुक्लाक्षा, आतां ती कधीं तरी येऊन बाबा ह्मणून मला हाक मारील काय? ती आतां कोठें असेल ? तिजपाशीं मला कोणी घेऊन जाईल काय ? मला सोडून तिच्यानें कसें राहवलें ! आपला ह्मातारा बाप दुःख करून प्राण सोडील असें तिच्या मनांत कसें आलें नाहीं ! मजविषयीं तिनें इतकें कठोर मन कां केलें? सोमदत्तास सांगत असतां तोही गेला. त्याचाही कोठें थांग नाहीं. असा त्याचा शोक पाहून शुक्लाक्ष हा पाषणहृदयी खरा; परंतु त्यासही द्रव आला, आणि तोही खरोखरीच शोक करूं लागला. इतक्यांत मुक्तामालेची आई, सासू वगैरे सर्व मनुष्यें तेथें जमलीं आणि त्यांनीं एकच कल्होळ केला. नंतर कांहीं वेळानें सर्व स्तब्ध झालें. तों शांतवर्मा ह्यानें मोठा दुःखाचा सुस्कारा टाकून, बंदिखान्यांत धनशंकराचें कसें काय आहे ह्मणून विचारिलें. तेव्हां तो अधिकाधिकच रडूं लागला. हें पाहून शांतवर्मा मनांत दचकला,

आणि त्यास ह्मणाला बाबारे, आतां मी आपलें ह्रदय दगडापेक्षांही कठीण करून, जें येईल तें सोसण्यास तयार झालों आहे. तर शोक एकीकडे ठेऊन जें खरें असेल तें सांग. मग तो मानभावी ह्मणाला, तात्या, ही गोष्ट तुह्मांस समजावी; नंतर तुमच्या भेटीस यावें. ह्याचमुळें आजपावेतों मी विलंब केला. इतकें असून ही गोष्ट सांगणें माझ्याच प्रारब्धीं आलें. ह्मणून मला फार दुःख होतें. असो, आतां आल्या प्रसंगास सादर झालें पाहिजे, असें ह्मणून त्यानें सांगण्यास आरंभ केला.

जेव्हां त्या दुष्ट कृत्यांत सांपडल्यामुळें राजानें त्यांस शिक्षा दिली, तेव्हांपासूनच त्यांनीं अन्नपाणी सोडिलें. कधीं खावें कधीं न खावें, रात्रंदिवस सारखा शोक करावा. अशा क्रमामुळें त्यांची प्रकृति क्षीण होत चालली. मी आपणाकडून अन्नवस्त्राची वगैरे फार चांगल्या रीतींची त्यांची तजवीज ठेविली होती, व वरचेवर जाऊन अनेक प्रकारच्या उपदेशपर गोष्टी सांगून त्यांचें समाधानही करीत असें; परंतु सर्व व्यर्थ! त्यांचा तो क्रम सुटला नाहीं. शेवटीं सुमारें पंधरा दिवस झाले, क्षीण होऊन परिणाम झाला हें ऐकतांच त्याच्या त्या बिचारे आईनें एकदांच किंकाळी फोडली. शांतवर्मा ह्यास जें दुःख झालें तेणेंकरून तो मूर्छित होऊन खालीं पडला. मग जवळची आश्रितमंडळी पुढें झाली, आणि सर्वांस सांगितलें कीं, तुह्मीं हें करितां काय ? ह्या वृद्धापकाळीं अति दुःख झाल्यानें त्यांची प्रकृति अगदीं क्षीण होऊन गेली आहे. जर तुह्मीं असा वरचेवर शोक कराल तर भलतेंच

होईल, ह्या अनर्थाकडे लक्ष द्या. तुह्मांवर ईश्वर कोपला, त्यास काय कराल? परंतु सर्व दुःख गिळून उगेंच बसा, एवढेंच आमचें मागणें आहे; असें ह्मणून त्यांनीं सर्वांचीं तोंडें मिटविलीं, आणि शांतवर्मा ह्याचे डोळ्यास पाणी लावून सावध केलें.

धनशंकराचे आईचा मात्र शोक आवरेना. तिला वाटलें कीं, माझ्या मुलाची कोणतीच हौस पुरली नाहीं. संसार वगैरे वाढून सुख घेण्याचे दिवस येणार तों ईश्वरानें मूळच खणून टाकिलें. सर्वस्वीं नाश होऊन, माझ्या बाबाचा अल्पवयांत असा परिणाम झाला. अशा प्रकारच्या अनेक गोष्टी आठवून ती एकीकडे जाऊन शोक करीत बसली. असो; पुढें आठ चार दिवस झाल्यावर शुक्राक्षाचा पाय चांगला बरा झाला. मग त्यानें एके दिवशीं शांतवर्मा ह्यास मोठ्या नम्रतेनें विचारिलें कीं, तात्या, मला आतां जयपूर येथें अगदीं चैन पडत नाहीं. तुह्मांवर वृद्धापकालीं असा प्रसंग पडल्यामुळें माझे जिवास जो खेद होत आहे तो सांगतां पुरवत नाहीं, ह्याखेरीज येथें कोणत्या वेळीं काय होईल ह्याचाही भरंवसा नाहीं. तर आबादावांत पाय काढावा हें फार बरें असें मला वाटतें. हें ऐकून शांतवर्मा ह्मणालाः बाबारे, माझेही मनांत तूं ह्मणतोस तसेंच आहे.आतां तुजवांचून मला कोणी नाहीं, व ह्या त्रासापेक्षां लवकरच डोळे मिटतील तर बरें, असें मला होऊन गेलें आहे. मग शुक्राक्ष ह्मणाला, येथें आलों तरी चैन पडेल असेंही वाटत नाहीं; कारण आज आठ दिवसांत एक दिवसही माझे जिवास

समाधान नाहीं. ही सर्व नगरी मुक्तामालेवांचून मला अगदीं ओसाड दिसते. तर तुह्मी कृपा करून हुकूम द्याल तर तिच्या शोधाकरितां मीही एकवेळ जाईन. हें ऐकून तो ह्मणाला: बाबारे, सोमदत्त गेला त्यास एक महिना होऊन गेला; त्याचाही कोठें थांग नाहीं. ह्याच-प्रमाणें तूंही करून मला शोक करण्यास लावशील ह्मणजे झालें. तात्या, बहुधा असें व्हावयाचें नाहीं. कसेंही करून महिना दोन महिन्यांचे आंत मी माघारां खचित येतों, असें सांगून सुमारें दोन हजार रुपये बरोबर घेऊन तो तेथून निघून चालता झाला.

# भाग ६.

॥ श्लोक ॥

दुःखांत दुःख घडतें अतिशोक व्हाया
हें तों विचित्र पण ही जगदीशमाया।
ऐशा दशेंत जन जे सदसत् पहाती
त्यांसी सदैव हरि तो धरितोचि हातीं ॥

मध्यरात्रीचा समय झाला असून शहरांतील बहुतेक लोक, दिवसा केलेले श्रम दूर करणाऱ्या अशा गाढ निद्रारूप विश्रांतींत निमग्न होऊन गेले आहेत; कित्येक गाणीं, नाच, तमाशे इत्यादिकांत आपल्या थकलेल्या जिवास आराम करून घेत आहेत. तरी चोहोंकडे बहुधा स्तब्ध होऊन राहिलें आहे. कृष्णपक्ष असल्यामुळे रात्र फारच काळ्या रंगाचें वस्त्र नेसली होती. त्या योगानें तिचें स्वरूप अति भयंकर दिसत होतें. चौकीवाले व गस्तवाले शिपाई यांचे शब्द मधूनमधून कानीं पडत, आणि त्यांत रात्रीचे कीटकांचे किर्र स्वर व कुत्र्यांचें भोंकणें हीं मिळून एक निराळाच चित्तास उदास वाटण्यासारखा ध्वनि कानावर येत होता. बादशाहाचे वाड्यापुढें कांहीं स्वार व शिपाई जवळ बंदुकींचे तोडे पेटलेले असून पाहरा करीत आहेत. वाड्याचे शेजारींच मागचे बाजूस मोठा भयंकर तुरंग होता; त्याचे तटावरही तोडे पेटवून खांद्यावर बंदुकी टाकून शिपाई लोक पाहरा करीत फिरत आहेत.

अशा वर लिहिलेल्या वेळीं तुरुंगांतून चोरवाटेनें दोन असामी बादशाहाचे वाड्याकडे येत आहेत. रात्र काळोखी व तुरुंगांतील बोळांतून व कोठड्यांतील अडचणीच्या वाटेनें चांचपत चांचपत ते तटाजवळ मोठ्या मारामारीनें येऊन पोंचले. मग ते तटाचे चोरदार हळूच उघडून त्यांतून बाहेर पडून वाड्याचे पिछाडीस आले. इतक्यांत कोणी खांकरलेंसें वाटल्यानें चपापून ते चोहींकडे पाहूं लागले. पोटांत धडकी भरून काय प्रसंग येतो कोण जाणे असें वाटून ते स्तब्ध राहिले; परंतु कोठें कांहीं नाहीं. मग सर्व शांत आहे, असें पाहून पुढें चालते झाले. इतक्यांत कोणी समोरून आलें आणि परस्परांचें अगदीं हळूच कांहीं सांकेतिक बोलणें होऊन त्याचे मागून ते दोघेही पुढें चालले. शेवटीं एक जिना लागला, व त्या ठिकाणीं पहिल्या दोघांपैकीं एकजण दडून बसला, आणि राहिलेले दोघे जिन्यानें वरतीं गेले. मग कोणी न पाहील अशा प्रकारें तें तिसऱ्या मजल्यावर एका सुशोभित महालांत जाऊन पोंचले आंत जातात तों एकदम पुष्पांचा व अत्तराचा फार मधुर सुगंध आला. इतक्यांत एक अप्सरेसारखी पंधरा वर्षांची स्त्री पुढें आली आणि तिनें त्या नवीन आलेल्या मनुष्यांस मोठ्या नम्रतेनें व हास्यवदनानें हातांनीं बिछायतीवर बसण्यास खूण केली. मखमालीची बिछायत व भरगच्ची तक्के व इतर सोन्यारुप्याचें सामान पाहून त्या परकी मनुष्यास असा भास झाला कीं, मी आपल्या मंदिरांतच आहे कीं काय? अथवा

मला स्वप्न तर पडत नाहींना! अशा स्थितींत तो त्या तरुय.शीं जाऊन बसला, आणि त्या स्त्रीच्या रूपाकडे व हिरे, पाच वगैरे अमोलिक रत्नांच्या अलंकारांकडे पाहून तो अगदीं चकित होऊन गेला. बरोबर आलेला मनुष्य दार लावून घेऊन एकीकडे जाऊन बसला.

कांहींवेळ दोघेंही एकमेकांकडे चोरून पहात स्वस्थ बसलीं. परिचय नसल्यामुळें संकोचानें कोणासच कांहीं बोलण्याचा धीर होईना. शेवटीं ती बादशाहाची मुलगी ह्मणाली, आपल्या सारख्या पुरुषांस अशी दशा प्राप्त झाली ह्मणून मला फार वाईट वाटलें. आरंभीं जेव्हां आपणास घोड्यावर पाहिलें तेव्हांच माझें मन अगदीं सद्गदित होऊन गेलें. त्या स्वाराचे हातीं आपण कसे सांपडलां? अशा प्रकारचे विचार मनांत येऊन त्या दिवसापासून मला चईन पडेनासें झालें आहे. आपणांस या बंदिखान्यांतून सुटून चांगल्या दशेंत कधीं पाहीन असें मला झालें आहे; परंतु आपणांवरील दोष जाऊन माझा बाप आपणास कसें सोडील ही मोठी काळजीच आहे. हें दुःखांत कांहीं सुख होण्यासारखें भाषण ऐकून तो पठाण (भुक्तामाला) मोठा दुःखाचा सुस्कारा टाकून ह्मणाला कीं, काय तुमच्या राज्यांत अंदाधुंदी ही! मी मुशाफर, त्रासानें घरदार सोडून देशावर सुखानें दिवस घालवीत फिरत असतां मला धरून कैदेंत आणून टाकिलें!! मजकडे दोष काय व मी कोण वगैरे कांहींच चौकशी नाहीं; यास ह्मणावें तरी काय? असो; आपल्या नशीबास बोल लावावा, दुसरा

इलाज राहिला नाहीं. (असें ह्मणत ह्मणत तो कपाळास हात लावितो) येथें जिवाचा मोठा धडा करून आलों. कारण, अशा ठिकाणीं येणें ह्मणजे सर्पाच्या शेंपटीवर पाय देण्यासारखेंच आहे. खेरीज माझा काळ विपरीत असल्यामुळें फारच भीति वाटते.

हें त्या पठाणाचें मोठ्या दुःखाचें भाषण ऐकून त्या बादशाहाचे कन्येस अतिशय वाईट वाटलें. मग ती ह्मणाली—आपणांस भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मी हा भेटीचा संकेत गुप्त राखण्याची चांगली तजवीज टेविली आहे. दुसऱ्याच्या नांवावर आपणांस पकडून कैद केलें हें मला खरें वाटतें; परंतु इलाज काय! बादशहापुढें बोलतो कोण! आपणास ज्यांनीं कैद करून आणिलें त्यांनीं मर्जी तर खुष करून घेतली; परंतु कदाचित् खरी गोष्ट समजल्यास खप्पा होण्यासही उशीर लागणार नाहीं; असो. मजकडून आपणांस मदत होण्यासारखी असेल त्यांत आळस होणार नाहीं; परंतु माझा हेतु मात्र आपण परिपूर्ण केला पाहिजे ह्मणजे आपण माझा अंगिकार केला पाहिजे. माझ्या लग्नाची तजवीज चालली आहे. दोघां चौघांच्या तसबिरी आणिल्या आहेत; परंतु आपणांस पाहिल्यापासून माझें मन दुसऱ्या कोणाकडेसच लागत नाहींसें होऊन गेलें आहे. हें ऐकून तो पठाण बोलला कीं, आह्मीं मुशाफर, घर नादार, आणि हल्लीं बंदींत. तर अशाबरोबर बादशाहाच्या मुलीचें लग्न, ही गोष्ट मनांत आणणें हें वेडेपणाचें कृत्य नव्हे काय? त्यावर ती बोलली कीं, आपणांस

ही ग्रहदशा आली आहे ह्मणून असें वाटतें, परंतु ही अशीच राहणार काय? हे दिवस लवकरच निघून जातील. असें ऐकून त्यानें उत्तर दिलें कीं, ईश्वरी संकेत असला तर मी, नाहीं ह्मणून तरी होणार काय? असो, आतां मी जातों. मला येथें भय वाटतें. उद्यां तुह्मीच या चोरवाटेनें आमच्या मकाणीं याल तर कोणता एखादा बेत करण्यास जीव स्वस्थ राहील. ती गोष्ट तिलाही नीट वाटली आणि विडा वगैरे घेऊन तो पठाण आलेल्या वाटेनें आपल्या तुरूंगांतील बिऱ्हाडीं स्वस्थपणें येऊन निजला. बादशाहाचे लोकांनीं त्यास कशाकरितां पकडलें व आणून यास कोठें कसें ठेविलें वगैरे वृत्तांत वाचणारांस समजण्याची इच्छा होईल, तो असा:—

या बादशाहाचे मांडलीक संस्थानिकांपैकीं एका पठाणानें करभार देण्याचें नाकारल्यावरून मोठें बंड केलें नंतर बादशाहानें फौज पाठवून त्याचा पराभव केला; परंतु तो दहापांच लोकांनिशीं पळून गेला, त्यास पकडण्याकरितां चोहींकडे स्वार, शिबंदी रवाना केली होती, त्यापैकीं एका टोळीनें तो हाच समजून आपले मुक्तामालपठाणास पकडलें. हें मागेंच सांगितलें आहे. जेव्हां त्या स्वारांनीं कैद करून यास चालविलें तेव्हां गुलालसिंगानें अशी शहाणपणाची करामत केली कीं, त्या स्वारापैकीं एकाजवळ कैद करण्याचें कारण बेताबातानें विचारून घेऊन, जेव्हां त्यास बादशाहापाशीं नेलें तेव्हां तो ह्मणाला कीं, खावंदसाहेब, मी आपला नोकर असून मला कैद होते ही अन्यायाची गोष्ट आहे. जेव्हां

सर्व त्याचे तोंडाकडे पाहूं लागले आणि बादशाहानें विचारिलें कीं, तुला कोठें पाहिलें देखील नाहीं, आणि तूं चाकर ह्मणतोस हें कसें? तेव्हां तो हात जोडून ह्मणाला; खावंद, अशी ह्मण आहे कीं, सर्व प्रजा राजास ओळखते; परंतु राजा सर्व प्रजेस ओळखीत नाहीं. सुमारें तीन महिने झाले, मी आपल्या आश्रयाखालीं आहे. चाकरी लागावी ह्मणून यत्न करीत आहे, परंतु दाद लागेना. शेवटीं ही संधि बरी आहे असें मनांत आणून या पठाणास पकडून खावंदापाशीं आणावें या हेतूनें याचे मागें आज तीन दिवस उपाशींतापाशीं फिरत आहे; या पठाणास मी तुजपाशीं चाकरीस राहणार असें सांगितलें होतें, व सवड सांपडेल तेथें यास सरकारचे माणसांच्या स्वाधीन करावें असा माझा हेतु होता; परंतु तें कार्य हे स्वार आल्यानें साहाजिक घडून आलें. अशी माझी हकीगत आहे. याउपर मलाही कैद करावें असें खावंदाचे मनांत येईल तर त्यासही मी तयार आहे.

असें त्या स्वाराचें भाषण ऐकून बादशाहा खुष झाला, आणि त्या स्वारास अभय वचन देऊन ह्मणाला कीं, त्वां चांगली चाकरी बजाविली. तुला याबद्दल बक्षीस मि-ळेल. असें ह्मणून त्यास सोन्याचें कडें, कंठी व पोषाग मिळून पांच हजारांचें बक्षीस देण्याचा हुकूम केला. आणि त्यास बादशाहानें सांगितलें कीं, यास कैदेंत ठे-वणार, त्याजवर तुझी नेमणूक करितों, तूं याचा चांग-ला बंदोबस्त ठेव. असें बादशाहा बोलत आहे तों तो पठाण हात जोडून ह्मणाला कीं, माझा एक अर्ज आहे,

कीं, मला कैद कां केलें, मी कोण व मजकडे अपराध कोणता? हें ऐकून बादशहानें त्यावर लाल डोळे केले, आणि ह्मणाला. बस, फार बोलण्याचें काम नाहीं. तूं काय केलेंस हें जर तुला ठाऊक नाहीं, तर तें लवकरच कळून येईल. असें ह्मणून त्यास वाड्याजवळील राजकीय कारणावरून मोठ्या लोकांस कैदेंत ठेवण्याच्या तुरुंगांत, एका बंगल्यांत कैद करून ठेवण्याचा हुकूम केला, आणि गुलालसिंग स्वारास त्याची सर्व प्रकारें खबरदारी घेण्यास सांगितलें, आणि बादशहाची स्वारी वाड्यांत निघून गेली.

सदरील चौकशी होत असतां, वाड्याचे तिसऱ्या मजल्यावर चिकाचे पडदे सोडून खिडकीमध्यें बादशाहाची पंधरा वर्षांची मुलगी बसली होती, तिनें या पठाणास पाहिलें. त्याचें मदनासारखें स्वरूप पाहून ती अगदीं मोहित होऊन गेली. तिला वाटलें कीं, आपणास हा पति मिळेल तर फार चांगलें होईल. असें मनांत आल्यावरून तिला अगदीं चैन पडेनासें झालें. रात्रंदिवस तीं सुंदर मूर्ति तिचे डोळ्यांपुढून जाईना; परंतु ही गोष्ट आपल्या मातापितरांस कळविण्यास तिला छाती होईना. कारण, तिचे मनांत येई कीं, मला आवडलें तरी तो आपल्या तोलाचा नसल्यानें तीं अनुमोदन देणार नाहींत. मग पहिल्यानें तिनें असा विचार केला कीं, त्याची एकांतीं भेट घेऊं व त्यास पूर्णपणें रेखून पाहूं आणि त्याचे मनांतला अभिप्राय काढून, नंतर काय विचार करणें तो करावा. त्याप्रमाणें तिनें गुलालसिंगाच्या मार्फत

रात्रौ त्याची एकांतीं भेट घेतली वगैरे प्रकार मागें सांगितलाच आहे.

इकडे बादशाहाचे हुकुमाबरहुकूम त्या पठाणास तुरुंगांत नेऊन ठेविलें. पाहारेकरी वगैरे दुसरे शिपाई होते तरी त्यांवर मुख्य गुलालसिंगाचीच नेमणूक झाल्यानें कोणतीच अडचण पडली नाहीं. रात्रीं सर्व निजल्यावर गुलालसिंग व मुक्तामाला हीं एकत्र बसून विचार करूं लागलीं. मुक्तामाला ह्मणाली, गुलालसिंगा, कायरे माझें दैव ! कितीं व कांहीं उपाय केले तरी मागें हटतच नाहीं. यावरून मला असें वाटतें कीं, मी आपल्या आईबापांस व त्यांस पुन: पाहिल्यावांचून प्राणास मुकणार! हर! हर ! ! असें कोणतें माझ्या हातून पातक घडलें होतें कीं, ज्याचे योगानें मी गांजून गांजून मरण पावावें. तो मेला काळ माझी पाठ सोडीत नाहीं. मध्यें हें ध्यानीं मनीं नाहीं असेंच विघ्न उत्पन्न झालें. येथें न्याय नाहीं, विचार नाहीं; एकादे दिवशीं तो बादशाहा फांशीं देण्याचाही हुकूम करील. मी तर मेल्यापेक्षांही मेली,झाल्यें आहे. यास्तव मी आपल्या प्राणाची इतकी काळजी करीत नाहीं; परंतु त्या वृद्ध मातापितरांच्या व (गरोदर असल्यामुळें पोटाकडे हात दाखवून) याच्या प्राणनाशास कारण मीं झाल्यें. असें मनांत येऊन मला अति दु:ख होत आहे. असें ह्मणून ढळढळां रडूं लागतें. तें पाहून गुलालसिंगाच्या पोटांत तडतडां तोडूं लागतें. डोळ्यांस पाणी येऊन ह्मणतो, बाईसाहेब, धीरानें व विचारानेंच यांतून पार पडलें

पाहिजे. ईश्वर आपणांस मदत करील ही मनांत पक्की गांठ घालून ठेवा. त्यास हा अन्याय दिसत नाहीं असें नाहीं; परंतु भोक्तृत्व संपल्यावांचून तो तरी करतो काय? बरें असो, रात्रीं कसें काय झालें ? तेव्हां ती ह्मणाली व्हावयाचें काय? ती माझ्याशीं लग्न लावण्यास उतावळी झाली आहे. जसें आपण सांगूं तसें ती करील. तर तिजकडून सुटका होण्याची कांहीं शकल निघाल्यास पहावी. व हेंच आपणास कर्तव्य आहे. लग्न तर लावणें नाहीं. त्यासमयीं किंचित् हंसून गुलालसिंग ह्मणतो. पुनः भेट होण्याचा संकेत केव्हां झाला आहे? तुजकडे तिचा तो चाकर येईल व आपण त्यास सांगूं तसें! मी आतां वाड्यांत येणार नाहीं, असें तिला सांगितलें आहे. हें फार चांगलें केलें. कारण तेथें जाणें सुरक्षित नव्हे. तर आतां असें करावें कीं, बादशाहाचे मनांत काय आहे हें समजण्याविषयीं व आपणावर विनाकारण हा आरोप आला आहे याची, त्याचे मनास खात्री करून देण्याविषयीं परस्परांनीं होईल तितका यत्न करावा, आणि हा सिद्धीस गेला, ह्मणजे त्याच्या विचारें अगर दुसऱ्या रीतीनें तिच्या मनांतील हेतूप्रमाणें करतां येईल व या विचाराकरितां दोन तीन दिवसांनीं तिनें रात्रीं फार जपून आपली भेट घेत जावी, याप्रमाणें तिला सांगावें. मग पुढें काय होईल तें पाहूं. असें दोघांच्या मतें ठरून तीं आपापले जागीं निजलीं

गुलालसिंगानें वाड्यापासून लगत, परंतु शहराचे

एके टोंकास बिऱ्हाड ह्मणून एक जागा करून ठेविली होती. तेथें आपले घोडे व सर्व सामान ठेविलें होतें; परंतु तो एक दोन वेळां तेथें जाऊन निरंतर मुक्तामाले-पाशीं असे. बादशाहाचें हुकुमानेंच मुक्तामालेस जेवण वगैरे करून घालण्याकरितां गुलालसिंगानें एक बायको चाकरीस ठेविली होती. ती सकाळीं येऊन रात्रीं काम आटोपून आपल्या घरीं जात असे. गुलाल-सिंग तिला सकाळीं आंत घेऊन येई व रात्रीं आपणच बाहेर पोंचवी, असा त्यानें बेत ठेविला होता. एके दिवशीं गुलालसिंग शहरांतून तुरुंगाकडे येत असतां त्यानें शुक्लाक्ष महाराजांची स्वारी घोड्यावर बसून जातांना रस्त्यांत पाहिली, तेऱ्हां ह्याचे पोटांत धस्स झालें; परंतु तोंड चुकवून तो कांहींसा पुढें आला आणि बरोबर शिपाई होता त्यास सांगितलें कीं, तो घोड्या-वरून जात आहे, तो कोठें राहतो हें मुकाट्यानें पाहून ये. असें त्यास सांगून आपण तुरुंगाकडे निघून गेला.

तुरुंगांत येऊन त्यानें ती गोष्ट मुक्तामालेस सांगितली तेव्हां तिच्या मनांत मोठीच काळजी उत्पन्न झाली. परंतु गुलालसिंगानें सांगितलें कीं, काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. मला वाटतें हें एका प्रकारें बरें झालें. त्यानें केलेल्या कृत्यांचा सूड घेण्यास चांगला संधि आला आहे. हें ऐकून मुक्तामाला ह्मणाली कीं, हें मनांतही आणूं नको; कारण आपणास काळ विपरीत आहे. याकरितां आपणच होऊन कांहीं भयंकर

अथवा घोर कृत्य करण्यास प्रवृत्त होऊं नये. होईल तितका आपला बचाव करण्याचा मात्र यत्न करून, त्याच्या दुष्ट वर्तणुकीबद्दल त्यास शिक्षा करण्याचें काम त्या ईश्वरावरच सोपवावें. हें तिचें विचारयुक्त भाषण ऐकून त्यासही तें खरें वाटलें. मग तो ह्मणाला कीं, त्याच्या बिऱ्हाडाचे शोधार्थ माणूस पाठविला आहे. तो आल्यावर जें योग्य दिसेल तेंच करतां येईल. असें बोलताहेत तों तो मनुष्य आला. त्यानें सांगितलें कीं, याचें बिऱ्हाड अगदीं तिकडच्या टोंकास असून बरोबर एकच चाकर आहे असें वाटतें. यानें ठीक आहे ह्मणून त्यास बाहेर जाण्यास सांगितलें. मग उभयतांच्या विचारें असें ठरलें कीं, एक चांगला हुषार व विश्वासु मनुष्य त्याजकडे त्याचें इच्छित काम करण्याच्या मिषानें पाठवावा, ह्मणजे तो काय करीत आहे, वगैरे हकीगत आपणास कळत जाईल. मग त्याप्रमाणें गुलालसिंगानें आपणाजवळ जो एक चाकर ठेविला होता, त्यासच चांगलें बक्षीस देऊं करून नीट शिकवून पाठविलें. तो दुसरे दिवशीं सकाळीं तेथें जाऊन शुक्राक्षमहाराजांस मुजरा करून ह्मणतो महाराज, मी गरीब आहे. कोठें चाकरी लागत नाहीं. यास्तव आपण मला ठेवाल तर मी आपली मनापासून विश्वासानें चाकरी करीन. माझी मुलेंमाणसें आपणांस दुवा देतील. अशी त्याची दीन वाणी ऐकून शुक्राक्ष ह्मणाला, तूं एथलाच राहणारा काय? होय. तुला सर्व शहराची चांगली माहिती आहे काय ? होय. सरकार, माझा जन्मच येथें झाला, मग माहिती कशी

नसेल ? बरें तर, तुला हीच कामगिरी आहे कीं, सर्व शहरांत फिरून बारकाईनें येथें कोणी बाहेरगांवची बायको आली आहे कीं काय, याची चौकशी कर. ती सुमारें पंधरा वर्षांची असून श्रीमंताची आहे व देख- ण्यांतही चांगली आहे. हें काम तर मी सहज करीन. शहरांतलें घरान घर धुंडून चौकशी करितों. जर हें काम तूं करशील तर पगाराखेरीज चांगलें बक्षीसही मिळेल. दर रोज संध्याकाळीं तुझ्या कामाची मला वर्दी देत जा; असें सांगितल्यावर तो मुजरा करून चालता झाला, आणि इकडे येऊन त्यानें गुलालसिंगास झालेलें वर्तमान सांगितलें. ठीक आहे, चांगलें केलें ह्मणून गुलालसिंगानें त्यास शाबासकी देऊन २५ रुपये इनाम दिले, आणि सांगितलें कीं, तुला फिरण्याची गरज नाहीं. संध्याकाळीं जाऊन आज अमकी बाजू पाहिली; ठिकाण नाहीं, असें जाऊन सांगत जा. बरें आहे ह्मणून तो चालता झाला.

मग हें बरेंच झालें आहे, असें ह्मणून गुलालसिंगानें अशी मसलत योजिली कीं, त्यास येथें आणून फसवावें. तो प्रकार असा हीं वरील वाटाघाट होत आहे, इतक्यांत बादशाहाची मुलगी रात्रीं चोरून एक दोन वेळ तेथें आली होती व आणखी तीन दिवसांनीं तिनें येऊन तिचें ह्मणणें कबूल करण्याचा निश्चय झाला होता, आणि ही गोष्ट बादशाहास कळून तो यांच्या पाळतीवर आहे असें, गुलालसिंगास समजलें होतें. अशा कारणांवरून त्या दोघांचेंही जिवात जीव नव्हता. याचें मुख्य कारण

जें करावें तें विपरीत व्हावें, असाच क्रम मागून चालत आल्यानें काय होईल कोण जाणे, ही काळजी त्यांचे मनास खात होती; परंतु करतात काय ? कांहीं तरी करून येईल त्या संकटांतून पार पडण्याचा यत्न करणें भाग होतें. अशा विचारांत तीं आहेत, तों एक दिवस गेला, व तो संकेताचा दिवस आला. मग गुलालसिंगानें त्या चाकराकडून शुक्लाक्षास असें कळविलें कीं, शहरांत कोठें थांग लागत नाहीं. तुरुंगांत एक नवीन बंदिवान आला आहे, तो आपण स्वतां पहावा. त्यावरील नायकास रात्रीं आपणास नेऊन दाखविण्याबद्दल पांचशें रुपये देण्याचें कबूल केलें आहे. त्याचे बोलण्यावरून असें धोरण दिसतें कीं, तो बंदिवान बायको असून पुरुषाचा वेश घेतला आहे. असें सांगून तो काय ह्मणतो तें मला येऊन कळीव. बरें आहे, ह्मणून तो तिकडे निघून गेला.

वर सांगितल्याप्रमाणें शुक्लाक्षास जाऊन सांगतांच त्यास तीच गोष्ट खरीशी वाटली, आणि त्यानें पांचशें रुपये देऊन तेथें चोरून जाऊन पाहण्याचें कबूल केलें, व त्या शिपायास त्यानें शाबासकी देऊन पुढें तुझें चांगलें कल्याण करीन असें आश्वासन दिलें. मग त्यानें मुजरा करून सांगितलें कीं, मी त्या तजविजींत असतों, आणि उद्यां रात्रीं सरकारास बलावूं येईन. त्यानें बरें आहे, ह्मणून सांगतांच तो निघून इकडे आला आणि झालेलें वर्त्तमान गुलालसिंगास सांगितलें. दुसरे दिवशीं गुलालसिंगानें अशी तजवीज केली कीं, रात्रीचे आठ

वाजतांच मुक्तामालेकडून पठाणाचा वेष टाकून पुन: स्त्रीचा वेष दिला, आणि स्वयंपाकास बायको येत होती तिला लालुच लावून तेथें पठाण करून बसविलें. मग तो त्या बायकोस बाहेर पोंचवीत असे त्याप्रमाणें मुक्तामालेस घेऊन तो आपल्या बिऱ्हाडीं गेला; आणि तेथें पुन: तिला साधारण पुरुषाचा पोषाख देऊन घोड्यांवर जीन वगैरे घालून तयार करून ठेवून आपण तुरुंगांत आला. इतकें कृत्य होत आहे, तों दहा वाजले. बारा वाजतां बादशाहाच्या मुलीचा येण्याचा संकेत होता व त्याच वेळेस त्या चाकरास शुकाक्षास आणण्यास सांगितलें होतें. बादशाहाही त्याच वेळेस येणार ह्मणून त्यास पक्केपणीं कळलं होतें. विचार करीत तो हिकडे तिकडे फिरत आहे तों बारा वाजले. तेव्हां गुलालसिंग मागच्या बाजूच्या चोर दरवाजाजवळ जाऊन काय चमत्कार होतो, तो पहात बसला. तेथील चाकरास कसें काय करावयाचें तें सर्व सांगून ठेविलें होतें. इतक्यांत बादशाहाची मुलगी आली. ती तेथें बसत आहे, तों तो शिपाई शुकाक्षास घेऊन तेथें आला. त्या नवीन पुरुषास पाहून बादशहाची मुलगी कांहींशी चपापली. असें होत आहे तों, माडीवरून स्वयंपाकी स्त्रीरूप पठाण जिन्यानें खालीं उतरून त्याच खोलींत येत आहे. अशा समयीं बरोबर एक चाकर असून डोईवर खोळ घेतलेला बादशाहा त्या खोलीचे दारांत येऊन उभा राहिला, आणि तेथें कोण कोण आहेत हें निरखून पहात पहात डोईवरील खोळ काढीत आहे तों त्याचे मु-

ऱ्हीची तिकडे नदर जाऊन तिनें त्यास ओळखिलें. मग ती फारच घाबरी होऊन उठली आणि मागचे दारानें पळून गेली. हें बादशाहानें पाहिलें तरी तिजकडे विशेष लक्ष न देतां, हातपाय आपटीतच तो आंत शिरला. मग काय विचारतां! शुक्राक्ष महाराजांची पांचावर धारण बसून पोटांत धडकी भरली, आणि हातपाय कांपूं लागले. अशा दशेंत तो आहे तों बादशाहानें मोठ्यानें ओरडून " तुम कौन है " असें विचारलें. तेव्हां त्याची बोबडी वळून में में असें करूं लागला. हें ऐकून बादशाहा पुनः ओरडला आणि त्यानें त्यास एक जोरानें लाथ मारली. तो अधींच घाबरून कांपत होता, यामुळें लाथ बसतांच उलथून खालीं पडला. तों दुसरी व तिसरी अशा लाथा बसल्या. मग सा-सा सांगतों असें हात जोडून रडत रडत बोलूं लागला. इतक्यांत जि. न्यावरून खालीं उतरून आलेल्या पठाणाकडे बादशा. हाची नजर गेली, आणि त्या आवेशांतच त्यास रागावून कोण आहे ह्मणून विचारतांच त्यानें विजारीची घाण केली, आणि हात जोडून खरें होतें तें सांगितलें. इतकें पाहून गुलालसिंग तेथून निसटला आणि बिऱ्हाडीं येऊन दोघें दोन घोड्यांवर बसून भरधांव घोडे टाकीत निघू-न गेलीं. इकडे बादशाहानें पठाणाचा व कसूरसिंगाचा (असें गुलालसिंगानें आपलें नांव सांगितलें होतें) शोध करण्यास सांगितलें. शुक्राक्षाचा व स्वयंपाकी पठाणाचा वृत्तांत ऐकून घेऊन कसूरसिंसानें मोठा ल-ष्कर्डी करून पठाणास पळविलें असें बादशाहास वाटलें.

मग त्यानें त्या दोघांस सध्या कैदेंतच ठेवावें असें सांगून व कसूरसिंग यास पकडून आणण्यास चोंहीकडे स्वार रवाना केले, आणि आपण वाड्यांत निघून गेला.

एक दोन दिवसांनीं स्वार परत आले आणि त्यांनीं सांगितलें कीं, त्यांचा कोठेंच थांग लागत नाहीं. हें ऐकून बादशाहास फार वाईट वाटलें, आणि त्यानें त्यांचे शोधार्थ गुप्त हेर पाठविले. मग भद्राक्षाची व याची दोस्ती असल्यानें शुक्राक्ष हा त्याचे पदरचा व त्याचे कामाक-रितां आला कीं काय, अशी मुद्दाम स्वार पाठवून चौकशी करून त्यास सोडून दिलें. तरी शुक्राक्षास हें सर्व होईपर्यंत एक महिनाभर कैद भोगावी लागली.

इकडे गुलालसिंग व मुक्तामाला भरधांव घोडे टाकीत निघालीं तीं सकाळपर्यंत १५ कोस निघून गेलीं, आणि तेथें फार वेळ विसावा न खातां दोनप्रहरचे सुमारास तीं परराज्यांत ह्मणजे भद्राक्षाचे अमलांत जाऊन पोंचलीं. वाटेनें शुक्राक्षाची झालेली दशा गुलालसिंगानें मुक्ता-मालेस सांगितली, तेव्हां दुःखांत कांहीं सुख झाल्या-प्रमाणें दोघेंही पोट धरधरून हंसलीं. त्यांस इतकें खचित वाटलें कीं, त्यास आपला अंदेशा येण्यास कांहीं एक कारण नाहीं हें एकापरी बरें झालें आहे. तेथून उज्जनी शहर चार पांच दिवसांच्या वाटेवार होतें. तेथें पोंचत पर्यंत रात्रीं एक प्रहर झोंप घेण्याशिवाय विसावा ह्मणून घ्यावयाचा नाहीं, असा त्यांनीं निश्चय करून तडक त्या रस्त्यानें तीं चालतीं झालीं.

# भाग ७.

॥ श्लोक. ॥

भंगावया झटति नेम पतिव्रतेचा
कामांध यत्न करुनी अती नीचतेचा।
नाहीं विचार मग त्यांस मुळींच कांहीं
हिंसादि पाप घडतें अपुल्या करांहीं ॥

प्रात:काळ झाल्यामुळें लोक आपआपल्या नित्यकृत्यास लागले आहेत. जे सज्जन व नीतिमान् लोक ते आजपावेतों कोणाचा घातपात वगैरे दुष्ट कर्म न करितां दिवस काढिले त्याच प्रमाणें हा दिवस जावो, अशी ईश्वराची प्रार्थना करूं लागले. जे रोगानें व अति दु:खानें जिवास त्रासले, त्यांस आपल्या ह्या दु:खदायक आयुष्याचा एक दिवस कमी झाला, असें वाटूं लागलें. कितीएकांचे आयुष्यास आरंभ झाला व कितीएकांच्या आयुष्याचा लय झाला. अशा प्रकारें सृष्टिक्रमास आरंभ झाला असतां, उज्जनींत मुगाबाईचे घरीं एकच गडबड होऊन गेली आहे. हेलकरणी डोक्यावर कलश घेऊन दारापुढें हेल घालीत आहेत. जोशीबोवा कालवेलादिकांवरून ग्रहांचें टिप्पण करीत आहेत. आसपासच्या बायका जमा झाल्यामुळें त्यांस हळदकूंकूं देऊन ओंट्या भरीत आहेत. कोणी साखरही वांटीत

आहेत. इतका आनंददायक सोहळा करण्याचें बाळंतिणीचें मनांत नव्हतें, परंतु मुगाबाईनें तिला समाधान होण्याकरितां असा समारंभ केला.

आपणास मुलगा झाला असें पाहून मुक्तामालेस त्या दुःखांत कांहींसें सुख झालें खरें, परंतु आपल्या पतीचें यथास्थित असून जर पित्याचे घरीं हा दिवस उगवला असता, तर त्यास अशा वृद्धावस्थेंत किती आनंद झाला असता ! हजारो रुपये दानधर्म करून त्यानें फारच मोठा सोहळा केला असता. असो, माझें प्रारब्ध खोटें ह्मणून त्या दुष्टास सर्वांची अशी दशा करण्याची बुद्धि झाली. येथें येऊन सुमारें दोन महिने झाले. घरीं तीन चार पत्रें पाठविलीं, परंतु एकाचाही जबाब नाहीं. ह्याचें कारण काय असावें, हें कांहींच समजत नाहीं. ह्यावरून पुढें आणखी कोणतें संकट येऊन पडणार आहे हें कळत नाहीं. असा विचार मुक्तामाला करीत आहे तों, तिचे मनांत असें आलें कीं, शुक्राक्षास अशा, प्रकारें आमचा नाश करण्याचें कारण काय ? मग विचार करितां करितां, माझ्या बापाची सर्व संपत्ति आपणासच मिळावी, ह्या खेरीज दुसरा हेतु दिसत नाहीं, अशी तिचेही मनाची खात्री झाली, व ह्याच हेतूनें त्यानें अशीं घोर कृत्यें केलीं; तेव्हा त्याच्या धाडसाचें तिला मोठें आश्चर्य झालें. तर आतां तो माझा व माझ्या बाळकाचाही प्राण घेतल्यावांचून राहणार नाहीं, असें तिला वाटलें. पित्याकडील अद्याप पत्र येत नाहीं, ह्यासही तोच कारण असावा अशी तिच्या मनाची समजूत होऊन गेली.

आतां ह्यास काय उपाय करावा, ह्या विचाराकडे तिचें मन अगदीं गुंतून गेलें.

जेव्हां मुक्तामाला मुगाबाईचे घरीं आली, तेव्हां तिनें तिचा मोठा आदरसत्कार केला. मग तिनें तिची सर्व हकीकत ऐकल्यावर एवढ्या श्रीमानाची मुलगी अशा दशेस आल्यामुळें तिचे पोटांत कळवळा आला आणि तिजवर ती फारच ममता करूं लागली. तिचा पति नुकताच मरण पावल्यामुळें हा एक मोठा आधारच जडल्यासारखा होईल असें तिला वाटूं लागलें. तिचा एक पांच वर्षांचा मुलगा व वृद्ध सासू ह्यांखेरीज दुसरें कोणी मनुष्य घरांत नव्हतें. तिचा भाऊ **भद्राक्ष** हा तेथील मामलेदार होता. त्याचा मात्र तिला आधार असे. तिची गरीबी पाहून मुक्तामालेनें आपलाच सर्व खर्च चालविला होता. एक पांचशें रुपयांचा दागिना मोडला व त्यापैकीं दोनशें रुपये गुलालसिंगास देऊन बाकीचे रुपये व चार साडेचार हजारांचे दागिने हे तिनें मुगाबाईचेच स्वाधीन केले होते. तिनें तिला सांगितलें होतें कीं, एक दोन चाकर ठेवून लागेल त्याप्रमाणें खर्च करीत जा, आणि हे रुपये संपल्यावर आणखी एकादा दागिना मोडता येईल. हाल करण्याजी गरज नाहीं. त्याचप्रमाणें तजवीज ठेवून तिनें चांगला बेतबात ठेविला होता. इरावतीहून पत्र येत नाहीं म्हणून तिलाही फार काळजी लागली होती. मग दोघींच्याही विचारें असें ठरलें कीं, कोणी मुद्दाम मनुष्य पाठविल्याखेरीज काय तें समजत नाहीं.

भद्राक्षाची स्वारी बहिणीचा समाचार घेण्याकरितां कधींकधीं येत असे; परंतु मुक्तामाला तेथें येऊन राहिल्या पासून त्या गरीब बहिणीकडे ते वारंवार आपली पायधूळ झाडूं लागले. तिचें दिव्य स्वरूप पाहून त्याचे मनांत पापवासना उत्पन्न झाली, परंतु तिचे प्रसूत होण्याचे दिवस जवळ आल्यामुळें त्याणें ती प्रगट केली नाहीं. वरचेवर समाचारास मात्र येऊन त्यानें तिचे दुःखामुळें हळहळावें, आणि आतां काळजी करूं नको. तूं सर्व संकटांतून लवकरच मुक्त होशील, असें ह्मणून त्या अनाथाचें समाधान करावें, व आपल्या हातचें पत्र लिहून मी उद्यां पाठवितों असें तिला सांगावें. अशा प्रकारचीं पत्रें शांतवर्म्यास कोठून पोंचणार! व ह्याचे मनांतील कपट मुक्तामालेच्या तरी कोठून ध्यानांत येणार! जें जें कमी पडेल त्या सर्वांची त्यानें तजवीज ठेवावी. असा क्रम चालला होता. हा मामलेदार येथें येई ह्मणून गुलालसिंग रात्रीं सवड पाहून कधींकधीं तिचे समाचारास येत असे. पुत्र झाला असें पाहून त्यास मोठा आनंद झाला; परंतु ही सुखरूपपणें घरीं पोंचेल तेव्हां सर्व निभावलें, असें वरचेवर त्याचे मनांत येई. त्यानेंही परस्पर एक दोन पत्रें पाठविलीं; परंतु सर्व पत्रें मामलेदारापाशीं येणार तेव्हां तीं पोंचतात कोठून! ही बाळंतीण होतांच मुद्दाम गडी करून पाठविला असें भद्राक्षानें सांगितलें; परंतु एक महिना झाला तरी त्याचाही ठिकाण नाहीं. असें पाहून जेव्हां गुलालसिंग समाचारास आला, तेव्हां तिनें त्यास सांगितलें कीं तुझ्या

योगानें मीं हे दिवस पाहिले. तर आतां ह्याचा शेवट करणेंही तुजकडेच आहे. तूं इरावतीस जाऊन सर्व तजवीज केल्याखेरीज माझें तारूं तडीस लागत नाहीं. असे तिचे दीनवाणे शब्द ऐकून, तो ह्मणाला, बाईसाहेब ह्या चाकरास काकुळुतवाण्या शब्दांनीं सांगण्याची गरज नाहीं. मीही असेंच मनांत आणिलें आहे, तर एक दोन दिवसांत निघून जातों. केव्हां कसा प्रसंग येईल ह्याची मला मोटी काळजी आहे. तर फार जपून वागावें. असें सांगून तो निघून गेला.

मुक्तामालेनें आपल्या पुत्राचे डोळे कमळासारखे आहेत असें पाहून त्याचें नांव **कमलाक्ष** असें ठेविलें होतें. त्याची मुद्रा थेट पतीसारखी असल्यामुळें त्यास पाहून तिला पतीची वरचेवर आठवण होई. गुलालसिंग घरीं जाऊन पित्यास हें आनंदकारक वर्त्तमान कळवितांच तो निघून येईल, असें तिला वाटत होतें; परंतु एक महिना गुदरला तरी त्याचाही ठिकाण नाहीं, असें पाहून तिचें चित्त उत्तरोत्तर उद्विग्न होत चाललें. सुमारें अडीच महिने झाल्यामुळें ती घरांत वावरूं लागली असें पाहून भद्राक्षानें मनांत आणिलें कीं, आपला बेत सिद्धीस नेण्याची वेळ आली आहे, तर आतां यत्न करण्यास आरंभ करावा. मग त्यानें आपल्या बहिणीस घरीं बोलावून नेलें आणि एकांतीं जाऊन तिला असें सांगितलें कीं, माझें एक काम आहे, त्यास जर तूं मदत करशील, तर तुला पांच हजार रुपये देईन. तेव्हां त्याच्या त्या पापवासनेविषयीं तिचे मनांतही आलें नाहीं. ती ह्मणा-

ली मी गरीब, माझे हातून असें कोणतें काम होणार आणि होण्यासारखें असल्यास मजकडून आळस होईल असें तुला वाटतें काय? हें ऐकून तो म्हणाला—मुक्तामालेस पाहिल्यापासून माझें मन अगदीं तिजवर गुंतून गेलें आहे, व तेव्हांपासून माझे जिवास चैन नाहीं. कधींकधीं सर्व रात्रींत झोंपही येत नाहीं, परंतु अडचणीमुळें मी आजपर्यंत दुःख सोसलें. आतां माझ्यानें दिवस काढवत नाहींत. हें ऐकून तिचे आंगावर कांटाच उभा राहिला, आणि ह्मणाली कीं, ती अशा स्वभावाची दिसत नाहीं, व अशा प्रकारची गोष्ट तिजपाशीं काढण्यास माझी छातीही होणें कठीण. मग तो हंसत हंसत ह्मणाला—तुझें वेड आहे. तिचा नवरा बंदींत पडला आहे, तर ती ही गोष्ट नाकारील असें मला वाटत नाहीं. हें ऐकून जरी ती पापभीरु होती तरी, पैसा काय न करील ह्याचा नेम नाहीं. तिचे मनांत असें आलें कीं, आपणास पांच हजार रुपये मिळतील व तिचे पांच हजारांचे दागिने आहेत तेही आपलेच आहेत. असे दहा हजार रुपये झाले ह्मणजे जन्मभर काळजी करावयास नको. तिचें यथास्थित होऊन पुढें आपलें कल्याण होईल, हें कोणी पाहिलें आहे! असा विचार करून तिनें त्यास सांगितलें कीं, तूं माझे घरीं ये. मग मी निघून जाऊन ती एकटीच तेथें राहील अशी तजवीज ठेवीन. नंतर पहिल्यानें तूंच तिला विचार. कार्य झालें तर बरेंच झालें. नाहींपेक्षां मागाहून मीही यत्न करीन. ह्यासही तो बेत बराच

वाटला. मग उद्यां येतों असें तो बोलतांच तीं आपल्या घरीं निघून आली.

दुसरे दिवशीं संकेताप्रमाणें सायंकाळीं भद्राक्ष आपले बहिणीचे घरीं गेला, तों माडीवर त्या दोघी मुलांस खेळवीत बसल्या होत्या. तिचाही मुलगा हिकडून तिकडे खेळत आहे; हा जातांच मुक्तामाला उठून उभी राहिली. तिला पाहून ह्याचें अंतःकरण गार होऊन गेलें. मग हा बहिणीचे समोरच त्या तान्ह्या मुलाजवळ जाऊन बसला. मग कांहीं वेळ हिकडच्या तिकडच्या गोष्टी होऊन, मुगाबाई मुलास जेवावयास बसवून येतें असें भावास सांगून मुलास हातीं धरून तेथून निघून गेली. मग भद्राक्षानें मुक्तामालेबरोबर बोलण्यास आरंभ केला. हा वरचेवर जाऊन समाचार घेई, तेव्हां मुक्तामालेस कधींकधीं ह्याजबरोबर बोलण्याचाही प्रसंग पडे यामुळें तिची त्याजबरोबर बोलण्याची बरीच भीड चेंपली होती. ह्याचे मनांत पापवासना आहे असें तिचे ध्यानींही आलें नाहीं. ह्मणून ती मोकळें मन करून ह्याजबरोबर बोलत असे. असो, तो तिजकडे पाहून ह्मणाला, कागद व गडीही पाठविला त्यांपैकीं अजून कोणाचाच ठिकाण नाहींना ? हें ऐकून थोडेंसें हास्य करून खालीं मान घालून तीं ह्मणाली, तुमच्यासारख्या मोठ्यांच्या हातून आज इतके दिवस झाले, एवढें काम होईना. काम काय! आह्मी आळस केला असेल तर सांगा. तुमचेच देखत पत्रें लिहून पाठविलीं, व मुद्दाम गडीही करून पाठविला, परंतु काय करावें ! कोणाचाच थांग नाहीं. बरें कांहीं

चिंता नाहीं. तुह्मी रानांत तर पडलां नाहींना? तीन महिने होऊं द्या, तोंपर्यंत कोणी न आल्यास मी तुह्मांस पोंचविण्यास येईन. हें ऐकतांच तिला थोडेंसें हंसूं आलें, असें पाहून त्याच्या पोटांत ज्या आनंदाच्या उकळ्या फुटल्या त्या सांगतां पुरवत नाहींत. मग ह्यास असें वाटलें कीं, आपलें काम झाल्यासारखेंच आहे. इतक्यांत मुलगा रडूं लागला? त्यास चिटक्या वाजवून ह्यानें हां हां केलें तरी तो राहीना. मग ह्यानेंच त्याला घ्या. असें तिला सांगितलें; तेव्हां ती पुढें येऊन त्यास घेण्याकरितां खालीं वांकली, इतक्यांत ह्या दुष्टानें तिचा हात धरिला आणि येथेंच कां बसाना? असें तिला ह्मटलें. हें पाहतांच ती नागिणीसारखी चवताळली आणि हातास हिसका देऊन थोडीशी मागें सरली. मग डोळे लाल करून ह्मणाली, अरे मानभाव्या, तूं कोणाचे आंगास हात लावलास, ह्याचा विचार केलास काय? भांगबिंग तर खाल्ली नाहींसना! तोंड काळें करून येथून निघून जा. पुनः मजकडे पाहशील तर तुजपुढें जीव देईन. असे तिचे कठोर शब्द ऐकून त्याचें तोंड खरकन् उतरून गेलें व आंगास घाम सुटला. मोठा मामलेदार खरा; परंतु त्यावेळीं मान वर करून तिच्या तोंडाकडे त्याच्यानें पहावेना. मनांतले मनांत अगदीं खजील होऊन गेला. मुलगा अधिकाधिक रडूं लागला; परंतु त्यास घेण्याचें तिला देहभान राहिलें नाहीं. इतक्यांत मुगाबाई वर आली आणि काय आहे, असें ह्मणून तिनें आधीं मुलास उचलून घेतलें. मग मुक्तामालेचा हात धरून ती तिला

आंत घेऊन गेली. नंतर भद्राक्षाची स्वारी खिन्न होत्साती उठून चालती झाली.

मुक्तामालेस फारच राग आला असें पाहून मृगाबाईनें आंत नेऊन तिचें अनेक प्रकारें सांत्वन केलें. तरी तिचा राग जाईना असें पाहून ती ह्मणाली जळला तुझा राग! सोन्यासारखें मूल, रडतां रडतां दमलें तरी त्याला घेण्याची तुला शुद्ध नाहीं! तेव्हां तिचा बराच राग कमी झाला, आणि तिनें मुलगा घेण्याकरितां पुढें केला होता त्यास घेऊन त्याचें तिनें मोठ्या प्रीतीनें चुंबन केलें. असें पाहून ती ह्मणाली; बाईगे, तरुण स्त्रियांवर त्यांतही ज्या तुझ्यासारख्या सुरूप असतात त्यांवर अशा कामुकांचे प्रसंग वारंवार पडतात. तर तूं तें कांहीं मनांत आणूं नको. मी आतां त्याचा चांगला बंदोबस्त करीन. अशा प्रकारें तिनें तिला त्या रागाचे वेळीं अनेक गोष्टी सांगितल्या; परंतु तिला जन्मांत असा प्रसंग प्राप्त झाला नव्हता, व ज्या दुर्गुणांचा ती मनापासून द्वेष करणारी तेंच प्राप्त झाल्यामुळें तिच्या सर्वांगाची आग होऊन गेली होती. मग तिनें मोठ्यानें दुःखाचा सुस्कारा टाकिला, आणि ह्मणाली माझें दैवच खोटें. मी दुसऱ्यास कां दोष लावूं! अजून माझे दैवीं कोणकोणते सोहळे भोगावयाचे राहिले आहेत तें कळत नाहीं! तुझा भाऊ तो माझाच भाऊ असें समजून मी मन मोकळें करून व आपल्यावरील प्रसंग जाणून त्याच्याशीं वागत होतें. त्या मेल्याची दुष्ट वासना मला कशानें समजावी? अतःपर मी त्या दुष्टाचें काळेंगोरें तोंडही

पाहणार नाहीं. अशाप्रकारें तिला फार राग आलेला पाहून मुगाबाई ह्मणाली, आतां ती गोष्ट देखील काढूं नको. तुझ्या प्रमाणेंच मलाही होऊन गेलें आहे. असें बोलून त्या आपआपल्या नित्यकृत्यास लागल्या.

इकडे मागें सांगितल्याप्रमाणें अपमान पावून भद्राक्ष आपल्या वाड्यांत आला, आणि स्वस्थपणें बसून विचार करूं लागला. तेव्हां त्यास असें वाटलें कीं, आज ह्या शहरांत माझा अम्मल, सर्वही मला थरथरां कांपतात, वेळेस मी एकदा मोठा अपराध केला तरी येथें मला कोणी शिक्षा करणार आहे असें नाहीं. असें असतां ती बंदिवानाची बायको माझा मोठा अपमान करून काळजास घरे पडण्यासारखे अपशब्द बोलली. ते मी एक उत्तरही न देतां ऐकून घेतले ! तर असें मला भुरळ कशानें पडलें ? पाहिजे तो अपराध ठेवून तिला बंदींत ठेवण्याचेंही माझे आंगीं सामर्थ्य आहे. असें असतां त्यावेळीं माझी अक्कल अगदीं गुंग होऊन गेली, हें माझें मलाच आश्चर्य वाटतें. असा विचार करीत असतां, तिचे ते कठोर शब्द आठवून त्याला फारच राग आला. मग जरी मनासारखें न झालें तरी ह्या गोष्टीचा चांगला सूड उगविण्याचा त्यानें निश्चय केला.

दुसरे दिवशीं मुगाबाई आपले भावाचे वाड्यांत गेली. नंतर दोघेंही झाल्या गोष्टीविषयीं विचार करूं लागलीं, तेव्हां ती ह्मणाली हें काम सिद्धीस जाणें मला फार कठीण वाटतें. भलतेंच केल्यास, वेळेस ती काय करील ह्याचा भरंवसा नाहीं. हें ऐकून भद्राक्ष

ह्मणाला—एकवेळ तिला अनेक प्रकारच्या गोष्टी सांगून तुझ्यानें होईल तितका यत्न कर. नाहीं तर तिचे कपाळीं दुःखच भोगणें असेल, तर माझा इलाज नाहीं. तुझ्या सांगण्यावरून जर ती मला अनुकूळ होईल तर तिनें जो माझा अपमान केला त्याची तिला क्षमा करीन. तसें न होईल, तर मात्र तिनें जें मला दुःख दिलें, त्याच्या शतपट तिला भोगण्यास लावीन. जेव्हां ती मला भलभलतीं दुरुत्तरें बोलली, तेव्हांच तिला माझ्यानें शिक्षा करवतीना असें नाहीं; परंतु मोहबतीस्तव सहन केलें. तिचा नवरा मोठ्या अपराधांत सांपडून बंदींत पडला. तर कदाचित् तिलाही बंदीवान करून राजाकडे पाठवीन. असें भावाचें भाषण ऐकून तिनें त्यापासून आठ दिवसांची मुदत मागून घेतली.

मुगाबाई भावाचे वाड्यांतून घरीं आल्यावर तिनें दोन चार दिवस जाऊं दिले. मग तिला वाटलें कीं, आतां मुक्तामालेचा राग जाऊन, ती पहिल्याप्रमाणें वागूं लागली. नंतर एके दिवशीं त्या दोघी आनंदांत बोलत बसल्या असतां, ही संधि बरी आहे असें मनांत आणून ती तिला ह्मणाली कीं, तुझी सर्व स्थिति मनांत आणून मला फार वाईट वाटतें व आलीकडे एक दोन दिवसांत तर फारच वाईट वाटूं लागलें आहे. कारण त्या दिवशींचे वाईट वर्त्तणुकीमुळें मी भावास बोलवायास गेलें, परंतु त्यास तुझे कठोर शब्दांनीं पूर्वींच अतिशय राग आला होता. ह्मणून तो ह्मणाला कीं, तिचे नवऱ्यावर मोठा टपका येऊन त्यास जन्मठेप झाली आहे. तर

हीही अपराधी झाल्यामुळें तिला कैद करून जयपुरास राजाकडे पाठविलें पाहिजे. तसें न करीन तर मजवर ठपका येईल. असें त्याचें भाषण एकून मी त्याची अनेक प्रकारें विनवणी केली, परंतु ऐकेना. शेवटीं त्यानें इतकेंच सांगितलें कीं, जर ती माझे इच्छेप्रमाणें वागेल तर मात्र तसें न करितां उलटा तिचे हिताविषयीं झटेन. मग ह्याविषयीं तुला काय तें कळवितें असें सांगून मी एक आठवड्याची मुदत त्याजपासून मागून घेतली आहे; तर मी तुला इतकेंच सांगतें कीं, भलतेंच आग्रह धरून आपला व आपल्या बालकाचा जीव संकटांत घालून घेऊं नको. मी हें तुला मोठ्या आनंदानें सांगतें असें नाहीं; परंतु काय करावें ? प्रसंगच चमत्कारिक येऊन गुदरला ! ! तो मामलेदार तेव्हां त्याच्या सत्तेस येथें कोणी प्रतिबंध करील असें नाहीं. तूं विचारी व शहाणी आहेस. मी तुला फार उघडून सांगावें असें नाहीं. हें ऐकून मुक्तामालेचें, चित्त अगदीं खिन्न होऊन गेलें, आणि विचार करून एकदोन दिवसांत काय तें तुला सांगतें असें ह्मणून ती कमलाक्षास घेऊन आपले खोलींत गेली आणि विचार करीत बिछान्यावर पडली.

विचार करितांकरितां मुक्तामालेचें अंतःकरण त्रासलें. ह्या प्रसंगीं काय तजवीज करावी हें सुचेनासें होऊन तिला वेड लागल्यासारखें झालें. ती वरचेवर आपल्या मुलाचे मुखाकडे पाही. तिचे मनांत असें येई कीं, आजपावेतों मला आपल्या एकट्या जिवाचीच

काळजी होती. आतां ईश्वरानें ही एक दुसरीच काळजी माझे पाठीमागें लाविली. मुगाबाईचेंही चित्तास फेर पडलासा दिसतो. आतां तो दुष्ट काय करील ह्याचा भरंवसा नाहीं. तो येथील मुख्य अंमलदार ह्याकरितां आपलें दुःख दुसऱ्या कोणास सांगूनही कांहीं उपयोग होईल असें नाहीं. कांहीं झाल्यास तें उलटें प्रतिकूळच होईल ह्यांत संशय नाहीं. गुलालसिंगाचा एक आधार होता तोही निघून गेला. असा विचार करीत असतां, आतां काय करावें हें तिला सुचेनासें झालें. मुगाबाईचें घर तिला यमसदनासारखें भासं लागलें. शेवटीं तिनें असा निश्चय केला कीं, गुलालसिंगाची बहीण राहते तें खेडें येथून सुमारें एक कोसावर आहे तेथें जावें. दुसरा कोणताही आधार दिसत नाहीं. मग काय होईल तें होवो. मुगाबाईपासून दागिने मागून घ्यावे असें तिचे मनांत आलें; परंतु तिचे मनांत मी कोठें तरी निघून जाणार असा संशय येईल, असा विचार करून तिनें त्यांवर पाणी सोडिलें. पुढें एक दोन दिवस गेल्यावर एके दिवशीं सायंकाळीं दिवे लागण्याचे सुमारास तिनें कमलाक्षास एका फडक्यांत गुंडाळून खांद्यावर टाकिलें, आणि मुगाबाई हाक मारीत असतां तिकडे लक्ष न देतां घराबाहेर पडली. मग एका रस्त्यास लागून हिकडे तिकडे न पाहतां तडक चालती झाली. बरें आतां आपण सोमदत्त तिकडे काय करीत आहे, ह्याचा विचार करूं.

सोमदत्त मोठा खिन्न होत्साता मुक्तामालेच्या शोधा-

करितां निघाला, तो ह्या गांवाहून त्या गांवीं व त्या गांवाहून ह्या गांवीं अशाप्रकारें शोध करीतकरीत चालला. त्यानें वाटसरू व गांवांतील लोक ह्यांस विचारून वेड्यासारखें गांवाचे आसपासही फिरावें. तेथें शोध नाहीं असें झालें म्हणजे दुसरे ठिकाणीं जावें. असें करीत करीत तो एका नगरींत आला. तेथेंही पूर्वी सांगितल्याप्रमाणेंच दिवसास आसपास शोध करून सायंकाळीं नगरींत परत आला, आणि रस्त्यांतून भ्रांतिष्टासारखा पाहत जातां जातां बाजारच्या रस्त्यावर आला. तेथें दोहीं बाजूंच्या दुकानांतून दिवे लागले असून शेंकडों पुरुष व स्त्रिया आपआपल्या उद्योगाकरितां हिकडून तिकडे जात आहेत व कितीएक कांहीं खरेदी करून आपआपल्या घराकडे जात आहेत असेंही त्यानें पाहिलें; परंतु त्यास जो इच्छित पदार्थ तो कोठेंच दिसत नाहीं. ह्या काळजीनें जी स्त्री भेटेल तिजकडे पहात तो हळूहळू चालला आहे, इतक्यांत एक स्त्री खांद्यावर मूल टाकून येत आहे असें त्यानें पाहिलें. नंतर ती एका दुकानासमोर आली तों त्यातील दिव्याचा प्रकाश तिचे तोंडावर पडला, तरी ह्यानें ओळखिलें नाहीं. कारण ऊंस चरकांतून काढला असतां जसें त्याचें रूपांतर होतें, त्याप्रमाणें हिचें शरीर अनेक वेळां दुःखाचे व काळजीचे चरकांतून पिळून निघाल्यामुळें निस्तेज झालें होतें. ह्याखेरीज तिचे नाकांत नथही नव्हती. मग इतर अलंकारांविषयीं बोलायास नको. आणखी रात्रीचा विषय ह्मणून त्यानें तिला ओळखिलें नाहीं.

जसजशी ती पुढें येत चालली व हाही कांहींसा पुढें गेला तों ह्यास ती मुक्तामाला असावी असा भास झाला. इतक्यांत तिनेंही सहाजिक वर पाहिलें, तेव्हां परस्परांनीं एकमेकास ओळखिलें. मग दोघांचेही पोटांतून आनंदाचे उद्गार येऊन व किंचित् हास्यवदन करून आपण कोठें आहों ह्याचीही शुद्ध न राहतां एकमेकांकडे जात आहेत, इतक्यांत एका भयंकर पुरुषानें एकाएकीं सोमदत्ताचे उरावर मोठ्या सपाट्यानें धक्का मारून त्यास उलथून खालीं पाडिलें, आणि कोणी पाहिलें न पाहिलें इतक्यांत मुक्तामालेस उचलून गाडींत टेवून चालता झाला. जेव्हां तिला त्या दुष्टानें गाडींत टेवण्याकरितां उचलली तेव्हां धांवा धांवा अशा करुणापर शब्दांनीं ती एक दोन वेळां ओरडली. लोक काय आहे, काय आहे, ह्मणून तिकडे येतात तों गाडी पार निघून गेली! हें काय असावें, हें लोकांस समजेना. तो बिचारा सोमदत्त, पागोटें एकीकडे व जोडा एकीकडे जाऊन मूर्छित पडला होता. त्यास एक दोघांनीं वारावारा घालून उठविलें. मग तो कांहींसा सावध झाल्यावर कोणी मारिलें व हें काय आहे वगैरे त्यास अनेक प्रकारें लोक प्रश्न करूं लागले. तेव्हां त्या बिचाऱ्यास पूर्वीपासून सर्व हकीकत सांगण्यास शक्तीही नव्हती. त्याचें सर्वांग ठेंचून हातपायही दुखावले होते. मग त्यानें संक्षेपानें कांहीं वृत्तांत सांगून सरकारी शिपायांस झाल्यागोष्टीविषयीं शोध करण्यास सांगितलें. आज इतके दिवस हिंडतां हिंडतां

मुक्तामाला दृष्टीस पडली आणि अतिशय आनंद होणार तों अशी दशा झाली. येणेंकरून त्यास जसें दुःख झालें तसें कधींच झालें नव्हतें. मग तो लंगडत लंगडत आपले बिऱ्हाडीं गेला. नंतर थोडासा उपहार करून तो बिछान्यावर लोळत पडला. त्यास आपल्या दुःखाची स्मृतीही नाहीं. बालक खांद्यावर टाकिलेली ती दीनवाणी मूर्ति त्याचे डोळ्यांपुढें येऊन उभी राहिली. ज्या दुष्टानें आपली अशी दशा करून तिला नेलें, तो कोण वगैरे कांहींच कल्पना त्यास होईना. तिची व तिच्या बालकाची काय अवस्था होईल ह्या काळजींतच तो अगदीं बुडून गेला. त्यास कांहींसें दुःखांत सुख इतकेंच झालें कीं, ती जिवंत आहे, इतका थांग लागला, इतक्यानें शांतवर्मा ह्यास समाधान होईल, ह्मणून त्यानें झालेल्या गोष्टीचें त्यास दुसरे दिवशीं पत्र पाठविलें; परंतु तें पोंचणार नाहीं ही कल्पनाही त्याचे मनांत आली नाहीं. सर्वांग ठेंचून हातपाय दुखावल्यामुळें तो आजारी पडला. ह्यामुळें पुढें शोध करण्याचें काम अगदीं राहिलें.

इकडे मुक्तामाला मुगाबाईचे घरून बाहेर पडतांच तिनें लागलेंच जाऊन आपले भावास वर्त्तमान सांगितलें. तो लागलाच गाडी तयार करून निघाला, आणि सोमदत्ताची दुर्दशा करून तिला घेऊन गेला, हें नुकतेंच सांगितलें आहे. नगरीचे लगतच त्याचा एक बाग होता, तेथील बंगल्यांत त्यानें तिला नेऊन ठेविलें, आणि दारास कुलुपें लावून सभोंवती चौकी पाहरा

ठेवून चांगला बंदोबस्त केला. तिच्या खाण्यापिण्याची वगैरे चांगली तरतूद ठेविली होती. दुसरे दिवशीं सायंकाळीं तेथें जाऊन त्यानें तिला सांगितलें कीं, तुझे मनांत जो वेडेपणा भरला आहे तो अगदीं सोडून दे. त्या दिवशीं तूं मला फार टाकून बोललीस; परंतु तें सर्व तुझे कल्याणाकरितांच मी सोसून घेतलें. नाहींपेक्षां तुझें तोंड बंद करून पाहिजे तें शासन करण्यास मी असमर्थ होतों असें नाहीं. तूं आजपर्यंत फार दुःख सोसलेंस तर आतां दुःख न होतां तुला व तुझे बाल-काला इरावतीस सुखरूप पोंचवावें असें माझ्या मनांत आहे. हें ऐकून ती ह्मणाली—जें जें माझे दैवीं भोगा-वयाचें असेल तें तें भोगल्यावचून सुटका नाहीं, हें मी पक्कें जाणते. नाहींपेक्षां सर्व यथास्थित असून घर सोडून बाहेर पडण्याची मला कां बुद्धि झाली असती? माझे पालन करणारे मोठाले धुरंधर असून मी अशा दीनवाण्या दशेस कां आलें असतें ? तर माझी पक्की खात्री होऊन गेली आहे कीं, भोक्तृत्व संपल्यावांचून अथवा जगन्नियंत्या परमेश्वरास करुणा आल्यावांचून ह्या दुःखचक्रांतून माझी सुटका व्हावयाची नाहीं. तर तोच तुह्मांस चांगली बुद्धि देवो, आणि मला ह्या दुःखां-तून मुक्त करो, अशी माझी त्यास अंतःकरणपूर्वक प्रार्थना आहे. इतकें असून जर तूह्मी भलतीच गोष्ट मनांत आणाल तर, माझे जिवांत जीव आहे तोंपर्यंत मजकडून भलतेंच आचरण कधींही व्हावयाचें नाहीं. हें ऐकून त्या भद्राक्षास मोठाच राग आला, आणि ह्मणा-

ला, तूं वेदांत सांगून माझें मन वळविण्यास पहातेस; परंतु तसें कधींच व्हावयाचें नाहीं. अशा प्रकारचे वेदांत मला टाऊक आहेत व ऐकिलेही आहेत. तुझें चांगलें व्हावें ह्या हेतूनें मी सामोपचारानें जें होतें तें उघडून सांगितलें. आतां जर तुझ्या कपाळीं दैनाच करून घेणें आहे, तर माझा उपाय नाहीं. असें ह्मणून तो निघून गेला.

इकडे शांतवर्मा सोमदत्ताची व शुक्लाक्षाची वाट पाहतां पाहतां दमला. सुमारें सहा महिने झालें तरी एकाकडूनही पत्र नाहीं, असें पाहून त्याचें चित्त अगदीं उदास होऊन गेलें. आतां बहुधा आपल्या प्रिय कन्येची व आपली भेट होत नाहीं, अशी त्याची खात्री होऊन गेली. रात्रंदिवस काळजीनें तो अगदीं क्षीण होऊन गेलाच होता, व मुक्तामालेचे दागिने वगैरे जिन्नस पाहून त्यास वरचेवर अतिशय दुःख होई. शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, आतां आपल्या आयुष्याचे दिवस येथें निघणें कठीण. तर तीर्थयात्रा करावयास जावें. त्यांत फिरतां फिरतां ह्यांपैकीं कोणाची गांठ पडून तिचा थांग लागल्यास बरेंच होईल. असा विचार करून त्यानें, आपल्या पदरीं जो फार दिवसांचा विश्वासु चाकर होता, त्याचे स्वाधीन आपला सर्व खटला केला, आणि आपली पत्नी व विहांण ह्यांखेरीज पदरचीं पन्नास मनुष्यें इतका खटला बरोबर घेऊन तीर्थयात्रेस निघून गेला.

इकडे मुक्तामाला त्या बागेंतील बंगल्यांत विलाप करीत पडली आहे. आतां हा दुष्ट आपली काय दशा

करणार ही तिचे मनांत मोठी धास्ती येऊन पडली. सोमदत्ताची अवस्था मनांत येऊन त्याची काय दशा झाली असेल, ही एक निराळीच काळजी तिचे अंतःकरणांत उपस्थित झाली. आईबापांची व आपल्या प्रियपतीची तिला वारंवार आठवण होई. अशा अनेक प्रकारच्या विवंचनेनें तिची कंबर खचून गेली. इतक्यांत बाहेर कोणी एकमेकाशीं बोलत आहेत असें तिला वाटलें. मग दाराचे फटींतून पाहते तों शुक्लाक्ष आणि भद्राक्ष ह्या दोन मूर्ति तिचे दृष्टीस पडल्या. तेव्हां ते केवळ काळपुरुषच आहेत, असें तिला वाटलें. शुक्लाक्षास पाहून तर तिचे सर्वांगाची आग होऊन गेली; परंतु मुक्तामालेनें असें मनांत आणिलें कीं, ह्यांच्या मनांत जें करणें आहे, तें करण्यास ते तर चुकत नाहींत; परंतु एक शेवटील उपाय सुचला तो करून पहावा. शुक्लाक्ष कोणतीही गोष्ट कवुल करील असें नाहीं, व तशा प्रकारच्या बोलण्यानें या प्रसंगीं आपलें हित होईल असेंही नाहीं. तर तो मला सोडविण्यासच आला आहे, असें दाखवून त्याची विनवणी करावी. मग कदाचित् त्याचे ह्रदयास घाम आला तर आला. नाहींपेक्षां ईश्वरावर सर्वप्रकारें हवाला आहेच. असा विचार करून, करूं कीं नको, करूं कीं नको, असें तिचें मन डागडूग करीत असतां त्याचा धडा करून तिनें आरंभ केला, तो असाः—

दाराच्या फटीशीं तोंड करून शुक्लाक्षा, अरे ही हाक मारते ही तुझी वहीण मुक्तामाळा! जिवावरचीं अनेक संकटें भोगून या बंदांत येऊन पडली आहे, हें तुला

कसेंरे समजलें बाबा !! या प्रसंगीं तूं कशीरे मजकरितां धांव घेतलीस ? ही तर मला ईश्वराचीच करणी दिसते. त्यानेंच तुला पाठविलें !! आतां मला धीर निघत नाहीं. लवकर हें दार उघड, आणि मला तुला कडकडून भेटूं दे ! अरे, माझी काय दशा झाली आहे ती पहा. बाबा, ह्या कमलाक्षाला एकदां उचलून मांडीवर घे. इतकें ती बोलत आहे तों तोही रडूं लागला. तें पाहून ष सर्व दुःखें मनांत येऊन तीही मोठ्यानें हंबरडा फोडून रडूं लागली. हें सर्व पाहून शुक्लाक्ष मनांत चरारला, आणि जरी तो पाषाणहृदयी होता, तरी त्याचे मनास बराच द्रव आला. चेहरा उतरून जाऊन आतां काय करावें हें त्यास सुचेनासें झालें. अशा स्थितींत तो आहे इतक्यांत मुक्तामालेनें रडें आटोपून पुनः त्यास हाक मारिली, आणि ह्मणाली–बाबा, दार उघड आणि आंत ये, आणि हे दीनदशेस आलेले दोघे प्राणी व त्यांचें सर्व वैभव तर पाहा! असें तिचें बोलणें ऐकून तो दार उघडून आंत गेला; आणि त्या दोघांकडे पहातच उभा राहिला. तेव्हां मुक्तामालेनें त्याचा हात धरून त्यास खालीं बसविलें आणि त्याच्या पोटांत मुसंडी घालून विलाप करूं लागली तो असाः—

शुक्लाक्षा, मेल्येंरे मेल्यें! दुःखानें माझें काळीज जळून गेलें. मेली मला कोठली बुद्धि झाली घरांतून बाहेर पडायाची? कईक वर्षांनीं नवस सायास करितां असली दुःख देणारी मी पोटास आल्यें! मी आपल्या आईबापांला ह्मातारपणीं भारी दुःख दिलें; यापेक्षां

असली हतभाग्य मी जन्मासच आल्यें नसत्यें तर बरें झालें असतें? शुक्लाक्षा, दोन्ही कुळांस काळोखी आणि- ली, असें मला लोक ह्मणतील. मेली किती झाली तरी बायकांची समजूत! त्या मेल्या धुताऱ्याच्या नादीं मी कां लागावें? असो, जें दैवीं होतें तें झालें. आतां मी आपल्या जिवाकरितां इतका शोक करित्यें असें ना- हीं, ह्या अनाथ तान्ह्याकडे पहा! आपल्या बाबांला अशा ह्यातारपणीं ह्यास पाहून कितीरे सुख होईल? शुक्लाक्षा, खरेंच सांग, तूं अगदीं मौन कां धरिलेंस? ही तुझी अनाथ झालेली गाय वाघाचे हातून सुटून कसा- याचे हातीं लागली हें तुला कोणी सांगितलें? शुक्लाक्षा, खरेंच सांग, तूं मला येथून सोडवून बाबांकडे नेणार काय? नेशील, हें मी खचित जाणत्यें, पण हा मेला वेडा जीव पोळून पोळून कोणावरच भरंवसा ठेवीनासा झाला. असें बोलून वर डोकें करून त्याचे हनवटीस हात लावते. हें पाहून तो मांगहृदयाचा जरी होता, तरी त्यास गहिंवर आला व त्याचे डोळ्यांतून अश्रू वाहूं लागले. मग तो तिला ह्मणाला—तूं आतां शोक करूं नको. मी तुझी चांगली तजवीज करीन, असें बोलून जाण्यास उठला; तेव्हां मुक्तामाला पदर पसरून ह्मणाली कीं, करीन असें ह्मणतोस, तेव्हां तूं मला आतां येथें ठेवून जाणार काय? तेव्हां तो ह्मणाला—आज सर्व तजवीज करून उद्यां घेऊन जातों. मग ती ह्मणाली, या बाळा- कडे पहा. याचा एकदां मुका घे. शुक्लाक्ष मुका

घेऊन बाहेर पडला. चाकर जवळच होता, त्यानें खोलीस कुलूप घातलें.

लहानपणापासून मुक्तामालेची शुक्लाक्षाबरोबर वागण्याची वजनदारीची रहाटी असल्यामुळें कोणत्याही प्रकारें त्याला तिच्याशीं उघडपणें वाईट वर्तणूक करवली नाहीं व त्या प्रसंगीं तर त्याचे चित्तास थोडा द्रव आला, हीच गोष्ट खरी; परंतु काय ? बाहेर आल्यावर कांहीं वेळानें त्याचे दुष्ट विचारांचें पारडें वजनदार झालें, आणि तो आपल्या पूर्वस्थितीवर आला. इकडे मुक्तामालेसही, त्याच्या कृतीवरून व बोलण्यावरून असें वाटलें कीं, आपण केलेले सर्व श्रम व्यर्थ आहेत. तो आपला दुष्ट हेतु सिद्धीस नेण्यास चुकेल असें दिसत नाहीं. असो; ईश्वर काय करील तें खरें, असें मनांत आणून ती त्याचें चिंतन करूं लागली.

शुक्लाक्ष बाहेर आल्यावर दोघेही तेथून निघाले. मग वाटेनें त्यानें भद्राक्षास सांगितलें कीं, ती आपली सुटका होण्यास फार आर्जवें करीत होती; परंतु तिचें वाईट कोण करीत आहे ? ती आपण होऊनच आपली दुर्दशा करून घेत आहे. मला वाटतें कीं, तिच्या सारखी दैवाची कोणी नाहीं. कारण, ती आपणा सर्वांची स्वामिणी होऊन बसणार आहे. असें बोलणें चालत आहे तों भद्राक्षानें खिशांतून एक पत्र काढिलें आणि शुक्लाक्षास ह्मणाला—हें पत्र सोमदत्त ह्मणून कोणी आहे त्यानें हिच्या बापास लिहिलें आहे. मला वाटतें कीं, ज्यास मी रस्त्यावर गुद्दा मारून पाडिलें तोच हा

असावा हें ऐकून शुक्राक्ष ह्मणाला, तोच हा. जर करितां त्याचा शोध लागला, तर ह्या कामांत त्याजवर टपका ठेवून त्यास एक दोन वर्षांची टेप द्यावी. हें ऐकून भद्राक्ष ह्मणाला, तें असो; परंतु तिची तजवीज कशी काय करावयाची? मग शुक्राक्ष ह्मणाला, हिजवर आपल्या महाराजांचा हेतु गुंतला आहे. तर कसेंही करून ती कबूल होईल, अशी तजवीज केली पाहिजे. भद्राक्ष ह्मणाला, ही गोष्ट तर कठीण दिसते. नंतर हा ह्मणाला-कठीण खरी; परंतु देववेल तितकं दुःख देऊन ती कबूल होईल तर पहावें; हा अपला धर्म. तो केला ह्मणजे आपणास ईश्वराचेंही भय नाहीं. मग राजाचें कोठून ! असें बोलून ते दोघे निघून गेले.

आतां ह्यां दोघांचेही मनांतील व बाहेरील विचार अगदीं निरनिराळे होते. ते असे कीं, शुक्राक्षाच्या मनांतील विचार उघडच आहे कीं, ह्या दोघांचा प्राण घ्यावयाचा; परंतु तो उघडपणें भद्राक्षापाशीं त्यास बोलतां येईना, तेव्हां बाहेरून एक दाखवून आपला संकल्प तडीस नेण्याविषयीं तो झटूं लागला. ह्याचप्रमाणें भद्राक्षाचे मनांतील संकल्प वाचणारांस माहीतच आहे. तर तो शुक्राक्षापुढें त्याच्यानें उघड करवेना. कारण जेथें राजानें आपला हेतु ठेविला, तेथें आपण ठेवून चालेल कसें? हें उघडच त्याचे मनांत येई. असा प्रकार होता तरी, ते परस्परांस संशय न येतां आपआपल्या मनांतील हेतू साधण्याकरितां सारखे झटूं लागले. शुक्राक्षानें भद्राक्षास सांगितलें होतें कीं, तूं एकटाच जाऊन तिला राजाचे म-

नांत काय आहे तें मोठ्यानें फुगवून सांग, आणि काय ह्मणते तें मला कळव; मग आपण त्याचा विचार करूं. त्याप्रमाणें तो दुष्ट एकटाच बागेंत आला, तेव्हां मुक्तामाला आपल्या विवंचनेंत निमग्न होऊन पडली होती. दाराचें कुलूप वाजतांच ती एकाएकीं दचकून उठून बसली, तों तो काळपुरुष तिचेपुढें जाऊन उभा राहिला. त्यास पाहून तिचे आंगास कंप सुटला. तिला वाटलें आतां हा काय करतो कोण जाणे ? अशा भीतींत ती आहे इतक्यांत तो ह्मणाला-तूं आतां अगदीं भिऊं नको. मी तुला आनंदाची गोष्ट सांगण्यास आलों आहें. राजानें तुला नेण्यास पाठविलें आहे. तूं आतां त्याची पट्टराणी होशील. मग तुला काय कमी ! सर्व प्रजा तुझे हुकूमांत ! मजकडून कांहीं अन्याय झाला असेल तर, तो मनांत ठेवून सूड घेऊं नको, हें माझें मागणें आहे, हें बोलून तो ह्मणाला-तूं कधीं निघणार, तें सांग ह्मणजे त्याप्रमाणें तयारी करितां येईल.

हे त्याचे शब्द तिचे अंतःकरणास बाणासारखे टोंचले, तरी तिनें त्याजकडे न पाहतां खालीं मान घालून तें सर्व ऐकून घेतलें. मग मोठा सुस्कारा टाकून ह्मणाली, माझे सर्व लक्षांत आहे. मी इतकी भोळी आहें असें नाहीं, पण वाघाच्या जाळ्यांत येऊन पडलें, हें मी पक्कें समजून आहें. वरचेवर चावटासारखें मला तेंच तेंच बोलतां येत नाहीं. आतां तुह्मी कधीं तयारी करूं ह्मणून मला विचारावयास आलां, तर हें मला कसें सांगतां येईल ? तुमचे मनांत माझा कधीं प्राण घ्यावयाचा

आहे, हें मला कसें कळेल ! जर सांगून ठेविलें असेंत तर त्या दिवशीं तयारी करा, असें मी सांगितलें असतें, आतां माझें पदर पसरून तुह्मापाशीं इतकेंच मागणें आहे कीं, आधीं माझा प्राण घ्या,आाणि मग माझ्या बालकाचें काय करणें असेल तें करा. असें बोलतांना तिचे पोटांत भडभडलें व डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या ! मग तिनें आपल्या मुलास पोटाशीं धरून मोठ्यानें शोक करण्यास आरंभ केला. हें पाहून भद्राक्ष पाय आपटीतच बाहेर आला आणि कुलूप लावून चालता झाला.

भद्राक्ष बाहेर येतो तों, शुक्लाक्ष बागेंत हिकडून तिकडे फिरत व काय मजकूर होतो, तो समजून घेण्याकरितां त्याची वाट पहातच होता; मग दोघांची गांठ पडतांच भद्राक्षानें झालेलें सर्व वर्त्तमान सांगितलें. तें ऐकून तो ह्मणाला-अशानें ती कबूल व्हावयाची नाहीं. तिची व तिच्या मुलाची ताडातोड केली पाहिजे. नंतर कबूल होशील तर मूल आणून देतों अशा धमकीनें ती कबूल होईल असें मला वाटतें. आतां तिनें ह्या बोलण्यास कबूल व्हावें, असें भद्राक्षाचे मनांत नव्हतें. तरी शुक्लाक्ष हा दुय्यम प्रधान व राजाचें प्रीतिपात्र, खेरीज हें राजाचेंच काम, ह्यामुळें त्यास त्याचे मसलतीविरुद्ध चालतां येईना. मग आज रात्रीं हें काम करावयाचें असें ठरवून दोघेही निघून गेले.

सुमारें रात्रीचे बारा वाजण्याचे वेळेस ते दोघेही तेथें आले आणि गडबड होऊं न देतां कुलूप काढून हळूच दार उघडलें, आणि मग पावलें न वाजवितां आंत

जाऊन पाहतात तो एके कोपऱ्यांत मंद दिवा जळत आहे. त्या विचारे मुक्तामालेस दुःख करून करून नुकतीच गाढ झोंप लागली होती, व तिचें तें मदनासारखें बालक तिजपाशीं तशीच झोंप लागून पडलें होतें. हें पाहून शुक्राक्ष पुढें सरसावला आणि त्या निर्दयानें तें बालक उचलून हळूच पोटाशीं घेतलें. नंतर तें जागें होऊन कदाचित् रडेल ह्या बुद्धीनें दार वगैरे लावण्यास भद्राक्षास सांगून आपण पुढें चालता झाला. त्यानें आपल्या चाकरास बागेंत उभें केलेंच होतें. त्यापाशीं तें आणून देऊन सांगितलें कीं, ह्यास आपल्या बिऱ्हाडीं घेऊन जा आणि थोपटून थोपटून निजीव. असें सांगत आहे इतक्यांत तें जागें होऊन रडूं लागलें; परंतु ह्या काळपुरुषास दया कोठून येणार ? त्यानें चाकरास लवकर जाण्याविषयीं हुकूम केला. तो जातो इतक्यांत भद्राक्ष तेथें आला. मग दोघांनीं हातावर हात मारून काम फत्ते झाल्याविषयीं संतोष मानिला. शुक्राक्षाचे मनांत आपलें अर्धें अधिक काम झालें ह्मणून त्यास फारच समाधान वाटलें. आतां ती बहुधा कबूल होईल, असें ह्मणून त्यानें भद्राक्षास सांगितलें कीं, उदईक संकेताप्रमाणें तिला विचारावें. मग काय ह्मणेल त्याप्रमाणें पुढें तजवीज करतां येईल. नंतर नमस्कार चमत्कार होऊन, दोघेही आपापल्या ठिकाणाकडे चालते झाले.

इकडे सोमदत्तास रात्रंदिवस चैन पडेना. मला मुक्तमालेचें स्वप्नच पडलें काय, असें त्यास वाटूं लागलें. खांद्यावर मूल टाकून दीनासारखी ती त्या रस्त्यांतून येत

आहे, असें एकसारखें त्याचे डोळ्यापुढें दिसूं लागलें. ह्यामुळें तो आपल्या वेदना अगदींच विसरून गेला. पुढें काय उपाय करावा हें त्याला सुचेना. अशा दुःखांतच दोनचार दिवस गेल्यावर एके दिवशीं तसाच लंगडत लंगडत तो मामलेदाराचे कचेरींत गेला, आणि त्या दिवशींचें झालेलें वर्त्तमान मामलेदारास सांगून ह्मणाला-तुह्मी मेहेरबानी करून एवढ्या अनर्थकारक गोष्टींचा थांग लावला तर मज दीनावर मोठे उपकार होतील! हें ऐकून मामलेदार डोळे वटारून त्यास ह्मणाला-माझे सर्व ध्यानांत आलें, व शिपायांच्या सांगण्यावरून मी बरीच चौकशीही केली आहे, व तुला मोकळें सोडिल्यामुळें त्यांस दंडही केला, तूं येथें येऊन लोकांच्या बायका बाहेर काढून पळवून नेण्याचा उद्योग करीत असतोस, ही माझी खात्री झाली. तर तें एकीकडे ठेवून दुसरीच बनावून गोष्ट सांगून मला चकविण्यास पाहतोस काय? बरें, हा तुझा पहिलाच अपराध आहे, ह्मणून तुला दोन वर्षांची टेप देतों; असें ह्मणून त्यानें शिपायांस त्यास बंदिखान्यांत टाकण्याविषयीं हुकूम केला. हें ऐकून त्यानें आपल्या कपाळास हात लाविला, आणि मामलेदारास ह्मणाला, हा अगदीं अन्याय आहे. मजकडे कांहींच अपराध नाहीं. मामलेदारानें त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देतां नेण्याविषयीं शिपायास हातानें खूण केली. तेव्हां त्यांनीं त्या बिचाऱ्यास धक्के देतच नेऊन बंदिखान्यांत टाकिलें. मग त्याची काय अवस्था विचारावयाची आहे! मुक्तमालेस पाहण्याची व तिच

शोध करण्याची वाटच खुंटली, ह्यामुळें त्याचे दुःखास पारावारच नाहींसा झाला. आतां ह्यास कोणता उपाय करावा ह्या विवंचनेंत तो अगदीं निमग्न होऊन गेला.

इकडे मुक्तामाला ह्या संकटांत पडल्यापासून तिला गाढ निद्रा आली, तरी ती फारवेळ येत नसे. हे दुष्ट निघून गेल्यावर ती सुमारें तीन वाजतां कांहींशी जागी झाली आणि मुलास पोटाशीं घेण्याकरितां पुढें हात टाकते तों मुलगा हातास लागेना. तेव्हां चपापून एकाएकीं उठून बसली, आणि बावऱ्या घाबऱ्या हिकडेतिकडे पाहते तों मूल कोठें दिसेना, तेव्हां त्या दुष्टांनीं हा माझा घात केला असें तिला कळून आलें. मग मोठ्यानें हंबरडा फोडून ती ह्मणाली, अरे कमलाक्षा, तूं मला सोडून कोठें गेलास? तुजवांचून माझा जीव कसा राहील? आतां तुला कोठें पाहूं? ह्मणून तिनें भुईवर हात आटपले आणि गडबडां लोळू लागली. त्या दुःखाच्या तिरमिरीनें तिला कांहीं वेळ मूर्च्छाही आली. मग सावध होऊन पुनः ह्मणते-हे ईश्वरा, मी असें कोणतें पातक केलें होतें, ह्मणून तूं मजविषयीं अगदीं पाठमोरा झालास ? हा माझा गुमारा होत आहे, हा तुला दिसत नाहीं काय? त्या दुष्टांना माझ्या बालकास हात लावण्याची कशीरे बुद्धि दिलीस? आतां कदाचित् मजकडून अपराध घडला असेल; परंतु त्या चार महिन्यांच्या बालकाकडे काय आहे? तर हे देवा, धांव आतां, आणि माझें बालक मला भेटेल असें कर. त्यावांचून माझा जीव

राहणार नाहीं. आतां मी काय करूं? अशा प्रकारें ती विलाप करूं लागली.

दुसरे दिवशीं भद्राक्ष संकेताप्रमाणें तेथें आला तों ही विलाप करीतच आहे असें त्यानें पाहिलें. रडून रडून तिचे डोळे सुजून गेले होते, आणि सायंकाळ होत, आला होता, तरी तिनें मुखप्रक्षालनही केलें नव्हतें. मग खाण्यापिण्याची तर गोष्ट कोठून ? अशा दुःखकारक अवस्थेंत ती शोक करीत पडली होती; परंतु त्या दुष्टाचे अंतःकरणास ह्मणून द्रव आला नाहीं. दुःखावर डाग दिल्यासारखें त्यानें शब्द काढिले; ते असे कीं, अशा प्रकारचीं सोंगें मी पुष्कळ पाहिलीं आहेत, तुला आपले मुलाची गरज असली, तर सांगितलेलें कबूल कर; ह्मणजे मूल आणून देतों. नाहींपेक्षां तूं त्यास मुकलीस असें समज. आतां कदाचित् तूं समजशील कीं, एवढ्यानेंच झालें; परंतु तसें नाहीं. तुला आणखीही घोर अशा यातना भोगाव्या लागतील. ह्या त्याच्या वाग्बाणांनीं तिचे अंतःकरणास घरे पडले. तिचा जीव अर्धीच त्रासून गेला होता, आणि त्याच्या ह्या दुष्ट वर्तणुकीमुळें तिचे सर्वांगाची आग होऊन गेली. मग ती संतापून त्यास ह्मणाली—ह्यापेक्षां दुसरें कोणतें अधिक दुःख होईल असें मला वाटत नाहीं. हें दुःख सहन करण्यापेक्षां जीव गेला तरी बरा, असें मला होऊन गेलें आहे. तर मला तोंड न दाखवितां तुह्मांस जें करणें असेल तें करा. बरें आहे, थोडक्याच दिवसांत तोही चमत्कार दिसून येईल. असें ह्मणून तो निघून गेला. नंतर मुक्तामालेस,

आपलें बालक जिवंत आहे असें वाटून थोडेंसें दुःखांत सुख झालें, आणि ती त्याच विचारांत निमग्न होऊन गेली.

शुक्लाक्ष व भद्राक्ष ह्यांनीं ही कबूल होईल ह्मणून सुमारें आठ दिवस वाट पाहिली, आणि ती कबूल होत नाहीं, अशी जेव्हां त्यांचे मनांची खात्री झाली, तेव्हां शुक्लाक्ष ह्मणाला, आतां असें उपयोगीं नाहीं. आपणाकडून होता तितका यत्न केला, परंतु सुखोपभोग करून घेणें तिचे प्रारब्धीं नाहीं, तेव्हां तिला तशी बुद्धि कोठून होणार ? तर ज्या वस्तूवर आपले राजानें हेतु ठेविला, त्या वस्तूचा उपभोग दुसऱ्यानें करावा, हें बरोबर नाहीं. प्राप्त न झाल्यास, ती जगांतून नाहींशीच होईल तर बरें, अशी पूर्वींपासून त्यांनींच वहिवाट ठेविली आहे. तर आपणासही आतां तसेंच केलें पाहिजे. हें ऐकून भद्राक्ष ह्मणाला—जसा हुकूम होईल, तसें करण्यास मी तयार आहें. मग त्यानें सांगितलें कीं, तिला दिवसास खाण्याच्या पदार्थांतून तोळा दोन तोळे अफू चारावी आणि रात्रौ कोणास न समजूं देतां ह्या बागेंतच पेटींत घालून तिला पुरून टाकावी ह्मणजे झालें. फार बरें आहे, उद्यां ह्याप्रमाणें तजवीज ठेवितों, असें भद्राक्षानें सांगितलें, आणि नतर ते तेथून निघून चालते झाले.

दुसरे दिवशीं रात्रौ सुमारें बारा वाजतां, जिकडेतिकडे सामसूम झालें असें पाहून, ते काळासारखे त्या बागेंत शिरले. आपण हें मोठें घोर कृत्य करण्यास प्रवृत्त होत आहों, हें त्यांचे ध्यानीं मनींही नाहीं. असो;

ते बोलतबोलत त्या खोलीचे बाहेरच्या बाजूस येऊन उभे राहिले. त्यांनीं दोन चाकर बरोबर आणिलेच होते, त्यापैकीं एकास कुलूप काढून कसें काय आहे तें पाहण्यास सांगितलें. नंतर त्यानें येऊन सांगितलें कीं, महाराज, हालचाल अगदीं नाहीं, उगीच पडली आहे. मग हे दोघेही आंत गेले, तेव्हां दिव्याचा प्रकाश फारच मंद झाला होता. त्या अचेतन प्राण्यानें पांघरावयास जें चिरगूट घेतलें होतें, तें कांहींसें अस्ताव्यस्त झालेलें पाहून भद्राक्षानें सर्वांगावर घातलें, आणि चाकरांस बाहेरील पेटी आंत आणण्यास सांगितलें. नंतर ती पेटी येतांच चौघांनीं खालचे घोंगडीचीं चाऱ्हीं टोकें धरून त्या अनाथास उचलून पेटींत घातलें, आणि दार बंद करून तशीच ती पेटी चौघांनीं बाहेरच्या बाजूस बागेंत आणिली. तेथें पूर्वींच खाडा खणून ठेविला होता, त्यांत ती पेटी सोडून त्या निर्दयांनीं वरती माती लोटिली ! हें सर्व कृत्य पाहून त्या चाकरांचे अंतःकरणास फार वाईट वाटलें व तिजविषयीं दयाही उत्पन्न झाली; परंतु ते विचारे करतात काय ? हुकुमाप्रमाणें वागलें पाहिजे. जरी त्यांचे पोटांतून कड आले, तरी त्यांस बाहेरून हुशारीच दाखविणें भाग आलें. असो; त्या निर्दय पुरुषांनीं त्या निरपराधी प्राण्याची अशी दशा केली !! मग तेथील सर्व व्यवस्था करून अगदीं मागमूसही नाहींसा करून टाकिला. आतां आपण कृतार्थ झालों, कांहीं संकटें आलीं तरी हातीं धरलेलें काम एकदाचें तडीस गेलें, असें मनांत येऊन शुक्राक्षाचें अंतःकरण अगदीं स्वस्थ झालें.

मग कांहीं वेळ विश्रांति घेण्यांकरितां ते दोघेही बागेंत वारा घेत बसले. बोलतां बोलतां शुक्राक्षानें भद्राक्षास सांगितलें कीं, ह्या कामांत तूं फार मदत केलीस ह्मणून राजापाशीं मी तुझी चांगली शिफारस करीन. हें ऐकून भद्राक्षास मोठा आनंद झाला, आणि तो ह्मणाला—आपण सुज्ञच आहां, आपले सर्व ध्यानांत आहे. राजाच्या हिताविषयीं मी किती झटत आहें ह्याचा विस्तार करण्याची आतां गरज नाहीं. मग शुक्राक्ष ह्मणाला—माझ्या सर्व लक्षांत आहे, व ह्या गोष्टीचा थोडकेच दिवसांत अनुभव येईल, असें सांगितलें आणि ह्मणाला कीं, मला इकडे येऊन फार दिवस झाले. महाराज माझी वाट पहात असतील, तर मी उदईकच निघण्याचा बेत करितों. मग भद्राक्ष ह्मणाला-उदईक माझे गरीबाचे भाजीभाकरीस मान देऊन परवां निघण्याचा बेत करावा, ह्मणजे मज गरीबावर मोठे उपकार होतील. फार बरें आहे, असें ह्मणून ते आपआपल्या ठिकाणीं गेले.

दुसरे दिवशीं भद्राक्षानें मेजवानीचा मोठा थाट केला, तेणेंकरून शुक्राक्षाचें अंतःकरण अगदीं सुप्रसन्न होऊन गेलें. भोजन वगैरे आटोपल्यावर त्यानें आपल्या बहिणीनें ह्या कामांत फार मदत केली ह्मणून शुक्राक्षापाशीं तिची शिफारस केली. मग त्यानें तिचे मोठे उपकार मानून तिला पांचशें रुपये बक्षीस दिले. नंतर कांहीं वेळ वामकुक्षी होऊन गोष्टी वगैरे सांगण्यांत तेथेंच सायंकाळ झाला. मग उदईक जावयाचें तेव्हां सर्व आटपाआटप केली पाहिजे ह्मणून शुक्राक्ष उठूं लागला

त्यावेळीं त्या मुलाचें काय करावयाचें ह्मणून भद्राक्षानें विचारलें. मी त्याची कांहीं तरी योग्य तजवीज करीन असें ह्मणून तो जावयास निघाला, तेव्हां वरचेवर पत्र पाठवून लोभ वाढवीत जावें, असें दोघांचें मोठ्या प्रेमानें संभाषण झाल्यानंतर आनंदानें एकदेकास भेटून व नमस्कारचमत्कार होऊन शुक्लाक्ष आपले बिऱ्हाडीं चालता झाला, व हा त्यास कांहींसा पोंचवावयास जाऊन आपले वाड्यांत परत आला.

शुक्लाक्षानें त्या अनाथाचें बालक नेल्यापासून आपलें बिऱ्हाड गांवाबाहेरील एका बागेंत नेलें होतें. मनांतील हेतु कीं, एकांतीं जाऊन राहिल्यानें तें रडलें तरी आसपासचे लोकांचे मनांत हें काय आहे वगैरे कांहींच शंका येऊं नये. भद्राक्षाचे वाड्यांतून तो तेथें आला तों तें रडत होतें, तें ऐकून चाकरास विचारिलें कीं, कारे, त्यास आज अफू घातलीस नाहीं काय? त्यानें उत्तर केलें–महाराज घातली होती; परंतु थोडी कमी झाली असें वाटतें. मग तो ह्मणाला; थोडी अधिकच कां नाहीं घातलीस? ही किरकिर कोणी सोसावी? आतां आणखी घाल. होय महाराज, ह्मणून त्यानें तसें केलें, आणि त्यास हिकडून तिकडे हिंडवून थोपटून निजविलें. त्या चाकरास त्या दीनाची करुणा येऊन तो त्याचें फारच संगोपन करीत असे; पण संपत्ति मिळविण्याचे लोभास्तव शुक्लाक्षास ह्मणून त्याची कांहींच करुणा आली नाहीं. दिवसांतून त्यास दोनचारदां वर दूध मात्र घालीत असत, परंतु तशा दशेंत ईश्वरनिर्मित अन्नावांचून

त्याचें समाधान कोठून होणार! अफूचा अम्मल कांहीं-सा कमी झाला ह्मणजे तें बिचारें रडूं लागे. मग पुनः त्यास अफू घालावी; असा क्रम त्यास त्याचे आई-चे पुढून उचलून आणिल्यापासून चालविला होता.

प्रातःकाळीं निघण्याची सर्व तयारी करून ठेवून शुक्लाक्षानें शयन केलें. सुमारें बारा वाजतां तो एक झों-प घेऊन उठला आणि चाकरास हाक मारली. तो उठू-न पुढें येतांच त्यास घोड्यावर खोगीर घालण्यास सां-गितलें, आणि आपण त्या बालकापाशीं आला. तों तें त्या अफूचे अमलांत डोळे झांकून चेत पडलें होतें. त्यास तो एका चिरगुटांत गुंडाळीत आहे इतक्यांत घोडा तयार करून ठेवून चाकर तेथें आला. त्याजवळ तें देऊन, मजबरोबर ह्यास घेऊन चल, असें त्यानें त्यास सांगितलें, आणि आपण पोषाग करून घोड्यावर बस-ला. मग हा पुढें व चाकर मागें असें सुमारें एक कोशभर गेले. तेथून त्या **क्षिप्रा** नदीचे अगदीं किना-ऱ्यास जाण्यास मध्यें खडकाळ डगर व बरेंच रुंदीचें वाळवंटही होतें. त्या डगरींतून घोड्यास जाण्यास वाट नव्हती ह्मणून शुक्लाक्ष तेथेंच उभा राहिला, आणि चाकरास ह्मणाला—मी येथेंच उभा राहतों, तूं येथून एक बराच मोठा दगड घेऊन त्या डोहाचे काठीं जा आणि त्या दगडासुद्धां ह्यास चिरगुटांत चांगलें बांधून तुझ्या-नें जितकें लांब आंत झोंकून देववेल तितकें देऊन प-रत ये. बरें आहे, ह्मणून त्यानें मुलास खांद्यावर टाकि-लें आणि दगड डोक्यावर घेऊन तो डोहाचे कडेस

जाऊन पोंचला, आणि धन्यानें सांगितल्याप्रमाणें कामगिरी बजावून माघारां परतला. जेव्हां त्यानें तें मोटाळें पाण्यांत झोंकून दिलें, तेव्हां मोठा आवाज झाला, तो ऐकून शुक्राक्षास मोठें समाधान झालें, आणि त्यास वाटलें कीं, आपला मतलब साधण्यास आतां कांहीं कर्तव्य ह्मणून राहिलें नाहीं. शांतवर्मा ह्यास दोन महिन्यांनीं परत येतों ह्मणून सांगितलें त्यास सुमारें पांच महिने होऊन गेले. तर तिकडील वर्तमान कसें काय आहे तें मात्र कळत नाहीं. सोमदत्त हातीं न लागतां निघून जाता तर तो त्या भोळ्या ह्मातार्‍यास, मुक्तामालेस मूल होऊन ती त्यासुद्धां जिवंत आहे असें सांगता, ह्मणजे इतकें करूनही सर्व व्यर्थ झालें असतें. तर तोही आयताच सांपडून बंदींत पडला, ही एक मोटीच गोष्ट झाली. तर ह्या कामांत आपणावर ईश्वराची कृपाच आहे असें समजलें पाहिजे. असा तो विचार करीत आहे इतक्यांत चाकर जवळ येऊन पोंचला. मग ते आपल्या बिर्‍हाडीं येऊन स्वस्थपणें निजले, आणि प्रातःकाळ होतांच मार्गास लागले.

## भाग ७.

### श्लोक.

दुःखें जिवावरिल सोशित नित्य जाती
जे सत्य, नीति, सुगुणां अवलंबिताती ।
ठेवूनि भार परमेश्वरिं वागताती
ते संकटांतहि पहा सुख पावताती ॥

पर्जन्यकाळ संपत येऊन हस्तनक्षत्रास आरंभ झाला असतां मोठमोठाले ढग आकाशांतून हिकडून तिकडे फिरूं लागले. मोठ्या जोराचा वारा सुटून कोठें कोठें वादळेंही होऊं लागलीं, विद्युल्लतेचे मोठे भयंकर कडकडाट चालू झाले. कोठें कोठें मोठ्या जोराचा पाऊसही पडत आहे. चोंहीकडील नदीनाले भरून चालले आहेत. कितीएक पांथस्थ लोक पावसाच्या सपाट्यानें भिजून नदीनाले इत्यादिकांस उतार नसल्यामुळें खुडखुडत उभे राहिले आहेत. कितीएकांस, विजेच्या व वादळाच्या सपाट्यांत आपण सापडतों कीं काय, असें होऊन गेलें आहे. जिकडून वादळ जात आहे तिकडे अतिशय धुरळा उसळून वृक्ष आपापलीं मस्तकें मोठ्या जोरानें हालवीत आहेत, आणि मेघांच्या भयंकर गर्जनेनें चाऱ्ही दिशा व्यापून गेल्या आहेत.

अशा भीतिदायक प्रसंगांत, उज्जनीपासून सुमारें दोन कोशांवर, आपला तो सोमदत्त सांपडला! शुक्लाक्षाच्या वर्गीनें भद्राक्षाची मोठ्या जाग्यावर नेमणूक होतांच सोमदत्तानें बंदिखान्यावरील अधिकाऱ्यांस एक हजार

रुपये लांच देऊन आपली सुटका करून घेतली, आणि पहांटेस उठून दोन कोश गेला नाहीं तों तो वादळाच्या सपाट्यांत सापडला. वारा इतका जोराचा सुटला कीं, तो घोड्यासुद्धां कोठें भलतीकडेच नेऊन टाकितो कीं काय असें त्यास वाटलें. धुरळा इतका होऊन गेला होता कीं, डोळे उघडण्याचीही सोय नाहीं. मध्यें थोडा अवकाश सांपडतांच तो घोड्यावरून खालीं उतरला, आणि एक झाड होतें त्याचे आड जाऊन उभा राहिला. चाकरही मोठ्या प्रयत्नानें घोडा तेथें घेऊन गेला. इतक्यांत पहिल्यापेक्षांही अधिक जोराचा वारा सुटला, तेणेंकरून तो वृक्ष उमळून पडून त्याखालीं आपला चुराडा होतो कीं काय असें त्यास वाटलें. अशा अवस्थेंत तो आहे तों मोठ्या सपाट्याचा पाऊस व मोठमोठ्या गारा पडण्यास आरंभ झाला. वाऱ्याच्या जोरामुळें जसा दगडाचा मार व्हावा तसा गारांचा मार चालला. इतक्यांत अंतःकरणांत धडकी भरण्यासारखा विजेचा कडकडाटही झाला. ह्यांतून आतां प्राण वांचणें कठीण असें सोमदत्तास वाटलें. सुमारें आठ महिने बंदिखान्यांत असल्यामुळें व रात्रंदिवस मुक्तामालेच्या काळजीमुळें तो अर्धाच अगदीं अशक्त होऊन गेला होता. मग बंदांतून सुटून बाहेर पडतो तों लगेच या अनर्थांत सांपडला, त्यामुळें त्यास असें वाटलें कीं, आपणांवर ईश्वरच कोपला; मग यश कोठून येणार! तर आतां त्यासच शरण जावें म्हणजे त्यास दया आली तर येईल. असा निश्चय करून त्यानें अनन्यभावें त्याचेंच चिंतन चालविलें.

मागें सांगितल्याप्रमाणें एक घटकाभर गारांचा पाऊस पडला. नंतर तो वळवाचा पाऊस, जसा एकाएकीं आला तसाच एकदम उबाला. मेघांनीं आकाश व्यापून गेलें होतें तें तेव्हांच वितळून जाऊन स्वच्छ ऊन्ह पडलें. जिकडे तिकडे पाणीचपाणी होऊन गेलें होतें. सोमदत्ताचें सर्वांग गारांच्या मारानें बरेंच ठेंचून गेलें व कपाळावर एक दोन ठिकाणीं टेंगळेंही आलीं होतीं. सर्व चिरगुटें भिजून चिंब झाल्यामुळें कोरडें वस्त्रही नेसावयास राहिलें नाहीं. घोड्यावरीलही सर्व सामान भिजून गेलें. हा आपला अपमृत्यूच टळला असें वाटून सर्व भिजलें व गारांचा मार बसला तरी त्यास फारसें दुःख झालें नाहीं; आकाश स्वच्छ होऊन ऊन्ह पडल्यामुळें कांहींसा त्याचे जिवास धीर आला. मग सर्व चिरगुटें पिळून घोड्यावर टाकिलीं; तेथून जवळच उतार होता, तेथें नाव जाण्यास अवकाश असल्यास तीं ओलीं चिरगुटें वाळत टाकितां येतील अशा बेतानें तो तेथून निघाला. घोड्यावरील गांठोड्यांत एक दोन आंबटओलीं वस्त्रें सांपडलीं तींच नेसून तो मार्गास लागला. अशी घाई करण्याचें कारण इतकेंच कीं, कदाचित् कोणी ओळखून चहाडी केल्यास पुनः बंदांत पडावें लागले. असो; अशा प्रकारें घाई करून तो उतारावर गेला तों तेथें उतारू लोकाची एकच गर्दी होऊन गेली होती. क्षिप्रा नदी तर दुथडी भरून चालली आहे. नावाड्यांस नाव ढकलण्याचीही छाती होईना. बहुतेक लोक पावसाचे सपाट्यांत सांपडून भिजल्यामुळें त्रा-

सून गेले होते. तेथें सर्वत्र चिखल झाल्यामुळें उभें राहण्यासही कोरडी जागा नव्हती. त्यामुळें त्यांस असें वाटूं लागलें कीं, एकदां पलीकडे उतरून गांवांत गेलों ह्मणजे बसण्यास कोरडी जागा तरी मिळेल, आणि चिरगुटें वाळत तोंपर्यंत जेवण वगैरे उरकून घेतां येईल. अशा विवंचनेंत ते लोक आहेत, इतक्यांत पुनः अभ्र येण्यास आरंभ झाला. हें पाहून त्यांची पांचांवर धारण बसली; सोमदत्त तर अगदीं घाबरा होऊन गेला. मग कितीएक लोक त्या नावाड्यांकडे गेले व माणशीं चार आण्याचा दर होता तो आठ आणे कबूल करून लव- कर नाव काढण्याविषयीं घाई करूं लागले. नावाड्यांस पाण्याच्या जोरामुळें कांहीं भीति वाटत होती; परंतु पैशा- च्या लालचीनें ते कबूल झाले. उतारू लोक फार ज- मले होते व मागें राहिल्यानें चांगली जागा मिळणार नाहीं व भरती झाल्यास नावाडी आंत घेणार नाहींत ह्या बुद्धीनें ते सर्वच एकदम नावेवर चढण्यास निघाले, ते- णेंकरून एकच गर्दी होऊन गेली. नावेंत जाण्याचा रस्ता दरडीवरून उतरता होता. त्यांतही पाऊस पडून चिखल झाल्यामुळें निसरडें झालें होतें. मग काय वि- चारावें! कितीएक पाय निसरून पाण्यांत पडले; कि- तीएक दरडीवरून कोलमडून पलीकडचे बाजूस चिख- लांत पडले; कितीएकांचीं पागोटीं पडलीं; कितीएकांचे जोडे गेले; कितीएकांचीं गांठोळीं आंत पडून वाहून गेलीं; कितीएकांस बरेंच लागलें व कितीएकांचे हातपायही दुखावले. असो; अशाप्रकारें नावेंत अगदीं ठेंच होऊन

गेली. इतकीं मनुष्यें जावयाचीं नाहींत ह्मणून नावाडी सांगत होते; परंतु कोणी ऐकेना. जो येई तो आंत भरे. पैशाच्या लालचीनें त्यांनींही कांहींसा कानाडोळा केला खरा. सोमदत्तानें घोड्यासुद्धां नावाड्यांस दोन रुपये देण्याचें कबूल केल्यामुळें त्यांनीं त्याचे हाल न होतां त्यास नावेवर नेऊन बसविलें, आणि त्यास गरदीही होऊं दिली नाहीं. इतकीं मनुष्यें भरलीं तरी आणखीही येतच आहेत. असें पाहून त्यांनीं नाव आंत ढकलली.

पूर्वीं अभ्र येण्यास आरंभ झालाच होता, नाव कांहींशी पुढें गेली नाहीं तों वारा सुटण्यास आरंभ झाला. मनुष्यांच्या भारामुळें नाव पाण्यापासून वीतभरच वर राहिली होती. वारा अधिकाधिक जोरावत चालल्यानें लाटा उसळूं लागल्या. नाव हिकडेतिकडे डगमग करूं लागली. सर्व उतारू लोक घाबरून गेले. नावाड्यांसही धडगत दिसेना. नाव हिकडेतिकडे हालूं लागल्यानें केव्हांकेव्हां पाण्याची व तिची सपाटी एकच होऊन जाई. आपला ह्या अरिष्टांतून प्राण वांचणें कठीण असें बहुतेकांस वाटून, कितीएक ईश्वराचा धांवा करूं लागले, कितीएक आपलीं स्त्री व मुलेंबाळें ह्यांची आठवण करून दुःख करूं लागले व कितीएक रडूंही लागले आणि कितीएक मोठ्यानें आरोळ्या देऊन ओरडूं लागले. सोमदत्ताचें अंतःकरण पूर्वीं मुक्तामालेच्या विचारांत गुंतलें होतें, तें ह्या अनर्थ पाहून आपल्या जिवाचें काय होईल ह्या विचाराकडे लागलें. प्रसंग तर चमत्कारिक आला; आतां काय करावें, हें कोणासही

सुचेना ! नाव सुमारें अर्ध्या नदींत आल्यामुळें मागें नेणें व पुढें जाणें हें सारखेंच होऊन गेलें. त्यांतील दहा-वीस लोकांनीं पोहून जाण्यास तयार होऊन पाण्यांत उड्या टाकिल्या असत्या तर मात्र भार कमी झाल्या-मुळें बहुधा बुडण्याची धास्ती गेली असती; परंतु तसें करून आपला जीव लागलाच धोक्यांत घालण्यास कोण तयार होतो ? पाण्यास जोर फार ह्यामुळें नाव फारच खालीं वाहूं लागली. असा भयंकर समय पाहू-न सोमदत्तानें एक हुशारी केली; ती अशी कीं, मी वल्हें मारतों, असें सांगून त्यानें जवळच्या नावाड्याचे हातचें वल्हें घेतलें, आणि तो तेथें बसला, इतक्यांत पाऊस पडावयास लागून वाऱ्याचाही जोर अधिक होत चालला. तें पाहून सर्व लोकांची एकच खळबळ होऊ-न गेली. तेणेंकरून नावेच्या एका बाजूस थोडासा अधिक जोर पडला. मग काय पुसतां ! एकदम पाणी आंत शिरलें; त्या वेळीं एकच मोठी आरोळी होऊन लाग-लेंच शांत झालें. नाव पाण्यानें भरून तळाशीं जाऊन बसली. लहान मुलें व स्त्रिया एक दोन गटांगळ्या खा-ऊनच प्राणास मुकलीं. ज्यांस थोडेंसें तरंगतां येत होतें ते कांहीं वेळपर्यंत हात पाय हालवून शेवटीं त्यांच्याच भेटीस गेले ! सुमारें अडीचशें प्राण्यांपैकीं ज्यांस चांगलें पोहतां येत होतें असे नावाड्यांसुद्धां दहा बारा असामी मात्र वांचले. बाकीच्यांची त्या जलरूपी कुंडांत आहुति झाली. सोमदत्तानें वल्हें हातीं घेतलें होतें तेंच त्याचे प्राण वांचविण्याचे उपयोगीं पडलें. त्यास

जरी चांगलें पोहतां येत होतें तरी शक्ति नसल्यामुळें त्याच्यानें पाणी तोडून तीराकडे जाववेना. मग त्या वल्याच्या आधारानेंच तो वाहात वाहात खालीं चालला. त्यास वाटलें कीं, आतां ह्यांतून प्राण वांचणें कठीण. कोठें तरी खडकावर आपटून अगर धबधब्यांत सांपडून प्राण जाणार यांत संशय नाहीं.

अशा विवंचनेंत तो खालीं जात असतां कोणी तिरावर दृष्टीस पडलें ह्मणजे त्यास आरोळी मारावी आणि मला ह्या संकटांतून वांचवा असें त्यानें ह्मणावें. तें ऐकून तिरावरील लोकांस फार वाईट वाटून त्यांचे पोटांत दया यावी; परंतु बिचारे करतात काय? नदी तुफान भरून चालली होती. ज्यानें जावें त्यानें आपलाही प्राण धोक्यांत घालावा. असा समय पाहून ते हळहळत व हा दिसेनासा होईपर्यंत ह्याजकडे पाहतच उभे राहात. मग त्याविषयीं परस्परांत दुःखानें बोलून आपाआपले कामास लागत. अशा प्रकारें तो खालीं वाहात जातां जातां बरोबर दोन वाजण्याचा समय झाला, तेव्हां खालीं पहातो तों नदीच्या मध्यभागींच कांहीं झाडें ह्याचे दृष्टीस पडलीं, व त्यांपाशीं आपण वाहात जाऊन पोंचूं अशी त्यानें अटकळ केली, आणि त्याचे चित्तास कांहींसा धीर आला. अशा विचारांत तो आहे इतक्यांत तीं झाडें अगदीं नजीक आलीं. तेथें नदीचें पाणी दुभंग होऊन दोन प्रवाह झाले होते, ते ह्याच्या दृष्टीस पडले. मग ह्यानें अनुमान केलें कीं, हें मध्यें बेट असावें. इतक्यांत हाही त्या बेटापाशीं जाऊन पोंचला.

तेथें वाऱ्यानें एक वृक्ष उपळून पडून त्याचा कांहीं भाग पाण्यांत आला होता, तेथें हा जाऊन लागला. मग त्या वृक्षाचे खांदीस धरून मोठ्या संकटानें तो वर चढला, आणि दमून व थंडावून गेल्यामुळें उन्हांत विश्रांति घेत बसला.तेथील दोन्हीं बाजूंचे किनाऱ्यांकडे लक्ष देतो तों ते मोठे भयंकर दिसले. दोन्हीं बाजूंची दरड इतकी उंच होती कीं, ती लहानशा डोंगराची रांगच आहे कीं काय, असें त्यास वाटलें. खालीं, वर व दोहों बाजूंसही दाट वृक्ष असून त्यांच्या फांद्या एकमेकांत गुंतून गेल्यामुळें सर्व गर्द होऊन गेलें होतें. तें पाहून ह्यानें अनुमान केलें कीं, हें मोठें भयंकर रान असावें. तेथें बसून जेथपर्यंत लांब नदर पोंचेल तेथपर्यंत एक-ही मनुष्य दिसत नाहीं असें पाहून ह्याचें मन अगदीं उदास झालें. आपण कोठें येऊन पडलों ह्याचें त्यास अनुमान होईना. मग ते विचार एकीकडे ठेवून ईश्व-रानें आपणास ह्या अरिष्टांतून वांचविलें ह्मणून त्यानें त्याची मनापासून प्रार्थना केली. नंतर हें बेटच आहे किंवा काय आहे हें पाहण्याच्या बेतानें जेव्हां तो तेथून उठला तेव्हां नेसलेलें वस्त्र ओलें आहे ह्याची त्यास स्मृति झा-ली. त्या वस्त्रावरून एका पंचानें कंबर बांधिली होती अशा दोन वस्त्रांखेरीज त्यापाशीं कांहीं नव्हतें. मग त्यानें तो पंचा पिळून नेसून नेसलेलें वस्त्र वाळविलें. नंतर तें नेसून पंचा आंगावर घेतला. तो सुमारें संध्याकाळचे चार वाजण्याचा सुमार झाला. पोटांत कांहीं नसल्यामुळें क्षुधेची अत्यंत पीडा होऊं लागली.

तिचें निवारण करण्याकरितां तेथील रानांत कांहीं फळें सांपडतील ह्मणून तो शोध करूं लागला. दिवस होता तरी तें चोंहींकडे दाट रान पाहून त्यास भीति वाटूं लागली, तेणेंकरून आंत जाण्याचा त्यास धीर होईना. मग नदीच्याच तीरानें फिरतां फिरतां पेरू, रामफळें, बोरें इत्यादि फळें त्यास पाहिजे तितकीं सांपडलीं. तीं खाऊन वर पाणी पिऊन तो तृप्त झाला. आतां येथें काय करावें हें त्यास सुचेना. सूर्य अस्तास जातांच थंडी वाजूं लागली. पंच्याखेरीज पांघरण्यास व हातरण्यास दुसरें वस्त्र नाहीं. थंड वाऱ्यापासून संरक्षणास अडोसाही नाहीं. ह्या रानांत घातुक जनावरेंही असतील असें त्याचे मनांत येऊं लागलें. अशीं अनेक दुःखें एकत्र झाल्यानें त्याचे डोळ्यांस पाणी आलें. वेड्यासारखा हिकडून तिकडे फिरूं लागला. जेव्हां अगदीं सायंकाळ होऊन काळोख पडण्याचा सुमार झा... तेव्हां जें होईल तें होवो, असें ह्मणून एके झाडाखालीं पाल्या... हातपाय पोटाशीं घेऊन खुडखुडत पडला. पहिल्यानें दुःखा... विचारांमुळें व भीतीमुळें त्यास झोंप येईना, परंतु अति श्रम झाल्यामुळें सुमारें दहा वाजतां त्यास झोंप लागली.

प्रातःकाळ होतांच पक्ष्यांच्या किलकिलाटानें तो जागा झाला, आणि थंडी वाजतच होती ह्मणून उठून तेथच्या तेथेंच विचार करीत बसला. मुक्तामाला कोठें असेल व ती काय करीत असेल, व कोणत्या प्रकारचे संकटांत ती आपल्या आयुष्याचे दिवस काढीत असेल, हें पहिल्यानें त्याचे अंतःकरणांत आलें. बंदींतून

सुटतांच तेथें राहून तिचा शोध करितां येणार नाहीं, ह्या विचारानें तो शांतवर्मा ह्यास भेटण्याकरितां निघाला. मनांतील हेतु कीं, त्यास हें सर्व वर्तमान सांगून तिच्या शोधाकरितां दुसरी एकादी चांगली तजवीज करतां येईल; परंतु ते सर्व विचार एकीकडे राहून तोच अशा विलक्षण अडचणींत येऊन सांपडला. मग त्यानें असें मनांत आणिलें कीं, आपली येथून सुटका झाली तर दुसरी एकादी तजवीज करण्याचा संभव; नाहींपेक्षां सर्व व्यर्थ आहे. तर आपलीच सुटका होण्याची तजवीज पूर्वीं पाहिली पाहिजे, असा निश्चय करून तो तेथन उ-ठला, आणि येथें कोठें काय आह व ह बट किता मोठें आहे, हें सर्व पाहण्याकरितां निघाला, तरी त्याच्यानें किनारा सोडून आंत जाववेना पायांत जोडा नसल्या-मुळें तेथील कांटयांतून चाल[illegible] त्यास फारच दुःख होऊं लागलें. तरी [illegible]कासपणें सर्व पहात पहात दहा वाज[illegible] सुमारास तो दुसरे टोकास जाऊन पों-[illegible] तेथें पुनः नदीचे पात्र एक झालेलें पाहून हें बेटच आहे अशी त्याची खात्री झाली. इतका वेळ तो फिरला तरी पलीकडील किनाऱ्यास कोठें एकही मनुष्य त्यास दिसलें नाहीं. ह्या बाजूचे किनाऱ्याप्रमाणेंच तिकडेही दाट झाडी होती. मग त्यानें स्नान वगैरे आटोपून पूर्व दिवशींप्रमाणें फलाहार केला. तेथील नदीचें पात्र फार मोठें व पर्जन्यामुळें अधिक वाढून भयं-कर झालें होतें, ह्मणून पोंहून पार जाण्याची कल्पना-ही त्याचे मनांत येईना. सकाळपासून अनवाणी चाल-

त्यानें तो फार थकला होता व पायांची आगही झाल्या-मुळें विश्रांति घेण्याकरितां एके झाडाखालीं येऊन पडला. पुनः बारांवर दोन वाजण्याचे सुमारास उठून बेटांतील रानाचे मध्यभागीं जाण्याचा त्यानें निश्चय केला. मग उठून आंत आंत वांकड्या तिकड्या वाटेनें जों जों जा-तो, तों तों मोठमोठाले गगनचुंबित वृक्ष त्यानें पाहिले; अनेक प्रकारचीं फळेंही त्याचे पहाण्यांत आलीं; तेथील मोठमोठ्या वृक्षांचा चमत्कार पाहून त्यास आनंद झाला, परंतु आणखी पुढें जाण्याविषयीं त्याचा पाय उठेना. चोहींकडे पाहूं लागला तों मोठमोठ्या दाट वृक्षांखेरीज नदी व तिचा किनारा वगैरे कांहीं दिसेनासें झालें. तरी तसेंच धैर्य धरून आणखी कांहींसा पुढें गेला तों तेथून कांहीं अंतरावर एक देऊळ आहे, असा त्यास भास झाला. नंतर पुढें जाऊन पाहतों तों एक पडकेसें देऊळ व त्याचे दोहीं बाजूस दोन पडक्या खो-ल्या असें त्याचे दृष्टीस पडलें. मग अगदीं जवळ जातो तों कोणी गुणगुण करीत असल्यासारखें त्यास वाटलें. तेणे-करून त्याचे मनास फारच भीति वाटली, आणि चपापून हिकडे तिकडे पाहूं लागला, तेव्हां त्यास तेथें धीर नि-घेनासें होऊन गेलें. तो तसाच चोहींकडे कावराबावरा पहात आहे तों पुनः तसेंच झालेंसें त्यास वाटलें. तेव्हां तर त्याची छाती धडधडां उडूं लागली व आंगास घामही सुटला. मग मोठा धीर करून त्यानें हळूच पाऊल मागें काढिलें, व तेथें कोणी भयंकर जनावर असावें असें त्यानें अनुमान केलें. कदाचित् पिशाच असेल असेंही त्यास

भाटलें, व दिवसही थोडा राहिल्यानें दिसत आहे तों किनाऱ्यास येण्याची त्यास काळजी होतीच. मग पाठी-मागें पहात पहात तो किनाऱ्याकडे येऊं लागला, व वाटेनें येतांना त्याचें मनांत त्या शब्दाविषयीं अनेक विचार आले. शेवटीं होईल तें होवो, पुनः उद्यां सकाळीं जाऊन काय आहे तें पहावें असा त्यानें निर्धार केला. सूर्यास्ताचे सुमारास तो सुखरूपपणें त्या किनाऱ्यास येऊन पोंचला आणि कांहीं फळें खाऊन पूर्वीप्रमाणें रात्र होतांच झाडाखालीं निजला. त्यादिवशीं त्यास कांहीं केल्या झोंप येईना, व अनेक प्रकारचे विचार मनांत घोळूं लागले. लहानपणापासून शांतवर्मा ह्याचे वाड्यांत असतां ज्या ज्या आनंदकारक गोष्टी झाल्या त्या त्या त्याचे डोळ्यांपुढें येऊन उभ्या राहिल्या. मुक्तामालेबरोबर विद्याभ्यास करून पुढें लग्न वगैरे होऊन जे सोहळे झाले त्यांची त्यास आठवण झाली. आतां धनशंकर कोठें, व मुक्तामाला कोठें जाऊन पडली, आणि मी कोणत्या अरिष्टांत सांपडलों, शांतवर्मा व भाग्यशीला यांची काय अवस्था झाली असेल, असें मनांत येऊन पूर्वी आपण सर्व एकत्र आनंदांत होतों कीं, नाहीं अशीच त्यास भ्रांति पडून तें सर्व स्वप्नवत् होऊन गेलें. अशा विचारांत तो असतां मी कोठें आहे, वगैरे तो अगदीं विसरून गेला. इतक्यांत जवळच कांहीं खसबसलें, तेणेंकरून तो चपापून उठून बसला, व कोठें कांहीं नाहीं असें पाहून पुनः निजला. नंतर पुनः खसबस व्हावी, पुनः उठावें, असें करितां करितां त्यास सुमारें बारा वाजतां झोंप लागली.

इकडे शुक्राक्ष महाराजांची स्वारी तीं घोर कृत्यें करून निघाली ती दर कुच दर मुक्काम करीत करीत इरावतीस येऊन दाखल झाली. नंतर शांतवर्मा यात्रेस निघून गेला असें समजल्यामुळें त्यास कांहींसें वाईट वाटलें; कारण वृद्धापकाळ झाल्यामुळें जर त्याची तिकडेच कांहीं वरीवाईट गोष्ट झाली, तर हें सर्व आपल्या हातीं लागण्यास अडचण पडेल. मग पुनः त्याचे मनांत असें आलें कीं, ह्या सर्व जहागिरीचा व संपत्तीचा त्याचे पाठीमागें वारस मजवांचून दुसरा कोण आहे ? तर हें काम आपल्या राजाकडून करून घेण्यास फारशी मेहनत पडेल असें नाहीं. ह्याप्रमाणें मनांत विचार करून शांतवर्मा ह्यानें जो मुख्य कारभारी नेमिला होता त्यास मुक्तामालेचा कोठें थांग लागत नाहीं; तिनें बहुधा आपला प्राणत्याग केला असावा, असें सांगून त्या मानभाव्यानें मोठा खेद केला, आणि दोनचार दिवस तेथें राहिला, तेव्हां त्या कारभाऱ्यानेंही त्याचा योग्य सत्कार केला. मग ह्यानें वाड्यांत काय काय आहे, ह्याची चौकशी करून हिशोबाचे वगैरे कागदपत्रही पाहिले, आणि ह्या दौलतीचे आपण मालक आहों असें त्या कारभाऱ्याचे मनांत आणून दिलें. मग कांहीं अधिकउणें करणें झाल्यास मला विचारीत जावें व सहा महिन्यांनीं खर्च वगैरेच्या कच्या यादीही मजकडे पाठवीत जाव्या, असें सांगून तो जयपुरास जाण्याकरितां निघाला. वाड्यांतील कारभारी व आश्रित मंडळी त्यास गांवाबाहेर पोंचवून परत आली. जेव्हां शुक्राक्ष जयपुरास जाऊन पोंचला, तेव्हां त्यास

पाहून राजा व प्रधानादि पंचकास फार आनंद झाला. फार दिवस जाऊन झाल्यामुळें त्यांस ह्याची वरचेवर आठवण होत असे. मग शुक्लाक्षानें आपणास उशीर-लागला ह्याविषयींचा फुगवून मोटा लांबचेलांब एक वृत्तांत वर्नवून सांगितला, आणि राजाकरितां फार श्रम करून विलक्षण दुःखही भोगिलें, असें त्यांचे मनांत आणून दिलें. शेवटीं ह्मणाला, काय करूं ! माझे मनांत होतें, तसें झालें नाहीं. हें ऐकून भयानक महाराज ह्मणाले, कांहीं चिंता नाहीं. तूं सुखरूप आलास ह्यानें मला सर्व पावलें. आपणास कोणतें कमी आहे असें नाहीं. तिजपेक्षां दसपट चांगल्या स्त्रिया हव्या तितक्या मिळतील. मग तेथील कसा काय क्रम चालला आहे, ह्याची चोकशी करून तो आपले वाड्यांत निघून गेला.

इकडे गुलालसिंग मुक्तामालेस इरावतीस जातों ह्मणून सांगून आला, तो दुसरे दिवशीं हिंवताप लागून आजारी पडला. मनांतील सर्व हेतु एकीकडे राहून भलतेंच झालें ह्मणून त्यास फार वाईट वाटलें. हा मजकूर तिला कळवितां येत नाहीं व ती माझी वाट पहात दिवस मोजीत बसेल अशी त्यास मोठी काळजी लागली; परंतु नाइलाजाची गोष्ट. तो तरी करतो काय ? आजार कमी न होतां उलटा वाढतच चालला. मुक्तामाला आतां काय करील, हें त्याचे मनांत वारंवार येऊं लागलें. अशा काळजींत असतां एके दिवशीं प्रातःकाळीं त्याची बहीण सुंदर व गोजीरवाणें एक बालक घेऊन आली. तिनें तें आधीं आणून आपल्या भावास दाखविलें. त्यानें त्या-

स पाहतांच ओळखिलें, आणि घाबरून विचारिलें कीं, हें येथें कोठून आलें? ह्याची आई येथें आहे काय? हें ऐकून ती ह्मणाली: येथें कोणी आलें नाहीं. मी रोजच्या प्रमाणें पहाटेस उठून नदीवर गेलें तों तेथून जवळच मूल रडत आहे असें मी ऐकिलें. पहिल्यानें मला थोडीशी भीति वाटली; परंतु दबकत दबकत तशीच जवळ गेलें तों तेथें अगदीं नदीचे कांठींच वाळवंटावर एक चिरगूट आंगाखालीं असून तें रडत आहे, असें मी पाहिलें. अग आईग! एवढेंसें मूल येथें कोणी आणून टाकिलें? असें ह्मणून मी त्यास उचलून पोटाशीं घेतलें. रडून रडून दमलें होतें ह्मणून मी घेतांच त्यानें गप्पदिशीं तोंड मिटलें. हें ऐकून गुलालसिंगानें कपाळास हात लाविला आणि ह्मणाला: गोष्ट फार वाईट झाली. हें माझ्या बाईसाहेबांचें मूल. त्यांस कोणी दुष्टानें दुःख दिल्यामुळें त्यांनीं येथें येऊन आपला प्राणत्याग केला असावा, असें मला वाटतें. इतक्या जवळ येऊन ती आपल्या घरीं कां आली नाहीं! हें ऐकून घरांतील सर्व मनुष्यास फारच दुःख झालें. मुलाची कांति व रूप पाहून तर सर्वांस त्याची अतिशय करुणा आली. मग गुलालसिंग बहिणीस ह्मणाला: त्याला फार भूक लागली असेल तर आनंदीपाशीं पाजण्यास दे. मग तिनेंही मोठ्या ममतेनें व आनंदानें आपल्या सुनेपाशीं त्यास पाजण्याकरितां दिलें. नंतर त्यानें सर्वांस जवळ बोलावून सांगितलें कीं, आपणास मूल सांपडलें वगैरे झालेलें वर्तमान कोणासही कळूं देऊं नका. कळल्यास कदाचित् त्याच्या व

माझ्याही जिवावर येऊन बेतेल. तर त्याला पुढले दारींही अगदीं आणूं नका. मागचे दारींच खेळवून परकी कोणी आले तर फार जपत जा. आपले घरांत एक मूल आहेच, तेव्हां कोणास फारसा संशय येईल असें नाहीं. हें ऐकून त्याचे बहिणीनें तसेंच करतां येईल असें सांगितलें. मग त्या मुलाची चांगली टापटीप ठेवून घरांतील सर्व मनुष्यें त्यावर फारच माया करूं लागलीं.

मागें सांगितलेंच आहे कीं, शुक्लाक्ष त्या मुलास चाकरापाशीं देऊन [illegible] गेला आणि वाट अवघड यास्तव आपण तेथेंच उभा राहून त्यानें चाकरास सांगितलें कीं, एक दगड बरोबर घेऊन जाऊन त्यासुद्धां ह्यास चिरगुटांत बांधून नदींत टाकून दे. त्याप्रमाणें तो दगड घेऊन गेला खरा; परंतु त्याचे पोटांत त्या बालकाविषयीं दया उपजली, तेव्हां त्याच्यानें तें घोर कृत्य करवेना. काळोखामुळें यजमानास दिसत नाहीं असें त्यानें पाहिलें, व अफूचे अमलामुळें तें मूलही रडणार नाहीं असें त्यानें मनांत आणिलें. मग त्या मुलास त्यानें चिरगुटांत गुंडाळून वाळवंटावर ठेविलें आणि नुस्ता धोंडा मात्र नदींत फेकून दिला. त्याच्या शब्दानें शुक्लाक्षानें आपलें काम बरोबर झालें म्हणून अनुमान केलें; आणि मग ते तेथून निघून गेले. गुलालसिंग रहात होता तें खेडें तेथून जवळच नदीचे कांठीं होतें. मग त्याची बहीण तेथें येऊन तिला मुलगा सांपडला वगैरे मजकूर वर सांगितलाच आहे.

इकडे सोमदत्त त्या बेटांत प्रातःकाळ होतांच जागृत झाला, आणि मुखमार्जन वगैरे प्रभातकर्म आटोपून त्यानें ईश्वरचिंतन केलें. मग दोन दिवस गेले असेच सर्व आयुष्याचे दिवस येथेंच जाणार अगर याहीपेक्षां अधिक दुःखदायक संकट आपणावर येऊन गुदरणार असें त्याचे मनांत आलें. आतां असें मनांत येण्याचें कारण इतकेंच कीं, तो ज्या उद्देशानें घरांतून बाहेर पडला, तो सिद्धीस न जातां उलटा एकापेक्षां एक अधिक अशीं संकटेंच तो भोगीत आला. अद्यापि त्यांस उतरता पाया लागला असें नाहीं. जें जवळ होतें तें सर्व जाऊन अन्नवस्त्रासही तो महाग झाला. भिक्षा मागून निर्वाह करूं ह्मटलें तरी त्यास तोंड नाहीं· असे विचार मनांत येऊन त्याचे हातपाय गळाले. निरंतर फळेंच खाऊन राहण्याची जन्मापासून संवय नाहीं, ह्यामुळेंही त्यास ग्लानि आली. त्यास एकदम सर्वच अनकूळ झालें, मग त्यानें कोणत्या गोष्टीचें ह्मणून दुःख करावें? त्या· बिचाऱ्या दुःखासच त्याचा कंटाळा येऊन तें हळूहळू यास सोडण्याच्या बेतांत आलें. असो, मोठ्यानें सुस्कारा टाकून त्यानें त्या रानांतील देऊळ व त्याजवळच्या खोल्या ह्यांत काय आहे हें पहाण्याचा निश्चय केला. मग त्यानें थोडीशीं फळें खाऊन उदकप्राशन केलें. तों सुमारें दोन घटका दिवस आला. मग हातांत एक लाकूड घेऊन तो त्या रानांत शिरला.

दोन दिवस एकट्यानेंच तेथें काढल्यामुळें त्याची

भीति बरीच कमी झाली होती. हिकडून तिकडे पहात पहात तो त्या देवळाचे जवळ गेला. तेथें मोठ्या मोठ्या उंच व लहान वृक्षांची इतकी गर्दी होऊन गेली होती कीं, सूर्याचे किरणास त्यांतून आंत प्रवेश करण्यास फार संकट पडे. दिवसास दाट काळे ढग आल्यानें जशी अंधारी पडते त्याप्रमाणें मेघ नसतांही तेथें वृक्षांच्या छायेमुळें अंधारी पडली होती. तेणेंकरून तेथील जागा फारच उदास व भयंकर दिसत असे, व पूर्वदिवशींची कांहींशी भीतिही सोमदत्ताचे मनांत होतीच. मग तो भयचकित होऊन कावराबावरा चोंहींकडे पाहूं लागला. मयूर, शुक, काक इत्यादि पक्ष्यांचे मधुर मधुर शब्द होत, तेही त्यास मोठे कठोर लागूं लागले. मग हळूहळू पुढें जाऊन कालचे प्रमाणें आजही त्या देवळांतून गुणगुण ऐकूं येते कीं काय, ह्मणून तो कान देऊन ऐकूं लागला. तों कांहीं तुटक तुटक शब्द त्यास ऐकूं आले. तेव्हां त्याचे सर्वांगावर एकदम कांटा उभा राहिला. हातपाय कांपूं लागले; परंतु तो तसाच दम धरून तेथें उभा राहिला, आणि कान देऊन ऐकतो तों पुन: त्यास त्यास तसेंच ऐकूं आलें. मग तो जिवाचा धडा करून अगदीं देवळाचे जवळ गेला. इतक्यांत कोणी दु:ख करून कण्हत आहे असें त्यास वाटलें; तरी हें काय आहे ह्याचें त्यास बरोबर अनुमान होईना. मग तशाच नेटानें तो देवळाच्या दारांत गेला, आणि आंत डोकावून पहातों तों एक लहानशी दगडाची मूर्ति असून आंत सर्व गदळ पडलें आहे असें त्यानें

पाहिलें. इतक्यांत शेजारचे खोलींत शब्द होत आहे, अशी त्याची पक्की खात्री झाली. मग हातांतील लांकूड सरसावून भीतभीत तो त्या खोलीचे दाराजवळ गेला. तेव्हां स्पष्टपणें शब्द झालेला ह्यास ऐकूं आला व ह्याची बाहेरल्या बाजूस चाहूल झाल्यामुळें कांहीं मोठ्यानें असे शब्द निघाले कीं, "बाहेर कोण आहे? आज तीन दिवस झाले अन्नपाणी नाहीं, आलां असलां तर लौकर कां आंत याना?" हें ऐकून सोमदत्तानें दार लांकडानें ढोसलें आणि आंत कोण आहे, ह्मणून विचारिलें. नंतर आंतून असे शब्द आले कीं, तुह्मी कोण आहां? येथें दुसरें कोण येणार! माझी गरीबाची थट्टा आज कां चालविली आहे ? मला आतां फार बोलवत नाहीं. लवकर आंत येऊन मला आधीं पाणी द्या. घशास अगदीं कोरड पडून गेली आहे.

अशा प्रकारचें स्पष्टपणें भाषण ऐकून कोणी तरी अजारी मनुष्य आहे अशी सोमदत्ताची खात्री होऊन गेली. मग त्या दाराकडे रेखून पाहतो तों त्यास कुलूप आहे असें त्याचे दृष्टीस पडलें. नंतर सभोंवतीं फिरून पाहतो तों आंत जाण्यास कोठेंही मार्ग नाहीं असें त्यास दिसून आलें. वरचे बाजूचें छप्पर कोठें कोठें पडलें होतें. मग तो शेजारचे झाडावरून छपरावर गेला आणि पडलेल्या भोसक्यांतून आंत पाहतो तों कोणी एक स्त्री फाटक्याशा चिरगुटावर पडलेली आहे असें सोमदत्तानें पाहिलें. तो वर चढून आंत येत आहे अशी चाहूल लागतांच तिलाही भीति वाटूं लागली, व रोजचे

येणारे नव्हेत अशी तिची त्या कृतीवरून खात्री झाली. हा वरचे भोसक्याशीं आला तेव्हां तिनें वळून ह्याकडे पाहिलें; परंतु मंद प्रकाशामुळें कोण आहे, हें तिला स्पष्टपणें दिसलें नाहीं. कोणी तरी मनुष्य आहे इतकें मात्र तिनें पाहिलें. आपणावर दुसरेंच एकादें अरिष्ट येत आहे कीं काय, असें मनांत येऊन तिला अधिकच भीति वाटूं लागली. इतक्यांत हा त्या भोसक्यांतून खालीं उतरून तिचे पुढें जाऊन उभा राहिला, तेव्हां तिनें ह्याकडे पाहतांच वर हात करून एकदां मोठ्यानें ओरडली, आणि लागलीच मुर्छा आल्यामुळें तेच हात निर्जीवांप्रमाणें एकदम भूईवर पडले. हा चमत्कार पाहून सोमदत्त फार भिऊन विस्मितही झाला. मुक्तामाला फार क्षीण झाली होती व केश वगैरे अस्ताव्यस्त असल्यामुळें तिला त्यानें लागलेंच ओळखिलें नाहीं. नंतर खालीं वांकून रेखून पाहतांच ही आपली मुक्तामाला, असें त्यानें ओळखिलें. मग काय विचारावें! त्यास जो आनंद झाला त्याचें वर्णन करतां येत नाहीं.

त्या आनंदाचे भरांत तिची काय अवस्था झाली आहे हें त्याचे लक्षांतही आलें नाहीं. त्याणें तिचे गळ्यास मिठी मारून मोठ्यानें रडण्यास आरंभ केला; परंतु लागलीच तिची हालचाल नाहींशी पाहून घाबरला; आणि ती मूर्छित झाली आहे, असें पाहून जवळ एक तांब्या पडला होता तो घेऊन आल्या वाटेनें बाहेर गेला. दैववशात् तेथें देवळाचे पाठीमागें एक विहीर होती. ती त्यानें येतांना पाहिली होती. तींत जाऊन तांब्या

भरून घेऊन पुन: आंत आला, आणि थोडेंसें पाणी तिचे तोंडांत घालून व डोळ्यांस लावून आंगावरी-ल पंचानें वारा घालूं लागला. कांहीं वेळ जातांच तिनें हळूच डोळे उघडले, तें पाहून त्याचा आनंद गगनीं माईनासा झाला. इतक्यांत तिनें उठून ह्याचे गळ्यास मिठी मारिली, आणि शक्ति नव्हती तरी मोठ्यानें हुंदर-डा फोडून ती रडूं लागली. ह्यानेंही त्याचप्रमाणें रडण्यास आरंभ केला. कांहीं वेळ तसेंच चाललें आहे तों, पोटांत कांहीं नसल्यामुळें व अत्यंत क्षीणतेमुळें, तिला पुन: घेरी येते असें वाटलें. मग रडणें बंद करून ती त्यास ह्मणाली–बाबारे, आज तीन दिवस मला अन्न पाणी नाहीं ह्यामुळें घसा कोरडा पडून बसवत नाहींसें झालें आहे,तर तुजपाशीं कांहीं खाण्यास असेल तर मला दे." एकादशीचे घरीं शिवरात्र" ही ह्मण येथें बरोबर लागू पडली. असो; ते तिचे दीनवाणे शब्द त्याचे चित्तास फारच लागले. जी शेंकडो मनुष्यांस सधन करणारी, ती केवळ अन्नास महाग झाली, हें मनांत घेऊन त्याचें चित्त विरघळून गेलें, व अशा समयीं आपणापाशीं कांहीं नाहीं ह्मणून तर त्यास फारच वाईट वाटलें. मग तो हळूच ह्मणाला–मी हल्लीं कोणच्या दशेंत आहें, हें माझ्यानें तुला आतांच सांगवत नाहीं; परंतु तूं खाशील दर कांहीं फळें आणून देतों. हें ऐकून ती ह्मणाली–जें तूं देशील तें अमृतापेक्षांही मला अधिक आहे; परंतु लवकर आण. मला आतां धीर निघत नाहीं, मग तो लागलाच बाहेर आला आणि कांहीं राम-

फळें, पेरू वगैरे तोडून घेऊन आंत गेला. ह्यासही क्षुधा लागलीच होती, मग दोघांनींही तीं फळें पोटभर खाऊन जलप्राशन केलें.

क्षुधा निवारण झाल्यानें मुक्तामालेस कांहींसा धीर आला. घर सुटल्यापासून दुःखें सांगण्यास तिला गुलालसिंगावांचून कळवळ्याचें कोणीच भेटलें नव्हतें व सोमदत्ताशीं तिचें जसें सख्य होतें तसें, पति व मातापितरांखेरीज दुसऱ्या कोणाशींच नव्हतें; तर तोच भेटला, मग काय विचारावें! तिचें अंतःकरणांतून दुःखाचे उद्गार येऊं लागले. ती बिचारी दुःख तरी कोठवर करील! दुःख करितां करितां तिचीं गात्रें अगदीं शुष्क होऊन गेलीं होतीं. रडून रडून डोळ्यांतून पाणी येण्याचा सांठाही अगदीं सरून गेला होता. असो; तरी तिला पहिल्यानें आपल्या बाळकाची आठवण झाली. मग मोठ्यानें सुस्कारा टाकून ती ह्मणाली—"सोमदत्ता, माझा कमलाक्ष कोठें पाहिलास काय? अरे मी निजलें असतां त्या दुष्टांनीं मजपुढून त्यास उचलून नेलें. बहुधा त्या मेल्या शुक्राक्षानेंच हें काम केलें. आतां तो माझ्या कोठून दृष्टीस पडणार? सोमदत्ता, तुला कांहीं तरी त्याची माहिती असली तर सांग! मला फार दुःख होईल ह्मणून चोरून ठेवूं नको? मी आतां पहिली मुक्तामाला नव्हे, माझें ह्रदय आलीकडे इतकें कठीण झालें आहे कीं, जरी हें सर्व आकाश कोसळून पडलें तरी मी अगदीं भ्यावयाची नाहीं असें मनांत आण". हे तिचे शब्द ऐकून ह्यासही गहिंवर आला; परंतु तिचीं फार अशक्त प्रकृति

पाहून त्यानें मनांत आणिलें कीं, दुःख न सांगतां ह्या-समयीं हिला धीर न दिला तर कदाचित् भलतेंच होईल. असा विचार करून तो ह्मणाला–तूं आतां कांहीं काळजी करूं नको. ईश्वरास आपली करुणा आली ह्यांत संशय नाहीं. तो आतां आपलें सर्व यथास्थित करील. नाहींपेक्षां तुझी व माझी भेट तरी कोठून झाली असती! आतां आपण येथून सुटून गेलों म्हणजे पूर्वी कमलाक्षाचा शोध लावूं व त्याला तूं लवकरच पाहशील, हें तुला मी खचित खात्रीनें सांगतों. हे त्याचे अमृतासारखे शब्द ऐकून तिला कांहींसें बरें वाटलें. हें काम शुक्लाक्षानें केलें असें ऐकून सोमदत्तास मोठें आश्चर्य झालें. कारण, तो ह्यांचा नाश करण्यास प्रवृत्त होईल हें त्याचे ध्यानीं मनींही नव्हतें. मग त्यानें तिला विचारलें कीं, शुक्लाक्षानेंच हें काम केलें असें तूं कशावरून ह्मटलेंस? हें ऐकून ती ह्मणाली–हा सर्व अनर्थ त्याचेच पायीं झाला! तो लहानपणीं मेला असता तर आमच्या सर्व घरादाराची नासाडी कां झाली असती? त्याची आठवण झाली म्हणजे माझ्या सर्वांगाची आग होऊन जाते. मग गुलालसिंगानें जी त्याजविषयीं हकीकत सांगितली होती, ती सर्व तिनें त्यास सांगितली. त्या गुहेंतून बाहेर पडल्यावर रात्रौ त्या रानांत तो माझा नाश करण्यास आला व त्यावेळीं गुलालसिंगानें माझे प्राण वांचविले, तेंही त्यास सांगितलें. नंतर उज्जनींत त्यानें व भद्राक्षानें जें दुःख दिलें व चार महिन्यांच्या बालकाची व आपली ताडातोड करून आपणास येथें आणून टाकिलें

वगैरे सर्व हकीकत त्यास सांगितली. ती ऐकून सोमदत्तास इतका राग आला कीं, आतांच जाऊन त्याचे नरडीचा घोट ध्यावा; परंतु बिचारा करतो काय ? सत्तेपुढें कांहीं इलाज चालत नाहीं.

सोमदत्तास फार आवेश आलेला पाहून मुक्तामाला ह्मणाली, आपल्या गरीबाची दाद कोठून लागणार ? ते आज सत्ताधारी आहेत. तर ज्याचा सर्वांवर अम्मल आहे, व ज्याचेठायीं सद्धर्म, नीति, दया इत्यादि सद्गुण पूर्णपणें वागत आहेत; व ज्याचे राज्यांत खऱ्याचा-च न्याय होत आहे; व ज्यास आपल्या प्रजेनें गुप्तपणें केलेले अपराध सहज समजत आहेत; अशा सार्वभौम राजास शरण जाणें, हाच एक उपाय आहे. दुसरी तोड नाहीं अशी माझी पक्की खात्री होऊन गेली आहे. राग येऊन भलतीच गोष्ट केल्यास आणखीं एकादा दुःखचक्रांत पडून संकटें मात्र भोगावीं लागतील ह्यांत संशय नाहीं. आतां तूं कदाचित् म्हणशील कीं, त्या सार्वभौम राजास हे झालेले अपराध कसे समजले नाहींत ? तर असें मात्र मनांत आणूं नको. त्यानें ह्याचे सर्व अपराध लिहून ठेविले असतील. आतां पातकाचा घडा भरतांच तो सर्व अपरा-ध्यांस एकदम पकडून यथायोग्य शिक्षा करील, ही मनांत गांठ घालून ठेव. हें ऐकून सोमदत्त ह्मणाला— तूं ह्मणतेस ह्याप्रमाणें होईल अशी माझीही खात्री आहे. असो; आतां पुढें काय करावयाचें ह्याचा आप-ण विचार करूं. हें ऐकून मुक्तामाला दचकली, आणि म्हणाली—मला अगदीं आठवण राहिली नाहीं; आपण येथें

निवांतपणें बोलत बसलों आहों; अशा समयीं ते आल्यास कदाचित् भलतेंच होईल. हें ऐकून सोमदत्त ह्मणाला–ते कोण? मग ती मोठ्यानें सुस्कारा टाकून ह्मणाली–मला त्या भद्राक्षानें येथें आणून टाकिलें आहे, व त्यानें दोन चाकर नेमिले आहेत, ते आठ दिवसांनीं एकवेळ येऊन मला अन्नपाणी ठेवून जातात; परंतु त्यांचा येण्याचा दिवस टळून तीन दिवस अधिक झाले, ह्मणूनच मी अशी उपोषित होत्यें. ह्याखेरीज तो दुष्टही स्वतः पंधरा दिवसांतून एक वेळ, मी आपला आग्रह सोडावा हें विचारण्याकरितां येत असतो. त्यास येण्यास अजून चार पांच दिवसांचा अवकाश आहे. परंतु ते चाकर आतां केव्हां येतील ह्याचा मात्र भरंवसा नाहीं. हें ऐकून सोमदत्तही चपापला, मग त्यानें विचारिलें–त्यांची येण्याची वेळ तरी कोणती? ती ह्मणाली–बहुधा सायंकाळचा दोन घटका दिवस राहिला असतां ते येतात. बोलण्याच्या नादांत त्यांस दिवस आहे किंवा रात्र झाली ह्याचें ह्यांस भानही राहिलें नाहीं. मग विचार करून पाहतां काळोख पडला आहे, त्यावरून रात्र झाली असावी असें त्यांनीं अनुमान केलें. तरी किती रात्र झाली ह्याचा निश्चय होईना. मग मुक्तामालेनें सांगितलें कीं, रात्र झाली त्यापेक्षां त्यांची भीति बाळगण्याची गरज नाहीं. त्यादिवशीं मुक्तामालेस फारच आनंद झाला. कारण ह्या भयंकर अरण्यांत एकटी महिनेबंदी काढून राहिल्यानें ती आपल्या जिवास फारच

त्रासून गेली होती. यांत सोमदत्ताचा सहवास झाल्यानें तिचा आनंद गगनीं माईनासा झाला.

रात्र बरीच झाली असें वाटून सोमदत्त ह्मणाला-आपल्या गोष्टी उजाडलें तरी संपतील असें नाहीं व जाग्रण झाल्यानें तुझी प्रकृति बिघडेल;तर निजावें हें फार बरें असें मला वाटतें. मुक्तामालेसही ती गोष्ट खरी वाटली. मग तीं दोघेंही बहीणभावंडें आपआपल्या बिछान्यावर निजलीं. सोमदत्ताचा बिछाना खालीं भुई व आंगावर पंचा आणि मुक्तामालेचा बिछाना खालीं एक फाटकें वस्त्र व अंगावर नेसलेलें जुनें लुगडें! असो, तीं दोघेंही झोंप घेण्याच्या बेतानें निजलीं खरीं; परंतु एकासही झोंप येईना. मग मुक्तामाला ह्मणाली-सोमदत्ता, बाबा व आई खुशाल आहेतना! माझ्यावांचून त्यांस रात्रंदिवस चैन पडत नसेल. मी दहा बारा दिवसांनीं परत येतें ह्मणून चिठी लिहून ठेवून बाहेर पडलें, त्यांस आज वर्ष होऊन गेलें. अजून मी परत जातेंच आहे! सोमदत्ता, आतां त्यांची माझी भेट होईल काय? बरें तिकडे बंदिखान्यांतील कसा काय समाचार आहे हें तुला कांहीं माहीत असेल तर मला आधीं सांग पाहूं. हें ऐकून तो ह्मणाला-तूं मला न कळवितां घर सोडून गेलीस हें चांगलें केलेंस काय? असो,मग तात्यांचा व आईचा माझ्यानें शोक पहावेना, व तुजवांचून मला घरांत सुखास येईना. शेवटीं तूं गेल्यापासून आठवे दिवशींच तुझ्या शोधाकरितां मी बाहेर पडलों. मग ह्या गांवाहून त्या गांवीं असा हिंडतां हिंडतां त्या दिवशीं संध्याकाळीं उज्जनींत तुला

मूल खांद्यावर घेऊन येतांना रस्त्यांत पाहिलें. मग मोठ्या आनंदानें तुजकडे येत असतां, त्या दुष्टानें मला एकाएकीं उरांत धक्का मारून खालीं पाडिलें. हें ऐकून ती ह्मणाली, तोचरे तो काळ! त्याच मेल्यानें माझी अशी दशा करून येथें आणून टाकिलें. सोमदत्त ह्मणाला—त्याची दैना ईश्वर करील ह्यांत संशय नाहीं. असो; मग त्या दुःखानें मी कांहीं दिवस आजारी पडलों, आणि थोडासा बरा होतांच तेथील मामलेदाराकडे ह्या गोष्टीची चौकशी लावण्याकरितां गेलों. त्यानें कांहीं तरी बोलून उलटें मलाच बंदींत टाकिलें. हें ऐकून तिला त्या दोघांच्या संवादाची आठवण झाली. आणि ह्मणाली, तूं तात्यांस पत्र पाठविलें होतें तें आणून त्या मेल्या मामलेदारानें त्या काळतोंड्यास वाचून दाखविलें, आणि त्यानेंच तुला बंदींत टाकण्यास सांगितलें. बरें तुझा जीव घेण्याची त्यांना बुद्धि झाली नाहीं, हें मोठें भाग्य. हं! असें काय! तेथील मामलेदारच हात धुऊन तुझ्या पाठीस लागला आहे? असें समजलें असतें तर मी पत्र कशाला पाठविलें असतें, व त्याकडे फिर्याद करण्यास तरी कशाला गेलों असतों! असो, होणार तें चुकत नाहीं. मग त्याची बदली होतांच हजार रुपये लांच देऊन तेथून सुटलों; परंतु काय? लागलाच मृत्यूचे तोंडांत सांपडलों; तेथून निघून दोन कोश आलों नाहीं तों मोठ्या वादळांत सांपडलों; इतक्यांत पाऊस, मोठमोठ्या गारा, विजांचे कडकडाट अशी एकच गर्दी होऊन प्राण जातो किंवा राहतो अशी अवस्था होऊन गेली! सर्व भिजून चिंब

झालें. शेवटीं त्यांतून निभावून एकदांचे उतारावर आलों. तेथें उतारू लोकांची नावेवर एकच गर्दी होऊन गेली होती. नदी तर तुफान भरून चालली. नावाड्यांची नाव ढकलण्यास छाती होईना. उभें राहण्यासही कोरडी जागा नाहीं! इतक्यांत पुन: वादळ होऊन पाऊस येण्याचें चिन्ह दिसूं लागलें. मग सर्व घाबरले, आणि नावाड्यांस दुप्पट पैसा कबूल करून त्यांकडून नाव काढविली; परंतु काय? आंत लोकांचा एकच खच होऊन गेला; त्यामुळें अरध्या नदींत ती नाव बुडाली! त्या वेळीं मला फार वाईट वाटलें; परंतु आतां बरें झालेंसें वाटतें. कारण एका वल्याचा आधार सांपडून येथें लागलों म्हणून तुझी भेट झाली. नाहींपेक्षां कोठून होती! येथें लागून मला आजचा तिसरा दिवस! काल येथें बाहेरच्या बाजूस येऊन तुझे तुटक शब्द ऐकून भिऊन माघारीं गेलों. आतां मला फार वाईट वाटतें कीं, दोन दिवस येथें असून तुझी माझी गांठ पडली नाहीं! हा त्याचा दु:खदायक इतिहास ऐकून मुक्तामालेला विलक्षणच दु:ख झालें, आणि ती ह्मणाली-सोमदत्ता, मजकरितां तूं इतकें दु:ख भोगलेंस ना? हर! हर! जन्मास येऊन मी आपल्या आईबापांस वृद्धपणीं सुख द्यावयाचें तें न देतां त्यांस फारच दु:ख दिलें! तुझ्या दु:खास तर जोडाच नाहीं! मला वाटतें, ह्यापेक्षां ईश्वरानें मला जन्मासच घातलें नसतें, तर फार बरें झालें असतें. हें ऐकून तो म्हणाला-तूं असें मनांत आणूं नको. ह्या गोष्टीस कोणाचाच इलाज नाहीं. दुसऱ्यास दु:ख द्यावें ह्मणून तूं

एकादी गोष्ट केलीसअसें नाहीं.ज्याला लहानपणापासून बाळगून ज्याचें सर्वस्वीं कल्याण केलें, तो अशीं घोर कृत्यें करून सर्व वाताहात करील हे कोणाचेही ध्यानीं मनीं आलें नाहीं. असो; होणार त्यास उपाय नाहीं. अशीं बोलण्यांतच सर्व रात्र जाऊन प्रातःकाळ झाला असें पाहून त्या उभयतांसही फार आश्चर्य वाटलें.!

# भाग ९.

## श्लोक.

दुष्टांच्या कृतिनें भले सुजनही लागूनि देशोधडी
जातो प्राण अशीं तयांवरि जरी आलीं बहू सांकडीं।
त्यांतूनी भगवत्कृपें सुटुनि ते एकत्र होती अहा
दुष्टां शासन होई अद्भुत कशी लीला प्रभूची पहा॥

मागचे भागांत सांगितलें कीं, शुक्लाक्ष आणि भद्राक्ष ह्या उभयतांनीं मुक्तामालेस पेटींत घालून पुरून टाकिलें, तर ती जिवंत होऊन ह्या बेटांतील अरण्यांत कशी आली, ही वाचणारांचे मनांत शंका येईल खरी. त्याचप्रमाणें ते दोघेही आंपापले मतलब साधण्याकरितां झटत होतें हेंही मागें सांगितलें आहे. तर भद्राक्षानें आपला मतलब सिद्धीस नेण्याकरितां, ज्या दिवशीं तिला अफू घालून पुरून टाकण्याचा बेत आला त्याच दिवशीं रात्रीं बंदिखान्यांतील एका स्त्रियेस अम्मल देऊन त्या ठिकाणीं आणून ठेवण्याचा त्यानें निश्चय केला. नंतर त्याच रात्रीं मुक्तामालेस त्यानें दुसरे ठिकाणीं नेऊन ठेविलें, आणि दुसरे दिवशीं त्या बिचाऱ्या अनाथ स्त्रियेस अम्मल देऊन मुक्तामालेस ज्या ठिकाणीं होती तेथें आणून ठेविलें. मग पूर्वीं आपण एकटाच तेथें येऊन दिवा मंद करून व तिजवर पांघरूण घालून गेला. नंतर शुक्लाक्षाबरोबर जेव्हां तो बारा वाजतां तेथें आला, तेव्हां पूर्वीं चाकरास पाठवून मागून हे उभयतां आंत गेले; तेव्हांही

भद्राक्षानें दिव्याचे बाजूस उभें राहून तो मंद प्रकाशही तिजवर पडूं दिला नाहीं आणि पांघरूण थोडेंसें अस्ताव्यस्त झालें होतें तें नीट केलें. हेंही मागें सांगितलें आहे. असो; मग जलदी करून त्यानें शुक्राक्षास टकविलें; परंतु आपण सर्पाचे शेपटीवर पाय दिला हें तो पक्केपणीं समजून होता, व ह्याच हेतूनें त्यानें तिला अशा निर्जनप्रदेशीं आणून टेविलें. जर ती दुःख सोसून कंटाळून आपणास कबूल झाली तर बरेंच झालें. नाहींपेक्षां कोणास न समजतां तेथेंच मरून जाईल. तें बेट होतें, तेथें नदीच्या दोहीं बाजूंसही मोठें भयंकर रान होतें, व त्या बेटांत कोणी भयंकर ब्रह्मराक्षस रहात आहे, अशी आसपासच्या गांवच्या लोकांची समजूत होती; ह्मणून कोणीही तिकडे जात नसे. ह्याखेरीज नदीचे किनाऱ्यास पाहिजे तितकें रान असल्यामुळें होडी ठेवून बेटांतील रानांत जाण्याची गरजही कोणास नसे. त्यानें हिला अन्नपाणी पुरविण्याकरितां जे चाकर ठेविले होते ते नदीस फार पाणी आल्यामुळें तीन दिवस आले नाहींत. त्यांस हिची दया येई; परंतु ते बिचारे त्या राक्षसापुढें करतात काय? जेव्हां त्याची बदली झाली, तेव्हां त्यानें ह्यांचा पगार वाढविला आणि हिची पूर्वींप्रमाणें तजवीज ठेवण्यास सांगून कोणापाशींही न बोलण्याविषयीं बजावून सांगितलें.

सोमदत्त व मुक्तामाला ह्यांस अगदीं झोंप न येतां बोलण्यांतच रात्र निघून गेली, आणि प्रातःकाळ झाला असें मागेंच सांगितलें आहे. नंतर सोमदत्तानें मनांत आ-

णिलें कीं, आपण ह्या भोसक्यांतून बाहेर जाऊं; परंतु मुक्तामालेस नेतां येणार नाहीं. मग त्यानें खोलीचें कवाड हालवून पाहतां एक उपटलें, आणि बाहेर जाण्यापुरता रस्ता झाला. तें पाहून मुक्तामाला ह्मणाली— हें काय केलेंस? जर त्या दुष्टाचे चाकर आज आले तर दार हें असें पाहून त्याचे मनांत संशय येणार नाहीं काय? मग तो ह्मणाला—तूं कांहीं काळजी करूं नकोस. त्यांचे येण्याचे वेळेच्या सुमारास पुनः तें जसें होतें तसें करून ठेवीन. मग दोघेंही बाहेर आलीं. रात्रभर जागरण झालें तेणेंकरून प्रकृति न बिघडतां उलटी कांहीं अधिक हुषारीच तिला वाटूं लागली. बाहेर पडतांच मी आज बंदांतून मोकळी झालें, असें वाटून तिला विलक्षण आनंद झाला. बाहेरील रानाची शोभा पाहून व मयूर, कीर इत्यादि पक्ष्यांचे मधुर शब्द ऐकून त्यांचे चित्तास फारच समाधान झालें. तेंच रान व तेच पक्ष्यांचे शब्द, सोमदत्तास काल उदास व भयंकर वाटले होते; परंतु मनांतील भीति जातांच तेच सर्व रमणीय होऊन गेले. यांतील चमत्कार पहात पहात व फळें तोडीत तोडीत तीं दोघेंही नदीवर आलीं. मुक्तामालेच्या सर्वांगास मळाचा काट चढला होता व वस्त्रही फार मळून गेलें होतें; परंतु तें वस्त्र धुण्यास दुसरें नेसावयास नाहीं. मग सोमदत्तानें पंचा नेसून आपलें धोतर तिला नेसावयास दिलें, आणि नको ह्मणत असतां तिची अशक्तता पाहून त्यानें आपल्या हातानें तिचें लुगडें स्वच्छ धुऊन वाळत टाकिलें. तें पाहून तिचें अंतः-

करण फार सद्गदित झालें आणि ती ह्मणाली -सोमदत्ता, मी आपले कातडयाचा जोडा करून तुझे पायांत घात-ला तरी तुझ्या उपकारांची उतराई होणार नाहीं. हें ऐकून तो ह्मणाला-हा माझा सर्व देह तुझ्या अन्नाचा आहे; माझ्या गरिबाच्यानें तुझे उपकार ते काय फेडव-णार ? तूं असें बोलून मात्र माझे जिवास दुःख देऊं नको. असो; मग आपलें सर्वांग स्वच्छ धुऊन ती आंग धुतली. सोमदत्तानेंही स्नान करून आपलें नित्यकर्म सारिलें. मग फळें वगैरे खाऊन दोघेंही समाधान पाव-लीं, तों सुमारें बारा वाजण्याचा समय झाला. मग वृ-क्षाच्या गर्द छायेखालीं तीं बोलत पडलीं असतां रात्रीचें जागरण झाल्यामुळें त्या दोघांसही गाढ निद्रा लागली.

सायंकाळचा प्रहर दिवस राहिला तेव्हां मुक्तामाला जागृत झाली, आणि तिनें सोमदत्तासही उठविलें. नंतर त्या निवाऱ्याच्या जाग्यास जाऊन रात्र काढावी ह्या बेतानें तीं तिकडे यावयास निघालीं. वाटेनें जातांना मुक्तामालेचे मनांत आलें कीं, कदाचित् ते मनुष्य आज येतील. मग तिनें तें सोमदत्तास सुचविलें. तें ऐकून तो ह्मणाला-नदीचें पाणी बरेंच उतरलें आहे तर मलाही तसेंच वाटतें. तर आतां आपण तिकडे लवकर जाऊं, आणि तुला तेथें ठेवून ते लोक येतात कसे व जातात कसे, हें पाहण्याकरितां मी पुन्हा परत जाऊन बसतों. असा बेत करून तीं दोघेंही तेथें गेलीं. मग त्यानें मुक्तामालेस आंत ठेवून दार होतें तसें बंद करून ठेविलें आणि आपण त्या भोसक्यांतून बाहेर आला.

जेव्हां तो बाहेर गेला तेव्हां मुक्तामालेस कांहींसें उदास वाटून तिचे मनांत आलें कीं, हा पुनः येऊन भेटेल तेव्हां सर्व निभावलें. नाहींपेक्षां मध्येंच कांहीं निराळें विघ्न येईल कीं काय, कोण जाणें! अशा प्रकारच्या विचारांनीं तिचें चित्त अस्वस्थ होऊन गेलें. इकडे सोमदत्ताचेही मनांत हे विचार आले नाहींत असें नाहीं; परंतु करतो काय! येथून सुटका तर झाली पाहिजे. असो; तो तीराजवळ जाऊन एका वृक्षावर चढला. आणि आपण कोणास न दिसतां पलीकडील सर्व आपणास दिसावें अशा ठिकाणीं जाऊन बसला. इतक्यांत पलीकडील किनाऱ्याचे रानांतून दोन मनुष्यें येत आहेत असें त्यास दिसलें. येतां येतां अगदीं नदीचे कांठीं जीं झाडें होतीं तेथें तीं आलीं, आणि त्यांनीं त्या झाडांत दडवून ठेविलेली एक लहानशी होडी बाहेर काढिली, आणि ती पाण्यांत सोडून दोघेही आंत बसले. होडींत एक लहानसें वल्हें होतेंच, तें एकानें घेतलें व एक सुकाणू धरून बसला. अशा रीतीनें ते त्या बेटांत येऊन लागले. मग होडी झाडास बांधून आंत आले. एक घटका झाली नाहीं तों ते दोघेही तेथें येऊन करावयाचें तें करून होडींत बसून पुनः परत गेले, आणि पहिल्या जागीं होडी ठेवून आल्या मार्गानें निघून गेले.

सोमदत्तानें झाडावरून तें सर्व पाहिलें, आणि ते अगदीं निघून गेलेसें पाहून तो झाडावरून खालीं उतरला. नंतर धांवत धांवत तो मुक्तामालेजवळ येऊन पोंचला. तेव्हां परस्परांस मोठा आनंद झाला. मग ते कसे येता-

त तें सर्व सोमदत्तानें मुक्तामालेस सांगितलें. आणि ह्मणाला–आतां येथून सुटून आपण कशीं जाऊं ही काळजी काळपासून जी माझे अंतःकरणास लागली होती ती दूर झाली. मी पोंहून पार गेलों असतों; परंतु तुला कसें न्यावें हें संकट होतें. असो; आतां येथून पाहिजे तेव्हां निघून जातां येईल. हें ऐकून मुक्तामालेसही समाधान वाटलें. मग त्यांनीं फराळाचें आणून दिलें होतें तें व कांहीं फळें खाऊन दोघांनींही आपली क्षुधा शांत केली. त्या दोघांसही फळांवांचून आज एक दोन दिवस कांहीं मिळालें नव्हतें, ह्मणून त्या दिवशीं अन्न खाऊन अधिक हुशारी आलीसें त्यांस वाटलें. मग रात्र होतांच सुखदुःखाच्या गोष्टी बोलतां बोलतां त्यांस झोंप लागली. दुसरे दिवशीं प्रातःकाळ होतांच सोमदत्तानें तेथील दाराची फळी उपटून पूर्वींप्रमाणें जाण्यायेण्यास मार्ग केला. नंतर त्या लोकांनीं जिकडून होडी आणिली होती तिकडेच स्नान वगैरे करण्याच्या बेतानें तीं दोघेंही गेलीं. नंतर स्नान करणेंच आहे तर लागलेंच पलीकडे जाऊन होडी घेऊन यावें ह्या बेतानें तो पलीकडे जाण्याकरितां तयार झाला. त्यावेळीं मुक्तामालेस फार वाईट वाटूं लागलें. जरी त्यास चांगलें पोहतां येत होतें, तरी काय होईल कोण जाणें असें तिच्या मनांत येऊन ती ह्मणाली-थांब बाबा! आणखी चार दिवस वाट पहा! नदीचें पाणी कमती झालें ह्मणजे हा बेत करतां येईल. हें ऐकून तो ह्मणाला–येथून जितकें लवकर निघून जाऊं तितकें चांगलें. कोणत्या वेळीं

काय होईल, ह्याचा मला अगदीं भरंवसा येत नाहीं. ह्या पात्रांतून पोंहून जाणें मला अगदीं कठीण वाटत नाहीं; तर तूं उगीच मौज पहात बैस. आतां तिरासारखा जाऊन येतों कीं नाहीं पहा. हें त्याचें ह्मणणें तिनें मोठ्या दुःखानें मान्य केलें, मग त्यानें उडी टाकतांच, हा सुखरूप परत येवो ह्मणून ती ईश्वराचें चिंतन करूं लागली.

तेथील पात्र फार मोठें होतें असें नाहीं व पाण्यासही फार जोर नव्हता, ह्मणून बोलल्याप्रमाणें सोमदत्त तिरासारखा पलीकडील तीरास जाऊन लागला, तेव्हां जरा मुक्तामालेचा जीव खालीं पडला. मग त्यानें ती होडी शोधून बाहेर काढिली आणि आपणास एकट्यास आंत बसून जातां येणार नाहीं असें समजून त्याणें ती होडी बरीच वरचे बाजूस ओढीत नेली. नंतर कितीही वाहवलों तरी मुक्तामाला आहे तेथें पोंचूं असें त्यास वाटतांच होडीची दोरी हातांत धरून त्यानें पाण्यांत उडी टाकिली, आणि होडी घेऊन पोंहत पोंहत तेथें येऊन लागला. तें पाहून मुक्तामालेस आनंद होऊन मोठें कौतुक वाटलें. मग स्नानें वगैरे करून त्यांनीं फराळाचें बरोबर आणिलेंच होतें तें व कांहीं फळें आणून दोघांनींही यथास्थित फराळ केला. आतां विलंब न करतां येथून निघून जावें असें सोमदत्तानें मनांत आणिलें. मग त्यानें तें मुक्तामालेस सांगतांच तिलाही बरें वाटलें. आपण कोठें आहों व पलीकडे गेलों असतां कोणत्या मुलखांत जाऊं ह्याचें त्यांस अनुमान होईना; परंतु जिकडून होडी आणिली तिकडे जाणें तर प्रशस्त नाहीं,

हें उघडच आहे. मग मोठ्या संकटानें होडी किनाऱ्यानेंच ओढीत ओढीत पलीकडच्या बाजूस नेली आणि मुक्तामालेचे बिऱ्हाडीं एक तांब्या होता तो आपले उपयोगीं पडेल असें समजून तो सोमदत्ताने जाऊन आणिला. फराळाचें बरोबर होतेंच. बाकीचें कोणतें सामान राहिलें असें नाहीं. मग त्यानें सुकाणूं कसें धरावें तें मुक्तामालेस सांगून आपण वल्हें हातांत घेतलें, आणि ईश्वरचिंतन करून होडी पाण्यांत लोटिली.

सोमदत्तानें जिकडून होडी आणिली तिकडील पात्रापेक्षां हें पात्र कांहींसें मोठें होतें व मध्यें एक दोन ठिकाणीं बऱ्याच लाटाही उसळत असत, तेणेंकरून मुक्तामालेस थोडीशी भीति वाटली; परंतु त्यानें ती जागा चुकवून जेव्हां होडी पुढें नेली तेव्हां तिचा जीव स्वस्थ झाला. मग पाहतां पाहतां ती होडी पलीकडील तीरास जाऊन लागली व दोघेंही तीरास उतरलीं. कदाचित् ही होडी पाण्यांतच ठेविल्यानें आपण ह्या तीरास लागून गेलों असें कोणी अनुमान करील, ह्मणून त्यांनीं ती वर घेऊन त्या कडेच्या रानांत टाकिली. त्यावेळीं बारांवर एक वाजण्याचा सुमार झाला होता; आतां आपण कोठें जाणार व वेळेस कोणता प्रसंग येईल कोण जाणें, असें मनांत येऊन त्या दोघांचीही मुखश्री म्लान झाली. इतक्यांत मुक्तामालेच्या मनांत आलें कीं, अशानें माझ्या कमलाक्षाचें वर्तमान मला कसें समजेल! तो एकीकडे राहिला व आम्हीं एकीकडे चाललों. असें मनांत येतांच तिचे डोळे पाण्यानें भरून आले. हें पाहतां-

च सोमदत्तही समजला; परंतु बिचारा करतो काय? त्याचीही तशीच अवस्था होऊन गेली होती, तरी त्यानें मोठ्या संकटानें आपलें दुःख आंवरून तिचें समाधान केलें. मग तीं डोंगर चढून वर जातात तों तेथेंही सर्व रानच आहे असें त्यांस दिसलें. पायांत जोडा नसल्यामुळें व कधींही चालण्याचा प्रसंग नसल्यामुळें त्यांस त्या रानांतील कांट्यांतून चालतांना फारच दुःख होऊं लागलें. पूर्वी लीलांबरीचे डोंगरांतील गुहेंत व रानांत पायांस ठेंचा व कांटे लागून ज्या खुणा झाल्या होत्या त्या तिनें सोमदत्तास दाखविल्या आणि म्हणाली—सोमदत्ता, जेव्हां ह्यांवर खडे टोंचून प्राण जातो कीं काय अशा वेदना होऊं लागल्या, तेव्हां मी लुगडें फाडून पायांस चिंध्या गुडाळल्या, तरि माझ्यानें पाय पुढें टाकवेना. अशा संकटांत मी आहें तरी तो मेला काळ माझा प्राण घेण्यास इतक्या अपरात्रीं तेथें आला! असें दांत ओंट खाऊन बोलून ती रागानें अगदीं लाल होऊन गेली, आणि म्हणाली—माझे ज्यानें विनाकारण असे हाल हाल करून सर्वस्वीं घात केला, तो किडे पडपडून झडून मरेल ह्यांत संशय नाहीं. सोमदत्ताचेही अंतःकरणाचा असाच संताप होऊन गेला आणि तो म्हणाला—करणार काय! आतां तें मनांत न आणतां आपणांस पुढील विचार केला पाहिजे. असें बोलत बोलत जात आहेत तों तें रान संपलें, आणि पुढें पाहतात तों एक बराच मोठा गांव दिसूं लागला.

त्या रानाबाहेर येतात तों सुमारें दोन अडीच वाज· ण्याचा समय झाला. गांव जवळ दिसत होता तरी तो सुमारें तेथून दोन कोश होता. सूर्याचें कडकडीत उन्ह पडल्यामुळें वाटेवरील धुरळ्यांत ह्यांचे पाय भाजूं लागले. वरून ऊन्ह लागल्यानें घाम येऊन सर्वांगाची आग झाली. मुक्तामालेचें तोंड लाल होऊन कपाळाव-रून घामाच्या धारा चालल्या. अशी तिची अवस्था पाहून सोमदत्ताच्या पोटांत तडतडां तोडूं लागलें. इत· क्यांत एक पिंपरणीचें झाड आलें, त्याची गर्द छाया पाहून दोघेंही कांहींवेळ विश्रांति घेण्याकरितां तेथें गेली. मुक्तामाला तर त्या पाचोळ्यावरच हातपाय पसरून वारा घेत पडली. सुमारें एक घटका झाल्यावर तिचा जीव कांहींसा थंड झाला; परंतु फारच तहान लागल्यामुळें ती उठून बसून चोंहींकडे पाहूं लागली. सोमदत्त तिजकडे पहात व मनांत दुःख करीतच जवळ बसला होता. त्यानें तिला विचारिलें—तुला काय पाहिजे, तें मला सांग. मी जवळ असतां वेड्यासारखी हिकडे तिकडे कशाकरितां पाहतेस ? हें ऐकून, त्यास ह्या उन्हांतून दुःख न द्यावें ह्मणून तिनें सांगितलें कीं, मी उगीच चोंहींकडचा चमत्कार पहात आहें. दुसरें कांहीं नाहीं. असें बोलून त्यांचा कांहीं वेळ गोष्टी बोलण्यांतच गेला. शेवटीं तिला दम निघेनासें झालें, तेव्हां ती ह्मणाली—"तुला

सोमदत्त घाबरला आणि ह्मणाला,--तूं असें करून माझे जिवास अधिक दुःख देऊं नको. तुजकरितां मी आपला प्राण देखील देईन; तर हें असलें क्षुल्लक दुःख मला कसें द्यावें हें मनांत आणून तूं आपला जीव इतक्या संकटांत कां घातलास? असें बोलून तो तांब्या हातांत घेऊन धांवतच निघाला.

तेथील रानांतील शेतकरी व गुराखी हिकडे तिकडे आपापले उद्योग करीत होते. त्यांपैकीं एकाजवळ जाऊन सोमदत्तानें पाणी कोठें आहे ह्मणून विचारिलें. तेव्हां तेथून जवळच एक झरा होता तो त्यानें दाखविला. मग त्यानें पाणी घेऊन तो धांवतच त्या झाडाखालीं आला.नंतर तें झऱ्याचें थंडगार पाणी प्राशन करून मुक्तामाला थोडी शांत झाली; आणि सोमदत्ताचे सर्वांगांतून घामाच्या धारा चालल्या होत्या त्या पाहून तिला फार वाईट वाटलें. मग तो नको नको ह्मणत असतांही तिनें मोठ्या कळवळ्यानें आपल्या ओंच्यांनीं त्याचा सर्व घाम पुसला, आणि हे तुझे उपकार कोठें फेडूं असें ह्मणून वारा घालूं लागली. मग असें तूं मनांत आणशील तर उलटें मला दुःख मात्र होईल असें ह्मणून सोमदत्तानें तिचे हात धरिले. नंतर तीं बोलत असतां जेव्हां अगदीं ऊन्ह खालवून दोन घटिका दिवस राहिला तेव्हां त्यांनीं पुनः मार्ग क्रमण्यास आरंभ केला. तीं सुमारें सायंकाळीं तीं त्या गांवांत जाऊन पोंचलीं. मग त्या गांवाचें नांव वगैरे शोध करितां असें समजलें कीं,आपण आपला देश सोडून अगदीं एकीकडे आलों. आपला गांव

येथून सुमारें दीडशें कोश राहिला, व हा देश भयानकाचे एका मांडलिक राजाचा आहे. मग एके प्रकारें त्यांस मोठें समाधान झालें कीं, आपणास येथें त्या दुष्टांपासून भीति बाळगण्याची फारशी गरज नाहीं, व इकडे आपल्या कोणी ओळखीचेंही भेटावयाचें नाहीं. तरी आपण कोण वगैरे खरा मजकूर कोणासही सांगावयाचा नाहीं. असा त्यांनीं निश्चय केला. असें करण्याचें कारण इतकेंच कीं, न जाणो, कदाचित् त्यांचे दुष्ट सांगे इकडे नसतील ह्याचा तरी भरंवसा काय! व भद्राक्ष हिकडे आपला पाठलाग करणार नाहीं, ह्याचांही त्यांस भरंवसा नव्हता. हा सर्व त्यांचा विचार योग्यतर खराच; ह्याखेरीज त्यांचें रंगरूप अगदीं पालटून गेल्यामुळें साधारण परिचितासही त्यांस ओळखतां येईल असा संभव नव्हता. त्यांचा नूर कांहींसा संभावितपणाचा दिसत असे, तरी त्यांचेवर भिकाऱ्याची कळा आली होती.

वर सांगितल्याप्रमाणें त्यांनीं निश्चय करून जवळ फराळाचें होतें त्यांतील खाऊन तेथील धर्मशाळेंत भुईवरच शयन केलें. तें फराळाचें मिळालें होतें ह्मणून बरें झालें. नाहींपेक्षां कांहीं विकत घेऊन खाण्यास त्या प्रसंगीं त्यांपाशीं एक पैसाही नव्हता! हांतरण्यास पांघरण्यास चिरगूटही नव्हतें. असें पाहून दुसऱ्या पांथस्थ लोकांनीं असें होण्याचें कारण काय, ह्मणून विचारिलें. तेव्हां आह्मांस चोरांनीं लुटलें असें सोमदत्तानें त्यांस सांगितलें. तें ऐकून जवळच दोघे भिक्षुक उतरले होते, ते ह्मणाले—बाबा, आमचीही अशीच अ-

वस्था झाली होती. नेसलेलें धोतर मात्र राहिलें होतें; परंतु मथुरेस गेलों तों तेथें एक हरीचा लाल आह्मांस भेटला, त्यानें आमचें गेलें होतें तितकें सर्व नवें घेऊन देऊन पांच पन्नास रुपयेही वाटखर्चास दिले; त्याचें ईश्वर कल्याण करो, आणि त्याची मुलगी त्यास भेटो! हें ऐकतांच सोमदत्तास मोठा चमत्कार वाटला व मुक्तामालाही त्यांजकडे रेखून पाहूं लागली. मग सोमदत्त ह्मणाला-भटजी महाराज, त्यांचें वय तरी किती आहे व त्यांचें नांव काय वगैरे तुमचे ध्यानांत आहे काय? भटजी ह्मणाले, त्यांपाशीं आह्मीं आठ दिवस राहिलों होतों, व आह्मांस सर्व माहिती आहे. ते फार वृद्ध आहेत. त्यांचें वय सुमारें पाउणशें वर्षांचें असावें. यांस सर्व तात्यासाहेब ह्मणत असत; पण त्यांचें नांव शांतवर्मा असें आह्मीं ऐकिलें आहे. त्यांची एकुलती एक मुलगी ती कोठें गेली ह्मणून ते फार दुःखी आहेत. आह्मांसही खुणाखाणा सांगून कोठें आढळली काय असें विचारीत होते, व कोणीही पांढस्थ भेटला असतां त्याचा मोठा आदरसत्कार करून त्यासही असेंच विचारतात; परंतु बिचाऱ्यास अद्यापि तिचा कोठें थांग लागला नाहीं! हें ऐकून मुक्तामालेस बराच गहिंवर येऊन तिचे डोळे पाण्यानें भरून आले. हें पाहून सोमदत्तानें आपलें दुःख आंवरून तिला खूण केली. ती समजून तिनें दुसरीकडे तोंड केलें, आणि झोंपेचें सोंग घेऊन दुःख करीत करीत ती निजली मग सोमदत्तानें त्या भटजींस विचारिलें कीं, तुम्हांस त्यांस सोडून किती

दिवस झाले व ते पुढें कोठें जाणार होते? हें ऐकून त्यांनीं सांगितलें कीं, आह्मांस त्यांस सोडून आज आठ दिवस झाले व त्यांच्या तिकडच्या यात्रा करण्याच्या झाल्या. तेही दोनचार दिवसांनीं परतणार होते. असें सांगून भटजी ह्मणाले, तुह्मीं इतकी चौकशी कां करितां? मग हा ह्मणाला–माझा बाप त्यांचें बरोबर यात्रेस गेला आहे, ह्यामुळें चौकशी केली. मग ते ह्मणाले– आठ चार दिवसांत ते तुह्मांस येऊन भेटतील. असें सांगून त्यांनीं ही स्त्री तुमची कोण ह्मणून त्यास विचारिलें; तेव्हां त्यानें सांगितलें कीं, ही माझी बहीण. तिला आणण्याकरितां मी तिचे सासरीं गेलों होतों; परंतु दैववशात् अशी विपरीत गोष्ट घडली, हें ऐकून त्यांनींही फार खेद केला, आणि त्यांस हांतरण्याकरितां आपले जवळची एक घोंगडी दिली. मग रात्र फार झाल्यामुळें ते निजले. सोमदत्तानें मुक्तामालेस झोंप लागली असें पाहून ती घोंगडी तिचे आंगावरच घातली, आणि आपण विचार करीतच निजला. आपला खरा मजकूर सांगून येतील तर त्यांस बरोबर घ्यावें असें एकदां त्याचे मनांत आलें. परंतु विचार करितां करितां तें बरोबर नव्हे असा शेवटीं त्याचा निश्चय झाला.

प्रातःकाळ होतांच त्या धर्मशाळेंतील लोक आपआपल्या मार्गास लागण्याकरितां निघाले; तेव्हां सोमदत्तानें त्या भिक्षुकांची घोंगडी त्यांस दिली. मग ओळखदेख ठेवा असें ह्मणून ते चालते झाले. नंतर सोमदत्तानें राहिलेलें सर्व वर्तमान मुक्तामालेस सांगितलें.

शांतवर्मा ह्याची अशी दुःखकारक दशा ऐकून त्यास विलक्षण वाईट वाटलें, आणि आपण कधीं जाऊन त्यास भेटूं असें होऊन गेलें. मग सोमदत्त ह्मणाला—आतां तजवीज काय करावी? बरोबर एक पैसा नाहीं. ह्याखेरीज तुझ्यानें चालत येणेंही कठीण. मग मुक्तामाला ह्मणाली—माझ्या आंगावर जें कांहीं खिडूकमिडूक उरलें आहे, तें मोडून जें काय येईल त्यावर आपण कशी तरी गुदरण करीत जाऊं, असें बोलून तिनें आपल्या गळ्यांतील वज्रटीक, तांदुळीपोत व गळेसरींत कांहीं सोन्याचे मणि होते तेही काढून दिले, आणि गळ्यांत नुस्तें मंगळसूत्र मात्र ठेविलें. हें तो पाहून मोठ्यानें रडूं लागला. व तें कांहीं केल्यानें आंवरेना. मग मुक्तामालेनें त्याचें अनेक प्रकारें समाधान केलें. नंतर बाजारांत चौकशीकरितां त्या पाउणशें रुपयांचे मालाचे चाळीस रुपये येऊं लागले. परंतु खाराखीर करून उपयोग नाहीं असें समजून त्यानें तितकेच रुपये घेतले. मग तेथें भाड्यानें घोडें मिळेल किंवा नाहीं ह्याची चौकशी केली, तों तेथील लोकांनीं मिळणार नाहीं ह्मणून सांगितलें. त्यांतील एकाचें घोडें विकावयाचें होतें, तो ह्मणाला-विकत घ्याल तर मात्र एक घोडें आहे. ह्यांस गरजच होती; मग जाऊन तें बारा रुपयांस विकत घेतलें; परंतु भाडेकऱ्याचेंही कांहींसें बरें अशा प्रकारचें तें होतें! असो, सरासरी निर्वाह झाला ह्मणजे झालें, असें त्यानें मनांत आणिलें. मग तेथें घोंगड्या मात्र मिळत होत्या त्यापैकीं एक दोन

घेऊन तांदुळ वगैरे सामान घेतलें; परंतु जवळ एका तांब्याखेरीज भांडें नाहीं. नंतर चौकशी करितां एका वाण्याचे घरीं एक गहाणवट तपेली होती ती त्यानें दुप्पट किंमत देऊन विकत घेतली. असो; तेथें भोजन करून सोमदत्तानें घोड्यावर जीन ठेविलें, आणि गोकुळवृंदावनाकडील रस्ता विचारून ते मार्गास लागले. तें घोडें सकाळपासून सायंकाळपावेतों तब्बल सहा कोश मजल करी! असो; अशा रीतीनें तो एका मोठ्या नगरींत आला, आणि मुक्तामालेकरितां त्यानें एक अडीच रुपयांचें लुगडें, आणि व आपणास दीड रुपयाचें पागोटें व एक बारा आण्याचें धोतर व एक पासोडी अशा जिनसा विकत घेतल्या. त्या घेतांना त्यास किती दुःख झालें तें वर्णन करितां येत नाहीं. जी नेहमीं पैठण्या नेसणारी तिला अडीच रुपयांचा सुताडा घेतांना त्यास काय वाटलें असेल, हें वाचणारांच्या लक्षांत येईलच. ह्याचप्रमाणें दीड रुपयाचें पागोटें पाहून मुक्तामालेचे अंतःकरणांत तडतडां टोचूं लागले. असें केलें तरी तीस रुपये खर्च होऊन दहाच शिल्लक राहिले. तर आपला पुढें कसा निभाव लागेल ह्याची काळजी होतीच. ह्याखेरीज त्या बिचाऱ्या सोमदत्तास घोड्याचा खरारा वगैरे चाकरी करावी लागे. तें पाहून मुक्तामालेस जें वाईट वाटे तें सांगतां येत नाहीं. त्यास मजुराप्रमाणें काम करावें लागून चालावें लागे. तेणेंकरून तो अगदीं थकत जाई. तरी मुक्तामाला सकाळसंध्याकाळ शिळोप्याच्या वेळेस आपण कोश दीडकोश हळूहळू चालून

त्यास फार आग्रह करून घोड्यावर वसवी. अशा प्रकारें त्यांनीं दहा दिवस वाट काढिली. शांतवर्मा आपणास वाटेंत कोठें तरी भेटेल अशी त्यांस आशा होती; परंतु चौकशी करितांही त्याची कोणी खबर सांगेना. ज्यास विचारावें तो आह्मांस कांहीं माहीत नाहीं ह्मणून सांगे. मथुरा पुढें सुमारें वीस बावीस कोश राहिली, व तितका मार्ग क्रमून जाण्यास आपल्या शामकर्णास चारपांच दिवस पाहिजेत, असें त्यांस वाटलें. त्या धर्मशाळेंतील भटजींच्या सांगण्याप्रमाणें तो तेथें असेल असेंही नव्हतें. जवळची खर्ची संपत आली. तर यापुढें आपला कसा निभाव लागेल, ही मुख्यत्वेंकरून त्यांस काळजी येऊन पडली.

अशा प्रकारची काळजी करून उपयोग काय, असा विचार करून त्यांनीं ईश्वरावर भरंवसा ठेविला, आणि अकरावे दिवशीं सायंकाळीं तीं एका गांवाजवळ येऊन पोंचलीं. घोडें अगदीं थकून गेल्यामुळें तेथें जाण्यास दिवे लागून गेले. रात्र काळोखी, तेव्हां घोड्यास चारा, आपणास पाणी वगैरे आणण्याची कशी काय तजवीज होईल,ह्याविषयीं सोमदत्ताचे मनांत काळजी आली. असो, गांवांत येऊन धर्मशाळेची चौकशी करितो तों लोकांनीं सांगितलें कीं, तुह्मांस आतां येथें जागा मिळावयाची कठीण. धर्मशाळेंत एक सरदार येऊन उतरला आहे; तर तेथें जागा रिकामी राहिली असेलसें वाटत नाहीं; परंतु जाऊन पहा,तुह्मी दोघेंच आहां. एकाद्या कोपऱ्यांत मिळाली तर मिळाली. असें ऐकून सोमदत्तास फारच

वाईट वाटलें, आणि घोडें धरून तो त्या धर्मशाळेकडे गेला; तों तेथें घोडीं, मेणें, शिपाई, आणि भोई ह्यांची एकच गर्दी त्यानें पाहिली. ते नुकतेच येऊन उतरल्यामुळें सामान वगैरे लावण्याची एकच गडबड चालली होती. आंतले बाजूस मात्र दिव्याचा प्रकाश दिसत होता. चाकर लोक आंत सामान घेऊन जात आहेत; ह्यांत आपली रीघ होणें कठीण असें सोमदत्तास वाटलें; परंतु करतो काय! रात्र तर काढिली पाहिजे. आपण ह्यांतच एका कोपऱ्यांत उतरूं असें मनांत आणून त्यानें मुक्तामालेस घोड्यावरून खालीं उतरिलें, आणि घोडें पडवीचे खांबास गुंतवून पडशी खांद्यावर घेतली. मग आंत जाऊन जागा आपलीशी करून व ओझ्यापाशीं मुक्तामालेस बसवून घोडें बांधण्यास यावें अशा बेतानें तो तिला हातीं धरून आंत शिरला, आणि पाहतो तों एके बाजूचे सोप्यांत दिवे असून फार गर्दी दिसली व दुसरे बाजूस दिवे नसून शिपाई वगैरे लोक आपआपलें सामान ठेवून जागा आंखून टाकीत होते, तिकडचेच बाजूस हा एका कोपऱ्यांत शिरला, आणि पडशी खालीं ठेवितो तों, 'कोण आहे' ह्मणून एका शिपायानें विचारिलें. मग 'आह्मी वाटसरू आहों' असें ह्यानें सांगितलें; तेव्हां तो दरडावून ह्मणाला कीं, 'ही सगळी जागा आमच्या लोकांना पाहिजे, तुह्मी दुसरीकडे जा.' हें ऐकून हा मोठ्या नम्रतेनें ह्मणाला-शिपाईबोवा, आतां इतक्या रात्रीं आह्मी दुसरीकडे कोठें जावें? आणि ही धर्मशाळा; तर तुह्मीच येथें रहावें आणि आह्मी न रहावें

असें नाहीं. हें ऐकून त्या समशेरबहादुरास मोटा राग आला, आणि त्यानें येऊन ह्याची पडशी फेकून दिली आणि एक धक्का मारून बाहेर जा ह्मणून सांगितलें.

अशा प्रकारची त्याची उर्मट वर्तणूक पाहून मुक्तामालेस फारच राग आला. मग ती त्यास ह्मणाली— असा उंडावरून कशानें गेलास! ही कांहीं धर्मशाळा तुझी नाहीं. हें ऐकून तो रागानेंच ह्मणाला—अग जा, अशा तुझ्यासारख्या पुष्कळ पाहिल्या आहेत. असा त्यांचा संवाद चालला आहे, तों यजमान गड्यानें कंदील धरिला असून बहिर्देशेस जाण्याकरितां दरवाज्या पाशीं आले होते, त्यांनीं हें ऐकिलें. मग काय आहेरे? ह्मणून विचारिलें, तेव्हां त्यांचा दयाळू स्वभाव शिपायांस माहीत असल्यामुळें त्यांनीं कांहींच उत्तर दिलें नाहीं. सोमदत्तानें त्या शिपायानें फेकून दिलेली पडशी उचलून नुकतीच खांद्यावर टाकिली होती. मग शिपायाची दुष्ट वर्तणूक त्या यजमानाचे कानावर घालण्याकरितां तो तसाच पुढें सरला, व त्याच हेतूनें मुक्तामालाही तेथें आली. ह्या दोघांस पाहून त्यानें पुनः काय आहे ह्मणून विचारिलें. हीं दोघेंहीं त्या कडेसच रोखून पाहत स्तब्ध उभीं राहिलीं. एकाचेही तोंडांतून अक्षर निघेना सोमदत्ताचे खांद्यावरील पडशी घसरून धाडदिशीं खालीं पडली; हें पाहून त्यास मोटा चमत्कार वाटला. मग तुह्मी कोण आहां? बोलत कां नाहीं, असें पुनः त्यानें विचारलें. तें ऐकतांच मुक्तामाला त्याजकडे धांवली. तें पाहून तो मागें सरूं लाग-

ला, आणि ह्मणाला–ही असें काय करते? वेडीविडी आहे कीं काय? असें तो ह्मणत आहे इतक्यांत तिनें त्यास मिठी मारली, आणि मोठ्यानें ह्मणाली–बाबा, तुह्मीं मला ओळखिलें नाहीं काय? असें ती बोलत आहे इतक्यांत सोमदत्तही मोठ्यानें ह्मणाला ताल्या, ही मुक्तामाला! तुह्मीं तिला ओळखिलें कसें नाहीं? हे अमृतासारखे दोघांचे शब्द ऐकतांच त्या ह्मातान्याचा आनंद त्रिभुवनांत माईनासा झाला. मग तिला पोटाशीं धरून तो ह्मणाला–जवळ उजेड असतां तुह्मां दोघांसही मी ओळखिलें नाहीं! अशी तुमची अवस्था कशानें झाली? हें ऐकून तिनें मोठ्यानें हंबरडा फोडिला, आणि ह्मणाली–बाबा, मला त्या दुष्टानें गांजलें हो गांजलें! माझें काळीज दुःखानें करपून गेलें. तुमची भेट घेण्यास वांचलें हेंच मोठें भाग्य माना! अशी ती बोलत आहे इतक्यांत भाग्यशीला, मुक्तामालेची सासू व आश्रितमंडळी जमून एकच गर्दी झाली. तिचे ते दीनवाणे शब्द ऐकून सर्वांस भडभडून रडूं आलें. मुक्तामालेनें आईस पाहतांच तिचे गळ्यास मिठी मारली व मोठ्यानेंच रडूं लागली. सोमदत्त दीनासारखा रडतच तेथें उभा राहिला होता. त्यास शांतवर्मा पोटाशीं धरून घळघळां रडूं लागला. असा एकच आकांत होऊन कांहीं वेळानें सर्व उगीच राहिलीं.

अशा प्रकारें कांहीं वेळ गेल्यानंतर मुक्तामाला व सोमदत्त मध्यें असून त्यांसभोवतीं सर्वांनीं गराडा घातला. व शांतवर्मा ह्यानें दिवा आणण्यास सांगितलें. मग मध्यें दिवा आणून ठेवितांच त्या दोघांची दीनवाणी

मुद्रा सर्वांचे दृष्टीस पडली, तेणेंकरून सर्वांचे पोटांत तडतडां तोडूं लागलें. मुक्तामाला तो अडीच रुपयांचा सुताडा नेसली होती, आंगावर फुटका मणीही नाहीं, चोळीही फाटकी, उन्हानें व जिवावरील संकटांनीं तिचे रूपांत इतकें अंतर पडलें होतें कीं, साधारण परिचितासही रेखून पाहिलें तरी ओळखतां येऊं नये. ह्याच प्रमाणें सोमदत्ताचीही अवस्था झाली होती.डोक्यास दीड रुपयाचें पागोटें व आंगावर हलकीं व फाटकीं धोतरें, तेणेंकरून त्यास तेलंग्याचीच कळा आली होती. अशी त्यांची दैना पाहून शांतवर्मा यास फारच वाईट वाटलें. मग त्यानें तिला विचारलें कीं, तुझी अशी दशा कोणी केली? हें ऐकून सर्व दुःखें तिजपुढें येऊन उभीं राहिलीं. नंतर मोठ्यानें सुस्कारा टाकून ती ह्मणाली—बाबा, हें सर्व शुक्लाक्षाचें कृत्य! तुह्मी लहानपणापासून त्याचें लालनपालन करून कल्याण केलें,त्याचे त्यानें सव्याज उपकार फेडले ! हें ऐकून त्यास विलक्षण आश्चर्य वाटलें, आणि चपापून व भिंवया वर करून तो ह्मणाला—काय ह्मणतेस? तुला शुक्लाक्षानें गांजिलें? खरेंच सांग! अग, हे शुक्लाक्षानें तुझे हाल केले काय?—पुनः ती आवेशानें ह्मणाली—"हो! हो! त्यानेंच! बाबा, शुक्लाक्षानेंच! त्यानें एक दोनदां मला ठार मारण्याचाही प्रसंग आणला; परंतु ईश्वरकृपेनें मी तुह्मांस भेटण्याकरितां वांचलें, आणि मजप्रमाणेंच दुःख सोसून त्या दुसऱ्या काळाचेही तोंडांतून या सोमदत्तानें मला सोडवून आणिलें." असें बोलत आहे इतक्यांत तिला आपल्या बालकाची आठ-

वण झाली. मग काय ! मोठ्यानेंच घसा काढून ती म्ह-णाली–बाबा, माझें चार महिन्यांचें सोन्यासारखें बालक· हीं त्या मेल्या शुक्लाक्षानें नेलें हो! आतां मी त्याला कोठें पाहूं! त्याला दया कोठून येणार? त्यानें त्याचा प्राण घेतला असेल. अरे कमलाक्षा, कोठेंरे आहेस ! अशा प्रकारें तिनें रडून एकच आकांत केला. तें ऐकून शां-तवर्मा, भाग्यशीला वगैरे सर्वांची तशीच अवस्था झाली. मग शांतवर्मा ह्यानें आपला शोक आंवरून तिला पोटा-शीं धरिलें, आणि तोंडावरून हात फिरवून तो ह्मणाला " बये, आतां मजकडे बघ, कोणत्या गोष्टीचा म्हणून शोक करशील? तुजवर आकाशच कोसळलें आहे!" अशा अनेक प्रकारें त्यानें तिचें सांत्वन केलें.

शांतवर्मा ह्यास हीं दोघेंही भेटल्यामुळें फार आनंद झाला; परंतु मुलगा होऊन त्याचा वाईट परिणाम झाला ह्यामुळें त्यास तसेंच दुःखही झालें. हा सर्व अनर्थ शुक्लाक्षानें केला असें ऐकून तर त्याचे सर्वांगाची आगच होऊन गेली. इतक्यांत तिसरीच काळजी त्याचे मनांत आली, ती अशी कीं, अशा समयीं हिला पतीचें वर्तमान सांगितलें तर हीं फारच अनर्थ करील; परंतु न सांगूनही उपयोग नाहीं. कारण तिला आजपासून दहा दिवस अशौच धरिलें पाहिजे. तर न सांगून तिच्याशीं व्यवहार कसा करावा ? असें मनांत आलें, तरी त्याच्यानें तिला तें सांगवेना. अशा विचारांत तो आहे इतक्यांत मुक्तामालेनें त्यास विचारलें कीं, जयपुरा-कडील कशी काय खबर आहे ? असें ऐकतांच त्यानें

मान खालींच घातली. भाग्यशीला व मुक्तामालेची सासू ह्यांनीं हंबरडा फोडून मोठ्यानें रडण्यास आरंभ केला. हें पाहून ती मनांत समजलीच. मग तिनें गडबडा लोळून जो शोक केला तो सांगतां पुरवत नाहीं. तिजबरोबर सर्वही शोकांत निमग्न होऊन गेलीं. तें दुःख मनांत येऊन सोमदत्ताचे काळजास घरेच पडले. मुक्तामालेचा शोक कांहीं केल्यानें आंवरेना. मग सोमदत्तानें पुढें होऊन तिला पोटाशीं धरिलें आणि हनवटीस हात लावून डोळे पुसून ह्मणाला—बाई आतां शोक कुठवर करशील ? आतां अमुक झाल्यानें तुला सुख होईल असें सांगण्याची वाट खुंटली; तुला काय सांगून समाधान करावें, हें मला सुचत नाहीं. तर त्या तुझ्या वृद्ध आईबापांकडे पहा ! शोक करून त्यांचीं नुस्तीं हाडें मात्र उरलीं आहेत. आतां तुझाही उपाय नाहीं, तुझ्या सुखाचें मूळच त्या दुष्टानें खणून टाकिलें; परंतु करावयाचें काय ? तूं विचारीच आहेस. सर्वांस थोडेंबहुत सुख देणें तुजकडे आहे, हें ऐकून ती स्फुंदतस्फुंदतच ह्मणाली—सोमदत्ता, तूं सांगतोस हें सर्व माझे लक्षांत आहे; परंतु काय करूं ? पोटांतून वरचेवर कढ येतात ते माझे मला आंवरत नाहींत. माझे मनांत हें पूर्वींच आलें होतें कीं, जो माझा प्राण घेण्यास इतका यत्न करीत आहे तो तिकडे प्राण घेण्यास कधीं चुकणार नाहीं. शेवटीं त्या दुष्टानें तसें केलेंना ! मी मरतां मरतां हें ऐकण्यास कशाला वांचलें ? माझा कमळाक्षही गेला, आतां मी काय करूं ! सोमदत्ता, कायरे

हौस होती! मजवर किती मर्जी! किती गोड बोलाव-याचें! तें सर्व स्वप्नासारखें झालेंना! हें ऐकून सर्वांचीं अंतःकरणें खळबळून गेलीं. मग सोमदत्त ह्मणाला—आतां तें कांहीं मनांत आणूं नको. आमचेकडे पहा; तुझें दुःख पाहून आमची सर्वांची काय अवस्था होत असेल हें मनांत आण. असें अनेक प्रकारें त्यानें तिचें सांत्वन केलें, तों प्रातःकाळ झाला. ती सर्व रात्र खाण्यापिण्यावांचून ह्या दुःखांतच निघून गेली.

प्रातःकाळ झाला असें पाहून हळुहळु सर्व तेथून उठून आपआपल्या नित्यक्रमास लागलीं. सर्वांचीं स्नानें झालीं. मुक्तामालेसही डोईवरून आंग धुऊं घातलें! त्या बिचारीच्या मंगलस्नानाची येथें समाप्ति झाली! आज किती महिने नहाण नसल्यामुळें तिच्या केसांचे पेड वळून त्यास घाणही सुटली होती. असा एकच प्रकार काय? सर्व प्रकारें तिची ती दीनवाणी दशा पाहून सर्वांचें अंतःकरण दुःखमय होऊन गेलें. अशौचामुळें मुक्तामाला एकीकडे होतीच. मग भोजन झाल्यावर ती कोणाशीं न बोलतां दुःख करीतच एका कोपऱ्यांत निजली. तिला आणखीं दुःख न व्हावें ह्या हेतूनें तिला झोंप लागली असें पाहून शांतवर्मा ह्यानें सोमदत्तास जवळ बोलाविलें आणि पहिल्यापासून काय हकीकत झाली ती सर्व सांग ह्मणून सांगितलें. तेव्हां त्यानें मुक्तामाळा घरांतून बाहेर पडल्यापासून सांगण्यास आरंभ केला. तेव्हां सर्वांनीं त्यासभोंवतीं कोंडाळें घातलें. मग त्याचे तोंडचें साद्यंत वर्तमान ऐकून त्यांचे आंगावर कांटा

उभा राहिला. डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या आणि अशा संकटांतून ती वांचली हें भाग्यच अशी सर्वांची खात्री होऊन गेली. शुक्लाक्षाचें तें घोर चरित्र ऐकून शांतवर्मा ह्याच्या सर्वांगाची आग झाली आणि ह्मणाला–मी लहानपणापासून त्यास बाळगून जें त्याचें कल्याण केलें त्याचे त्यानें चांगल्या रीतीनें उपकार फेडले, आज माझें वयास पाऊणशें वर्षें झालीं; परंतु अशा प्रकारचा कृतघ्न पुरुष माझे पाहण्यांत व ऐकण्यांतही आला नव्हता. त्याची छाती तरी केवढी ! अशीं घातुक कृत्यें करून मजकडे येतो, आणि मानभाव्यासारख्या गहिंवर आणून रडून माझें समाधान करितो! असो, मी आपला धर्म केला व त्यानें माझा असा सर्वस्वीं नाश केला ! ह्याबद्दल ईश्वर त्यास तसेंच शासन करील ह्यांत संशय नाहीं. असें बोलतांना सायंकाळ झाला. मुक्तामाला उठून उगीच त्या कोपऱ्यांत बसली. तिकडे पाहून सर्वांचे मनांत आलें कीं, हिनें त्या गुहेंत व बेटांत एकटीनें कसे दिवस काढिले असतील ? धन्य तिची छाती !

असें ह्मणून जो तो आपआपल्या    आश्चर्यच करूं
लागला, व शुक्लाक्षाचें कृत्य मन    न तो काळपु-
रुषच असावा असें त्यां सर्वांस वा    लें. असो, अशा
प्रकारच्या दुःखांतच ते अशी    दहा दिवस त्या
धर्मशाळेंत गेले. अकराव्या दिव    ा धुऊन मुक्ता-
माला मोकळी झाली. तेव्हां    आंगावर घाल
असें भाग्यशीला ह्मणाली. तेव्हां हें    देवसांचें कोरडें
सौभाग्य मला कशाला पाहिजे,    ह्मणून तिनें नको

ह्मणून सांगितलें, आणि उंची लुगडेंही न नेसतां हल-केंसें एक साधें पातळच नेसली. तें पाहून सर्वांचे अंतःकरणास गहिंवर आला; परंतु तो बाहेर दाखवावा तर तिला त्याच्या शतपट दुःख होणार, ह्मणून त्यांनीं तो आंतले आंतच आंवरला. असो; शांतवर्मा ह्याची हिकडची तीर्थयात्रा संपलीच होती. मग दुसरे दिवशीं घरीं जाण्याच्या बेतानें तो मार्गास लागला.

सुमारें सात आठ दिवस मार्ग क्रमून तो सर्व खटल्या-सुद्धां एका तीर्थी आला. तेथें उपाध्यायांनीं मुक्तामालेस सोंवळी करण्याविषयीं शांतवर्मा ह्यास सुचविलें. तें ऐकून ती गोष्ट कर्त्तव्य तर खरीच; परंतु त्यास फार वाईट लागली. तिला ही गोष्ट सांगण्याचें सर्वांचेच जिवावर आलें. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं ही गोष्ट करणें, तर तेव्हांच तिला सांगतां येईल, असें ह्मणून सर्वांनीं शयन केलें. मुक्तामाला ती कुणकूण ऐकूनच काय आहे तें मनांत समजली. मग तिला झोंप कोठून येणार! तिचे मनांत आलें कीं, आपण जन्मास येऊन काय केलें व कोणते सोहळे भोगिले! मला समजूं लागल्यापासून तों आज ह्या दिवसपर्यंत थोडेच दिवस सुखतां गेले, असें सहज तिचे लक्षांत आलें. आणि आतां पुढें तर हा सारा जन्म विरूप होऊन दुःखांतच काढावयाचा, असें तिच्या मनांत येऊन तिला फार वाईट वाटलें; कोणतीच हौस पुरली नाहीं. डागडागिना, उंचीं उंचीं वस्त्रें, चौघी बायकांत मिरवत जाणें, आपल्या घरीं मुलाचें लग्नकार्य होणें, व्रतवैकल्यें वगैरे या सर्वांस मी मुकलें. प्रसंगीं पुढें गेल्यास लोकांनीं तिरस्कार

करावा असेच दिवस आतां प्राप्त होणारना? ह्यापेक्षां सहगमन करण्याचा प्रसंग आला असता तरी बरें झालें असतें. जर माझा कमलाक्ष असता तर त्याच्या सुखानें तरी हे दिवस काढले असते. आतां लवकरच आपला अंत होईल तर फार बरें, असें तिला वाटूं लागलें. ह्या काळजींत पडल्यामुळें सर्व रात्रींत तिला झोंप आली नाहीं.

प्रात:काळ होतांच सर्व उठून आपापल्या नित्य-कृत्यांस लागले. मुक्तामालेची मुखश्री पाहूनच तिला आजचा बेत कळला असावा असें शांतवर्मा ह्यानें अनुमान केलें. त्याचीही मुखश्री त्या दु:खामुळें अगदीं म्लान होऊन गेली. तिची आई, सासू यांच्या व आश्रितमंडळी वगैरेंच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. हे ज्या धर्मशाळेंत उतरले होते तिचे समोरच एक सोपा होता. त्यांत कांहीं बैरागी उतरले होते, त्यांस ह्यांचें दु:ख पाहून फार वाईट वाटलें. मग त्यांतील एक बैरागी पुढें येऊन शिपायांस, हीं सर्व मनुष्यें दु:ख कां करितात, ह्मणून विचारूं लागला. तो बिचारा काय सांगतो! "मला ठाऊक नाहीं" असें ह्मणाला. मग तो शांतवर्मा ह्याजपाशीं येऊन विचारूं लागला; तेव्हां तो ह्मणाला—बाबा, तें दु:ख माझ्यानें सांगवत नाहीं व सांगून तरी उपयोग काय? मग बैरागी ह्मणाला—मला सांगाल तर तुमचें दु:ख मी दूर करीन. असें ऐकतांच शांतवर्मा त्याचे तोंडाकडे पाहूं लागला; तों सोमदत्त, भाग्यशीला वगैरे तेथें जमलीं. सोमदत्तानें रेखून पाहून तुमचें नांव काय,

तेव्हां "कधींच थंडी वाजूं नये अशी लवकरच तजवीज होईल!" अशा त्याच्या कठोर शब्दांनीं माझे अंतःकरणास जे घरे पडले आहेत, ते अद्यापि बुजले नाहींत. हें ऐकून सर्वांचे आंगावर कांटा उभा राहिला, व जवळच आड उभी राहून मुक्तामाला ऐकत होती तिचीही तशीच अवस्था झाली. नंतर त्यानें एके दिवशीं मला अम्मल देऊन रात्रीं चिरगुटांत माझी मोट बांधून खालचे बाजूस डोह आहे त्यांत नेऊन टाकिलें; परंतु ईश्वरास करुणा! तेथून जवळच कोळी लोक मासे धरीत होते. त्यांनीं कोणी जीव दिला असें समजून लागलीच माझी मोट बाहेर काढिली, आणि शेकटी करून शेकून मला सावध केलें. मग मला त्यांनीं ओळखतांच त्या बिचाऱ्यांस माझी मोठी दया आली, तेव्हां ही गोष्ट कोणापाशीं बोलूं नका असें मी त्यांस सांगितलें; परंतु काय! चालण्यासही शक्ति नाहीं अशी माझी अवस्था झाली होती. ते लोक तेथून एक कोशावर खेडें आहे तेथें रहात होते. मग त्यांनीं मला उचलून आपल्या घरीं नेलें. त्या दुष्टास कदाचित् बातमी लागल्यास तो माझा प्राण घेईल ही भीति होतीच; परंतु त्या लोकांचे मी कुठवर उपकार आठवूं! त्यांनीं मी सांगितल्याप्रमाणें वागून बाहेर मागमूसही लागूं दिला नाहीं. असो; मला हिंडूं फिरूं लागण्यासारखा बरा होण्यास चार पांच महिने लागले. तोंपर्यंत त्या लोकांनीं मला कोणतेंही कमी पडूं दिलें नाहीं. त्यांचे उपकार माझे हातून कधीं फिटतील ते फिटोत. मग मी तेथून रात्रीं निघून

मोठ्या तजविजीनें मनांत मोठी आशा धरून इरावतीस आलों; परंतु काय! माझी अगदीं निराशा होऊन फारच दुःख झालें. कोणाचाच कोठें थांग नाहीं असें पाहून आपणही त्या त्रासानें तीर्थयात्रेस गेलां असें ऐकिलें. तेव्हां तर चित्तास फारच पश्चात्ताप होऊन असें वाटलें कीं, त्या कोळ्यांनीं मला बाहेर काढिलें नसतें तर बरें झालें असतें. मग मी वाड्यांतही न जातां तसाच बाहेर पडलों, आणि पूर्वी पाहिलेला वेष धारण करून फिरतां फिरता मोठ्या चमत्कारिक समयास आपली ही गांठ पडली. असें जामाताचें वर्तमान ऐकून शांतवर्मा ह्यानें दुःखाचा सुस्कारा टाकिला, आणि ह्मणाला—असो; ईश्वरासच करुणा आल्यामुळें त्यानें मजवरील आजचा प्रसंग टाळला. नाहींपेक्षां पुढें एक दोन दिवसांनीं तुमची गांठ पडली असती ह्मणजे माझ्या दुःखाचा कळसच झाला असता. आतां माझ्या मुक्तामालेनें व सोमदत्तानें जे संकटाचे दिवस काढिले ते माझ्यानें सांगवत नाहींत. हळुहळू सर्व तुमचे कानीं येतीलच. आज तुमची गांठ पडल्यानें आमच्या बहुतेक दुःखाचा परिहार झाला; परंतु एक कमी आहे तेवढें असतें तर मजसारखा दैववान कोणीच नव्हता. असें बोलतांना ह्मातान्याचे डोळ्यांतून पाणी आलें, तें पाहून सर्वांसही गहिंवर आला. त्यावरून आपणास बालक होऊन तें मरण पावलें असें धनशंकरानें अनुमान केलें; परंतु लज्जेस्तव त्याला खरा मजकूर काय आहे तो विचारतां येईना. इतक्यांत सायंकाळ झाला असें पाहून सर्व देवदर्शनास निघून गेले.

ह्मणून त्या बोवास विचारिलें. त्यानें आमचें नांव बोवा ह्मणून सांगितलें. मग सोमदत्त ह्मणाला—आह्मीं दुःखानें पोळून निघालों आहों, तर त्रास न देतां लवकरच काय असेल तें सांगा. असें ऐकतांच त्याचे डोळ्यांतून पाण्याच्या धारा चालल्या, आणि मग तसेंच त्यानें शांतवर्मा ह्याचे चरणावर मस्तक ठेविलें. त्यासही पूर्वी थोडा संशय आला होता. मग शांतवर्म्यानें त्यास उचलून पोटाशीं धरिलें. इतक्यांत त्याची आई धांवली आणि धनशंकरास पोटाशीं धरून तिनें सर्व दुःख आठवून जो विलाप केला तो वर्णन करितां येत नाहीं. तें ऐकून त्यालाही तसाच शोक झाला. मग कांहीं वेळानें त्यानें अनेक प्रकारच्या उपदेशपर गोष्टी सांगून तिचें सांत्वन केलें. मुक्तामालेची मुखश्री म्लान झाली होती ती ह्यास पाहतांच टवटवीत झाली. तिजवर आज जो प्रसंग आला होता तो मनांत आणून तिला यावेळीं किती आनंद होईल याचें वाचणारांनींच अनुमान करावें. धनशंकरास पाहून सर्वांस आनंदच आनंद होऊन गेला. मग त्या दिवशीं धनशंकरानें त्याच तीर्थीं आपल्या जटांचें विसर्जन केलें, आणि चाकराकडून उटणें लावून मंगलस्नानही केलें. मग उत्तम वस्त्रें नेसल्यानें त्यास कांहींशीं कळा आली. ह्याचप्रमाणें मुक्तामालेनें अभ्यंगस्नान करून वस्त्रालंकार धारण केले. तेव्हां शांतवर्मा ह्यानें तेथील गरीबगुरीबांस व आपल्या पदरच्या लोकांस मिळून हजार दोन हजार रुपये धर्म केला, आणि पंचपक्वानें करून तेथील सर्वांस भोजन घालून

वृत्त केलें. त्या समयीं मुक्तामालेच्या लग्नांतही कोणास झाला नव्हता इतका आनंद सर्वांस झाला.

भोजन होऊन पानसुपारी व गुलावअत्तर झाल्यानंतर तेथील सर्व मंडळी आपआपल्या घरीं मोठ्या आनंदानें निघून गेली. मग धनशंकराविषयींचें वर्त्तमान भलतेंच असून हा जिवंत कसा राहिला हें ऐकण्याविषयीं सर्व उत्सुक आहेत, हें पाहून त्यानें तें सर्व सांगण्यास आरंभ केला. तो ह्मणाला–त्या शुक्राक्षाचे सपाट्यांतून तुह्मी सर्व वांचाल अशी मला आशा नव्हती; परंतु तुह्मां सर्वांस पाहून ईश्वराचें कौतुक चमत्कारिक आहे अशी माझी आज खात्री झाली. त्यानें सर्व कुलक्षय करण्याचा बेत केला होता; परंतु त्या जगदीशाच्या दयेनेंच हा आनंदाचा दिवस दृष्टीस पडला. असो; बंडवाल्याच्या संकेताची बातमी मी दिली असतां त्यानें राजास भलतेंच समजाविलें; व माझ्या रुमालांत व खिशांत ज्या बंडप्रकरणीं चिठ्या सांपडल्या त्या फत्तेसिंगाकडून त्यानेंच आणून ठेविल्या असें मागाहून विचार करितां माझे लक्षांत आलें; परंतु त्या गोष्टीस इलाज राहिला नाहीं. त्याचा हा विलक्षण प्रतीचा कृतघ्नपणा बंदींत पडल्यावर माझे अनुभवास आला. त्यानें तेथें असतां जे माझे हाल केले ते सर्व सांगितल्यानें तुह्मांस दुःख मात्र होईल. तर एकच गोष्ट सांगतों ती ही कीं, मी रात्रंदिवस उघडा असल्यामुळें थंडी, ढेकूण व पिसा ह्यांच्या उपद्रवानें जेव्हां फारच त्रास झाला, तेव्हां दीनवाण्या तोंडानें त्याजपाशीं पांघरण्यास एक धोतर मागितलें,

पोटांत ढवळलें. मग तिनें त्या गड्यांस विचारिलें कीं, बाबांनो, ह्या मुलाची आई कोठें आहे? हें ऐकून ते ह्मणाले–त्याला आईकडेच घेऊन जात आहों. असें त्याचें बोलणें चाललें आहे तों दुधाचें भांडें हातांत घेऊन गुलालसिंग तिकडून आला! त्यास पाहतांच मुक्तामालेस विलक्षण आनंद झाला; परंतु हा मुलगा आपलाच ही मात्र तिची खात्री झाली नाहीं. मग जवळ येऊन मुलगा रडत आहे असें पाहून तो ह्मणाला बाईसाहेब, पाहतां काय? तो भुकेमुळें रडत आहे, त्याला अधीं उचलून घ्या. असे त्याचे अमृतासारखे शब्द ऐकतांच तिनें त्यास उचलून पोटाशीं धरिलें आणि पान्हा आलाच होता, मग तिनें त्याचे तोंडांत स्तन दिला. इतक्यांत हास्यवदन करीत धनशंकर तिकडून येत आहे असें पाहून ती लाजली आणि त्यास पोटाशीं धरून आनंदानें झट्कन् उठून जाऊन मेण्याचे आड बसली.

इकडे गुलालसिंगानें मोठ्या नम्रतेनें शांतवर्मा व सोमदत्त ह्यांस रामराम केला, आणि वर पहात आहे इतक्यांत त्यानें आपला दयाळु यजमान तिकडून येत आहे असें पाहिलें. तेव्हां त्याचे आनंदास तर पारावार नाहींसा झाला. मग धांवत पुढें जाऊन त्यानें त्याचे पायांवर डोई ठेविली, आणि रडूं लागला. धनशंकरानें त्यास उचलून पोटाशीं धरिलें आणि ह्मणाला–आतां कशाकरितां शोक करितोस? तुझ्यामुळें मी हे दिवस पाहिले. तुझे उपकार ह्या जन्मांत माझ्यानें फिटायाचे नाहींत. आजच्या तुझ्या भेटीनें मला काय, परंतु येथील सर्वांसच जो आनंद झाला

आहे तो सांगवत नाहीं. मग त्यानें आपणास मुलगा कसा सांपडला वगैरे सर्व हकीकत सांगितली, आणि ह्मणाला - मी ह्यास इरावतीस घेऊन चाललों होतों; परंतु मध्येंच ईश्वरानें हा दिवस आणिला, आतां मी काळजींतून सुटलों. मला तरी आपल्या ठिकाणास मुलासुद्धां सुखरूप कसा पोंचेन ही मोठीच दहशत होती. हें ऐकून त्याच्या चांगुलपणाचें सर्वांस आश्चर्य वाटलें. मग शांतवर्मा ह्यानें दोनशेर सोन्याचें कडें व मोठें पागोटें, व शेला असें त्यास बक्षीस दिलें व जे गडी बरोबर आणले होते त्या प्रत्येकासही पन्नास पन्नास रुपये देऊन संतुष्ट केलें.

मुक्तामाला प्रेमानें आपल्या मुलाचे मुके घेऊन त्यास कुरवाळीत आहे इतक्यांत तिची सासू व आई ह्या दोघीही तेथें आल्या आणि त्या मदनासारख्या मुलास पाहून आपणास आज ईश्वरच भेटला कीं, काय असें त्यांस होऊन गेलें. मग त्याच्या तोंडावरून हात फिरवून मोठ्या प्रेमानें त्या त्याचें चुंबन घेऊं लागल्या. मुलास कांहीं समजत नव्हतें तरी तो गालांत हसूं लागला, तें पाहून त्यांस मोठें कौतुक वाटलें. अशा आनंदांत ह्या आहेत इतक्यांत सोमदत्त तेथें गेला, आणि मोठ्या आनंदानें त्या मुलास घेऊन खेळवीत खेळवीत शांतवर्मा ह्याजपाशीं घेऊन आला. त्या ह्मातान्यास अगोदरच मोठा आनंद झाला होता. मग त्यानें मोठ्या कौतुकानें त्यास मांडीवर घेऊन हातानें चुटक्या वाजवून तो त्यास खेळवूं लागला. आणि त्याचें हास्यवदन पाहून त्याचे ह्रदयांतून आनंदाच्या उखाळ्या वरचेवर येऊं लागल्या. कांहींवेळ गेल्यावर त्याची

धनशंकरही मुखप्रक्षालन वगैरे करून येत आहे तों शांतवर्मा त्याची वाट पहात बसलाच होता, त्यास नमस्कार करून जवळच तो बसला. मग शांतवर्म्यानें ह्यास विचारिलें कीं, आतां कसें करावें ? राजाचा पूर्वीप्रमाणेंच अनीतीचा क्रम चालला असेल तर तिकडे जाऊन आणखी दुसऱ्या एकाद्या मोठ्या संकटांत पडावें, त्यापेक्षां इकडेच कोठें तरी सुखांत दिवस काढावे हें मला बरें वाटतें. असें ऐकून धनशंकर ह्मणाला— आतां आपण कांहीं काळजी करूं नये. झाल्या गोष्टीचा कोणत्या प्रकारें न्याय होतो हें मला पहावयाचें आहे. शांतवर्मा ह्यास त्याचे शहाणपणाची खात्री होती ह्मणून त्यानें त्याचे वचनास रुकार दिला. मग भोजन वगैरे आटोपून ते मार्गास लागले. सुमारें पंधरा दिवस मार्ग क्रमून एके दिवशीं प्रातःकाळीं सुमारें नऊ वाजतां भोजन करण्याच्या बेतानें ह्यांची स्वारी वाटेवर एक गर्द आंबराई लागली तींत जाऊन उतरली. तेथें दुसरेही कित्तीएक पांथस्थ लोक उतरले होते. त्यांत दोघे गडी पाळण्याजवळ असून मुलास खेळवीत आहेत, असें कांहींसें दुरून मुक्तामालेनें पाहिलें. तो मुलगा सुमारें वर्षा सवा वर्षाचा होता. मग मुक्तामाला पुढें गेली आणि त्यास रेखून पाहतां, आपलाही असाच मुलगा होता, असें तिला वाटलें व तिचें डोळ्यांस पाणी येऊन पान्हा फुटला. ती अशा दशेंत आहे तों शांतवर्मा व सोमदत्त हेही तेथें आले. ते गडी खेळवीत होते तरी त्या बालकास फार भूक लागली होती ह्मणून तें रडूं लागलें. तें पाहून मुक्तामालेचे

क्षुधा शांत झाली नसल्यामुळें तो पुनः रडूं लागला. मग शांतवर्मा ह्यानें स्वतः नेऊन त्यास मुक्तामालेपाशीं दिलें; तेव्हां तिचें प्रफुल्लित वदन पाहून त्यास अतिशयितच समाधान वाटलें. मग त्यानें ह्याच्या भुकेची अधीं तज-वीज कर असें तिला सांगितलें. असो, एवंच त्या दिवशीं सर्वांचीं अंतःकरणें सुप्रसन्न व आनंदित होऊन गेलीं. मग भोजन आटोपून तेथून निघाले, ते मोठ्या आनंदानें एक दोन दिवसांनीं इरावतीस येऊन पोंचले.

इकडे भयानक व त्याचें प्रधानादि पंचक ह्यांचा क्रम पहिल्याप्रमाणेंच चालू असून ते प्रजेस त्रास देत आहेत, असें मागें सांगितलेंच आहे; व राज्यांतील जहागीरदार व माजी कारभारी व सरदार निरनिराळ्या ठिकाणीं एकत्र मिळून विचार करीत आहेत हें मा-गें दर्शविलेंच आहे. तर जेव्हां शुक्लाक्ष, कृतकार्य हो-ऊन राजधानींत येऊन पोंचला, तेव्हांच त्या जहा-गीरदारांदिकांचे विचार परिपक्व होऊन गेले होते. मागचे प्रमाणें आपला मोड न व्हावा ह्याविषयीं त्यांनीं फारच दूरवर लक्ष दिलें होतें. जयपुरास दहा बारा हजार फौज होती, तींतीलही अर्धी अधिक त्यांनीं फि-तूर केली होती. भयानकाचा कनिष्ट बंधु विशालाक्ष हाही पूर्वीपेक्षां अधिक अनुकूळ होता. भयानक आप-ल्या पंचकासुद्धां विलासांत निमग्न असल्यामुळें राज्यांत काय चाललें आहे ह्याची त्यास खबरही नसे. ह्या ज-हागीरदार वगैरे लोकांनीं इतर ठिकाणीं यथायोग्य आ-दरातिथ्य व्हावें अशी योजना करून ठेविली होती

मग सुमारें पंचवीस हजार फौज अमुक दिवशीं मोठ्या बंदोबस्तानें शहराचे आसपास यावी आणि चोहींकडे एकेच दिवशीं हल्ला करावा असा त्यांनीं बेत केला. ह्या कामांत माजी प्रधान रावबहादूर विश्वासराव हा मुख्य होता. तो नीतिमान्, चतुर, दक्ष व मोठा हुषार असे. उदईक प्रातःकाळीं आपल्या शहरावर हल्ला होणार असें राजा व प्रधानादि पंचक ह्यांस समजलें. तेव्हां राजानें सेनापति मदांध ह्यांस आपल्या फौजेची कशी काय तयारी आहे ह्मणून विचारलें. तें ऐकून त्यानें उत्तर केलें कीं, महाराज, आपण काहीं काळजी करूं नये. शत्रूचे धुडके धुडके उडवून टाकीन; असें धैर्याचें उत्तर ऐकून राजास मोठा धीर आला, आणि त्यानें त्यास तयारी ठेवण्याविषयीं हुकूम केला. तेव्हां तो फार बरें आहे असें ह्मणून निघून गेला.

इकडे गदाधर व शुक्राक्षादि कारभारी ह्यांची पांचांवर धारण बसली मग त्यांनीं राजाच्या संमतीनें निरनिराळ्या ठिकाणची फौज शहरांत येण्याविषयीं चोंहींकडे जासूद पाठविले. ते जासूदही पोंचून उपयोग न्हता—पोंचतात तरी कोठून! ते आयतेच शत्रूंच्या निरनिराळ्या टोळ्या येत होत्या त्यांचे हातीं सांपडले. मग अर्थातच त्यानीं त्यांस कैद करून ठेविलें. इकडे मदांध लष्करांत येऊन त्यानें सर्वांस तयार असण्याविषयीं हुकूम केला. मग कितीएक आपआपलीं हत्यारें शोधूं लागले. ज्यांचीं जवळ होतीं ते तीं जंगलेलीं असल्यामुळें साफ करूं लागले. बहुतेक तोफाही जंगून गेल्या होत्या. दारूगोळ्याचीही

तशीच अवस्था झाली होती. अशा प्रकारें फौजेची तयारी होत आहे तों प्रातःकाळ झाला. शत्रूंची फौज घेऊन तर दाराशीं भिडली. त्यांच्या वाद्यांचा गजर ऐकून भयानक व प्रधानादि पंचक ह्यांच्या आंगास थरकांप सुटला. मग तसेच ते किल्ल्यांतील वाड्याचे सहाव्या मजल्यावरचे गच्चीवर जाऊन शत्रूंची फौज किती आहे हें पाहूं लागले, तों तो सेनासमुद्रच त्यांचे दृष्टीस पडला. सुमारें दहा हजार घोडेस्वार व पंधरा हजार पायदळ चोंहींकडून आरोळ्या देतच शहरापाशीं येऊन भिडले आहे, असें त्यांनीं पाहिलें. मदांधही आपली मोडकीतोडकी सुमारें दहा हजार फौज घेऊन त्यांस सामोरा जात आहे, असें राजादिकांचे दृष्टीस पडलें; परंतु ती शत्रूंची भयंकर सेना व त्यांच्या हत्यारांचा चकचकाट व वाद्याचा गजर पाहून ह्यांचे पोटांत धडकीच भरली. इतक्यांत तोफांचे आवाज झाले; तेव्हां लढाई सुरू झाली असें ह्यांस वाटलें. मग राजानें गदाधर व शुक्राक्ष ह्यास मदांधाचे मदतीस जाण्याविषयीं हुकूम केला. तेव्हां ते मनांतून भीत; परंतु करितात काय? खालीं उतरून घोड्यावर बसून निरुपायास्तव चालते झाले.

इकडे त्यांजवर शत्रूंच्या फौजेच्या मारापुढें राजाच्या फौजेचा टिकाव निघेना. हळूहळू लोक मागें पाऊल घेऊं लागले. जंगलेल्या तोफा व खराब दारूगोळा असल्यामुळें त्यांचा अगदींच इलाज चालेना. ह्या खेरीज फितुरी लोकांनीं तर अधींच मागें पाय काढिला, इतक्यांत प्र-

धान व शुक्राक्ष येऊन पोंचले. त्यांनीं त्या लोकांस धमकावून पुढें व्हा ह्मणून सांगितलें. तें ऐकून त्यांनींही दरडावून उत्तर केलें कीं, दारू नाहीं, धड हत्यार नाहीं, पुढें जाऊन आह्मीं उगीच मरावें कीं काय? हें ऐकून ते उगीच बसले. असें हिकडे चाललें आहे तों शत्रूंनीं तोफा बंद करून पांचहजार घोडे भरधांव टाकून एकदम पुढें चाल केली. तें भयंकर स्वरूप पाहून तर आलेरे आले, असें ह्मणून राजाच्या फौजेची एकच दाणादाण होऊन गेली. ज्यास जिकडे वाट सांपडेल तिकडे तो पळूं लागला. सर्वांनीं आपापलीं हत्यारें फेंकून दिलीं. अशी दशा पाहून गदाधर, शुक्राक्ष व मदांध ह्यांनीं भरधांव घोडे टाकून किल्ल्याची वाट धरिली. अगदीं घावरून जाऊन शत्रूंच्या हातीं न सांपडतां किल्ल्यांत कसे जाऊन पोंचतों असें त्यांस होऊन गेलें. इतक्यांत शुक्राक्षाचें पागोटें पडलें, मदांधाच्या पागोट्याच्या सर्व पट्या गळ्यांत आल्या. तरी त्याकडे लक्ष न देतां तसाच तो घोड्यास मारीतच पुढें चालला. इतक्यांत मदांध घोड्यावरून खालीं पडला. मग काय विचारावें? पागोटें एकीकडे, जोडा एकीकडे, आंग धुरळ्यानें मळलें, व घोडा भलतीकडे निघून गेला. अशी अव्यवस्था झाली तरी तो पागोटें, घोडा व जोडा ह्यांचें नादीं न लागतां तसाच रस्त्यानें पळत सुटला. हा चमत्कार राजानें पाहिल्यावरून त्यास फारच वाईट वाटलें, व मोड झाल्यामुळें आपली दशा काय होईल, हें मनांत येऊन त्याची

केवरच खचून गेली. गदाधर, शुक्लाक्ष व मदांध ह्यांचीं ही चमत्कारिक तारंबळ पाहून रस्त्यांतील लोकांचें हंसतां हंसतां पोट दुखूं लागलें.

इकडे सर्व फौजेची दाणादाण होऊन आपापला जीव वांचविण्याकरितां जो तो रानोमाळ पळत आहे असें पाहून तो माजी रावबहादूर विश्वासराव प्रधान त्या पांचहजार स्वारांनिशीं पुढें आला, आणि "पळूं नका, कोणासही व्यर्थ मारण्याकरितां आह्मी आलों नाहीं" असें सांगून त्यानें सर्वांचे जीवास धीर दिला, व त्याचप्रमाणें शहरांतही चौक्या ठेवून न भिण्याविषयीं लोकांसही सांगितलें. मग सुमारें दोन हजार स्वारांनिशीं किल्ल्याकडे गेला तों, मोठी मारामार करून गदाधर, शुक्लाक्ष व मदांध हे आंत जाऊन त्यांनीं दरवाजा बंद केला होता; परंतु तेथील शिबंदी लोक फितूर होतेच. त्यामुळें तो उघडण्यास फारशी अडचण पडली नाहीं. हे लोक आंत शिरतांच राजा व त्याचें पंचक ह्यांच्या तर तोंडचें पाणीच पळालें. मग विश्वासराव ह्यानें सर्वांस पकडून कैद केलें, राजासही बंदीवान करून त्याचा तेथेंच चौकीपाहरे ठेवून बंदोबस्त केला, व बाकीच्यांस मुसक्या बांधून बंदिखान्यांत पाठविलें. मग विशालाक्षास गादीवर बसवून सर्व ठिकाणीं त्याचे नांवाचे जाहिरनामे लाविले, आणि त्यादिवशीं मोठा उत्साह करण्याविषयीं सर्व शहरांत वर्दी दिली. लोकांनींही मोठ्या आनंदानें तो दिवस घालविला.

इकडे शांतवर्मा, व धनशंकर इरावतीस येऊन पों-

चतांच त्यांस ही बातमी लागली. मग त्यांची भीति जाऊन आतां आपला यथायोग्य न्याय होईल व आपला सर्वस्वी घात करणारांचें व्हावें तसें शासन होईल, असें मनांत येऊन त्यांस अतिशयित आनंद झाला. हे इरावतीस येऊन पोंचण्याचे पूर्वींच विशालाक्ष गादीवर येऊन चार दिवस झाले होते. असो, इरावतीस ये-तांच शांतवर्मा ह्यानें आपणास हा सुदिन प्राप्त झाल्या-मुळें पुष्कळ दानधर्म करून मोठा उत्साह केला. नगरींतील लोकांस विलक्षण आनंद होऊन त्यांनींही आपापल्या शक्त्यनुसार तो दिवस सणासारखाच घाल-विला. मग अवकाश न करितां धनशंकर व सोमदत्त हे दोघेही निघून जयपुरास गेले, आणि एकांतीं विश्वास-राव प्रधान ह्याची गांट घेऊन त्यास झालेलें सर्व वर्त्तमान समजाविलें.तें ऐकून त्याचे आंगावर कांटा उभा राहिला. व धनशंकराविषयीं त्याचे अंतःकरणांत फारच दया उत्पन्न झाली. मग त्यानें त्यास बरोबर घेऊन जाऊन राजाची भेट करविली. तेव्हां त्याला पाहून हा मेलेला जिवंत कसा झाला, ह्मणून राजास मोठें आश्चर्य वाटलें. मग विश्वासराव ह्यानें सर्व हकीकत राजास सांगितली, ती ऐकत असतां राजाचे व ह्याचेही डोळ्यांतून पाणी चाललें होतें. ती समाप्त होतांच विशालाक्षास फारच वाईट वाटून, त्या कृतघ्न पुरुषांविषयीं त्यास फारच राग आला. मग त्यानें धनशंकर ह्यास सांगितलें कीं,काळजी करूं नको. ज्यांनीं तुझी अशी दशा केली त्यांस तसेंच दुःख सोसावें लागेल ह्यांत संशय नाहीं. असें

म्हणून त्यानें विश्वासराव यास भद्राक्षास कैद करून आणण्याविषयीं हुकूम केला, व ह्या कामांत जे दुसरे गुन्हेगार व साक्षीदार असतील त्या सर्वांस यथायोग्य रीतीनें आणून सर्व खटला अर्धा तयार करावा, मग दुसरें काम; असेंही त्यानें प्रधानास सांगितलें. मग ते मोठ्या आनंदानें तेथून निघून सर्व प्रधानाचे वाड्यांत आले. मग त्यानें भद्राक्षास कैद करून आणण्याविषयीं हुकूम लिहून जासुदाचे हातीं पाठविला, आणि फत्तेसिंगास कैद करून आणण्याचा हुकूम लिहीत आहे इतक्यांत धनशंकरानें सांगितलें कीं, ह्या कृत्यांतील सर्व माहिती त्यास आहे; यास्तव तो कबूल होऊन साक्ष देईल तर त्यास अपराधाची माफी मिळावी, अशा हेतूनें आह्मी त्याच्या बापासच त्याकडे पाठविलें आहे. तर तो आल्यावर जसें सांगेल त्याप्रमाणें करतां येईल. हें ऐकून प्रधानानेंही त्यास रुकार दिला. मग धनशंकर व सोमदत्त आपले बिऱ्हाडीं निघून आले.

हे बिऱ्हाडीं येऊन बसतात तों गुलालसिंग फत्तेसिंगास घेऊन तेथें आला. त्याचा चेहरा तर म्लान होऊन गेला होता. धनशंकरास पाहून त्यानें त्याचे पायांवर डोकी ठेविली, आणि ह्मणाला—मी सर्वस्वी अपराधी आहें. दुसऱ्याचे सांगण्यावरून मी करूं नये असें कृत्य केलें. आतां सरकार सांगतील तसें ऐकण्यास मी तयार आहें; परंतु माझा जीव मात्र वांचवावा. मग धनशंकरानें त्यास आश्वासन दिलें, आणि सर्व खरा मजकूर सांगशील तर तुला क्षमा होईल असें सांगितलें. मग

त्यानें आपण चिठ्या नेऊन ठेविल्याचें कबूल केलें, व शुक्लाक्षानें मुक्तामालेस मारण्याकरितां मंत्री पाठविला व तो तिला गुहेंत ठेवून दासीस मारून तिचे हातपाय तोडून घेऊन आला व तो अद्यापि बंदींतच आहे. मुक्तामालेस त्यानें व भद्राक्षानें मिळून उज्जनींत पेटींत घालून पुरलें व तिचे मुलास क्षिप्रानदीचे डोहांत नेऊन टाकिलें. ह्या कृत्यांत त्याचा दुसरा चाकर त्याजबरोबर होता, तोही हल्लीं कैदेंत आहे; त्यास मी साक्ष देण्यास कबूल करीन, असेंही त्यानें सांगितलें. हीं शुक्लाक्षमहाराजांचीं कृत्यें त्याचे कानीं आलीं नव्हतीं. तीं ऐकून त्याच्या क्रूर स्वभावाचें त्यास मोठेंच आश्चर्य वाटलें.असो, मग त्यांनीं प्रधानाकडे फत्तेसिंगास नेऊन त्याकडून सर्व त्याचे तोंडावर कबूल करविलें. मग हा अपराधी असें समजून त्यानें त्यास कैद करून ठेविलें. मग शहरांत व बाहेरील मोठमोठे गांवींही, शुक्लाक्ष व भद्राक्ष ह्यांनीं अमुक अमुक कृत्यें केलीं, तर त्यांची चौकशी आजपासून पंधरावे दिवशीं होणार, अशा प्रकारचे जाहिरनामे लाविले. त्यांवर अगर दुसऱ्या भयानकाचे मंडळीवर घातपात वगैरे केल्याची कोणाची फिर्याद असेल, तर वर लिहिलेल्या मुदतीचे आंत करावी,असेंही त्या जाहीरनाम्यांत दर्शविलें होतें. हे जाहीरनामे लागून आठ दिवस झाले नाहींत तोंच अनेक फिर्यादी झाल्या;परंतु शुक्लाक्ष व भद्राक्ष ह्यांवर मात्र दुसरी फिर्याद आली नाहीं.

धनशंकर जिवंत आहे असें समजतांच राज्यांतील सर्व लोकांस मोठा अचंबा वाटला, व त्या वि-

लक्षण चौकशीचा चमत्कार पाहण्याकरितां फार लां-
बलांबचेही लोक जयपुरास जमा झाले. शांतवर्माही सर्व
खटलं घेऊन तेथें आला. शहराबाहेर मोठा मंडप
घालण्याचा कारखाना चाललाच होता. हजारो लो-
कांचा समावेश होऊन सर्वांस दिसेल अशा प्रकारची
योजना त्या मंडपांत केली होती. मध्यें राजाचें एक भव्य
सिंहासन ठेवून दोहीं बाजूस वादिप्रतिवादी उभे राहून
ते सर्वांस दिसावे ह्या हेतूनें त्यांची ती जागा कांहींशी उं-
च केली होती. तेथून बऱ्याच अंतरावर एक उंच जागा
बायकांकरितां तयार करून त्यासभोंवती चिकाचे पडदे
सोडिले होते. ही जागा मुख्यत्वेंकरून मुक्तामाला, भाग्य-
शीला व धनशंकराची आई ह्यांकरितां तयार केली
होती. सर्व तयारी होऊन चौकशीचा दिवस आला व
आज बारांवर एक वाजतां आरंभ होणार ह्मणून आप-
णास चांगली जागा मिळावी ह्या हेतूनें दहा वाजल्या-
पासूनच लोक तेथें जमूं लागले. सुमारें बारा वाजतांना
तेथें एकच गर्दी होऊन गेली. इतक्यांत विश्वासराव
प्रधानही तेथें आला, आणि त्यानें सर्व लोकांस नीट
व्यवस्थेनें बसवून जागोजाग शिपाई ठेवून नीट बंदोबस्त
करण्याविषयीं कारकुनास हुकूम केला. मुक्तामाला
वगैरे स्त्रिया आपापल्या जागीं येऊन बसल्या. सुमारें
पन्नास हजार लोक बसतील अशी तजवीज केली हो-
ती, तरी बसण्यास जागा नाहींशी होऊन हजारों लो
कांचें सभोंवती कडें पडलें. राजाचे सिंहासनाचे दोहों-
बाजूंस रांगेनेंच, जहागिरदार, कारभारी, सरदार,

संभावित लोक वगैरे बसविले होते. तें भव्य दरबार पाहूनें च सर्वांस मोठा आनंद झाला. इतक्यांत नागव्या तरवारीच्या पाहाऱ्यानिशीं अपराधी लोक येतांच त्यांजकडे सर्वांचें लक्ष लागलें. पुढें शुक्राक्ष, मागून भद्राक्ष, त्याचे मागून पंचाक्षरी बोवा, त्यामागून फत्तेसिंग व त्याचे मागून शुक्राक्षाचे चाकर इतके लोक त्या समाजांत आणिले. मग प्रधानानें त्यांस त्या उंच जाग्यावर पिंजऱ्यांत उभें केलें. इतकें होत आहे तों उत्तमप्रकारचे पोशाख करून पुढें शांतवर्मा, मागून धनशंकर, त्यामागून सोमदत्त, त्याचे मागून गुलालसिंग व भद्राक्षानें बेटांत मुक्ताबाईच्या तजविजीकरितां ठेविलेले दोन चाकर, हे सर्वांचे शेवटीं, अशा थाटानें ते त्या समाजांत आले. मग विश्वासरावानें त्यांचा मोठा आदरसत्कार करून नेमलेल्या स्थानीं त्यांस बसविलें. इतक्यांत शिंगांचा नाद व भालदारांच्या आरोळ्या ऐकूं आल्या. तों घोड्यावर बसून मोठ्या थाटानें विशालाक्षमहाराजांची स्वारी आली. तों घोड्यावरून उतरून त्या समाजांत शिरतो तां सर्व लोक उठून उभे राहिले, आणि राजाचे नांवानें सर्वांनीं एकदम जयघोष केला. दोहींबाजूंनीं नमस्कार व सलाम घेतच राजा सिंहासनावर येऊन बसला. मग चोहींकडे नदर फेंकून तो भव्य समाज पाहतांच त्यास अतिशयच आनंद झाला. मग शुक्राक्ष व भद्राक्ष ह्यांकडे पाहतांच त्यांनीं खालीं माना घातल्या. बंदोबस्त चांगला, व काय बोलतात हें ऐकण्याविषयीं लोक फारच उत्सुक होते म्हणून, एक शब्दही न काढितां ते तटस्थ

राहिले. मग प्रधानानें राजाचे जवळ जाऊन नमस्कार करून मोठ्या नम्रतेनें विनंति केली कीं, ( बंदिवानांकडे बोट दाखवून ) ह्या तिघांनीं जीं घोर कृत्यें केलीं, तीं सरकारास व सर्व लोकांस सांगावीं ह्याकरितां सोमदत्त हुकूम मागत आहे. ( असें ह्मणून तो उभा होता त्याकडे बोट दाखविलें ) मग राजानें किंचित् हास्यवदन करून त्यास तत्काल हुकूम दिला. मग त्यानें राजास नमस्कार करून सांगण्यास आरंभ केला तो येणेंप्रमाणें:-

(हात वर करून) "ऐका ऐका" असें ह्मणतांच कांहीं गलबला झाला होता तो शांत झाला. मग पहिल्या बंदिवानाकडे बोट दाखवून तो ह्मणाला"-हा शुक्लाक्ष बहुतेकांस माहीत असेलच. हा ( शांतवर्मा ह्याकडे बोट दाखवून ) ह्यांचा चुलतचुलत पुतण्या होय. ह्यांनीं त्यास लहानपणापासून मोठ्या ममतेनें वाळगून विद्या शिकवून त्याचें लग्न केलें, आणि उभयतांचे आंगावर दहा हजारांचे दागिने घालून ते त्यांस बहाल केले. आपल्या पोटीं संतान नसल्यामुळें त्यास दत्तक घेण्याचा ह्यांचा मनसुबा होता, परंतु वृद्धपणीं एक कन्या झाल्यामुळें त्यांचा तो विचार फिरला. तरी त्याचें कल्याण व्हावें ह्या हेतूनें जामाताकडून त्यास मोठा रोजगार लावून दिला. ह्यांचे जामात धनशंकरराव दुय्यम प्रधान, हेही सर्वांस माहीत आहेतच. आतां ह्यानें चुलत्याची सर्व दौलत आपणास मिळावी ह्मणून काय काय घोर कृत्यें केलीं तीं ऐका:-भया-

नक्रमहाराज व त्यांची दुष्ट मंडळी ह्यांस पकडण्याकरितां जो बेत कांहीं परोपकारी लोकांनीं केला होता, त्याची बातमी धनशंकररावांचे हेरानें आणतांच त्यांनीं ह्यास हजार स्वार घेऊन राजाचे मदतीस पाठविलें. ती बातमी आपल्या चाकरानें आणिली असें राजापाशीं सांगून दुय्यम प्रधान बंडवाल्यांस सामील आहेत, असें त्या बंदिवानांतील एक दोन भोळ्या लोकांकडून कबूल करवून राजास सांगितलें, आणि ह्या फत्तेसिंगाकडून फितुरीच्या चिठ्या धनशंकररावांचे वाड्यांत नेऊन ठेवविल्या. फत्तेसिंगाचा बाप गुलालसिंग हा ह्यांचा चाकर ह्मणून त्यास तें कृत्य करण्यास अडचण पडली नाहीं. असो, मग अर्थातच राजानें त्यांस बंदिखान्यांत नेऊन टाकिलें. मग त्या कृतघ्न पुरुषानें ह्या तिसऱ्या बंदिवानास, मुक्तामालेस ठार मारून तिचे हातपाय आणून दाखविण्याकरितां, इरावतीस पाठविलें. मग, बंदिखान्यांत पडलेल्या पतीची गांठ घालून देतों, असें त्या भोळ्या स्त्रीस सांगून, तिला एके साडीनिशीं चोरून त्यानें बाहेर काढिलें, आणि आठ दिवसांचे वाटेवर नेऊन एके डोंगराचे गुहेंत कोंडून ठेविलें. नंतर तिचे दासीस ठार मारून तिचे हातपाय आपल्या यजमानास आणून दाखविले. सुमारें त्याच वेळेस ह्या शुक्लाक्षानें धनशंकरराव मेल्याची बातमी देववून त्यास रात्रौ खालचे बाजूचे डोहांत नेऊन बुडविलें; परंतु तेथें जवळच कोळी लोक मासे धरीत होते त्यांनीं बाहेर काढल्यामुळें त्याचे प्राण वांचले.

ह्या कृतघ्नास त्यावेळीं कृतकृत्य झालोंसें वाटलें. चुल-त्याच्या जांवयाचा व लेकाचाही प्राण घेतल्यानें आतां सर्व दौलत आपणासच मिळेल अशी ह्याची खात्री झाली. परंतु पंचाक्षरीबोवांनीं हातपाय आणिलेले पाहतां एके खुणेवरून ते दासीचे असें ह्यानें ओळखिलें. मग बोवांनीं पापवासनेमुळें जें कपट केलें होतें तें त्यांजकडून कबूल करविलें. नंतर ती मेली नाहीं, असें समजून हा लांडग्यासारखा त्या गुहेंत लागलाच गेला. ती बिचारी त्या गुहेत शोक करून करून शेवटीं एक वाट सांपडली तिकडून डोंगराचे पलीकडचे बाजूस पार पडली. त्याच दिवशीं हाही त्या मार्गानें पलीकडे गेला,आणि ती बिचारी भीतभीत रात्रीची जात असतां तिला धरूं लागला. तेव्हां, ती ओरडतांच ह्या गुलाल-सिंगानें त्या कृतघ्नास लाथ मारून खालीं पाडून तिला काळाचे तोंडांतून सोडविलें. मग तो तिला उज्जनीस घेऊन गेला. तेथें एक मुगाबाई ह्मणून तिची लांबची संबंधी आहे तिचे घरीं ती बाळंतीण होऊन मुलगा झाला. त्या मुगाबाईचा भाऊ हा दुसरा बंदि-वान भद्राक्ष; ह्यानें आपली पापवासना तृप्त करण्या-करितां त्या अनाथास फारच त्रास दिला. त्याच वेळेस शुक्लाक्षही चुलत्याचे घरीं येऊन झाल्या गो-ष्टीचें मोठें दुःख मानून तिचा शोध करण्याकरितां दोन हजार रुपये घेऊन उज्जनींत जाऊन पोंचला. मीही तिचा शोध करण्याकरितां त्याच वेळेस उज्जनींत गेलों होतों. मुगाबाईचे घरीं आपला निभाव लागत

नाहीं असें ती समजून एके दिवशीं सायंकाळीं तीन महि- न्यांचें मूल खांद्यावर टाकून, गुलालसिंगाची बहीण ते- थून एक कोशावरील खेड्यांत राहत होती, तिचे घरीं जाण्याकरितां निघाली. कर्मधर्मसंयोगेंकरून तिची माझी रस्त्यांत गांठ पडली. मग मी त्या आनंदाचे भ- रांत तिला भेटण्यास पुढें जात असतां हा कर्मचांडाळ भद्राक्ष ह्यानें मला उरांत गुद्दा मारून खालीं पाडिलें, आणि तिला मुलासुद्धां उचलून गाडींत घालून घेऊन गेला. मग त्यानें तिला एके बागेंतील बंगल्यांत कों- डून ठेविलें; तेव्हां शुक्लाक्ष व हा असे दोघे एकत्र होऊन तिचें मूल शुक्लाक्षानें तिजपासून रात्रीचें चो- रून नेलें. तरी ती आपणास कबूल होत नाहीं, असें पाहून तिला अम्मल देऊन रात्रीं पेटींत घालून पुरून टाकिलें. ह्या कृत्यांतही ठकास महाठक भेटल्यासा- रखें झालें! भद्राक्षानें आपला हेतु साधण्याकरितां दु- सरीच एक अनाथ स्त्री त्या बागेंतील बंगल्यांत नेऊन मुक्तामालेचे जागीं ठेविली. हीच मुक्तामाला अशा बुद्धी- नें शुक्लाक्षास फसवून, त्यांनीं त्या बायकोस पुरलें व शु- क्लाक्ष मुक्तामाला नेली असें समजला. मग दुसरे दिव- शीं त्यानें त्या बालकास एक कोशभर लांब जाऊन क्षिप्रा नदीचे डोहांत चाकराकडून टाकविलें; परंतु त्या चाकरास दया आल्यामुळें त्यानें बालक नदीचे कांठीं ठेवून नुस्ता दगडच आंत फेंकून दिला. काळोख्या रात्रीमुळें शुक्लाक्षास तें कृत्य समजलें नाहीं. त्या- च दिवशीं पहाटेस गुलालसिंगाची बहीण पाणवठ्या-

वर गेली तेव्हां तिला तें मूल सांपडलें. इकडे भद्राक्षानें मुक्तामालेस उज्जनीपासून सुमारें दहा कोसावरून नदीचे मध्यभागीं एक बेट आहे, तेथें आणून ठेविलें. तेथें आसपास व बेटांतही दाट व भयंकर रान असल्यामुळें मनुष्याचा संचारही नव्हता. आठ दिवसांनीं एक वेळ त्याचे चाकर मात्र तेथें जाऊन तिचा खाण्यापिण्याचा बंदोबस्त करीत असत. आतां मला गुद्दा मारून पाडल्यावर कांहीं दिवसांनीं मी चौकशी होण्याकरितां ह्याजकडेच गेलों. हा तेथील मामलेदार, तेव्हां कांहीं दाद लागेल, असें माझ्या मनांत होतें; परंतु हेच निर्दय ह्या कृत्यांत आहेत, हें मला माहीत नव्हतें! ह्यांनीं माझें ऐकून न घेतां उलटें मलाच बंदींत टाकिलें. मग ह्यांची बदली होतांच मोठ्या युक्तिनें मी तेथून सुटून गेलों तो, तेथून दोन कोशांवर उतार आहे तेथें जाऊन पोंचलों. नदी भरून चालली होती, व नाव ढकलण्यास नावाड्यांची छाती होईना. मग त्यांस सर्वांनीं दुप्पट पैसा देण्याचें कबूल केल्यामुळें, त्यांनीं नाव लोटिली. मनुष्यें फारच भरलीं व वारा सुटला तेणेंकरून नाव मध्येंच बुडाली. मला वल्हें सांपडल्यामुळें वाहात वाहावत गेलों तो त्या बेटाशीं येऊन लागलों. ईश्वराचीं करणी अगाध यांत संशय नाहीं. अशा प्रकारें मुक्तामालेची व माझी त्या बेटांत गांठ पडली. मग तिला तेथून घेऊन निघालों, तों मथुरेचे वाटेंत शांतवर्मा ह्यांची गांठ पडली. ते त्रासून यात्रेस गेले होते. तर मध्यें असें झाल्यामुळें सर्वांस किती आनंद झाला असेल, हें

सर्वांचे लक्षांत येईल. पुढें धनशंकरराव सर्व वाताहात झाली असें पाहून बैरागी बनून हिंडत होते, त्यांचीही गांठ पडली. मग पुढें गुलालसिंग मुलास घेऊन इरावतीस जात होता, त्यांचीही वाटेंतच गांठ पडली. मग अशा विलक्षण आनंदांत इरावतीस आलों तों राज्यांत असा फेरफार झाला, ही आनंदाची वार्ता ऐकिली. मग विलंब न करितां प्रधानाची व महाराजांची भेट घेतली व त्यांनीं हा आजचा प्रसंग करविला." हा दुःखकारक इतिहास ऐकून सर्वांसच वाईट वाटलें. कितीएकांचे डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या. ते अपराधी लोक यमदूतांसारखे सर्वांस दिसूं लागले. आतांच ह्यांस हालहाल करून ठार मारावें असें सर्व लोक बोलूं लागले.

राजासही सर्व वृत्तांत ऐकून गहिंवर आला. मग त्यानें प्रधानाकडून त्या अपराध्यांस विचारलें कीं, तुमचें ह्यावर कांहीं बोलणें आहे कीं काय? सर्व साक्षी तयारच होते. मग ते बोलतात काय! खालीं माना घालून रडत होते. प्रधानानें विचारतांच त्यांनीं कांहीं नाहीं, ह्मणून सांगितलें. मग राजानें प्रत्येकास शिक्षा दिली ती येणेंप्रमाणें:—शुक्राक्षास हातपाय बांधून पंधरा दिवस पर्यंत गळ्याइतक्या शेणांत व लिदींत पुरून ठेवावें. मग कांहींसा बरा करून हत्तीच्या पायाशीं द्यावा. भद्राक्षास उज्जनींत नेऊन त्याचें दुष्टकृत्य सर्वांस जाहीर करावें आणि तेथेंच फाशीं द्यावा. पंचाक्षरी ह्यास आतांच फाशीं चढवावें. बाकीच्यांस ते साक्ष देण्यास कबूल झाल्यामुळें सोडून द्यावें. असा हुकूम होतांच त्या स-

मा जादेखत बोवांस एकदम फांशीं चढविलें. मग राजानें धनशंकरास पहिल्याप्रमाणें दुय्यम प्रधानाची सनद दिली, व जप्त केलेला सर्व जिनगीही परत देण्याविषयीं हुकूम केला, आणि ज्यांवर विनाकारण जुलूम झाले होते, त्यांचीही त्याप्रमाणेंच व्यवस्था केली. मग पूर्वीप्रमाणें राज्यकारभार नीतीनें चालण्यास आरंभ झाला. हें पाहून सर्व प्रजा सुख पावून आनंदानें वर्तूं लागली. शांतवर्मा ह्यानें जावयाच्या व मुलीच्या विचारानें आपली सर्व संपत्ति व जहागीर सोमदत्तास दिली. धनशंकरानें जे लोक आपल्या संकटसमयीं उपयोगीं पडले होते, त्यांचें चांगलें कल्याण केलें. नंतर सर्व मोठ्या आनंदानें वर्तूं लागले.

समाप्त.